भू: प्रवास
सं. क्र. ३४२

म. ग्रं सं. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. ३४२

REFBK-0014260

३७०४२
पू. पं.
१७.८.६
ग्रं. [illegible]
३४२

३७०४२ ग्रंथांक
३४२ [illegible]

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रा. क्र.

# कोंकण दर्शन

द. थत्ते

REFBK-0014260
REFBK-0014260

मनोहर
ग्रंथमाला
प्रकाशन
— १२८ —

प्रकाशक :
मनोहर महादेव केळकर
मनोहर ग्रंथमाला
टिळक रोड, पुणें २.

●

सर्वाधिकार लेखकाचे स्वाधीन

किंमत चार रुपये

●

मुखपृष्ठ :
सौ. पद्मा सहस्रबुद्धे

●

३० ऑगस्ट १९६४
गोकुळ अष्टमी

●

मुद्रक :
बा. रा. वर्तक
प्रशांत प्रिंटिंग प्रेस,
४६१/१ सदाशिव पुणें–२.

# ऋणनिर्देश

सुजलां, सुफलां कोंकणांत जन्म पावलेल्या रसाळ, स्वादिष्ट, आंबे, फणस, काजू या वस्तूंनीं व तिच्या लो. टिळक, ना. गोखले, महर्षी कर्वे, रँ. परांजपे, डॉ. आंबेडकर, डॉ. चिंतामणराव देशमुख, पू. विनोबाजी व श्री. सानेगुरुजी या अनेक सुपुत्रांनीं भारतीय सीमापार, दशदिशांत कोंकणमातेचा गंध, सुगंध दरवळून टाकला व दरिद्री कोंकणच्या या वैभवानें साऱ्यांचे डोळे सुखावले. या सुपुत्रप्रसू महन्मंगल मातेचें आपणांस दर्शन घडावें अशी आंस मनांत बाळगून होतों. सुदैवानें या निसर्गसौंदर्यानें नटलेल्या पावन भूमीचें, देहभान हरवणारें दर्शन मला तीन वर्षं मुक्त मनानें घेतां आलें. कोंकणचा निसर्ग, तिथला सर्व थरांतील समाज, तिथले गड—किल्ले, देउळें-राउळें यांत व तिथल्या इतिहास, पुराण, लोककथा यांतून मला झालेलें कोंकण—दर्शन अद्‌भुत व आनंदमय होतें. बाणकोट ते बांदा या तीन साडेतीनशें मैलांची यात्रा मीं देहानें, मनानें अनेकवेळां केली; त्यांत स्वतःला विसरलों.

'नव-कोंकण'चें सह—संपादक श्री. बांदेकर यांनीं माझ्या या अननुभूत आनंदाला शब्दबद्ध करण्यास सुचवलें. 'नव-कोंकण'चे संपादक, खासदार श्री. मोरोपंत जोशी, 'बलवंत'चे संपादक श्री. गंगाधरभाऊ पटवर्धन, 'समानते'चे अजातशत्रु संपादक श्री. दादासाहेब शिखरे व 'सत्यशोधक'चे आमदार श्री. शामराव पेजे व माजी संपादक श्री. लिमये यांनीं आपल्या पत्रांतून स्थान देऊन, मला उत्तेजन देऊन, ही लेखमाला पुरी करून घेतली. जिल्ह्यांच्या भंडारी समाजानें व मुस्लीम समाजानें माझ्या लेखांचें सुवर्णाक्षरांत मुद्रण केलें, अंकांची खरेदी केली. जिल्ह्याच्या अनेक खासदार, आमदार, नामदारांनीं आपल्या पसंतीच्या शब्दांनीं मला उपकृत केलें. कोंकणच्या जनतेनें मुक्त मनानें तिचें स्वागत केलें.

हें कोंकण—दर्शन म्हणजे कोंकणची मार्गदर्शिका, इतिहास—संशोधन नव्हे. कोंकणचा निसर्ग, इतिहास, पुराण, लोककथा व समाज—मानस यांची

भक्तिभावानें केलेली ही मानसयात्रा आहे. यात्रेंत अडी–अडचणी, सोयी-गैरसोयी, अमांगल्य यांकडे दुर्लक्ष करायचें असते. स्वतःचें जीवन अधिकाधिक निर्मल, पवित्र, मंगल व्हावे म्हणून निर्मलतेचा, पावित्र्याचा, मांगल्याचाच ध्यास घ्यावयाचा असतो. एका अतिसामान्य व्यक्तीनें, आपलें जीवन निर्मलता, पवित्रता, मांगल्य यानें परिपूर्ण व्हावें या कामनेनें केलेली कोंकणची ही मानसयात्रा आहे, तसा प्रयत्न आहे. अतिसामान्य साधकाचे सारे गुणदोष त्यामुळें यांत दिसतील. वाचकांनींहि त्याच भावनेनें हें दर्शन घ्यावें अशी इच्छा आहे.

पुणें विद्यापीठाचे कुलगुरु, मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व मान्यवर साहित्यिक श्री. काकासाहेब गाडगीळ यांनीं प्रस्तावनेचा आशीर्वाद दिला व 'वाङ्मय-शोभा' मासिकाचे संपादक श्री. मनोहरपंत केळकर यांनीं या लिखाणाला ग्रंथबद्ध करून माझें कौतुक केलें. याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडेच होतील. या लिखाणांत थेट श्रुति–स्मृति कालापासून तो पू. विनोबांपर्यंत अनेक संत-सत्पुरुषांच्या अमृतमय विचारांचा आधार घेतला आहे. मी त्यांच्या कायम ऋणांत आहेच.

माझी ही वाङ्मयी–पूजा महन्मंगला कोंकणमाता व वाचक गोड करून घेतील ही आशा आहे.

१५–८–६४ — शान्ताराम द. थत्ते.

# कुलगुरु काकासाहेब गाडगीळ यांचा आशीर्वाद

श्री. शान्ताराम थत्ते यांनीं नवकोंकण, सत्यशोधक, बलवंत इ. मधून रत्नागिरींत प्रसिद्ध होणाऱ्या, कोंकणविषयक ऐतिहासिक, धार्मिक स्थळाबाबत लिहीलेल्या लेखांचा हा कोंकण–दर्शन या नांवाचा ग्रंथ प्रकाशित केलेला आहे. यामधें निरनिराळीं तीर्थक्षेत्रें तसेच ऐतिहासिक वास्तू व प्रसिद्ध पुरुष यांच्याबद्दल माहिती दिली असून ती श्री. थत्ते यांच्या प्रवाही व प्रासादिक शैलीनें वाचकांना आकर्षण करून घेते. ज्यांनीं यांतील लेख यापूर्वीं वाचले असतील त्यांनासुद्धां हें संकलन पाहून आनंद वाटेल यांत शंका नाहीं.

सती सामाई या लेखांतील मार्दव व पित्याची सहृदयता वाचून वाचकाचें मन निःसंशय हेलावून जातें. गर्भांत मूल आहे म्हणून सती न जाणारी, मुलाचें ऐतिहासिक भविष्य पुरे झालेलें पाहिल्यावर जीवित संपलें असें मानून सती जाणारी माता ही जगावयाचें कशासाठीं व मरावयाचें कशासाठीं याचा एक सुंदर आदर्श आहे.

दाभोळच्या वर्णनांत अवगत इतिहास दिला असून त्यांतील कांहीं घटना मोठ्या मनोरंजक रीतीनें सांगितल्या आहेत. वर्णन करतांना अगदीं स्वाभाविकपणें श्री. थत्ते यांची लेखणी नैतिकतेकडे धांव घेते व मग नीतिमूल्यांचें विवरण करूं लागते शौर्य-धैर्य व स्वाभिमान हे सद्‌गुण राष्ट्रीय चारित्र्याच्या अभावीं मातीमोल झालें हें त्यांचें मत सर्वमान्य होण्यासारखें आहे. पीरांच्या व संतांच्या लोककथा आल्यानें या लेखांत अद्‌भुत रसालाहि त्यांनीं वाव दिला आहे. यांत दिलेल्या घटनांतून तत्कालीन सामाजिक मन कसें होतें याचेंहि पण ज्ञान होतें. राजा बदलला म्हणजे काल बदलतो, त्याप्रमाणें राजा बदलला म्हणजे देवहि बदलतो हाहि अनुभव या लेखांत नजरेस येतो. जुनी रम्यता व महत्त्व गेल्यानंतर तेंच शहर आज उपेक्षितामध्यें दाखल झालें आहे. कालाची ही करामत मनावर विषण्णतेची छाया उत्पन्न करते.

शिरीबाबाच्या लेखांत शिरीबाबा यांचें अलौकिक व दैवी सामर्थ्य बुद्धिमंताना मान्य झालें नाहीं, तरी याबाबत तपशीलवार लिहिलें गेल्यामुळें भाविक मनामध्यें श्रद्धेला अधिक दृढता येते. शिरीबाबांच्या प्रसिद्धी-विन्मुखतेबद्दल बोलतांना त्यांचें व्यक्तित्व ' चातुर्य लपवी, महत्त्व हरवी पिसेपण मिरवी, आवडोनी । जे दिठीहि न पविजे ते दिठीविण देखिजे ' असा अनुभव त्यांच्याबाबत मालवणकरांना आला असें नमूद केलें आहे. आधुनिक संशयी आत्म्यांना हें पटणार नाहीं, तथापि ज्यांना तो आला त्यांचें भाग्य थोर म्हटलें पाहिजे.

' गूढवनांतील वाडेश्वर ' या लेखांत या पवित्र मंदिराची कहाणी दिली आहे व गुहागरवासी लोकांची प्रवृत्ति कशी असते हें सूचित केलें आहे.

संगमेश्वर शहराचें व त्याच्या ऐतिहासिक महत्त्वाचें सुंदर वर्णन रामक्षेत्र यांत दिलें आहे. प्रयत्नांना कालानुकूलता नसली तर कसें विफल व्हावें लागतें याचा इतिहास संभाजीच्या संगमेश्वरीं झालेल्या पराभवामुळें दिसून येतो. " समय समय बलवान है, नहि पुरुष बलवान । कां बे अर्जुन लुटियो, वहि धनुष वहि बाण, " पराक्रमाचा मूर्तिमान अवतार तो अर्जुन याची ही गत झाली. मग संभाजीसारख्या माणसाची झाल्यास नवल नाहीं अशी थोडीशी दैववादी दृष्टि या लेखांत दिसून येते. तसेच, सरदेसाई कुटुंबाच्या उल्लेखानें लक्ष्मी राजसत्तेच्या इशाऱ्याप्रमाणें नाचते हा अनंत काळचा अनुभव पुनः प्रत्ययास येतो.

' सवतकडा ' या लेखांतील मार्मिकता अवर्णनीय आहे. ' कुणबी सतीचा ताजमहाल ' या लेखांतील लालित्य व ' जाकाईची प्रेमकहाणी ' वाचून ताज-महाल बांधणाऱ्या शहाजहानच्या प्रेमकथेंत अभिन्नता दिसून येते. ताज-महाल हा सौंदर्याचा मानबिंदू असला तरी त्याची पार्श्वभूमि अमर प्रेमाची आहे. वास्तूला किंमत नाहीं, भावनेला किंमत आहे. लुधियानवी या पंजाबी शाहिरानें ताजमहालबाबत एक कविता लिहिली असून त्यानें आपल्या महिबूला सांगितले आहे कीं, ताजमहाल म्हणजे गरीबांच्या दीन दुःखी जीवनाची मूर्तिमंत बिटंबना आहे. गरीबांच्या श्रमावर व जुलूम-जबरदस्तीच्या सहाय्यानें बांधलेला ताजमहाल खऱ्या प्रेमाचें स्मारक असूं शकत नाहीं. तुझें स्मारक माझ्या अमर शाहिरींत अनंत काल रहाणार

आहे. क्षणभर जाकाईच्या स्मृतींत बांधलेलें मंदिर सर्वांचा ताजमहाल असें लेखकाचें म्हणणें आहे तें सार्थ आहे.

प्रवासांत भेटलेल्या पंढरीच्या वारकऱ्याचें दर्शन हेंच खरें दर्शन आहे. "वेद अनंत बोलिला, अर्थ इतुकाचि साधिला, विठोबासी शरण जावें, निज निष्टें नाम गावें" सात्विकता, तितिक्षा हीच दोन्ही जीवनाला उन्नत करणारीं द्रव्यें आहेत. केवळ साक्षरता अगर वेदांतज्ञान हीं नाहींत. चारित्र्य हें विद्येंत नाहीं आचरणांत आहे. "तो न पढो कां ब्रह्मसूत्र, न लेढो सर्वशास्त्र। सिद्धांत न हो स्वतंत्र, तयाच्या हातीं" अशा सत्पुरुषाची "आचरति पाऊलें, पाहुनि सात्विका श्रद्धा चाले" हेंच खरें श्रेष्ठ जीवन आहे.

मालेश्वराच्या वर्णनांत आधुनिक राजकारणासंबंधीं कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत. लोकशाही ही सिद्धावस्था नव्हे, साधना आहे हा निष्कर्ष बरोबर आहे. तसेच निःसत्त्व झालेलें चारित्र्य, मृत झालेले धैर्य व परास्त झालेली महत्त्वाकांक्षा कुठल्या प्रकारच्या वैचारिक जादूनें प्रभावित होतात याचा रोमहर्षक प्रपंच या लेखांत त्यांनीं केला आहे. मालेश्वर हें आतां एक पूज्य दैवत बनलें आहे व सर्वमांगल्याची आशा त्याच्यापासून भक्त करतात आणि तोहि वरदायी ठरतो अशी श्रद्धा कोंकणची जनता मानते.

कोंकणच्या वर्णनांत भार्गवराम न आला तर आश्चर्यच. परशुराम शस्त्र व शास्त्र यांचा समन्वय. 'इदं शस्त्रम् इदं ब्राह्मम्' अशी ज्याची प्रतिज्ञा त्या परशुरामानें ही कोंकणची भूमि वसवली अशी कथा आहे आणि या कथेनें कोंकणांतील व्यक्तींचें जीवन आकारित झालेलें आहे. त्याच्या आशयावर परशुरामाचा प्रभाव पडला आहे हें उघड आहे.

सोहिरोबा नाथ अंबिये यांच्यावरील लेखांत लेखकाची भावुकता उत्कट रीतीनें दिसून येते. सोहिरोबांच्या निस्पृहतेची आख्यायिका खरी वाटत नाहीं. तथापि ते निस्पृह होते ही गोष्ट दिसून आतां ते "दिसणें हें सरलें, अवघे प्राक्तन हें मुरलें। आलों नाहीं, गेलों नाहीं, मध्यें दिसणें हें भ्रांति। सगुण स्वरूपीं निर्गुण ठेलें, कर्पूर न्यायें जग हरलें" या महान् विचाराचा हा पुरुष कोंकणांतील जनतेच्या भक्तीचें स्थान आहे यांत आश्चर्य नाहीं.

गोपाळगडच्या कथेंत सिदनाक महाराची कथा हृदयाला पीळ पाडणारी आहे. अदूरदृष्टि हिंदुधर्मीयांनीं व असहिष्णु हिंदुसंस्कृति—रक्षकांनीं राष्ट्राचें केवढें नुकसान केले त्याचा वस्तुपाठ देणारें सिदनाक महाराचें हें कथानक आहे. आधुनिक कालांतहि त्यांतील बोध व मर्म घेण्यासारखें आहे.

विंध्यवासिनी, गणपती पुळ्याचा चिंतामणी, श्री हरिहरेश्वर, वेळणेश्वर, आडिवऱ्याची महाकाली यांवरील लेखहि माहितीपूर्ण आहेत.

श्री. थत्ते यांची भाषा मनाला चटका लावणारी आहे. इतिहासाचें कार्य करतांना ती भावनावश होते व मग काव्याचा सौरभ त्यांतून निघतो. घटनेंतील तात्पर्य, ऐतिहासिक स्थळांच्या दर्शनानें सुचलेले विचार यांत त्यांच्या प्रतिभेनें आपलें अस्तित्व दाखविलें आहे.

गोकुळाच्या मार्गें जातां जातां गोपींना अमोलिक वस्तू भेटली त्याप्रमाणें थत्त्यांच्या प्रतिभेला तीर्थक्षेत्रांना भेट देतांना व सत्पुरुषांच्या कथा लिहितांना कांहीं तात्विक विचारांचें अमोलिक मोती त्यांना सांपडले आहेत व मोठ्या चातुर्यानें त्यांनी तें वेंचलें असून काव्यरसाच्या सुंदर दोऱ्यानें गुंफिले आहेत. माझी खात्री आहे कीं, हें कोंकण—दर्शन सामान्य वाचकाला व साहित्यिकाला-सुद्धां आवडेल.

दिनांक १–८–६४ न. वि. गाडगीळ,



॥ ॐ ॥

श्रीमत् परमहंस वामनरावजी गुळवणी महाराज, पुणें.

यांचे परम पवित्र चरणीं—

**अगा विश्वैक धामा, तुझा प्रसाद चंद्रमा,**

**करू मज पूर्णिमा, स्फूर्तीची जी ॥**

**शान्ताराम द. थत्ते**

## कांहीं अभिप्राय—

महाराष्ट्र सरकारच्या शिक्षणखात्याचे व आतां नगरविकास खात्याचे सेक्रेटरी, संस्कृत भाषेचे महापंडित श्री. **पां. ज. चिन्मुळगुंद,** I. C. S. यांचा " **कोंकण-दर्शन** " वरचा अभिप्राय—" श्री. शान्ताराम द. थत्ते यांचे अध्यात्माच्या बैठकीवर परंतु ललित शैलीनें लिहिलेले लेख मला **फारच** आवडले. अशा तऱ्हेचें वाङ्मय मराठींत अत्यल्पच आहे. ऐतिहासिक, धार्मिक अथवा निसर्गसुंदर अशा स्थळांचें वर्णन करतांना श्री. थत्ते यांची प्रतिभा काव्यात्मक तर होतेच पण त्यांच्या प्रतिभेचा आध्यात्मिक गाभा त्यांत स्फटिकाच्या घरांत ठेवलेल्या दीपाप्रमाणें स्पष्ट व प्रशांततेनें प्रतीत होतो. प्राचीन इतिहासांतील वाईट गोष्टींबद्दल त्यांना जितकी घृणा वाटते तितकीच त्यांतील चांगल्या गोष्टींबद्दल त्यांना भक्ति व आदराची भावना आहे. हे सर्वच गुण त्यांच्या सर्व लेखांत प्रतीत होतात. पण मला त्यांचें विशेष दर्शन पीरबाबा, कुणबी सतीचा ताजमहाल व मार्लेश्वर या लेखांत झालें. लेखांच्या वाचनानें " वाचे बरवें कवित्व । कवित्वीं बरवें रसिकत्व । रसिकत्वीं परतत्व- । स्पर्शु जैसा " या श्री ज्ञानदेवोक्तीची आठवण होते. अशीच वाङ्मय-निर्मिति त्यांच्याकडून यापुढेंहि होवो हीच माझी प्रार्थना आहे.

मुंबई २१-५-६४ **पां. ज. चिन्मुळगुंद**

## श्री. दामले, मुंबई—

" **कोंकण-दर्शन** " मला फारच आवडलें. या लेखांत सारें कांहीं चांगलें मोठ्या प्रासादिक भाषेंत उतरलें आहे. त्यांत निसर्गाचें रम्य वर्णन आहे, इतिहास, दंतकथा, समाजशास्त्र, अध्यात्म यांचें सुंदर दर्शन आहे. वाचकाला मोहून टाकण्याचें, भान विसरायला लावण्याचें अद्भुत सामर्थ्य लेखणींत आहे !

**श्री. गंगाधरभाऊ पटवर्धन**, संपादक " बलवंत " संचालक " विहार, रत्नागिरी,

" तुमच्या लेखांवर लोक बेहद्द खूष आहेत. "

आमदार **श्री. भावे गुरुजी**, B. A. B. T. मुख्याध्यापक " फाटक हायस्कूल " रत्नागिरी.

" तुम्हीं " **कोंकण–दर्शन** " लेखमाला लिहून एक फार मोठी कामगिरी केलीत. तुमचे सर्व लेख आम्हांला अतिशयच आवडले "

**श्री. पंडित**, पंजाबच्या राज्यपालांचे चिटणीस—

" **कोंकण–दर्शन** " वाचून निसर्गसुंदर कोंकण डोळ्यांपुढें मूर्तिमंत उभें राहतें. "

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | निवसरच्या कुणबी सतीचा ताजमहाल | १ |
| २. | गणपति पुळ्याचा भक्तानुकंपित चिंतामणि | ९ |
| ३. | अलकनंदा–वरुणा संगमींचें ' रामक्षेत्र ' | १६ |
| ४. | अंजनवेलचा गोपाळगड | २१ |
| ५. | कोंकणचा प्रपितामह " भार्गवराम " | २८ |
| ६. | सह्य कटाहांतील मार्लेश्वर | ३४ |
| ७. | गूढवनांतील व्याडेश्वर | ४४ |
| ८. | जयगडचा ' सुताम्रपर्णी जलराशियोगी ' करहाटेश्वर | ४९ |
| ९. | मालवणचे शिरीबाबा | ५६ |
| १०. | दालभ्य ऋषींचें दाभोळ | ६१ |
| ११. | भाट्यांतील सती सामाई देवी | ६६ |

१२. चुना कोळवणचा सवतकडा ७०

१३. चिपळूणची जगन्माता
भगवति विंध्यवासिनी ७६

१४. श्री हरिहरेश्वर ८१

१५. कळकदऱ्यांतील उंच
गिरिशिखर ८७

१६. नीलप्रांगणांतील प्रसन्न
नीलकंठ ९३

१७. बेलाग दुर्ग जंजिरा
सुवर्ण दुर्ग ९९

१८. आडिवऱ्याचें श्यामल ब्रह्म १०५

१९. शंकरमौलिविहारिणी
राजापुरवासिनी विमला ११०

२०. केळशी उटंबरे येथील
कमला आणि पीरबाबा ११९

२१. तळवण्याचे भारती महाराज १२८

२२. मीम्या मांग १३२

२३. अंतरींचा ज्ञानदिवा
मालवूं नको रे १३८

ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३७०... दि: ...
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

# निवसरच्या कुणबी सतीचा ताजमहाल

कोंकणची निर्मिती करतांना ब्रह्मदेवानें ज्यावेळीं इथली सृष्टि निर्माण केली, त्यावेळीं त्याला फारच विचार करावा लागला असेल. इथल्या खडकाळ पण भव्य पर्वतराजी शेजारीच त्यानें खोल दऱ्या निर्माण केल्या. सुंदर झाडी–झुडुपांबरोबरच महाभयंकर फुरशी, व नाग निर्माण झाले. इथल्या हापूस कलमांच्या रायांबरोबरच कडू कंदांचा पुरवठा झाला. गगनचुंबी ताडमाडांपासून माणसाला व्यसनांच्या गर्तेत पाडणारीं पेयें आलीं. सुंदर मोगरी कळ्यांसारख्या भाताबरोबरच, माणसाला झिंगायला लावणारीं हरीकचीं पिकें उगवलीं. इथल्या खाऱ्या महासागराच्या बाजूलाच निर्मल, गोड, पाचक जळाचे झरे उत्पन्न झाले. बर्फासारख्या थंडगार नदींतूनच अंग भाजणाऱ्या पाण्याच्या कुंडांना स्थान मिळालें. कोंकणांतल्या-इतकी विविधता, वैचित्र्य व आंबटगोडपणा इतरत्र पहायला मिळत नाहीं. इथला कोणीच एका सरळ, सपाट रेषेवर कधींच चालूं शकत नाहीं. त्याला वक्र, ऊर्ध्व, अध अशा अनेक गती सहजच प्राप्त होतात. निसर्गाचा हा गुण इतर जीवसृष्टींतहि उतरला. ब्रह्मदेवानें इथल्या ब्राह्मणांना उत्तम कुशाग्र बुद्धि देऊन सरस्वतीची उपासना करण्यास सांगितलें. पण स्वतःच्या अहंकारानें त्यांचें ज्ञान समाजाला उपयोगी न पडतां मत्सर, हेवेदावे करण्यां-

तच फुकट गेलें. ज्ञानाची परिणती सात्विकतेंत झाली नाहीं. मग त्यानें तेजाचे अंश देऊन क्षत्रियांना चंडीची उपासना दिली. पण उन्मत्तपणानें तेजाची अधोगतीच झाली. ‘ सद्रक्षणाय ’ च्या ऐवजीं समाजभक्षणाचेंच कार्य त्यांनीं सुरू केलें. त्यानंतर कौशल्य देऊनच वैश्य समाजाला, समाजाच्या धारण–पोषणाकरतांच लक्ष्मीची उपासना दिली. पण लक्ष्मीच्या प्रसादानें इच्छित औदार्य न येतां वणिकांनीं क्षुद्र लोभालाच आत्मसात करून समाजाला व ब्रह्मदेवालाहि निराश केलें. त्यामुळें हे सारेच प्रयोग फसलेले पाहून ब्रह्मदेवानें निराशेच्या आवेगांत फक्त सात्विकता व तितिक्षा देऊनच कोंकणांतला कुणबी समाज निर्माण केला. “ सहन सर्व दुःखानाम् अप्रतिकारपूर्वकम् ” हा आद्य शंकराचार्यांचा तितिक्षेची व्याख्या करणारा चरण, जणूं कोंकणांतल्या कुणबी समाजाकडे पाहूनच त्यांना स्फुरला असावा.

रत्नागिरी जिल्ह्यांत मी बाणकोट ते बांद्यापर्यंतचा सारा मुलुख धुंडाळला. सर्वत्र मला कुणबी समाजाच्या सात्विकतेनें, तितिक्षेनें मोहित केले. जणुं पूर्वजन्माचे स्वर्गलोकांतील साधुसमुदाय, आपलें तप–तापवते तें–पुरें करण्याकरतां कुणबी समाजाच्या रूपानें जन्माला आले आहेत असं वाटतं. जिल्ह्याच्या कित्येक बाजारपेठांत चांगल्या पोषाखांच्या पण हीन मनोवृत्तीच्या लोकांकडून त्यांच्या काजूआंब्यांच्या टोपल्यांतून उघड उघड जबरदस्तीनें होणाऱ्या चोऱ्या मी पहातो. पाली हातखंब्यासारख्या दहा–वीस मैलांच्या अंतरावरून कंबर मोडणाऱ्या चढ-उतारांवरून व भर उन्हापावसांत डोक्यावर भरपूर वजनाच्या लांकडांच्या मोळ्या, काजू आंब्यांच्या टोपल्या व गवतांचे भारे आणणाऱ्या कुणबी बाया बाजारपेठेंत माती मोलानं आपल्या वस्तू विकतांना मी पहातो. पालीसारख्या ठिकाणचें एस्. टी. चें परतीचे भाडेंच जवळ जवळ दोन रुपये होतें, पण तेथून आणलेल्या या बोजांची किंमत न चिडतां हंसतमुखानें एक–दोन रुपये सांगणाऱ्या कुणबी स्त्रिया पाहिल्या कीं मला सखेद आश्चर्य वाटतें. त्या दोन रुपयांचेहि दोन आणे करणाऱ्या गिऱ्हाइकाला, आमच्या देशावरच्या रगेल बाईनें वहाणेचा नाहीं तरी निदान इरसाल शिव्यांचा अहेर जरूर केला असता. त्याच्या पितरांचा निदान उद्धार केला असता. त्या सभ्य बाईनें ग्राहकाच्या कुळाशीं आणि खिशाशीं लक्ष्मीचं किती तीव्र वैर आहे, याची तरी निदान जाणीव दिली असती. पण

येथें सारी 'नाथा घरची उलटी खूण !' अर्थशास्त्राचे सारे नियम पायीं तुडविणाऱ्या समाजाबद्दल येथें यत्किंचितहि रोषाची, वा द्वेषाची भावना नाहीं. समाजामुळें स्वतःला सोसाव्या लागणाऱ्या यातनांची खंत नाहीं. जणुं श्री ज्ञानेश्वर महाराजांचा "तेवि उन्मत्त जगें, जयासि खंती न लगे, आणि जयाचे नि आंगें, शिणे लोक" हा चरण साऱ्या कुणबी समाजानें आत्मसात करून टाकला आहे. इतर समाजाला हजारांचे लाख करण्याचें वेड, तर कुणबी समाजाला लाखाचे बारा हजार करण्याचें वेड ! पण ईश्वराची अपार कृपा या समाजावर आहे व्यवहारांत लाखाचे बारा हजार करणाऱ्या या समाजानें ईश्वराची कृपा संपादण्यांत हजारांचे लाख केले आहेत. गीता, ज्ञानेश्वरी न वाचतांहि त्यांतल्या सात्विकतेनें त्यांच्या ठायीं वस्ती केली आहे. निरक्षर असूनहि जणुं अक्षरब्रह्माची उपासना ते करीत आहेत. सद्भावना प्रकट करणारी आमच्यासारखी वाचाळता त्यांच्यांत नसली तरी "म्हणोनि सभ्दाव जीवगत, बाहेरी दिसती फांकत, ते स्फटिक गृहींचे डोलत, दीप जैसे" असे निरामय डोळे आहेत. कुणबी तुकारामासारखाच त्यांचा सारा व्यवहार आहे. देशावरच्या महाग मिऱ्यांच्या व्यापाराकरितां तो कोंकणांत उतरला, पण इथल्या व्यवहारचतुरांनीं त्याला पुरा नागवला. शेवटीं पंढरीच्या सांवळ्या परब्रह्माला, विठ्ठलाला, त्याच्या येण्याची वसुली स्वतःच्या जीवाचें मोल लावून करवून द्यावी लागली. त्या तुकारामाला ठकवणाऱ्या व्यवहारचतुरांची धनमत्ता व नामें त्यांच्याबरोबरच नामशेष झालीं. पण अव्यवहारी कुणबी तुकारामानें जमविलेलें धन, तीनशें वर्षें जाऊनहि आम्हां सर्वांना अजून संपत नाहीं !

●

रत्नागिरीजवळच्या पालीपासून ४–५ मैलांवर असलेल्या निवसर गांवांत अशीच एक बुजऱ्या चेहेऱ्याची, बारीक बसक्या अंगाची नि लाजाळूच्या पानांप्रमाणें परक्यांसमोर ओठ बंद करणारी, आगऱ्यांच्या कुळांत जन्मलेली, जाकाय दोन–अडीचशें वर्षांपूर्वी रहात होती. आगऱ्यांच्या केंबळी झोंपडींत जात्यावर बसून नाचणी दळतांना तिच्या गोड आवाजांतली गौराईचीं गाणीं ऐकायला तिच्या जवळ रहाणाऱ्या नकाय, राजाय, तुळसाय एकत्र यायच्या. जाकायचा बापूस सका, जवळच्या खोताचा कूळ होता. नकाय, राजाय,

तुळसायचे बापहि त्याच खोताचे कूळ होते. त्यामुळें त्यांच्या झोपड्याहि त्याच वाडींत बांधल्या होत्या. साऱ्यांना एकाच खोताकडे काम असल्यानें त्यांचीं सुखदुःखें समान होतीं. वर्षभर मेहनत करून काढलेल्या वरकस जमिनीच्या उत्पन्नांत खोताचा मोठा हिस्सा असायचा. त्यावर लग्नांत काढलेल्या व कधींच न फिटणाऱ्या कर्जाचा वांटा द्यावा लागे. पेरणीच्या वेळीं आणलेलं बियाणं नि खावटी, दामदुप्पट परत करावी लागे. हें सारं करतांना साऱ्या कुणब्यांच्या वांट्याला चार महिन्यांचें धान्यहि उरत नसे. राहिलेले दिवस कडु कंद, जंगलांतले फणस, कैऱ्या, हरिकाची पेजपाणी नि तेंहि नसलें म्हणजे रानांतला टाकळा व पालापाचोळा उकडून खायला उपयोगी पडे. उन्हाळा जवळ आला कीं मग याचीहि वाण पडत असे. मग एकादशी शिवरात्रींना दिवसचे दिवस मिळत. पण येवढं सारं असूनहि खोताच्या घराला, मुलाबाळांना कधीं धोका पोचला नाहीं. त्याचीं धान्याचीं पोतीं उघड्यावर राहूं शकत होतीं. त्यांच्या मुलीबाळी एकट्या दुकट्या अंगावर सोनंनाणं घालून, रात्री-बेरात्री, येत-जात होत्या. गांवचे कुणबी स्वतःच्या खांद्यावरून मेणे वाहून, सोन्यानं लडलेल्या खोताच्या लेकींना जंगलपठारावरून सासरहून माहेरीं निर्धोक पोचवीत होते. उपाशीं पोटं पापानं भरण्याची भावनाहि निर्माण होत नव्हती. साऱ्या हालअपेष्टांतून दुर्लभ संतोषाचं, तितिक्षेचंच रूप उठून दिसत होतं.

त्या वर्षी गांवकऱ्यांच्या सल्ल्याप्रमाणें जाकायचं लग्न त्याच वाडींत रहाणाऱ्या राघो गोनबरेशीं व्हायचं घाटत होतं. राघो त्याच दृष्टीनं आतां जाकायकडे पहात होता. माहेंत कवाल उतारणी करतांना, पुसांत मोडणी-भाजावणीच्या वेळीं राघोला जाकायशीं बोलायचा अवसर मिळाला होता. भादव्यांत नांगरणीच्या वेळीं गाणीं म्हणतांना जाकायला तिच्याबरोबर काम करायला असलेल्या मैत्रिणी राघोवरून चिडवायच्या. ढोलताशा वाजत, ज्यावेळीं सारे पुरुष सांपड ( गाणीं ) घालूं लागत, त्यावेळीं राघोचा इतरांपेक्षां उंच असलेला आवाज ऐकून जाकाय हरकून जात असे. गणपतीला जाकडी घालतांना राघो त्यांत मोठ्या आवेशानें भाग घेई. गोफवेणी घालतांना इतर १०-१२ गड्यांत तो उठून दिसे; तर गौरीच्या वेळच्या गाणीं-फुगड्यांत तरुण जाकाय पटाईत होती.

गांवकऱ्याचा शब्द मोडणं मोठं कठीण असतं. तो सांगेल त्या मुलाला मुलगी देणं भाग पडतं. पण एरवी, मिळणाऱ्या फायद्याकडे पाहून गांवकर वाटेल तशीं लग्न जुळवत असला, तरी राघोच्या बाबतींत तक्रारीला जागा नव्हती. त्यामुळें जाकाय-राघोला द्यायला जाकायच्या बापाला हरकत वाटत नव्हती. त्यांतून जाकाय-राघोचं एकमेकांला जीव लावणं पाहून हा जोडा अनुरूप होईल याबद्दल त्याची खात्री पटली. त्यामुळें गांवड्याला नेऊन गांवकऱ्यांनीं जेव्हां जाकाय-राघोचं लग्न ठरवलं, तेव्हां सारी मंडळी मोठ्या खुशींत आली. भटाला बोलावून मुहूर्त पक्का करण्यांत आला.

राघोकडून जाकायला सोन्याच्या पाटल्या, कानांत बुगडी, पायांत सांखळ्या, साडी, पातळ अशा त्याच्या अवसानांतल्या वस्तू घेतल्या गेल्या. सक्यानंहि राघोकरतां जथा घेतला. बाशिंग, हळद, दोरा सारं आणलं. लग्नाचा दिवस जवळ येऊं लागला. नवरीला हळद लागली. धान्यावर बसली. उष्टी हळद आणून करवल्यांनीं राघोला लावली. जिकडे तिकडे आनंदाचें वातावरण सुरू झालें. जाकायला जवळ बसवून नक्काय, राजाय, तुळसाय साऱ्या चेष्टा करूं लागल्या. आतां चांदाव धरायचा, पांढऱ्या चांफ्याच्या फुलांच्या माळा घालायच्या, लगीन लागायचं, पांच परतवनी यायचे. मग जाकाय परत येईल. मग धा पावने येऊन जाकाय राघोकडे जायची. सण व्हायचा. अशा लग्नाच्या गोष्टी करून जाकायला त्यांनीं नकोनकोसं केलं. जाकाय त्या गोड चेष्टांनीं आनंदानं फुलून जात होती.

पहांट फुलली. लग्नाचा दिवस उजाडला. सारी पाहुणे मंडळी गडबडींत होती. पण त्याच वेळीं राघोच्या मनांत काय कल्पना आली तें रवळनाथाला ठाऊक. तो जो उठला तो तडक जांबूळ भाटल्याच्या दिशेनं निघाला. झपझप पावलं टाकत तो पऱ्ह्याच्या जवळ आला. तिथल्या करंबळाच्या झाडावर चढून त्यानें एका मागोमाग एक अशीं पानेंफुलें काढायला सुरुवात केली. त्यांतच तो इतका रंगून गेला कीं, काळावेळाचं त्याला भान राहिलं नाहीं. जाकायच्या गोड आठवणी काढीत तो या फांदीवरून त्या फांदीवर असा फिरत फिरत खूप उंचावरच्या फांदीवर त्यानं पाय ठेवला. त्याच्या भारानं काडकन् फांदी मोडली. हाताच्या फांदीला त्याचा भार सहन झाला नाहीं व त्या फांदीनं दगा दिला. 'म्येलोऽम्येलोऽ' करीत राघो

खालीं येऊन जमिनीवर कोसळला. त्याचें डोकें जवळच्या दगडावर आपटून चेंचलें गेलें व तो रक्तबंबाळ होऊन त्याची शुद्ध गेली.

त्याच्या त्या अति हाकाऱ्यानं वाडींतल्या साऱ्या लोकांच्या जीवाचं पाणी पाणी झालं. सारे पऱ्ह्याच्या बाजूला हातांतलीं कामं बाजूला टाकून पळत सुटले. लहान पोरंटोरं सारे बघायला धांवले. राघोची अवस्था पाहून साऱ्यांचे जीव उडाले. कुणी पाणी शिंपी, तर कुणी वारा घाली. कुणी त्याला खालीवर करून पाहूं लागला, तर कुणी त्याच्या हृदयाचा तपास घेऊं लागला. पण आतां उपाय करण्यासारखी राघोची स्थिति नव्हती. त्याचा श्वास थांबला होता. त्याच्या प्राणाचं पांखरूं केंव्हांच आपला पिंजरा सोडून उडालं होतं. त्या रिकाम्या पिंजऱ्याकडे पाहून आक्रोशाचा एकच हलकल्लोळ उठला.

जाकायच्या कानांवर तो स्वर पडतांच ती कावरीबावरी झाली. तिला चैन पडेना. हळद लावलेल्या, साजशृंगार असलेल्या अंगानं ती उठली. तेवढ्यांत आलेलं, राघोच्या मृत्यूचं वर्तमान ऐकून मोकाट वाऱ्यानं हलणाऱ्या केळीसारखी ती थरथर कांपूं लागली. ज्याच्याशीं एकरूप व्हायच्या आशेनें ती आज सजून तयार झाली होती, त्यानंच तिला सोडलं होतं; त्यानंच तिच्या आशाचा चक्काचूर केला होता. तिचे मायबाप या धक्क्यानं सुन्न होऊन डोक्याला हात लावून बसले होते. दिवाळीच्या पाडव्याचा आज शिमगा झाला होता. ओक्साबोक्शी रडतां रडतां जाकायच्या मनाचा तोल सुटला होता. ती असहाय्य, दीन झाली होती. तिच्या तोंडाशीं आलेला अमृताचा पेला काळानं निर्घृणपणानं दूर फेंकून दिला होता. तिच्या सुकुमार जीवनपुष्पाला पायदळीं तुडवलं होतं.

पण थोड्याच वेळांत जाकायचं रडणं थांबलं होतं. तिचे लहानसे नाजूक ओठ घट्ट मिटले गेले. डोळ्यांतला पाण्याचा पूर गुप्त झाला. ती मनाशीं कांहीं निर्धार करून बापाजवळ गेली. राघोबरोबर सती जाण्याचा तिचा निश्चय ऐकून सारे स्तिमित झाले. आईबापांनीं लग्न न झालेल्या परपुरुषाबरोबर सती जातां येत नाहीं, असा शास्त्रार्थ मायेपोटीं दाखवला. आईनं आकांत करून तिला समजावलं.

पण जाकाय अभंग होती. तिचा निश्चय बदलेना. तिचं एकच म्हणणं

होतं. ज्यालं मी आपला जीव लावला, ज्याला मी आजपासून भरतार मानला, तो चार अक्षता न पडल्यानं दुसरा मनुष्य ठरूं शकत नाहीं. तिच्या या हट्टानं शेवटीं बाप चवताळला; " येवढी तूं पाणीदार आहेस, तर लाथ मारून दगडांतून पाणी काढून आम्हाला दाखव. तुझं सतीत्व आम्हांला पटेल असं सिद्ध कर. म्हणजे तुझा हा भलता हट्टहि आम्ही पुरवूं ! " म्हणून मायेपोटींच तिला त्यानें कठोर शब्दांत सांगितलें.

जाकाय उठली. कुणबी समाजांतलं सारं सत्व, तेज जणुं तिच्याबरोबर परीक्षा द्यायला सिद्ध झालं ! " मी जिथें लाथ मारतांच पाणी निघेल, तिथें लोकांच्या उपयोगाकरतां तळी बांधा. जिथं मी प्राण सोडीन तिथं आमच्या खऱ्या प्रेमाचं पवित्र मंदिर बांधा, " असं सांगून, ती राघो पडला होता, त्या पऱ्ह्याच्या बाजूला झपझप चालूं लागली. सारे गांवकरी पाव्हणे व आईबाप तिच्या मागोमाग निघाले. जाकायला आतां घाई झाली होती. ती विद्ध हरिणीच्या वेगानं नि मनानं राघोचं कलेवर जिथं पडलं होतं, त्याच्याजवळ येतांच तिनं एका प्रचंड शीळेवर जोरानं लत्ताप्रहार केला. त्याचबरोबर अद्‌भुत चमत्कार झाला. तिच्या पायानं त्या प्रचंड दगडाचा एक खपला उडाला व त्यांतून खळखळ करीत पाण्याचा एक प्रचंड ओघ बाहेर पडून सोसाट वाहूं लागला. सारे आश्चर्यानें दिङ्मूढ झाले. पण जाकायला थांबायला वेळ नव्हता. ती तशीच पुढें झाली. राघोच्या निष्प्राण शरीराजवळ येऊन ती खालीं बसली. त्याच्या दृष्टिहीन डोळ्यांना तिनें आपली नजर भिडवली. आणि एका क्षणांत ती त्याच्या अंगावर कोसळली. तिची प्राणज्योत राघोच्या प्राणज्योतीबरोबर अनंतांत विलीन झाली.

जगावेगळ्या प्रेमाचा हा अद्‌भुत प्रकार पाहून सारे चकीत झाले. राघो-जाकायच्या अमर प्रेमाची स्मृति कायम ठेवण्याकरतां त्यांच्या पवित्र कलेवरांवर एक देऊळ बांधण्यांत आलं. गरीब कुणबी समाजानं बांधलेला हा अमर प्रेमाचा, अतीव निष्ठेचा संदेश देणारा ' कुणबी बाईचा ताजमहाल ' आहे. काळ्या कृत्यांनीं पांढऱ्या दगडांच्या राशी उभारून स्वतःच्या आसुरी वैभवाचा, स्वैर विलासाचा, निष्ठाहीन जीवनाचा लोकांना विसर पडावा म्हणून बांधलेला ढोंगीपणाचा हा मनोरा नव्हे. सत्वशील पण गरीब माणसांनीं मोठ्या इमानानें, कष्टांनीं बांधलेलं अनाघ्रात सुवर्णचंपकाचं हें

पवित्र मंदिर आहे. इथं बिजलीच्या दिव्यांचा तोरा नसेल पण निरांजनाची शांतिदायक पवित्रता आहे. इथं सोन्याचांदीचा लखलखाट नसेल, पण देवाला वाहिलेल्या पुष्पांची कोमलता, सौंदर्य आहे. गरीब कुणबी समाजानें बांधलेलं हें साधं देऊळ, जाकाय देवीची तळी, निवसरच्या साऱ्या सत्वशील लोकांचं अभिमानाचं स्थान आहे. जाकायच्या मंदिरांत येऊन लोक सद्‌बुद्धि देण्याची प्रार्थना करतात व जाकायच्या तळीचं निर्मल, गोड व पाचक पाणी पिऊन तृप्त होतात.

जाकायचं मंदिर बांधलं त्याच सुमारास कोंडवीच्या विठ्ठल मंदिरांतील मूर्तीच्या मानेला तडा गेला होता. त्यामुळें गांवकऱ्यांनीं एक सुंदर मूर्ति तयार करवून घेतली. पण रात्रीं गांवच्या प्रमुखाला स्वप्नांत दृष्टांत झाला. “ म्हाताऱ्या वडिलांना तुम्ही घालवून देत नाहीं, मग मलाहि घालवूं नका. नवीन मूर्तीची सात्विक वृत्तीच्या निवसरांत रहाण्याची इच्छा आहे. ” हा स्वप्नांतील दृष्टांत साऱ्यांना मान्य होऊन, निवसरांत नव्या मंदिरांत नव्या मूर्तीची स्थापना होऊन, त्या ठिकाणीं उत्सव सुरू झाला. आजहि तुम्ही निवसरला गेलांत तर जाकाईचं मंदिर, ती तळी, तो सांवळा विठ्ठल तुम्हाला स्फूर्ति देईल. आजहि निर्व्यसनी, सात्विक वृतीचे तिथले लोक तुम्हाला मोठ्या प्रेमानं या साऱ्या गोष्टी ऐकवतील. आजहि राघोच्या मधुर पांवरीचे, जाकायच्या गोड गाण्यांचे आलाप, पक्ष्यांच्या गोड किलबिलीसह या पऱ्ह्यांतून येतांना तुम्हांला ऐकूं येतील व त्या गोड संगीतानें तुम्ही धुंद होऊन देहभान विसराल.

• • •

# गणपतिपुळ्याचा भक्तानुकंपित चिंतामणी : २

विशाल आकाराच्या, अलंकारांनीं चमचमणाऱ्या अंगाच्या, वेगवान्, चपळ, हजारों शिस्तबद्ध हत्तींचा प्रचंड थवा, आपल्या वळवळणाऱ्या सोंडांनीं सलामी देत, एखाद्या विस्तृत सपाट मैदानावरून धांवत, आपल्या सम्राटाकडे यावा, तशा गणपतीपुळ्याच्या अतिविस्तृत, प्रसन्नतेनें हंसणाऱ्या किनारपट्टीकडे, सागराच्या प्रचंड, लांबच लांब पसरलेल्या भव्य, चमकणाऱ्या लाटांचे थवेच्या थवे, एकामागून एक अखंडपणें, किनाऱ्यावर असलेल्या आपल्या विश्वसम्राटाकडे अधोमुख होऊन, नम्रतेनें 'ॐ-नमोव्रातपतये, नमो गणपतये, नमः प्रथमपतये' असा गगनभेदी सुघोष करीत, वळवळणाऱ्या जलौघाच्या सोंडांनीं शुभ्रधवल फेसांचे हार उडवीत, जणूं सलामी देत, किनाऱ्यावर येऊन भुईसपाट साष्टांग प्रणिपात करीत आपलें जीवन धन्य धन्य करीत असतात. त्यांच्या श्रमपरिहारार्थ पश्चिम मलयाचें अखंड गुंजन, त्यांच्या कळपाभोंवतीं चालू असते. किनारपट्टीवर शिस्तीनें पण दाटी करून उभे असलेले हजारो सेवाभावी माड आपल्या या सम्राटाच्या सेवेला जय्यत तयार होऊन, त्याच्यावर आपल्या गगनचुंबी चवऱ्या ढाळीत असतात. या सम्राटाच्या सेवेला असलेल्या, हिरवा शालू, पांघरलेल्या वनलतांचीहि मोठीच लगबग चालूं असते. प्रसन्नतेचा सर्वदूर शिडकाव

करणाऱ्या, सुवर्णमय किरणांचाहि संचार, या सम्राटाचें वैभव खुलवीत असतो. आपल्या सदाचारानें व सद्विचारानें प्रसिद्ध झालेले, तेजस्वी ब्रम्हज्ञानी, या सम्राटाला "गणानां त्वा गणपतिं हवामहे, कविं कवीनामुपमश्रवस्तम ज्येष्ठराजं ब्रम्हणां ब्रम्हणस्पत, आनः श्रृण्वन्नूतिभिः सीद सादनम्" ॥ "हे साऱ्या समुदायाच्या प्रभो गणपते, तूं ज्ञानी जनांत अत्यंत ज्ञानी, कीर्तिवंतांत वरिष्ठ, राजांचाहि अधिराज असल्यानें आम्ही तुला तुझ्या सर्व महान् शक्तींसह आमच्या या ठिकाणीं विराजमान हो" असें आवाहन करीत असतात.

गृत्समद ऋषींनीं देववाणींत स्तविलेल्या या महान् सम्राटाची स्तुतिस्तोत्रें गगनीं विहार करणारी पक्षीजातहि, आपल्या मंजुळ वाणीनें गात असते. रक्त वर्णाचा, विशाल उदर असलेला, हत्तीच्या कानांनीं शोभणारा, रक्तचंदन फांसलेला, तांबड्या पुष्पांनीं पूजिलेला, व सत्व, रज, तमांच्या पलिकडचा हा देव भक्तांना फार प्रिय आहे. त्याच्या कृपेनेंच ते 'योगीनां वरः' असे ठरले. शब्दाच्या पोंचीपलीकडे असलेला हा गणराज भक्तांकरतां 'शब्दसहः' झाला आहे. समुद्रतीरावर वसलेला हा अद्वितीय मेरूच सच्चितानंदस्वरूप गणेश आहे, या भावनेनें भक्तजन त्या भोंवतालच्या चिरेबंदी लाल पाखाडीवरून त्याला "देवा तूंचि गणेशू, सकलार्थ मति प्रकाशू" म्हणून प्रदक्षिणा करीत असतात. देवाच्या गर्भागारापासून तों धर्मशाळेपर्यंत अनंताची ओढ लागलेले अनेक जीव आपल्या सुमधुर कंठातून अथर्वशीर्षांचे गंभीर घोष करून सारे आवार "नाम घोष गौरवें" धवलीत करतात. जीवनांतील सारे पापताप, नेत्रांतल्या गंगायमुना जलांचा अभिषेक करून ते शुभ्रसत्व करीत असतात. "या क्षुद्र देहाचा विसर पाडी मज" म्हणून आर्त हांक देतात. इ. स. १६०० च्या सुमारास प्रगट झालेला हा चिंतामणी अनेक सकाम भक्तांच्या चिंता दूर करून नामरहित असूनहि नांवारूपास आला. इथल्या रमणीय, निसर्गसुंदर, पवित्र क्षेत्रांत प्रकट झालेल्या अनंताचा शोध करावा, 'मी' चा विसर पडून 'तत् त्वम् असि' असा अनुभव यावा, भक्तांकरतां वाढून ठेवलेल्या या ब्रम्हरसाचें पारणें आपल्यालाहि फेडतां यावें, या महनीय आकांक्षेनें अनेक दूरदूरचे गाणपत्य इथें येऊन अनुष्ठानें, उपवास करून जीवनांत गुप्त झालेला ब्रम्हरस

राजापुरी गंगेसारखा उफाळून यावा म्हणून प्रयत्न करीत असलेले दिसतात. या संतसंगाच्या पवित्र वातावरणानें माणूस भारावतो. त्या वाङ्मय, चिन्मय, ब्रम्हमय, सच्चिदानंद, अद्वितीय अरूपाचें रूप, गुण, इतिहास, पुराण शोधायला तो उत्सुकतेनें लागतो. या अनंताचा अंत पाहाण्याकरतां त्याचा जीव आसुसतो व त्या दिशेनें तो प्रयत्नशील बनतो.

वेदकालांत आदिनाथ शंकरांच्या गायत्री तंत्राचे रहस्य विवरणाच्या ग्रंथाचें लेखन याच विद्याधरानें केलें. अप्रतिम प्रतिभेच्या महर्षी व्यासांचें अठरा पर्वांचें महाभारत, त्यांची अर्थ समजून लिहिण्याची कठीण अट पाळूनहि याच पार्वतीनंदनानें उरकलें आहे. वराहपुराणांत महादेवानें त्याला ध्यानानेंच साकाररूप दिलें. पण जगन्माता पार्वतीला तें न आवडल्यानें तिनें त्याला गजमुखाचा बनवला आहे. स्कंद पुराणानें दुसरीच हकीकत या अजन्म्याच्या जन्माची दिली आहे. मुलाची आवड असलेल्या पार्वतीनें मनोवांछित पुत्रकामनेला मृत्तिकास्वरूपांत साकार केलें. त्यावर कार्तिकस्वामीनें गजमुख बसवून त्याला चालताबोलता केला. दुसरं पुराण सांगतं कीं, पार्वतीच्या गर्भांत या बाळाचें अस्तित्व असतांना आपल्या या भावी वैऱ्याचें, सिंदुरासुरानें मस्तक छेदून टाकलें व तें नर्मदेंत टाकून दिलें. नर्मदेंत अजूनहि लालभडक झालेले त्याचें अंश सांपडतात. पुढें विष्णूनें पार्वतीची समजूत घालून त्यावर एका उन्मत्त ऐरावताचें मुख चिकवटून दिलें. आणखी एका पुराणाला निराळाच शोध लागला. वैशाखस्नानानंतर दुर्मति राक्षसाचा वध करण्याकरतां मातीची मूर्ति देवांनीं तयार केली. सद्बुद्धिदात्या गणरायानें प्रार्थनेनंतर त्यांत स्वतःचा प्राण ओतला व भगवान् विष्णूंनीं आपल्या पुष्टीनामक कन्येचा त्याच्याशी विवाह लावून दिला. पण या लग्नाला इतर देवांबरोबर शनी महाराज आले होते. ते आपला प्रभाव ( ! ) जाणून डोळे मिटून बसले होते. पण हा अजब पाहुणा या आनंदाच्या प्रसंगीं दुर्मुखलेला पाहून पार्वतीनें त्याला बळें बळें डोळे उघडायला लावलें. पण शनी महाराजांचाच प्रभाव तो. नवरदेवाचें डोकें त्याच्या एका दृष्टिक्षेपासरशी गळून पडलें. जिकडे तिकडे हाहाःकार उडाला. शेवटीं शंकरानें या नवरदेवाला गजमुख चिकटवलें व मगच लग्न थाटानें पार पडलें.

एकदां इंद्रसभेंत, इंद्राच्या अधिकारांत असलेल्या क्रौंच नांवाच्या गंधर्वानें वामदेवाला लाथ मारली. त्या ऋषींच्या शापासरशीं तो गंधर्व मूषक रूपानें पाराशर ऋषींच्या आश्रमांत शिरून धान्य फस्त करूं लागला. पाराशरांच्या प्रार्थनेवरून गजाननानें त्या उंदराला मुसक्या बांधून आपलें वाहन बनवलें.

लहानपणापासूनच गणेशाला वीरतेचे, धैर्याचे धडे मिळाले होते. एकदां शंकर-पार्वतींचा एकांत चालला असतां गजानन द्वारपालाचें काम करीत होता. भगवान परशुराम आपल्या गुरूच्या आदिनाथाच्या दर्शनाला आले असतां हा इद्दकला त्यांना आंत सोडीना. एवढेंच नव्हे तर त्या दोघांच्या झोंबींत परशुरामाच्या हातून त्याचा एक दांत मोडून त्याला एकदंत नांव प्राप्त झालें. पराक्रमाबरोबर याची बुद्धीहि अप्रतिहत होती. एकदां पृथ्वी प्रदक्षिणेची पैज यानें आपल्या ज्येष्ठ बंधू कार्तिकस्वामीबरोबर लावली. आजच्या आपल्या अनुभवाप्रमाणें त्यावेळींहि मोठे भाऊ सरळ, एकमार्गी, जरासे बावळट असण्याच्या नियमाला अपवाद नव्हता. बिचारा कार्तिक खरी पृथ्वी-प्रदक्षिणा करून येतो तों हे महाशय स्वस्थपणें आईच्या मांडीवर लोळत बसलेले आईबापांना प्रदक्षिणा घालून विनाश्रम यांनींच पैज जिंकली होती. आशुतोष भोळ्या महादेवानें आपलें आत्मलिंग रावणाच्या स्वाधीन केलें तेव्हां साऱ्या देवलोकांत हाहाःकार उडाला. पण गोकर्ण महाबळेश्वरला, लघुशंका करणाऱ्या रावणानें अट मोडतांच या बाल गजाननानें ते तिथेंच कायमचें स्थानापन्न केलें व देवांना संकटांतून सोडवतानाच गंगाधरभक्तांची दक्षिणेंत सोय करून ठेवली. दातृत्वाच्या अहंकारानें फुगलेल्या जनक राजाचा गर्व या लंबोदरानें आपल्या लंब-विशाल उदरांत त्याच्या सर्व संपत्तीचे मोदक रिचवून उतरवला व गरीब त्रिशिरा ब्राह्मणाच्या साध्या दुर्वादलानें त्यानें तृप्तीची ढेकर दिली.

गणेश पुराण, मुद्‌गल पुराण, यांतून या कधीं सिंहारूढ, कधीं मयूरारूढ तर कधीं मूषकारूढ असलेल्या गणपतीनें केलेल्या महापराक्रमांची हकीकत कळते. काशी राजाचा बचाव यानें आपल्या अस्त्रांनीं अनेक राक्षसांना मुक्ति देऊन केला. त्रेतायुगांत माजलेल्या सिंदुरासुराला यानें पाणी पाजलें, तर द्वापारयुगांत सिंदुरासुराचा वध केला. कलियुगांतहि हा धूम्रकेतू या

नांवानें अवतार घेणार आहे. कामक्रोध इत्यादि सर्वांना छळणाऱ्या राक्षसांवर या योगेश्वरानें जय मिळविले त्यांचें त्या पुराणांत वर्णन आहे तो अत्यंत महान योगी, गणिती व मंत्रज्ञ होता. त्याच्या सहस्रनामांत त्याच्या सर्व गुणांचें चिंतन अपेक्षित आहे.

गृत्स, व्रात, गण, विरूप इत्यादि लोकसंघांचा हा लोकनियुक्त विशेष नायक–आजचा राष्ट्रपति–असावा व अशीं अनेक लोकशाहीवादी राष्ट्रें त्या वेळीं या महाभारतांत नांदत होतीं. आकाशांतही ग्रहनक्षत्रांच्या गणांत खगोल–शास्त्रज्ञाचा गणपति आहेच. बुद्ध, जैन, धर्मांत, चीन, जपान, इंडोनेशियांत, आफ्रिकेच्या कांहीं भागांत गणेशाचें अस्तित्व आढळून येतें. भारतांतहि छप्पन्न गणेश प्रसिद्ध असून काशीचा ढुंढीराज, हिमालयांतला मुंडकटा हे गणपति विशेष भक्तप्रिय आहेत. ‘ कलौचंडी विनायकौ ’ हेच गणेशभक्तांना सिद्धीदायक वाटत असल्यानें व पेशव्यांसारखे सत्ताधारी एक वेळ त्यांचेच उपासक असल्यानें महाराष्ट्रांत अष्टसिद्धी विनायक प्रसिद्ध आहेत. हेदवी येथील दशभुज विनायकाचें स्थानहि खूप जुनें व प्रसिद्ध आहे.

या गणेशाचा उत्सव माघीं व भाद्रपदीं सर्वत्र साजरा होतो. एकदां विशाल उदर गणराज, उंदरावरून घसरून पडल्यानें चंद्र हंसला. गणेश चतुर्थीला, अनंत दर्शनाचा प्रयत्न करायचा असल्यानें चंद्रदर्शन शापरूप झालें. चतुर्थी म्हणजे जाग्रत, स्वप्न, सुषुप्ती या तिघींच्या पलीकडची चतुर्थ – तुरीय – अवस्था. त्या दिवशीं चंद्र पहायचा नाहीं. कारण चंद्र ही मनाची देवता, मन हें चंद्राप्रमाणेंच एका अवस्थेत न राहणारे, अति चंचल. जेव्हां हें मन उन्मन होईल, तेव्हांच तुरीय अवस्था साधून अनंताचा शोध लागायचा. साधूनें खळांची व्यंकटी सांडायची तशी अनंताच्या उपासनेनें मनाचें मनपण मोडून “ त्वं आनंदमयः, ब्रह्ममयः, सच्चिदानंदरूप ” असा अनुभव घ्यायचा अशी या विनायकाची उपासना आहे.

इ. स. १६०० च्या सुमारास हा विघ्नराज गणेश *गुळयाला होता.

*गणपति-पुळे येथील गणपति पांवस गांवाजवळच्या गुळे या गांवीं प्रथम होता. गुळे येथील एक रजस्वला स्त्रीनें विटाळ कालवला व भिडयांनीं त्याच-वेळीं पुळयाला तपस्या केली म्हणून तो तिथे गेला. गुळे गांवचे मंदिर आजतागायत मूर्तिविना राहिलें आहे, हा इतिहास आहे.

पण पुळ्याच्या बाळंभट भिड्यांवर एकदां सांकडें पडलें. मानवी उपाय हरल्यानें, शेवटीं त्यांनीं गणेशाचे पाय धरले, त्याची कडक उपासना सुरू केली अथर्वशीर्षाचे अखंड पाठ ते करूं लागले. पुळ्याच्या सागर किनारीं असलेल्या मेरूवर ते साधना करूं लागले. अनंताचा चिंतामणी करण्याचा निश्चय करून ते धरणें धरून बसले. त्यांना जेवणखाण सुचेना. संसार काकविष्ठेप्रमाणें वाटूं लागला. देहाची आसक्ति खुंटली. अनंताचें चिंतन करतां करतां त्यांचें देहभान गेलें. एका सुप्रभातीं त्यांना दृष्टांत झाला. गाय ज्या ठिकाणीं आपली धार सोडील तिथें मी आकाराला येईन. बाळंभट घाईघाईनें पहांटेच्या फुलल्यावेळीं डोंगर हिंडूं लागले. फिरत फिरत ते समुद्रकिनाऱ्याला केतकीच्या बेटांत शिरले तिथें एक कपिला आपल्या दुधाच्या अमृत धारा एका ठिकाणीं सोडीत होती. भिड्यांनीं सारी भीड सोडली. वेळूंचें, केतकीचें तें बेट त्यांनीं साफ केलें. तिथें तो भालचंद्र त्यांची वाटच पहात होता. डोळ्यांतल्या अमृतधारेची धार त्यांनीं धरली. त्या चिंतामणीच्या चरणीं ते रुद्ध कंठानें आपलें गाऱ्हाणें सांगूं लागले. त्यांच्या चिंता दूर झाल्या. मुख उजळलें. मंगलमूर्ति मोरयाच्या जयघोषानें आसमंत दुमदुमून गेला.

बाळंभटांच्या साऱ्या कामना गळून पडल्या. ते निरहंकार वृत्तीनें, निष्काम भावनेनें त्या गजाननाची सेवा करूं लागले. त्यांच्या भक्तीची, श्रद्धेची छत्रपती शिवाजीनें दर्शन घेऊन पोंच दिली. त्यांचे सचीव अण्णाजी दत्तो यांनीं स्वखर्चानें देवालयाचा गाभारा बांधला. पुढें राजाराम महाराजांनीं जमीन इनाम देऊन आपली भक्ति प्रकट केली. नेवऱ्याचा जोगदेव भट बर्वे यानें आपली बहिण पेशवे बाळाजी विश्वनाथ यांना देऊन त्यांचा संबंध पुळ्याशी जोडला. पेशव्यांचें कुलदैवत गणपति. त्यामुळें थोरल्या माधवराव पेशव्यांपर्यंत साऱ्या पेशव्यांनीं या स्थानाला आपल्या देणग्या देऊन आपलेंसें केलें. बाजीरावाचा सरदार गोविंदपंत खेर बुंदेले यानें आपल्या उत्तर विजयानिमित्त चिरेबंदी पाखाडी मेरूपर्वताभोंवतीं बांधली. थोर पराक्रमी सेनापती परशुरामभाऊ पटवर्धनांचे हें कुलदैवत. त्यांच्यापासून सुरू झालेला गणपतीसेवेचा ओघ, त्यांचे वंशज सांगली, मिरज, कुरुंदवाड जमखिंडी, तासगांवकर पटवर्धन अजूनहि चालवीत आहेत. या परिसरांत सामान्य कुळांत जन्मलेले गणपतिभक्त श्रेष्ठपदाला जाऊन गणांचे पति

झाले; गणपतीच्या भक्तीनें त्यांनीं आपलीं जीवनेंहि फुलवली.

गणपतीपुळ्याचा हा सारा इतिहास ऐकून, उन्मत्त समुद्र–गजांचें तांडव पाहून व तिथल्या प्रसन्न वातावरणानें मोहून, मनुष्य त्या चिंतामणीला प्रार्थना करतो कीं " उत्तिष्ठ कमलाकांत, त्रैलोक्यं मंगलं कुरु । "

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३५०७८ दि:
क्रमांक ३७२ नों दि

# अलकनंदा—
# वरुणा—संगमींचें ' रामक्षेत्र ' : ३

रात्रीच्या दाट काळोखांत श्रुतिमधुर असे वेणूचे नाद, निसर्गरम्य नदीतीरावर आल्हाद देत असावेत, पण त्या बन्सीधराचा पत्ता लागूं नये, कानांवर दुःखित अबलेचे विलाप ऐकूं यावेत, पण त्या दुःखितेचा ठावठिकाणा कळूं नये, त्याप्रमाणें ज्या ठिकाणीं अनेक संस्कृतींची जडणघडण व्हावी, पण त्यांचे फारसे साक्षीदार सांपडूं नयेत, याचें माझ्यासारख्याला अतीव दुःख होतें.

सह्याद्रीच्या कुशींत जन्म घेऊन, त्या दरिद्री पण रम्य माहेरच्या त्यागानें रत्नाकरासारख्या श्रीमंत सासरीं जातांनाहि अलंकनंदा व वरुणेला जें दुःख झालें, त्या दुःखानें त्यांच्यांतील सारे पाणीच आटून गेलें, पण त्या तशाच, कोंकणचा प्रपितामह जो परशुराम त्याच्या तपस्येच्या स्थानापर्यंत येऊन एकमेकींच्या गळ्यांत पडल्या. रत्नाकर सागरानेंहि त्यांचें माहेरप्रेम पाहून आपले दूत त्यांच्यापर्यंत पाठवून त्यांचीं समजावणी केली. गुप्तरूपानें असणाऱ्या या संगमाला ' रामक्षेत्र ' असें म्हणतात. स्वतःच्या मातेच्या प्रेमानें ज्यानें पृथ्वी निःक्षत्रीय करण्याचें ठरवून सत्तेनें माजलेल्या क्षत्रीय राजांचा संहार करता करतां स्वतः क्षात्रियत्व पत्करून पृथ्वी स्वतःच्या रूपानें ' क्षत्रियच ' राहिली आहे, असा अनुभव घेतला व त्या बोधाचा

'मर्यादा पुरुषोत्तम श्रीरामानें' साक्षात्कार देतांच ज्यानें तपस्येकरतां साऱ्यांचा त्याग करून अलंकनंदा-वरुणा संगमाचें हें स्थान पसंत केलें त्या परशुरामाचें हें एक तपस्या-स्थान आहे. तेथेंच मंगलानां च मंगलम् शिवाची आराधना सुरू करून, त्याकरतां संगमावरच त्यानें मंदिराची स्थापना केली' या पवित्र भूमीलाच ' कसबा संगमेश्वर ' म्हणतात. इथें अनेक संस्कृति आल्या, वाढल्या व पुढें गुप्तरूपानें आजपर्यंत नांदत आल्या. या क्षेत्राचें महत्त्व वाढत गेलें. भारताच्या संस्कृतीची, साहित्याची, कला-शिल्पाची चढउतार करणाऱ्या पेठा म्हणजे नद्यांचे संगम ! नद्यांचें मूळ व ऋषींचें कुळ शोधूं नये म्हणतात. पण मानवाची सारीं इतिहास-पुराणें म्हणजे या भवताप-हारिणींचीं इतिहास–पुराणें होत !

दोन हजार वर्षांपूर्वीं कसबा संगमेश्वरला ' चालुक्य ' या राजघराण्याची एक शाखा राज्य करीत होती. त्यांचा एक भव्य राजवाडा संगमाजवळ होता. चालुक्य घराण्याची सत्ता-संपत्ति जसजशी वाढूं लागली, तसतशी संगमेश्वरची वस्ती वाढूं लागली. संगमाच्या आसपास सरदार-दरकदारांचे भव्य वाडे उठले. व्यापारी व कारागिरांची वस्ती वाढली. या राजधानीपर्यंत परदेशहून माल येऊं-जाऊं लागून धनाच्या राशी जमा झाल्या त्या योगानें कलाकृतींना, शिल्पाला उत्तेजन मिळूं लागलें. सुमारें सोळाशें वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. कोल्हापूर ( कापिलतीर्थ ) च्या मुख्य घराण्यांतील राजा कर्ण हा पुराणकालीन कर्णाप्रमाणेंच पराक्रमी, दानशूर, कलासक्त आणि भाविक होता. त्याच्या पराक्रमानें, दानशूरत्वानें सारा महाराष्ट्र व कर्नाटक दिपून गेला. शिवाच्या रुद्र-रूपाच्या अभ्यासाबरोबर, त्याला त्याच्या शिव–मंगल रूपाचा विसर पडला नव्हता. त्यानें मोठ्या कलासक्त नजरेनें, पवित्र भक्तीनें, संगमावर एक शिल्पाच्या दृष्टीनें अप्रतिम असें कर्णेश्वराचें भव्य देऊळ बांधलें. महाराष्ट्राचे सारे अप्रतिम शिल्पी संगमेश्वराला गोळा झाले. दूर प्रदेशाहून खास व्यवस्थेनें टिकाऊ काळा दगड आणून, त्यावर त्यांच्या कलासक्त हातानें अतीव सुंदर शिल्प, आकार घेऊन सजीव होऊं लागलें. कर्णाच्या दान-शूरत्वाची, कलाप्रियतेची, निर्मळ भक्तीची साक्ष म्हणून कर्णेश्वराचें देऊळ आज १६०० वर्षें उभें आहे. यथा राजा, तथा प्रजा या उक्तीप्रमाणें इतर उदार बुद्धीच्या धनिकांच्या पिशव्यांचे बंद मोकळे होऊन, या ठिकाणीं

इतरहि अनेक शिल्पें उठलीं. संगमेश्वराचा लौकीक दूरदेशपर्यंत गेला.

पण पुढें चालुक्य घराण्यावर आपदा आल्या. कोल्हापूर ( कापिलतीर्थ ) ला जैनधर्मी राजा शोणभद्राची सत्ता नांदूं लागली. चालुक्यांचा निर्वंश व्हावा म्हणून अहिंसा धर्मीय शोणभद्रानें संगमेश्वर जिंकलें व 'सत्यवादी' या नांवाच्या मावळंग्याच्या एका पराक्रमी ब्राह्मणाला आपला तेथला सुभेदार नेमलें. पण तीस वर्षांत पुन्हा चालुक्यांच्या वंशांत पराक्रम वर उफाळून आला व त्यांनीं सत्यवादीला हुसकावून देऊन संगमेश्वराचा ताबा घेतला व त्या आनंदाप्रीत्यर्थ संगमावर 'संगमेश्वर महादेवाचें' नवीन मंदिर बांधलें.

इ. स. १५७० च्या सुमारास विजापूरच्या महंमद गवाननें चालुक्यांवर चाल केली. महंमद गवानला स्वतःची कन्या देऊनहि, संघटनेच्या अभावी पराक्रमी जाकुराय चालुक्याला परागंदा व्हावें लागून, पुन्हा मावळंग्याच्या सत्यवादीला सरदेसाई करून महंमद गवान परत गेला. देवगडपासून दाभोळपर्यंत या सरदेसायांची सत्ता विजापूर दरबारतर्फे चालत असे. विजापूरचे आश्रित असलेल्या सरदेसाई घराण्याला हिंदूंच्या लग्नांत, मुसलमान सत्ताधीशांनीं स्त्रिया पळवूं नयेत म्हणून पांच नारळ देण्याचा पहिला मान दिला जात असे.

पुढें शिवाजी महाराजांनीं संगमेश्वराचा कबजा घेऊन सरदेसाई घराण्याकडे फक्त २२ गांवें ठेवून बाकी खालसा केलीं व त्यांच्याकडे १।१० वसूल लावून दिला. सरदेसाई घराण्यानें शिवाजी महाराजांच्या विरुद्ध असलेल्या गणोजी शिर्क्यासारख्या पराक्रमी मराठा सरदाराविरुद्ध महाराजांना मदत केल्यानें त्यांची सत्ता येथें दृढमूल झाली व विजापूरचा गणोजीच्या मार्फत असलेला वचक नाहींसा झाला.

दुर्दैवानें अपयश पदरीं आल्यानें, ज्याला स्वतःच्या राज्यासह जिवाला मुकावें लागून, इतिहासांत दारुड्या, बदफैली म्हणून उगाचच बदनाम करण्यांत आलें, त्या महापराक्रमी संभाजीच्या स्वातंत्र्याचा शेवट याच संगमेश्वरा झाला. औरंगजेबाच्या अतिशय मोठ्या सैन्याला आपल्या अत्यंत अल्प सैनिकांच्या मदतीनें जेरीस आणून संभाजीनें त्याला स्वतःचा नाद सोडून विजापूर गोंवळकोंड्याकडे जायला लावलें होतें. जंजिऱ्याचा सिद्दी, गोव्याचा फिरंगी यांनाहि त्यानें खडे चारले. पण मराठा जातींत जन्माला येऊनहि

विजापूरचा गुलाम असलेल्या शिर्क्यांनें जेव्हां त्याच्या सत्तेला अखंड आव्हानच दिलें, तेव्हां त्याचा राग अनावर झाला. या अस्तनींतील निखाऱ्याची वाट लावल्याशिवाय आपला निभाव लागणार नाहीं हें समजून आल्यावर त्यानें कोंकणांत उतरण्याचें ठरवलें. स्वतःच्या विरोधकांना एकदम डिवचण्याचें धाडस त्यानें केलें होतें, आणि राज्याच्या रक्षणार्थ स्वतःच्या सैन्याचे तीन विभाग करून एका विभागासह तो कोंकणांत उतरला. पण याच वेळीं औरंगजेबाच्या बलाढ्य सैन्याशीं मुकाबला करतां न आल्यानें, कोल्हापूर उघडें पडलें. शिर्क्यांचा बंदोबस्त होऊनहि मोंगलांशीं मुकाबला करतांना संभाजीचा सैन्यविभागहि खर्ची पडला. जेमतेम ५००—७०० सैनिक घेऊन तो, रायगडासारख्या किल्ल्यावर सुरक्षितपणें आडवाटेनें निघून जावें म्हणून आपला प्रधान कलुशा याच्यासह संगमेश्वरला मोठ्या तांतडीनें आला. आपला पत्ता मोंगल सैन्याला लागणार नाहीं या भ्रमांत असल्यानें व अखंड लढाया करतां करतां सैन्यच नाहींसं व्हायची पाळी आल्यानें विश्रांतीकरतां तो संगमेश्वरला थांबला होता. पण स्वकीय मराठा सरदारांच्या स्वार्थबुद्धीनें त्याचा पत्ता व ठावठिकाणा मोंगल सैन्याला लागला होता. कोल्हापूरहून ५—७ हजार सैन्यासह मोंगल सरदार मधल्या वाटेनें संगमेश्वरला आला. येवढ्या बलाढ्य व स्वतःच्या दसपट संख्या असलेल्या ताज्या दमाच्या त्या सैन्यावर कलुशा व संभाजी या दोघांनीं जोरदार हल्ला चढविला. कलुशाला तीर लागून त्याचा हात तुटून तो खालीं पडला. घोरपड्यांच्या सैन्याचा धीर सुटला व पळत सुटलेलें तें सैन्य कापलें गेलें. कलुशा कैद झाला. संभाजीनें ताबडतोब बैराग्याचा वेष चढवून तो निराधार अवस्थेंत देसायांच्या वाड्याजवळच्या कर्णेश्वराच्या मंदिरांत शिरून ध्यानस्थ बसला पण मोंगल सैन्यानें त्याला पकडून कैद केलें. सारा पराक्रम, धैर्य त्या अफाट सैन्यापुढें, त्या प्रतिकूल कालापुढें हतबल झालें. कबीराच्या "समय समय बलवान है, नहीं पुरुष बलवान, काबे अर्जून लुटिया वहि धनुष वहि बाण" या कृष्णावतार संपल्यावर, हिस्सारच्या जंगलांत साध्या गवळ्यांकडून हातीं धनुष्यबाण असूनहि पराभूत झालेल्या अर्जुनाला उद्देशून केलेल्या दोह्याची आठवण येते. इतिहासतज्ज्ञ श्री. बेंद्रे यांनीं नवीन संशोधन करून संभाजीचें जें चरित्र प्रसिद्ध केलें आहे, त्यानें संभाजीविषयींचें सारें किल्मिष नाहींसें

होते. शिवाजी महाराजांना यशश्री मिळाल्यानें त्यांचा गौरव होतो. पण त्यांच्यापेक्षांहि जास्त पराक्रमी, योजनाकुशल सेनापति असूनहि केवळ अपयशामुळें संभाजी दुराचारी व दुर्गुणांचा पुतळा ठरला होता. पळणाऱ्या माणसांच्या मागें चोर चोर म्हणून पुकारा केला कीं लोकही त्याला चोर समजूनच मारतात हा अनुभव आहे.

शूर संभाजीचें स्वातंत्र्य या ठिकाणीं नाहींसें झालें तरी त्यानें निष्ठेशीं द्रोह न करतां जें हौतात्म्य पत्करलें, त्यानेंच महाराष्ट्राचा इतिहास बदलला. त्याच्या तेजस्वी वागणुकीनें त्या वेळच्या महाराष्ट्रांतील जनतेंत चैतन्य स्फुरलें व अखंड तीस वर्षें औरंगजेबासारख्या महाबलाढ्य-बादशहाशीं लढून शेवटीं महाराष्ट्राच्या भूमींत, औरंगजेबाला कायमची निद्रा देऊन, जनतेनें तीस वर्षांच्या वास्तव्यानें त्यालाहि कायमचा महाराष्ट्रीय करून सोडलें.

शूर संभाजीचें स्वातंत्र्य हरण करणाऱ्या, पण त्याच्या चातुर्याची, तडफेची आठवण देणाऱ्या या पवित्र स्थानीं गेल्यावर, या साऱ्या इतिहासाची, संभाजीच्या गुणांची मला आठवण झाली. त्याच्या त्या पवित्र स्मृतीला वंदन करून ओढ्यांतल्या जलानें मीं त्याला आपली आदरांजली वाहिली.

औरंगजेबाच्या सैन्यानें त्यावेळीं सरदेसायांचा सारा वाडा नष्ट करून सपाट केला व त्यावर एक गढी बांधली. पण पुढें पेशव्यांचें लक्ष इकडे जातांच त्यांनीं सरदेसायांना पुन्हां स्थानापन्न केलें. त्यानंतर हिंदू व मुसलमान इथें गुण्यागोविंदानें तर कधीं भांडत तंडत राहिले. त्यांचे उत्कर्ष-अपकर्ष झाले. अलकनंदा–वरुणा संगमानें या साऱ्या घटना एखाद्या स्थितप्रज्ञाच्या डोळ्यानें पाहिल्या. येथें राहिलेल्या सज्जन दुर्जन आशा आकांक्षांचा तो साक्षी होता.

त्यामुळें या ठिकाणीं संगमावर गेलें म्हणजे अनेक तऱ्हेच्या संमिश्र भावनांनीं मन भरून येतें. कधीं इतिहासाच्या दाट काळोखांत अबलांचे आर्तस्वर कानीं पडून मन बेचैन होतें, तर कधीं इथें घडलेल्या मंगल घटनांचे मधुर वेणुनाद ऐकून मन बहरून येते. सद्भावनांनीं भरलेलें मन " महामनाः स्यात तद् व्रतम् " म्हणून मधुर वाणी ऐकवतें. तेवढाच, एक संदेश आपल्याला या ठिकाणीं मिळतो. कारण काळाचा ओघ महापराक्रमी पुरुषोत्तमांनाहि बदलता आला नाहीं, पण मोठें मन ठेवणें, मात्र त्यांनीं पुरुषार्थ करून सिद्ध करून दाखवलें येवढें मात्र सत्य !

# अंजनवेलचा गोपाळगड : ४

रत्नागिरी जिल्ह्याचा कणा ज्या समाजांनीं ताठ व रगदार बनवला आहे, त्यांत इथें सर्वदूर पसरलेल्या महार ( आतां पुष्कळसा नवबुद्ध ) समाजाचा फार मोठा हिस्सा आहे. कुठल्याहि खेड्यांत मी गेलों कीं, प्रथम बुद्धवाड्याची चौकशी करतों. मला भेटलेले बुद्ध मोठे कसदार शरिराचे, पीळ असलेल्या मनाचे व 'मोडेन पण वांकणार नाहीं' अशा हिंमतीचे, बहाद्दर भेटले. त्यांचा आवेश, त्यांचा निर्धार, त्यांची शान व त्यांचें दिलदार पण कडवटपणानें झांकलेलें मन पाहून मी त्यांच्यावर खूष होत असे. स्वतःवर होणाऱ्या सामाजिक अन्यायानें चडफडणारे ते तरुण पाहून, कधीं मला अभिमान वाटे, तर कधीं, आम्ही या उमद्या लोकांवर, या मानधन समाजावर, अजून करीत असलेल्या अन्यायानें ती मान शरमेनें खालीं येत असे. ज्या समाजाकडून त्यांच्यावर अन्याय होतो, त्यांचे अपमान होतात, त्या समाजाचा मी एक प्रतिनिधि होतों. त्यामुळें ज्या वेळीं ते माझ्यावर कडकडून हल्ला चढवीत, त्यावेळीं मला राग न येतां मी त्यांची क्षमाच मागत असे. " ज्या समाजाकडून तुम्हांला अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या, तुमच्या मानी दिलदारपणाला अनुरूप प्रत्युत्तर मिळालें नाहीं, त्याच समाजाचे प्रतिनिधी आज राज्यकर्ते आहेत.

त्यांनीं गतकालीन अन्यायांचें परिमार्जन करण्याकरतांच आज उदार बुद्धीनें तुम्हांला स्वतःच्या जातीभाईपेक्षां जास्त, शिक्षणाच्या, नोकऱ्यांच्या व इतर सवलती दिल्या आहेत. आमची घटना तुमच्याच एका महान् पंडितानें बनविली आहे. आमच्या वाडवडिलांनीं अज्ञानानें, गैरसमजुतीनें, अहंगंडानें जे घोर अन्याय केले, त्यामागें कोती विचारसरणी होती, भीति होती, आपण तसें केलें नाहीं तर आपल्यावर संकट कोसळेल हा दुर्बल विचार होता. तुमच्या देवाला पूर्वी कोंबडें नाहीं कापलें तर तो कोपेल अशी खुळी समजूत तुमच्यांतहि होती आज तसें राहिलेलें नाहीं. आम्हीहि आतां समजूतदार, शहाणे होत आहोंत. मेहेरबानी म्हणून नव्हे तर तो तुमचा न्याय हक्क म्हणून आम्ही तुमच्याशीं समानतेच्या, मानवतेच्या भावनेनें वागूं. आमच्या कृतकर्मांबद्दल आम्हांला क्षमा करा !" अशा शब्दांत त्यांचा राग शांत करण्याचा मी प्रयत्न करीत असे. त्यांच्याशीं असले भाषणप्रसंग करताना, त्याच्या तोंडावर झळकणारें तेज, अन्यायाची चीड, मनाचा कणखरपणा पाहून खरोखर मला धन्य वाटत असे. स्वतःच्या पोटावर पाय येईल हें माहीत असतानाहि गुरें फाडण्याचें काम बंद करून उपाशीं पोटीं रहाणारा, बुद्ध झाल्यानंतर आपली अनेक वर्षांची मद्यपानाची संवय सोडणारा व मोठ्या एकजुटीनें, स्वतःवर अन्याय होत असतां अत्यल्प संख्येंत असूनहि दंड थोपटून प्रतिकाराला उभा ठाकणारा, हा समाज पाहून कधीं कौतुक, कधीं विषाद, तर कधीं लज्जा या भावनांनीं माझें मन भरून येत असे. या समाजाला जर आपलासा केला नाहीं, त्यांच्यांतला आमच्याविषयींचा द्वेष, डंख घालावला नाहीं, तर आम्हीच आमच्या हातानें स्वतःच्या विनाशाचीं बीजें पेरून ठेवूं. इतिहासानें आम्हांला क्षमा केली नाहीं व आतां आम्ही शहाणे झालों नाहीं तर पुढेंहि ती क्षमा आम्हांला मिळणार नाहीं. आमच्या देशाच्या संरक्षणाकरतां, काश्मीरवरच्या हल्ल्याच्या वेळीं या समाजांतल्या अनेक तरुणांनीं आपला देह धारातीर्थी ठेवला. परमवीरता प्रगट करून अनेक परमवीर चक्रें आपल्या गळ्यांत घातलीं. असा हा ओजस्वी, पराक्रमी, स्वाभिमानी, समाज असंतुष्ट ठेवणें, त्यांच्या मनांत आमच्याविषयीं डंख, द्वेष असूं देणें आम्हांला परवडणारें नाहीं. आम्हांला तो एक मोठा धोकाच ठरेल, हें आम्हीं समजलें पाहिजे. त्यांच्या दुःखाचें त्यांच्या

अपमानित जिण्याचें निराकारण आम्हीं प्राणपणानें केलें पाहिजे.

आमच्या इतिहासांत अंजनवेलच्या गोपाळगडचें अनन्यसाधारण महत्त्व होतें. दाभोळच्या खाडीच्या दरवाजावर सक्त पहारा करणारा हा गड मराठ्यांच्या सत्तेचा उदयास्त पहाणारा भव्य साक्षीदार आहे. दाभोळच्या मुसलमानी सत्तेला आव्हान देऊन, शिवाजीमहाराजांनीं हा गड १६६० सालीं जिंकून तेथें आपल्या आरमाराकरतां एक भव्य गोदी बांधली. पण पुढें संभाजीराजांच्या हौतात्म्यानंतर १६९९ सालीं हबशी सरदार खैरातखान यानें तो जिंकून घेऊन आरमारी वर्चस्वाचे मराठी मनसुबे धुळीला मिळवले. शेचाळीस वर्षें त्यानें अंजनवेलच्या आधारानें दाभोळच्या खाडीवर आपली करडी नजर फिरवली. पहिल्या बाजीराव पेशव्यांचे गुरु श्री ब्रह्मेंद्रस्वामी यांना त्यानें सावनूरला आलेला एक उत्तम हत्ती आपल्याला मिळवून द्या, म्हणून गळ घातली. पण ब्रह्मेंद्रस्वामींनीं त्याला नकार देतांच, त्यानें परशुरामाचें स्थान उध्वस्त करून जिकडे तिकडे जाळपोळ करून चिपळूणपर्यंतचा सारा मुलुख उजाड करून टाकला. शेवटीं बाजीरावाचा पराक्रमी भाऊ चिमाजी अप्पा ससैन्य कोंकणांत उतरला व १९ एप्रिल १७३६ ला त्याने रेवस जवळच्या चन्हयी येथें सिद्दीसाताला गांठून, त्याला ठार केला व पुन्हां मराठ्यांचा जरी पटका अंजनवेलवर डौलानें फडकूं लागला. त्यानंतर परशुरामाचें देवस्थान नवीन बांधण्यांत येऊन प्रतिस्थापना केली. पुढें १७४५ सालीं आंग्र्यांच्या आरमारानें अंजनवेल काबीज केला. तुळाजी आंग्रे कृष्णभक्त असल्यानें त्यानें अंजनवेलच्या किल्ल्याला गोपाळगड व गोवळकोटच्या किल्ल्याला गोविंदगड हीं नांवें दिलीं. १७५६ मध्यें पुन्हां पेशव्यांचे सरदार रामजी महादेव बिवलकर यांनी तो घेतला. पानपतानंतर सदाशिवराव भाऊंच्या एका तोतयानें या किल्ल्यावर सहा महिने सत्ता गाजवली व त्यानंतर मराठ्यांचें राज्य १८१८ त नामशेष होईपर्यंत तो पेशव्यांच्या हातीं होता.

१८१५–१६ चा सुमार होता. अंजनवेलच्या एका विहिरीवर सिदनाक महार हातांतली कळशी घेऊन विहिरीवर आलेल्या लोकांना पाणी द्या म्हणून विनवीत होता. त्याचे पिळदार शरीर, कसदार मन पाण्याची ही भीक मागतांना कडवटपणानें, विषादानें भरून येत होतें. येणारे त्या

रंगेल गड्याकडे तुच्छतापूर्वक पहात आपआपलें पाणी भरून नेत होते. या महाराकडे, त्याच्या विनवण्याकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नव्हता. सिदनाकच्या अंगांत हत्तीचें बळ असूनहि तो तें पाणी काढून घेऊं शकत नव्हता. थंडपणें सारे ब्राह्मण-मराठे त्याच्याकडे पहात आपले व्यवहार उरकत होते. सिदनाकची पाण्याकरतां ताटकळणारी बायको तिथें आली. आपला नवरा तास अर्धा तास थांबूनहि पाण्याशिवायच बसलेला पाहून तिच्या कपाळाला अठी चढली. पाणी कां आणलें नाहीं म्हणून तिनें त्याला विचारलें. सिदनाकनें एकदां तिथें जमलेल्या लोकांकडे तिरस्कारानें पाहिलें. धोतराचा काचा मारला. "पाणी देतां कीं मीच विहिरींतून काढूं ?" म्हणून डोळे मोठे करून विचारलें. त्याबरोबर तिथें जमलेल्यांनीं महाराचा उद्धटपणा पाहून एकच गलका केला. सिदनाक बायकोकडे पहात म्हणाला, "पायलस, बामनं इंटाळ म्हणत्यात. पण पाणी मात्र देत नाहींत. काय करावं याला ?" सिदनाकच्या बायकोनें रिकामा हंडा जमिनीवर रागानें आपटला व म्हणाली, "या बामन-मराठ्यांना आमचा इंटाळ होतो, पण लेकराला पाणी द्यायची माणुसकी न्हाई !" जमलेल्या सर्वांनी महारणीचा तो उद्धटपणा पाहून आणखीच गलबला केला.

पण एवढ्यांत किल्लेदाराचा माणूस जमलेल्यांपैकीं एकाच्या नांवानं पुकारा करीत आला. किल्ल्यावर एक अरबी घोड्यांचा व्यापारी आला होता. त्यांपैकीं एका अबलख घोड्यावर बसायला त्याला बोलावलें होतें. साऱ्या मंडळींनीं तें ऐकतांच आपापलीं कामें टाकून घोडशाळेच्या मैदानाकडे धूम ठोकली. सिदनाकहि तसाच मागोमाग धांवला. सारें मैदान त्या अरबी तेज घोड्यावर कोण मांड चढवतो तें पहाण्याकरतां जमलेल्या बघ्यांनीं भरलें होतें. अरबी घोडा फुरफुरत मागें-पुढें होऊन टापांनीं जमीन उकरीत होता. वर-खालीं उडत होता. घोड्यावर जो मांड ठेवील त्या वीराला किल्लेदारानें चांदीचें कडें व पागोटें बक्षीस लावलें होतें. पण घोड्याच्या चपळपणाकडे पाहून जो तो दुसऱ्यावर ढकलीत होता. त्या उमद्या घोड्यावर मांड ठोकायची कोणाची तयारी नव्हती. जो तो स्वतःच्या जीवाला घाबरत होता. किल्लेदार किल्ल्यांतल्या साऱ्या मर्दांची अब्रू जाते म्हणून जमलेल्या जवानांना उत्तेजित करीत होता. पण कोणी लगाम

धरायला तयार होईना. तो देखावा पाहून घोडेवाला अरब मोठ्या तुच्छतेनें साऱ्यांकडे पहात हंसत होता. किल्ल्याच्या अब्रूकरतां स्वतःचा जीव गमावण्याची कोणाला हिंमत होईना. किल्लेदाराचा चेहरा काळाठिक्कर पडूं लागला. अरब तो फजितवाडा पाहून मिशीवर ताव देत हंसत होता. एवढ्यांत गर्दीतून वाट काढीत सिदनाक महार पुढें आला. त्यानें किल्लेदाराला जोहार करून घोड्याचा लगाम खेंचला व हां हां म्हणतां घोड्याला टांच मारून दूर दिसेनासा झाला. त्या घोड्यानें सिदनाकला पाडण्याचे सारे प्रयत्न केले. पण त्याची मांड एकठक बसली होती. तासाभरानें फेसाळलेल्या तोंडाचा घोडा मऊ होऊन सिदनाकला घेऊन परत आला. सिदनाकनें छाती फुगवून किल्लेदाराला जोहार केला व कडें—पागोट्याची मागणी केली.

पण हा अनपेक्षित जयहि साऱ्या किल्ल्यांतल्या मानकऱ्यांना अपशकुन वाटला. एवढे सारे ब्राह्मण व मराठे वीर तिथें असतांना एका महाराच्या पोरानें मानाचें कडेंपागोटें जिंकणें हा त्यांना अपमान वाटला. "महारड्या दूर हो. इंटाळ करूं नको" म्हणून एका मानकऱ्यानें सिदनाकला दटावलें. इतरांनीं त्याची री ओढली. तेजस्वी सिदनाकचा चेहरा त्या अपमानानें उतरला. त्यानें किल्लेदाराकडे आशेनें पाहिलें. पण तिथेंहि तेच भाव त्याला आढळले. तो खालच्या मानेनें परतला. जय होऊन, मोठा पराक्रम गाजवूनहि त्याला यशाचे धनी होतां आलें नाहीं. अपमानाची खोल, न बुजणारी जखम घेऊन तो घरीं परतला.

पण तो अरबी घोडेवाला त्याला गुरु झाला होता. किल्ल्यांतल्या पराक्रम—औदार्याची पारख करायला पाठवलेल्या त्या इंग्रजांच्या हेरानं सिदनाकला गांठला. एका रात्रीं तो अरब आणि सिदनाक किल्ल्यावरून पसार होऊन मुंबईला आले. मराठ्यांच्या पराक्रमाचा, भाग्याचा रवि अस्ताला चालला होता. मराठ्यांच्याच रक्ताच्या महारांच्या पलटणी कर्नल कॅनेडीच्या अधिपत्याखालीं मुंबईला उभारल्या जात होत्या. या लोकांतला सारा द्वेष, सारा अपमान जणूं त्या फौजफांट्याच्या रूपानें सूड घेण्याकरतां उभा होत होता. एखाद्या इंग्रज सेनापतीच्या हुकुमासरशीं स्वबांधवांचें राज्य बुडवायला तयार झालेलें, त्याकरतां मरायला तयार असलेलें हें सारें सैन्य मराठ्यांनीं आपल्या कोत्या, संकुचित वृत्तीनें निर्माण होऊं दिलें होतें. महारांच्या परा-

क्रमाचें, स्वाभिमानाचें, कणखरपणाचें कौतुक दिलदारपणानें करण्याऐवजीं मराठ्यांनीं या जहाल जातीला कायमचे शत्रू बनवले होते. अंजनवेलचा सिदनाक महार अशाच एका पलटणीचा सुभेदार झाला होता. त्याच्या पराक्रमाला अंजनवेलींत वाव मिळाला नाहीं, पण परक्या गोऱ्यांनीं त्याच्या गुणाचा गौरव केला होता. १८१८ त शेवटच्या छत्रपति पेशव्यांचा पराभव होतांच कर्नल केनेडी दाभोळच्या खाडींत घुसला. त्यानें गोपाळगडावर मोर्चे लावले. आंत असलेले तटकोट भराभर कोसळूं लागले. मेलेल्या मनाच्या त्या पराक्रमहीन बारगीरांचें रक्षण त्या चुन्या दगडाच्या भिंती किती वेळ करणार ? सिदनाकच्या तुकड्या मारा करीत कर्नल केनेडीसह किल्ल्यांत घुसल्या. त्यांनीं अगणित लूट त्या शेंदाड शिपायांकडून मिळविली. घरेंदारें लुटलीं, मंदिरें पाडलीं, जिकडे तिकडे सामसूम झालें. किल्लेदारासुद्धां सारे कैद झाले.

ज्या विहिरींवर सिदनाकला ब्राह्मण, मराठा मानकऱ्यांनीं 'इंटाळ होतो' म्हणून सांगितलें होतें, त्या विहिरीच्या पाण्यांत पाय सोडून सिदनाक पाण्यांत थुंकत होता. पकडून आणलेले ते सारे मानकरी खालीं माना घालून सिदनाककडे पहात होते. सिदनाकच्या एका महार शिपायानें तिघां मानकऱ्यांना मुसक्या बांधून त्याच्यापुढें उभे केले होते. त्यांच्याकडे पाहून तो हेटाळणीच्या स्वरांत म्हणाला, "सुभेदार, हीं बामनं, हे मराठे इंटाळ मानत होते. आतां त्यांना इंटाळ होत न्हाई बघा फेका त्यांना बावडींत म्हणजे सारे सुध होतील कायमचे !" सिदनाकनें एकदां तिरस्कारानें त्या सगळ्यांकडे पाहिलें. पण तो आपल्या शिपायाला दिलदारपणें म्हणाला, "जाऊं दे त्यांना. येकानं गाय मारली म्हणून दुसऱ्यानं वासरूं मारूं नये. आमाला त्येंच्यांतच ऱ्हायचं आहे. आमच्या चोखोबाची हाडं अजून पंढरीला विठ्ठल विठ्ठल म्हणत पंढरीनाथाच्या पायाशीं बसलीं आहेत. हे सारे येडे आहेत. पण पुढं त्यांच्यांत कुणी शहानं निघलं तर आमाला न्याय देईल. जाऊं दे त्यांना." सिदनाकच्या त्या दिलदारपणाचे गोडवे गात, लाजेनें अर्धमेले झालेले मराठेशाहीचे ते अखेरचे मानकरी निस्तेज होऊन घरीं परतले.

आजही तुम्ही कधीं अंजनवेलला गेलांत तर वासिष्ठीच्या व समुद्राच्या

संगमाच्या बाजूला सिदनाकचें थडगें तुम्हांला पहायला मिळेल. आजही त्यांतून " त्यांच्यांतहि श्याने लोक निघतील, ते आम्हांला न्याय देतील, आमचा अपमान धुवून काढतील. " म्हणून वाट पहात असलेल्या सिदनाकचे बोल तुम्हांला ऐकूं येतील. वासिष्ठीचें गंभीर पात्र उसळत्या लाटांनीं आजही हेंच सांगेल कीं, " या मानधन लोकांना माणुसकीनें वागवा. त्यांना आपलेसें करा. त्यांच्या सहनशक्तीचा अंत पाहूं नका. त्यांना आपलेसें केलेत तर ते जिवाला जीव देणारे थोर सुहृद आहेत. त्यांना आतां मानानें वागवा व आपल्या गतकालांतील पापाचें प्रायश्चित्त घेऊन शुद्ध व्हा. "

●●●

# कोंकणचा प्रपितामह
# " भार्गवराम " : ५

एखाद्या खेळण्या बागडण्याच्या दिवस असलेल्या षोडश वर्षीय कुमारिकेचें झटपट लग्न होऊन, तिच्या पदरांत मुलाबाळांच्या मोठ्या घराची अकाली जबाबदारी पडली तर ती अल्लडबाला जशी एकदम प्रौढ व गंभीर दिसूं लागते, त्याप्रमाणें पोफळी जवळच्या सह्याद्रीच्या शिखरावरून अल्लडपणें उड्या मारीत निघालेली वाशिष्ठी, चिपळूण–परशु-रामच्या विशाल दरींत, सागराच्या संसाराची जबाबदारी, तारुण्याचा अव-खळ–अल्लडपणा ओसरण्याच्या आंतच पडल्यानें, संथ गतीची व प्रौढ मुद्रेची बनली आहे. एका बाजूस गंभीरपणानें उभा असलेला महाकाय, हरितरोमांचकारी महेंद्र पर्वत, इतस्तत: आपल्या सैन्यासह पसरलेला आहे, तर दुसऱ्या बाजूस त्याच्याशीं स्पर्धा करणारी वृक्षवल्लींनीं लहडलेली पर्वतराजी तिची पाठराखणी करीत आहे. संसाराच्या जबाबदाऱ्यांनीं प्रौढ पण प्रसन्न मुद्रेची, वाशिष्ठी माता आपल्या अंगाखांद्यांवर गर्भश्रीमंती दागिन्यांप्रमाणें शोभणारी, चिपळूण, परशुराम, केतकी, बिवली, इत्यादी नगरांची माला धारण करतांना पाहून मन प्रसन्न पण गंभीर बनतें. जवळच्या महाकाय महेंद्रगिरीकडे, त्यावर दिसणाऱ्या लाल कौलांच्या सुंदर घरांनीं व भगवान परशुरामाच्या सुबक व भव्य मंदिराच्या दीपमालांनीं आपलें लक्ष

सहजच वेधलें जातें. रात्रींच्या दाट काळोखांत ज्यावेळीं महेंद्र पर्वतावरील दीपज्योती त्या अफाट विस्ताराच्या वसिष्ठीच्या दऱ्यांकांठीं लुकलुक् करूं लागतात त्यावेळीं, अशाच दाट काळोखांत प्रकाशून गेलेल्या परशुरामाची तीव्रतेनें आठवण येते. अध्यात्म रामायणांत वर्णिलेल्या त्याच्या.

" कोटी सूर्य प्रतीकाशं, विद्युत्पुंजसमप्रभम् ।
तेजोराशिं ददर्शाथि जामदग्न्यं प्रतापवान् ॥
नीलमेघनिभंप्रांशु–जटामण्डल–मंडितम् ।
धनुः परशुपाणिं च साक्षात्कालमिवान्तकम् ॥

( " कोटी सूर्यासमान तेजस्वी, विद्युत्पुंजाप्रमाणें प्रभासंपन्न, महाप्रतापी तेजोराशीं नीलमेघाप्रमाणें कांति असणाऱ्या, जटाजूटधारी, परशु व धनुष्य धारण करणाऱ्या, कालाप्रमाणें उग्र पण लोकपालक ) व्यक्तित्वाच्या कल्पनेनें मन भारून जातें. उग्रता, भव्यता व विरागता यांचें मिश्रण म्हणजे परशुराम. पण त्या कठोर, त्यागमय, वीर्यशाली जीवनाच्या अंतःस्रोतांचा जर आपण मागोवा घेतला, तर दीनजनांच्या परम कारुणिक जिव्हाळ्यानें, अन्यायाच्या चिडीनें तें व्यक्तित्व, प्रसन्नतेनें वाहतांना दिसतें व आपलें मन त्या वैष्णव अवताराच्या आदरपूर्ण भक्तीनें भरून येतें.

ज्यावेळीं समाजांतले सारें सामंजस्य, सौहार्द व सहिष्णुता लोप पावते व ऐवजीं व्यक्ति, जाति, कुलद्वेषाच्या बुरख्याखालीं स्वार्थांधतेचा, पाशवी-मन वृत्तीचा नंगा नाच सुरू होतो, त्यावेळीं समाजाला जडलेल्या व समाज-पुरुषाच्या सर्व शरीरभर पसरलेल्या या कॅन्सरला कापून, शरीर निरोगी करणारा कुशल शल्यतंत्रज्ञ आवश्यक होतो. भीरुता, दुर्बलता, स्वकेंद्रित स्वार्थांधता, यामुळें सारा समाज दुर्बल होतो; त्यावेळीं एखादा सहस्रार्जुन, एखादा चेंगिझखान, औरंगजेब, एखादा डायर, अशा सत्त्वहीन समाजावर वाटेल ते जुलूम, अत्याचार करूं लागतो. स्वार्थाखातर अशा खून, दरोडे-खोरीला, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पाठिंबा, सहानुभूति दाखवणारे महाभाग सर्वकाळीं, सर्वत्र झाले आहेत, होत आहेत व होतील. पण अशा या जुलमाचा, अन्यायाचा क्रौर्याचा प्रतिकार जर झाला नाहीं, तर तो रौद्ररूपानें तांडव करून सारा समाज गुलामी वृत्तीचा, नेभळा, पौरुषहीन बनवतो. पण त्याला आपल्या

नेटाच्या, धैर्याच्या, बुद्धिबलाच्या जोरावर जर कुणी प्रतिकार करणारा निघाला, तर या जुलूमशहाचें कंबरडे मोडतें; समाजांत पुरुषार्थाची प्रेरणा अखंडपणें तेवत रहातें व असा समाज गुलाम राहूं शकत नाहीं. अशा तेजस्वी भव्य व्यक्ती ज्या समाजांत होतात, व त्यांचीच जो समाज पूजा करतो, त्या समाजाचाच भविष्यकाल उज्ज्वल असूं शकतो.

भृगु कुलांत ब्रह्मर्षि जमदग्नीच्या पोटीं असाच एक महापुरुष सुमारें चार हजार वर्षांपूर्वी जन्मास आला. क्षत्रिय व राजकुलांतील रेणुकामाता व ब्राह्मण भृगुकुलांतील जमदग्नि यांच्या कुशींत या बाळानें क्षत्रियांच्या तेजाची व ब्राह्मणांच्या सात्विक धर्माची मनोभावें उपासना केल्यानें "शापादपि शरादपि" स्वत्व राखण्याची कुवत त्याच्यांत निर्माण झाली. हिमालयाच्या कुशींत शांतपणें स्वतःचें 'जमदग्नित्व' शेतीच्या व अध्यात्माच्या क्षेत्रांत गाजवणाऱ्या जमदग्नि ऋषींच्या आश्रमांत असणाऱ्या रेणुकामातेला एकदां राजकुलांतल्या एका राजाचा विलास पाहून तारुण्यसुलभ वैषम्य वाटलें. समाजांतल्या वरच्या वर्गाला विलासभोग उघडपणें भोगतांना, खालच्या वर्गाला सोसाव्या लागणाऱ्या यातनांची आठवण कशी असणार? एकाला जडान्न पचत नाहीं. म्हणून दुःख करावें लागतें तर दुसऱ्याला अन्न नाहीं म्हणून धाय मोकलून रडावें लागतें आहे, अशीं दृश्यें ज्या समाजांत आहेत, तिथें 'नाहीं रे' वर्गातल्या व्यक्ती वैषम्यानें भान विसरतील यांत विशेष कांहीं नव्हतें. पण जन्मभर ईश्वरसेवेकरितां दारिद्र्याचा त्याग-स्वीकार केलेल्या जमदग्नीला तें खटकलें. त्याच्यांतील तामस वृत्ति --^-- व त्या आवेगांत दिलेल्या आज्ञेसरशी परशुरामानें रेणुकामाता व स्वबंधू यांवर, प्रेम बाजूला ठेवून शस्त्र चालविलें. पण अखेर जमदग्नि हा माणूसच होता. तो विपरीत प्रकार झाल्यावर त्याचें भान परत आलें. मातेच्या वियोगानें दुःखित झालेल्या परशुरामाला त्यानें रेणुका व तिचीं मुलें यांना स्वसामर्थ्यानें सजीव करून, प्रसन्नतेचा आशीर्वाद दिला. माता व बंधूंवर अलोट प्रेम करणारा परशुराम पुन्हा प्रसन्न होऊन मातेच्या अंकावर लोळूं लागला. त्याचें शांततामय जीवन पुन्हा सुरू झालें. पुन्हा आपल्या पित्या-जवळ वेद आणि शास्त्रें यांचा व्यासंग त्यानें सुरू केला. कैलासपति शंकराला त्यानें आपल्या तपस्येनें प्रसन्न केला व त्याच्याकडून परशु व शिवधनुष्य

मिळवून शस्त्रविद्या हस्तगत केली. येवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष गुरूला त्यानें शस्त्रविद्येंतील आपलें प्राविण्य दाखवून, आपला सत्शिष्य तयार झाल्याचा आनंद व ' खंडपरशु ' हें नांव अर्पण केलें व असा हा ' इदं क्षात्रं, इदं ब्राह्मं ' शक्ति असलेला तेजस्वी तरुण आपल्या वडिलांच्या कृपाछत्राखालीं राहून तपःसाधना करूं लागला.

त्यावेळीं महिष्मती नगरावर हैहय कुलांतल्या राजांचें राज्य चालू होतें. त्यांच्या कुळांत महापराक्रमी सहस्रार्जुन जन्मास येऊन त्यानें आपल्या पराक्रमानें सारा भारत पादाक्रांत केला. तो एवढा भीमपराक्रमी होता कीं, रावणासारख्या महाबलाढ्य, तपस्वी राजाचीहि त्यानें पळतां भुई थोडी केली. अयोध्येच्या सगर राजाच्या कुलावरहि त्याची वक्र दृष्टि वळली व श्रीरामचंद्राच्या या कुलाचें व सहस्रार्जुनाचें हाडवैर सुरू झालें. सगरानें सहस्रार्जुनानें चालवलेल्या हत्याकांडाला प्रतिरोध करण्याकरतां महापराक्रमी परशुरामाला आवाहन केलें. इकडे सहस्रार्जुन आपल्या सैन्यासह जिकडे तिकडे धमाल उडवूं लागला. एकदां तर वसिष्ठ मुनींचाहि आश्रम त्यानें लुटला. अनेक नगरें, वाटिका त्यानें उध्वस्त केल्या. भृगु कुलाचे आश्रम, शेतीवाडीं यांची त्यानें वाट लावली. अनेक लहान अर्भकें, स्त्रिया यांच्यावर अत्याचार केले. एकदां असाच तो ससैन्य जमदग्नि ऋषींच्या आश्रमांत शिरला. ऋषींनीं या राजपुरुषाचा व त्याच्या सैन्याचा उत्तम सत्कार केला. पण ज्या कामधेनूच्या साहाय्यानें हा सत्कार करतां आला तिच्यावर त्याचें मन बसलें व जगदग्नीकडे त्यानें कामधेनूची मागणी अनेक प्रलोभनें दाखवून केली. पण त्याला नकार मिळतांच तो भडकला. जगदग्नीवर हल्ला करून त्यानें त्यांना ठार मारलें व सारा आश्रम उध्वस्त करून त्यानें कामधेनू पळविली.

इकडे तपाचरणाकरतां गेलेल्या परशुरामाला हें वृत्त व रेणुकेचा विलाप कळला. तो तांतडीनें सगर राजाचें सैन्य घेऊन सहस्रार्जुनावर धांवला. घनघोर लढाई होऊन त्यांत सहस्रार्जुनाला त्यानें ठार केलें. पण सहस्रार्जुनाच्या अश्रयानें अत्याचार व लूट करायला संवकलेल्या इतर राजांनीं पुन्हा उठाव केला. एकवीस वेळां असले उठाव झाले. पण परशुरामानें ते सारे मोडून सर्व राजांना यमसदनाला पाठविलें. भारतभर चाललेला सैतानी

वृत्तीचा उन्मत्त नंगा नाच त्यानें ठेंचून काढला व सारी पृथ्वी त्यानें जिंकली.

पण या राज्याचा त्या तपस्व्याला लोभ नव्हता. त्यानें सत्वस्थ वृत्तीच्या ऋषींना तिचें दान केलें व दत्तोपासना करून त्यानें दत्तभार्गव संवादानें मनःशांति मिळविली. साऱ्या राज्याचा त्याग करून तो महेंद्र पर्वतावर येऊन तपःसाधना करूं लागला. तिथेंहि, सगरपुत्र भगीरथानें गंगेला स्वर्गांतून खालीं आणतांच सारे सागर उधाणींनें जमीन धुपून नेऊं लागले, तेव्हां त्या भूमीला स्वतःच्या तपोबलानें यानें वांचवलें व कोंकणची निर्मिती केली व तो महेंद्र पर्वतावर परतला.

सुमारें चारशें वर्षांपूर्वी गायीचें दूध आपोआप एका स्थानावर पडतांना पाहून तेंच परशुरामाचें स्थान समजून लोकांनीं या कोंकणच्या प्रपितामहाला आपली कृतज्ञता, भक्तिभाव अर्पण करण्याकरतां एक मंदिर उभारलें. छत्रपती शिवाजी राजे, तसेंच पेशवे यांचें या स्थानावर प्रेम व भक्ति होती. पुढें बाजीराव पेशव्यांचे गुरु ब्रम्हेंद्रस्वामी यांनीं या स्थानाचें महत्त्व वाढवलें. एका मुसलमान बेगमेवर त्यांनीं कृपा केली होती. या गोष्टीचें स्मरण म्हणून कृतज्ञभावनेनें तिनें परशुराम मंदिराचा कांहीं भाग स्वतः बांधून दिला. आंग्रे कुळांतल्या पराक्रमी माणसांनींहि मदत केली. ज्या ज्या वेळीं समाजांत स्वार्थ, असहिष्णुता, सूडबुद्धि यांचें थैमान सुरू झालें, त्या त्या वेळीं या स्थानावर हल्ले झाले. पण पुन्हां लोकांत पुरुषार्थ, भक्तिभाव, स्वतःच्या संस्कृतीचा अभिमान जागृत होतांच हें स्थान उठून उभें राहिलें.

महेंद्र पर्वतावर भगवान् परशुराम अजून गुप्तरूपानें असतात असें म्हणतात. कोंकणच्या भूमीवर त्यांचें अपार प्रेम आहे. या जिल्ह्यांत फिरतांना परशुरामाच्या चिरंजीवित्वाची प्रचीति मला अनेकदां आली. या भूमींत असणाऱ्या नागरांच्या तेजस्वी बुद्धींतून, सदाचारांतून अन्यायाचा प्रतिकार करणाऱ्या उर्मींतून, त्यांच्या त्यागमय तेजस्वी वृत्तींतून, मला त्यांचें अनेकदां दर्शन झालें आहे. परशुरामाच्या मंदिरावर फडकणाऱ्या पताकेनें अनेकदां मला हेंच सांगितलें कीं, " या कोंकण भूमि मातेचे सुपुत्र स्वतः अत्याचार, जुल्म करणार नाहींत, त्यांना पाठिंबा देणार नाहींत, तर त्याचा प्राणपणानें प्रतिकार करतील. दुसऱ्याला गुलाम करण्याची हांव ते बाळगणार नाहींत, तसेंच स्वतःहि गुलामी–भ्याड वृत्तीचे ते होणार नाहींत.

त्याच्याविरुद्ध ते बंडच करतील. स्वतंत्र, पुरुषार्थी पण समाजाकरतां त्यागमय जीवन आचरणारे असेच ते होतील. चिरंजीवरूपानें प्रकटणाऱ्या या परशुरामास माझे मनःपूर्वक प्रणाम व प्रार्थना अशी कीं—

" यदि मेऽनुग्रहो राम तवास्ति मधुसूदन ।
त्वद्भक्तसंगस्त्वत्पादे दृढा भक्तिः सदास्तु मे । "

हे रामा, तुझी कृपा माझ्यावर असेल तर माझी तुझ्या तेजस्वी, उदात्त रूपावर भक्ति असो व तुझ्या अशा गुणांच्या भक्तांचाहि मला सत्संग लाभो !

• • •

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ..३७०७२.......... वि: ..अप्रकाशित.....
क्रमांक ........३२............ नों दि. २७/८/६८ .

# सह्यकटाहांतील मालेश्वर : ६

लहानपणापासून भारताचा मानदंड जो हिमालय त्याचें मला विलक्षण आकर्षण. भारतीय संस्कृतीचें प्रतीक म्हणजे कैलास, मानस व गंगामाई ! या त्रयींचें चिंतन करावें, ' काशीस जावें, नित्य वदावें ' या म्हणीप्रमाणें, या त्रयींचें दर्शन घेऊन पावन व्हावें, ही प्रत्येक हिंदू मनाची आकांक्षा असते. पण साऱ्यांनाच तें भाग्य कसें मिळावें ? पण महाराष्ट्राच्या भाग्यानें, हिमालयाचा वडील भाऊ जो सह्याद्रि, तो महाराष्ट्रांत सर्वत्र आडवातिडवा पसरल्यानें, दुधाची तहान ताकानें भागवण्याची सोय झाली आहे. दुधापेक्षां ताकाचें पथ्य संसारानें पछाडलेल्या रोग्यांना जास्त फलदायक. त्यामुळें हिमालयांतील सारीं तीर्थें, पवित्र क्षेत्रें महाराष्ट्रांत आलीं. एकूण बहुसंख्य ज्योतिर्लिंगें, दत्तस्थानें, देवींचीं स्थानें, व गणपति–क्षेत्रें महाराष्ट्रांत येऊन राहिलीं. भारतांतील अति उच्च कोटीचे संत महात्मे श्री ज्ञानदेव, तुकाराम, रामदासांच्या रूपानें, आजतागायत या मराठी भावेंत वहात आले आहेत. त्यामुळें मराठी मनें भारतांत वैशिष्ट्यपूर्ण ठरलीं. इथें पराक्रमाबरोबर वैराग्य नांदतें, सात्विकतेबरोबर तेजाची दाट मैत्री आहे, त्यामुळें हें विश्वाचि माझें घर मानणाऱ्या ज्ञानोबांपासून तो " जय जगत् " ची घोषणा करणाऱ्या विनोबांपर्यंतचे सारे संत मराठी मायबोलीचे दूध

घ्यायल्याचा सात्विक अभिमान बाळगूं शकतात. इथल्या गोदा-कृष्णांत स्नान करतांना भाविकांना 'हरगंगे भागीरथी' म्हणून तेच पवित्र भाव लाभतात. इथली पर्वतराजीहि हिमालयाच्या भव्यतेची, उत्तुंगतेची, दिव्यतेची स्फूर्ति देते. इथें निर्माण झालेल्या ज्ञानेश्वरीचे व तुकारामगाथेचे अनुवाद करण्याकरतां, त्यांच्या उदात्त तत्त्वज्ञानानें आपली भाषा नटवून समृद्ध करण्याकरितां, सातासमुद्रांपलिकडचे फ्रेंच, इंग्रज, जर्मन येथें येऊन बसतात. इथें दरवळणाऱ्या उच्च जीवनाच्या धूपदीपांचा परिमल साऱ्या जगभर पसरतो. इथल्या पवित्रतीर्थांचें दर्शन घेण्याकरतां जगन्नाथभक्तांपासून द्वारकाधीशाच्या दासांपर्यंतचे सारे भारतवासी जमा होतात. महाराष्ट्राची पवित्र भूमि त्यांच्या ब्रह्मानंदानें अधिक पावन होते.

कोंकणचा प्रपितामह जो परशुराम त्यानें वाडेश्वर, कर्णेश्वर या तपस्थानां-बरोबरच देवरूखजवळच्या एका रम्य स्थानीं मार्लेश्वराची स्थापना केली होती. अनेक वर्षें या देवाला महान् भगवद्भक्तांनीं आळवून आपल्या जीवनाला उजाळा दिला. देवाच्या बाह्य वैभवाबरोबर स्वतःचें अंर्तवैभवहि त्यांनीं वाढवलें. जवळच्या संगमेश्वरच्या इतिहासप्रसिद्ध ठिकाणीं शिलाहार राजांची सत्ता होती. या राजपुरुषांचीहि या देवस्थानावर श्रद्धा असल्यानें, त्याच्या भक्तांवरहि त्याच्या औदार्याचा वर्षाव होत असे. लांबलांबनें लोक कर्णेश्वराबरोबर या देवाचें दर्शन घेऊन स्वतःला धन्य समजत. पण पुढें काळ पालटला. संगमेश्वराच्या राजालाच उतरती कळा लागली. लोकांना बाह्य वैभवापुढें आंतल्या ज्ञानदीपाची किंमत कळेनाशी झाली. स्वतःचें अंतर हीन विकारांच्या काळोखानें भरण्यांतच, हीन भोग स्वत्व विकून भोगण्यांतच, लोकांना विकृत आनंद वाटूं लागला. "अहं सत्यं जगत् मिथ्या"चा घोष करणारे पंडित, क्षुद्र देह जपण्याच्या लोभानें स्वत्वाला मुकले. शत्रूला पाठ न दाखवतां, छातीचा कोट उभारून, धारातीर्थी देहाचा होम करणारे क्षत्रिय, सरदेशमुखी जहागिऱ्या, वतनें यांच्या लोभानें परकीयांना स्वतःच्या कन्या देऊन वा पत्नीच्या अब्रूचा विक्रा करूनही मोठेपणा मिरवूं लागले. सात्विक वृत्तीनें समाजाच्या पोषणाकरतां धनधान्याचा संग्रह करणारे, समाजाच्या गरजा पुऱ्या करण्यांत स्वतःचें जीवन धन्य समजणारे वणिक्, समाजद्रोह करून स्वतःच्या पोतड्या भरण्यांतच मश्गुल

झाले. समाजांतील सारे सामंजस्य लोप पावलें. माणसांच्या समुदायाचें हिंस्त्र जनावरांच्या कळपांत रूपांतर झालें. माणूस माणसाला ओळखेना. पैसा, धन-दौलत, जहागिऱ्या, सरदारक्या मिळवतांना आपल्याच बांधवांचे गळे कापायला, माणसांना लाज वाटेनाशी झाली. स्वतःचीं देवस्थानें, स्वतःचा धर्म यांचा अभिमान विरला. देवस्थानांची विटंबना लोक षंढासारखे तटस्थतेनें पाहूं लागले. जिवाच्या, संपत्तीच्या, दौलतीच्या लोभानें कोणी प्रतिकाराचा हात उचलेना. साऱ्या समाजाला जडतेनें, अपौरुषत्वानें ग्रासलें. सर्वत्र अवकळा पसरली.

देवरूखजवळ असणाऱ्या ‘ मार्लेश्वराला ’ हें सारें पाहून वाईट वाटलें. ज्या समाजांत अन्यायाचा, बेअब्रूचा, विटंबनेचा प्रतिकार लोक नेभळट झाल्यानें होत नाहीं; जिथें त्या विटंबनेलाच प्रतिष्ठा, बेअब्रूला लौकिक, अन्यायाला व्यवहार म्हटला जातो, त्या सत्वहीन समाजाच्या वाऱ्यालाहि उभे रहाणें मार्लेश्वराला असह्य झालें. समाजाच्या या दैन्यवाण्या अवस्थेनें तो बेचैन झाला. देवरूखजवळचें तें स्थान सोडण्याचें त्यानें ठरवलें. एका काळोख्या रात्रीं मार्लेश्वर स्वस्थानावरून उठला. त्यानें इकडे तिकडे पहात वाटचाल सुरू केली. सभोंवतीं विपरीत काळानें आणलेल्या या हीन दीन करणाऱ्या दाट काळोखांत, एखादी तरी आशेची दिवटी पाजळणारा, अंतरीचा ज्ञानदीप मालवूं न देणारा, कोणी सुपुत्र आढळतो का ? यांतून मार्ग काढणारा एखादा तरी ‘ शिव ’ होऊं इच्छिणारा ‘जीव’ दिसतो कां ? म्हणून बारीक नजरेनें पहात तो निघाला. “ सर्वस्य मार्गद्रष्टा त्वं तव को मार्ग दर्शकः । तथापि दर्शयिष्यन्ति तव लोकानुसारिणः ” असा स्वतः साऱ्या जगाला वाट दाखवणारा मार्लेश्वर, स्वतःला आशेची वाट दाखवणारा कोणी मिळतो कां तें पाहूं लागला. अज्ञानाच्या घोर अंधःकारांत घोरणाऱ्या लोभी ब्राह्मणांची घरें त्यानें निराश होऊन मागें टाकलीं. गतवीर्य क्षत्रियांच्या वस्तींतहि त्याला तेजोमय जीवनाची ज्योति आढळली नाहीं. लक्ष्मीची आराधना करणाऱ्या वणिक पुत्रांची घरेंहि सत्वहीन दिसल्यानें तो पुढें निघाला. निराश झालेला मार्लेश्वर गांवाबाहेरील चांभाराच्या वस्तींतून जाऊं लागला. सत्वहीन झालेले हे सारे समाज पाहून, ज्यांना सुशिक्षण, सुसंस्कार यांपासून साऱ्या समाजानें दूर ठेवले, ज्यांच्यावर अनेक शतकां-

पासून अगणित अन्याय केले गेले, त्या हीन दीन चर्मकारांच्या वस्तींत कांहीं आशादायक सांपडते कां, तें तो पाहूं लागला. एका मोडक्या झोंपडीच्या दारांत, फाटके कपडे घातलेला, एक वृद्ध चांभार, त्याचेंच नांव मोठ्या भावभक्तीनें घेत, एकाग्रतेनें चामडे कुटीत असलेला त्याला दिसला. जवळचा संपूर्ण अंधार जरी दूर करता आला नाहीं, तरी जीवनाला आवश्यक प्रकाश देणारी एक इवलीशी दिवटी, त्या प्रगाढ अंधःकारांत चांभाराजवळ लावलेली होती. मालेश्वरानें, भक्तिपूर्ण अंतःकरणानें तन्मय होऊन, स्वतःचें नाम गाणाऱ्या त्या आपल्या भक्ताकडे मोठ्या प्रेमानें व कौतुकानें पाहिलें. त्याला दुकानाबाहेर येण्याची खूण केली. स्वतःबरोबर दिवटी घेऊन चालण्यास खुणावलें.

मालेश्वराच्या आज्ञेप्रमाणें हातांत दिवटी घेऊन चांभार बराच वेळ चालत होता. आपण कुठें जात आहोंत याचें त्याला भान नव्हतें. सारें गतजीवन त्यानें मालेश्वराच्या नामस्मरणांत घालवलें होतें. इतर सारा समाज सत्वहीन झालेला असतांना, स्वतःचा लहानशा जीवनज्योतीनें तो मालेश्वराला ओवाळीत असे. सारा प्रकाश लोपून गेला असतां, स्वतःच्या इवल्याशा भक्तीच्या दिवटीनें, तो या गडद अंधारांतून स्वतःचा जीवनपथ धुंडाळीत असे. कोळशांच्या खाणींतल्या त्या हिऱ्याला आज मोल आलें होतें. मालेश्वराबरोबर चालण्याचें महद्भाग्य आज त्याच्या वांट्याला आलें होतें. त्या ब्रह्मानंदानें तो देहभान विसरला. मालेश्वराच्या सान्निध्यांत एका मालेश्वराशिवाय सारें लोप पावलें होतें. चांभार चालत होता, पण आपण कुठें जात आहोंत, याचें त्याला भान नव्हतें.

दुसऱ्या दिवशीं मालेश्वर नाहींसा झाल्याचें साऱ्या गांवभर झालें. चांभारानें आपण दिवटी घेऊन गेल्याचें व त्याला एका ठिकाणीं पोंचवल्याचें सांगितलें. पण तें स्थान कुठलें याचा त्यालाच पत्ता नव्हता. त्यामुळें लोकांना मालेश्वराचा कुठें शोध करावा तें समजेना. मालेश्वरानें गांव सोडतांच लोकांवर नाना संकटें कोसळलीं. रोगांच्या साथींत हजारों माणसें किड्यामुंग्यांप्रमाणें मेलीं. परकीय आक्रमणांनीं घरादारांची राखरांगोळी होऊं लागली. हजारों स्त्रियांची बेअब्रू झाली. हजारोंच्या कत्तली झाल्या. ज्या सुखाच्या लालसेनें लोकांनीं स्वधर्म, स्वकर्तव्यें सोडलीं,

सत्त्व सोडलें, लाचारी पत्करली, बेअब्रू सहन केली, तें सुख दूरदूर तर पळालेंच पण जीवहि वांचणें मुष्किल ठरलें. लोक या साऱ्यानें हवालदिल झाले. मालेश्वराची करुणा भाकूं लागले, दर्शन देण्याची प्रार्थना करूं लागले, “ या जुलमाचा शेवट कर; या अत्याचारांपासून आम्हांला वांचव; आमचें रक्षण कर ” म्हणून रडूं लागलें. महिपतगडच्या आसपास राहाणाऱ्या सावंत, साळुंखे आदि तरुण वीरांचें रक्त या जुलुमानें तापूं लागलें. पंडितांचें पांडित्य धर्माच्या प्रेमानें खळखळ वाहूं लागलें. तरुणांच्या संघटना करण्यांत आल्या. तलवारी, भाले, बर्च्या, बंदुका, तोफा यांचा गंज पुसण्यांत आला. सह्याद्रीचें अजस्त्र खोरें ‘ जय मालेश्वर ’, ‘ हरहर महादेव ’ या घोषणांनीं दुमदुमूं लागलें. तरुण मराठे, धनगर, येवढेंच नव्हे तर महार, मांग एकत्र होऊन कवायती, हत्यारें चालवणें या गोष्टी करूं लागले. ब्राह्मणांची धर्मप्रचाराची गंगा दुथडी भरून वाहूं लागली. क्षत्रिय व इतर लढाऊ लोकांचे हात शौर्यानें स्फुरूं लागले. वणिकांनीं आपल्या थैल्यांचा संग्रह समाजाकरतां मोकळा केला. सारें वातावरण बदललें. उत्साहानें, धर्म-कर्तव्यप्रेमानें भरून गेलें.

मालेश्वराला हें सारें पाहून मोठा आनंद वाटला. समाजांतली ही सात्विकता, हें तेज, हा एकोपा, हें कर्तव्यप्रेम पाहून त्याला लोकांची स्वतःचें दर्शन घेण्याची असलेली तहान, भागवावीसें वाटलें. एके दिवशीं गांवावर कांहीं अत्याचारी पठाणांचें सैन्य चालून आलें. आंगवली, महिपत-गडच्या जवळपासचे सारे वीर एकत्र झाले. त्यांनीं जुलूम व बेअब्रू करण्यास टपलेल्या त्या साऱ्या सैन्याची कत्तल केली. त्यांनीं सर्वांनाच मारलं. जिकडे तिकडे या पराक्रमाची, या शौर्याची, या संघटना-चातुर्याची वाहवा झाली. त्या स्थानाकडे वांकड्या डोळ्यानें पाहण्याची कुणाला हिंमत होईना. त्या स्थानाचा उल्लेख ‘ मारलं ’ या नांवानेंच होऊं लागला. तिथल्या सावंतांच्या वस्तीला ‘ मारलं, मारलं ’ या नांवानं लोक ओळखूं लागले. त्या पराक्रमानं, त्या विजयानं तिथल्या तरुणांना अधिकच स्फुरण चढलं. स्वतःच्या शस्त्राचं पाणी दाखवण्याकरतां तरुण माणसं सह्याद्रीच्या निबिड वनांत शिरून हिंस्त्र श्वापदांच्या शिकारी करूं लागलीं.

एके दिवशीं असेच कांहीं तरुण एका श्वापदाचा पाठलाग करीत होते. श्वापद एका लहानसें द्वार असलेल्या गुहेंत शिरलें. लोक पाठलाग करीत त्या

द्वाराकडे गेले. एक तरुण आंत घुसला व तें श्वापद दिसेनासें झालें. पण इकडे एक अघटित करणी झाली. त्या लहानशा गुहेच्या द्वारावर एक भली मोठी शिळा घसरून गुहेचें द्वार बंद झालें. बाहेर त्या तरुणांसोबत असलेला कुत्रा होता. त्यानें बरोबर आलेल्या लोकांचीं धोतरें ओढीत, सर्वांना गुहेच्या दाराजवळ आणलें. तो जोरजोरानें दाराकडे पाहून भुंकूं लागला. त्याचा आवाज ऐकून आंतल्या तरुणानें बाहेरच्यांना कुकारा घातला. बराच वेळ आंत राहिल्यानें आतां त्याला आंतलें स्पष्ट दिसूं लागलें होतें. तिथें अस-लेल्या 'मालेश्वराला'–मल्लिकार्जुनाला– त्यानें ओळखलें होतें. मोठ्यानें ओरडून त्यानें बाहेरच्यांना ती आनंदाची बातमी सांगितली. साऱ्यांना खूप आनंद झाला. आपलें सत्व गेल्यामुळें ज्या सत्वशील देवानें आपला त्याग केला, तो पुन्हां प्राप्त झाल्यानें पुन्हां चांगले दिवस येण्याचें हें सुचिन्ह आहे, असें ते समजले. त्यांनीं मालेश्वराची भक्तिभावानें, मोठ्या निष्ठेनें, प्रार्थना केली, "हे मालेश्वरा, तूंच आमचा मायबाप. आमच्या चुकांची, आमच्या लाचार व हीनदीन स्थितीची आम्हांला क्षमा कर. गुहेचें दार उघडून आम्हांला तुझें दर्शन दे. आमच्या त्या तरुणाला आमच्यांत येऊं दे. आम्ही यापुढें प्राणांची पर्वा न करतां, तुला प्रिय असलेलें आमचें तेज, आमचें पौरुष कायम राखूं. आमच्या धर्माचें, आमच्या देवस्थानाचें जीव पणाला लावून रक्षण करूं. आमच्या मातृभूमीकडे कुणी परका वैरत्वाच्या भावनेनें वांकडा डोळा करून पहाणार नाहीं, याची दक्षता घेऊं. आमचें तेज, आमचा पुरुषार्थ, आमचा पराक्रम यांना धार चढावी म्हणून दर वर्षीं तुझा उत्सव करूं!" अशी जमलेल्या साऱ्या तरुणवृद्धांनीं प्रतिज्ञा केली. मालेश्वराची प्रार्थना करून करुणा भाकली. त्यांच्या त्या अंतःकरणपूर्वक प्रार्थनेनें आशुतोष मालेश्वर प्रसन्न झाला. त्यांचा तो सत्कर्मांचा निश्चय ऐकून त्याला संतोष वाटला. द्वाराजवळची शिळा दूर होऊन द्वार खुलें झालें. मालेश्वराचा जयघोष करीत, सारे घाईगर्दीनें आंत शिरलें. मालेश्वराचीं स्तुतिस्तोत्रें गाऊं लागले. माले-श्वराच्या जयजयकारानें साऱ्या सह्याद्रीचीं दरीखोरीं, शिखरं दुमदुमून आका-शाला भेदून पार झालीं. लोकमानसांत झालेल्या या क्रांतीचा, पुरुषार्थाच्या पुनरुज्जीवनाचा हा उत्सव दरवर्षीं संक्रांतीला मोठ्या थाटामाटांत साजरा होऊं लागला. लाखो लोक कोंकणच्या या ज्योतिर्लिंग भीमाशंकरापुढें मोठ्या

भक्तिभावानें लांब लांबून येऊन एकच जयघोष करूं लागले : जय मार्लेश्वर, जय मल्लिकार्जुन, हर हर महादेव.

चमकणाऱ्या रंगीत फुलांचा पट वर पसरून आपण जर एखाद्या अतिप्रचंड कढईत बसलों, तर आपणांस जो अनुभव येईल, तो मार्लेश्वराला सह्यगिरीनें बनवलेल्या अतिभव्य नैसर्गिक कटाहांत ( कढईत ) येतो. सभोंवतीं हिरव्यागार झाडा-झुडपांनीं डंवरलेलीं सह्याद्रीचीं गगनाला भिडणारीं उंचच उंच गिरिशिखरें, मध्यभागीं भयानक, खोल खोल, विस्तृत दरी झांकणारी, गगनचुंबी घनदाट झाडी, त्यांतून खळखळ करीत वाहाणारा निर्मल, गोड पाण्याचा, धारदार बांव नदीचा प्रवाह व सर्वत्र पसरलेली नीरव अद्भुत शांतता ! या शांततेचा मधूनच आपल्या हृद्य, मधुर संगीतानें भंग करणारी मोर, पोपट, कोकीळ, सारस, साळुंकी इत्यादी गगनविहारींचीं गोड किलबिल ! अशा मोठ्या अद्भुतरम्य ठिकाणीं मार्लेश्वराचें नयनमनोहर स्थान सह्याद्रीच्या कुशींत, एका मोठ्या गुहेंत आहे. जवळच समोरासमोरचे दोन डोंगर जिथें एकमेकांना प्रेमानें येऊन आलिंगन देते झाले, तेथें आपल्या नांवाप्रमाणें नांव राखून ठेवणारा, धारेश्वरचा सहस्र धारांनीं उड्या मारणारा व गंभीर वेदघोष करणारा ' अभ्दुतं रोमहर्षणम् ' असा प्रपात आहे. पुरुषसूक्तांतील " सहस्रशीर्षा, पुरुषःसहस्राक्ष, सहस्रपात् " ही ऋचा आपल्या अद्भुत भव्य, रमणीय रूपानें आपल्यापुढें तो साकार करतो. दुधाच्या हजारों, नव्हे लाखो धारा सह्यगिरीच्या कड्यावरून खालीं वेगानें धांव घेतांना पाहून मन तृप्त होतें. मार्लेश्वरावर आपला अभिषेक करण्याची जणुं त्यांना घाई झालेली असते. पण लोकमानसानें हें अत्यंत भव्य असें अभ्दुत भगवद्रूप पाहून, त्या प्रपातालाच आदरानें ' धारेश्वर ' हें रम्य उपपद देऊन आपली उत्कटभव्य भक्ति त्याला समर्पण केली. धारेश्वराच्या सहस्र धारांखालीं पुरुषसूक्ताचा पाठ करतांना माणसाचें अंग, त्या अतीव थंड जलानें चांगलेंच सडकून निघतें व आपण या ताडित क्षुद्र देहापेक्षां, आपल्या आंतल्या सौंदर्य साक्षात्कारामुळें कोणी निराळेच आहोंत, याचा त्याला चांगलाच अनुभव येतो. धारेश्वराच्या धाराहि सह्याद्रीच्या चंड वातानें इतस्ततः स्वैरसंचार करीत असतात. त्यामुळें मनोमलानंतर, शारीरमल धुवून जावूनहि, वस्त्रांचाहि मळ काढण्याकरितां, माणसाला धारेश्वराच्या चंचल धारांनीं ओलीं झालेलीं अंगावरचीं

वस्त्रें, धुवून वाळवावीं लागतात. धारेश्वराच्या पडण्याच्या स्थानाचें वर गुलाबांचे ताटवेच्याताटवे फुलून, धारेश्वराच्या पाण्यांत मिसळून त्याला आपला सुवास अर्पण करून धारेश्वरांतून गुलाबपाण्याचा वर्षाव करतात असें ऐकलें. धारेश्वराच्या उगमस्थानाचा प्रदेश स्वर्गांतील रम्य उपवनासारखाच रम्य आहे असें म्हणतात. फक्त तिथें कठीण चढण चढतांना चुकलेलं पाऊल एकादेवेळीं खऱ्या स्वर्गांतील उपवनांतच पडण्याचा संभव असतो इतकेंच !

मार्लेश्वराच्या गुहामंदिरांत शिरण्यापूर्वी दारांतच उगम पावलेल्या ' गंगोत्री ' टाक्याचें थंडगार, मधुर, पाचक पाणी पिऊन व हातपाय धुवून माणसानें एवढा चढ चढल्याचें श्रम घालवावें. मग अश्रांत शरीरानें व शांत मनानें मार्लेश्वराचें मंदिरांत शिरावें. या गंगोत्रीला बारा महिने गंगेसारखें पवित्र, आरोग्यदायक, निर्मल पाणी असतें. लोकमानसानें राजापूरच्या गंगेशी या गंगोत्रीचा स्नेहसंबंध जोडून टाकला आहे. राजापूरला ज्यावेळीं गंगा वाहूं लागतें, त्यावेळीं, तिथला गंगेचा प्रवाह येणाऱ्या भक्तांना अपुरा वाटूं नये, म्हणून येथली गंगामाई, स्वतःचें जल तिथें पाठवून कृश होते असें सांगतात. गंगोत्रीदर्शनानंतर आंत गेल्यावर गुहेच्या डाव्या अंगास भक्तांना ' अनौपम्यं, मनोहारी ' वाटणाऱ्या भक्तकामकल्पद्रुम असणाऱ्या, मार्लेश्वराचें दर्शन होतें व त्यांचे हात जोडले जाऊन नम्र भावानें तो म्हणतो " नमो भवायच, रुद्रायच, नमःसर्वायच, पशुपतयेच, नमो गिरीशायच, शिपीविष्टायच नमो ह्रस्वायच वामनायच नमो, बृहतेच वर्षीयसेच नमो ! " उजव्या बाजूस तोच मार्लेश्वर, मल्लिकार्जुन या नांवानें स्थानापन्न झाला आहे. दोनहि लिंगांच्या जवळ असलेल्या विवरांतून, मार्लेश्वराला भक्तांनीं दाखवलेल्या धूपदीपांचा सुगंध घाटावरच्या नागोठण्याला येतो असें म्हणतात. गुहेच्या उजव्या हाताला माणसाला उभें राहून अथवा घोड्यावर बसून जातां येण्यासारखें एक मोठें भुयार आहे. आतां त्यांत बरीच पडझड झाली आहे. पण तें खूप खोलपर्यंत दिसतें. त्याचें दुसरें टोंक सातारा जिल्ह्यांतल्या उदगीरला आहे, असा लोकापवाद आहे. मार्लेश्वराचें गुहामंदिर शें–पन्नास माणसें बसण्याइतकें मोठें असून, त्याचे नैसर्गिक दार मात्र पुष्कळच लहान आहे. आसमंतांतील रम्य मनोहर वातावरणानें मार्लेश्वराची भक्ति करणाऱ्या साधकांची एकाग्रता व्हायला

फार मदत होते. गुहेच्या बरोबर समोरच्या खोल दरींत एक अत्यंत खोल डोह आहे. या करंबेळीचा ठाव काढण्याचा, दोर लावून, अनेकांनीं प्रयत्न केला. पण अजून त्याची खोली मार्लेश्वराच्या पूर्ण रूपाप्रमाणेंच मानवाला अज्ञात राहिली आहे. या ठिकाणींहि आशुतोष महादेवाचें अस्तित्व आहे असें मानतात.

मार्लेश्वर या विजनवासांत येऊन बसला तरी त्याच्या मागें, संसारांतच रमूं शकणाऱ्या त्याच्या भक्तांनीं, संसार लावून दिलाच. दर संक्रांतीला मार्लेश्वर–गिरिजा यांचा लग्नसोहळा मोठ्या थाटानें साजरा केला जातो. संक्रांतीचा आदला दिवस भोगी. त्या दिवशीं साखरप्याची गौरी मोठ्या थाटानें पालखींतून लाजत मुरकत, या समारंभाला निघते. तिला घेऊन जायला आंबव व लांजा येथल्या करवल्याहि नटूनथटून येतात. देवरूखचा यजमान वाडेश्वर या सर्वांना घेऊन आंगवल्याला मधें विश्रांति घेऊन पुढें मार्लेश्वरला येतो. तिकडे नागोटण्याहून मार्लेश्वराचा करवला आलेला असतो. भोगीच्या दिवशीं हळदीनें पिवळी झालेली गौरी व मार्लेश्वर यांचा विवाह संक्रांतीस गोरज मुहूर्तावर होतो. कार्यसिद्धीस नेण्यास श्रीमार्लेश्वर समर्थ असला, तरी त्याचे तीनशेंसाठ मानकरी लेकीसुना, इष्टमित्र, सहकुटुंब–सह-परिवार येऊन लाखो लोकांच्या समोर कार्य सिद्धीस नेतात. दिवटी दाख-विणाऱ्या चांभार कुटुंबापासून तों पूजा करणाऱ्या मठपती लिंगायतापर्यंत सारे मानकरी यावेळीं आपली भक्ति मार्लेश्वराला अर्पण करतात. वर्षभर मार्ले-श्वराच्या कृपेनें भोगलेल्या सुखदुःखाचें स्मरण करीत, मार्लेश्वराला पुढील काळ चांगला सुखाचा जावो, अशी मोठ्या भक्तिभावानें प्रार्थना करतात.

मार्लेश्वराचें देवस्थान फार कडक पण चटकन् प्रसन्न होणारें आहे, असा लोकांचा अनुभव आहे. इथें गुहेंत मोठमोठे नागसर्प आहेत. पण इतरांना असणारे मानेवरचे काळसर 'वेग' त्यांना नाहींत. गुहेच्या बाहेर जहाल विष धारण करणारे, नाग व इतर हिंस्र प्राणी आढळतात. पण मार्ले-श्वराच्या दर्शनाला येणाऱ्या व तिथें निदान सदाचार पाळणाऱ्या भक्तांच्या वाटेला ते जात नाहींत. फार वर्षांपूर्वी कांहीं भक्तांनीं कांहीं वर्षे इथें अहोरात्र नामसप्ताह, गांवावरच्या संकट निवारणार्थ, साजरे केले. एकदां एका भक्तानें मांसाशन व मद्यपान यांचा नियम मोडल्यानें गुहेंतच एका नागानें सर्वांच्या देखत त्याच्या पायाला दंश केला. पण अनुतापाच्या आंसवांनीं व अंगाऱ्याच्या

तीव्र श्रद्धेनें, औषधोपचार न करतां त्याला उतार पडला. एके वर्षी वरून कोसळलेला एक भयानक आकाराचा प्रचंड धोंडा, जमलेल्या भक्तांवर पडून त्यांचा चुराडा होणार, या भयानें साऱ्यांनीं हर हर महादेव, मालेश्वर की जय, अशा मुक्तकंठानें आर्त घोषणा केल्या. धोंडा एका निवडुंगाच्या वाळलेल्या झुडुपाजवळ अलगद जाऊन बसला व साऱ्यांवरचें तें महान् संकट टळलें. साखरप्याजवळच्या एका गृहस्थानें कांहीं वर्षांपूर्वीं जीवनांतल्या अपयशांना कंटाळून इथल्या करंबेळींत आपला देह विसर्जन केला. ज्या देहाच्या मोहानें हें अपयश, हा कलंक लागला तो देहच विसर्जन करून, त्यानें जगाच्या पापतापांतून स्वतःची सुटका करून घेतली. इथें अनेक तऱ्हांचे लोक एकाच भक्तिप्रेमानें संक्रातीला हजारों, लाखोंच्या संख्येनें जमून इथल्या रमणीय निसर्गसौंदर्याशीं आपलें नातें जोडून, स्वतःच्या क्षुद्र जीवनाचा, क्षुद्र वासनाविकारांचा संबंध तोडून, जीवनांत ' अमंगल्यशीलं तव भवतु नामैवमखिलं । तथापि स्मर्तॄणां वरदं परमं मंगलमसि ' अशा मालेश्वरानें, मांगल्य निर्माण करावें, म्हणून त्याला आळवतात. शुद्ध जीवनाचा संकल्प करतात.

मालेश्वराच्या या रम्य व अद्‌भुतभव्य वातावरणांत माणसाला स्वतःचें क्षुद्रत्व विसरतां येते. तिथल्या गगनचुंबी, महाकाय गिरिशिखरांकडे, तिथल्या हिरव्यागार वनमहोत्सवाकडे, तिथें क्षीराच्या निर्मळ सहस्र धारा उडवणाऱ्या धारेश्वराकडे, तिथल्या झाडींतून मंजुळ नाद करीत लगबगीनें समुद्राकडे धांवणाऱ्या बांव नदीच्या अवखळ पात्राकडे, नि तिथल्या या रम्य स्थानीं निवास करणाऱ्या ' मंगलानांच मंगलम् ' अशा आशुतोष मालेश्वराकडे पाहून, त्याचें मन पवित्र भावनांनीं व भक्तीनें भरून येतें व तो सहजच नम्रतेनें हात जोडून त्याच्याशीं एकरूप व्हायचा प्रयत्न करतो.

• • •

# गूढवनांतील व्याडेश्वर : ७

कोंकणांतल्या मला अतिशय आवडलेल्या गांवांपैकीं निसर्ग—सौंदर्यानें नटलेला गांव म्हणजे गुहागर आहे. एका बाजूस गंभीर गर्जना करणारा सागर, तर दुसऱ्या बाजूला उंच डोंगराचे कडे, मध्यभागीं त्या कड्याशीं उंचीच्या बाबतींत स्पर्धा करणारी नारळी-पोफळीचीं विस्तीर्ण बनें; व त्यांच्या गूढ छायेंत रहाणाऱ्या, गूढ अंतरंगाची परक्याला गूढता न समजूं देणाऱ्या, तिथल्या नागरजनांची वस्ती. एस्. टी. बस गिरक्या खात गुहागरांत शिरतांच तिथें सपाट जमिनीवर पसरलेली हरिततृणांकित भातशेतें पहात असतांनाच, त्या सपाट जमिनीवर उठावदारपणानें प्रवाशांचें मन खेंचून घेणारें व्याडेश्वराचें भव्य मंदिर दिसतें. कोंकणांत कसबा संगमेश्वराचा कर्णेश्वर, गुहागरचा व्याडेश्वर, वेंगुर्ल्याचा महादेव, इत्यादि देवळांचे आकार, इतर देवळांच्या छपरी आकारामुळें उठून दिसतात. त्यामुळें माझ्या पहिल्या भेटींतच व्याडेश्वराची कुळी शोधण्याची मला फार उत्सुकता लागली. जमदग्नी ब्राह्मण व रेणुका क्षत्रिय यांच्यापोटीं जन्मून, ब्राह्मण व क्षत्रियांचें ब्रह्म व क्षात्रतेज आत्मसात करणारा कोंकणचा जनक जो परशुराम, त्यानें आपल्या आवडत्या दैवताच्या वस्तीसाठीं हें गूढ-गुहेसारखें प्रवेशाला दुर्लभ असलेले स्थान मुद्दाम शोधून काढलें. या गूढ वनाला पूर्वीं चित्रवन म्हणत. त्या ठिकाणीं

दाट अरण्य असल्यानें डोंगरांतल्या गुहेसारखा दाट काळोख पसरलेला असे. तपस्येसाठीं हें गूढ स्थळ योग्य वाटून परशुरामानें त्या ठिकाणीं आपल्या दैवताची, शंकराची आराधना केली. शंकर प्रसन्न झाले. पुढें येणाऱ्या कलीयुगांत या ठिकाणीं गूढ (गुप्त) रूपानें आपण वास्तव्य करूं असा परशुरामाला त्यांनीं वर दिला व त्या स्थानाचें नांव गूढवन असें पडलें. परशुरामक्षेत्रीं गुप्त रूपानें राहून, परशुराम या ठिकाणीं गूढ रूपानें रहाणाऱ्या महादेवाचें दर्शनाला येत असतो. या ठिकाणीं मग परशुरामशिष्य व शिवभक्त व्याडिमुनीनें एका लिंगाची स्थापना केली व त्यावर छोटेसें मंदिर बांधलें व त्याला व्याडेश्वर असें नामाभिधान प्राप्त झालें. कालांतरानें तो वाडेश्वर झाला.

काळाच्या ओघांत हें मंदिर पुढें कांहीं वर्षें बांबूच्या निबिड बेटांत गुप्त होऊन लोकांना त्याची विस्मृति झाली. या ठिकाणच्या जागृत देवस्थानाची पडझड झाली. शिलाहार राजांच्या वेळीं पद्माकर भट्ट सिद्ध पुरुष व श्रीधर पाध्ये, यांनीं राजा कायुराण (आजच्या भाषेंत कायु राणे) व त्यांचा मुलगा सांकुराण यांच्या इच्छेप्रमाणें वरचा पाट व खालचा पाट या गूढवनांतील वस्त्या तयार करून नारळी–पोफळीचीं बनें तयार केलीं. त्यांचीहि लागवड येवढी दाट झाली कीं, पूर्वींच्या गूढवनाचीच आठवण व्हावी. या आगरांमुळें पूर्वींच्या गूढवनालाच गूढ–गुह–आगर–गुहागर असें लोक म्हणूं लागले. राजा कायुराण व संकुराण यांनीं आपल्या घोडशाळा येथें तयार केल्या. शिंगरांना व नागरिकांना दूध मिळावें म्हणून गोगृहें बांधलीं. अनेक गोघरें असलेलें गांव म्हणून त्याला गोघर–गुहागर असेंहि संबोधूं लागले.

राजा कायुराणचा तबेला ज्या ठिकाणीं होता त्या ठिकाणीं घोड्यांची अवलाद सुधारण्याची एक मोठी अश्वशाळा होती. त्या ठिकाणीं अनेक अश्ववैद्य काम करीत. शिंगरें पुष्ट व्हावीं म्हणून दुधाकरतां अनेक गाई ठेवलेल्या होत्या. त्या घोड्यांच्या वाड्याच्या मुख्याला वाडाधीश म्हणत. एकदां ठेवलेल्या गाईपैकीं भरपूर दूध देणारी एक कपिला गाय अजिबात दूध देत नसल्याचें आढळून आलें. उपचार होऊनहि जेव्हां दूध मिळेना तेव्हां राखणीचा गुराखीच कपिलेचें दूध पीत असावा या संशयानें वाडाधीशानें त्याला चोपलें. इमानानें काम करणारा गुराखी भडकला. त्यानें कपिलेवर लक्ष ठेवलें. कपिला एका वेळूंच्या बनांत शिरली. गुराखीहि

मार्गे होताच. एका ठिकाणीं जाऊन कपिलेनें पान्हा सोडला. सारें दूध निथळून बाहेर पडले. आपल्यावर निष्कारण चोरीचा आरोप आणणारी ती घटना पहातांच गुराखी हातांतल्या दांडक्यासह पुढें झाला. रागानें बेभान होऊन त्यानें कपिलेवर व त्या स्थानावर घाव मारण्यास सुरुवात केली. पण थोड्याच वेळांत आश्चर्यानें व भीतीनें तो थांबला. त्या ठिकाणीं रक्ताचा पाट सुरू झाला. गुराख्यानें धांवत वाडाधीशाला बोलावलें. त्यानें राजाकडे तें अद्‌भुत वृत्त कळवतांच राज्यावर आतां कुठली आपत्ति कोसळते या भयानें राजानें गांवच्या ब्राह्मणांना बोलावलें. त्या स्थानावर दुधाचा अभिषेक करून शांतिमंत्र म्हणण्यांत आले. रक्त थांबलें. राजानें आपले कारागिर बोलावले. मोठ्या काळजीपूर्वक वेळूचें बन साफ करून दूध सांडलेल्या जागीं खणण्यांत आलें. तो आंत गुराख्याच्या प्रहारानें अर्धवट भग्न झालेलें शिवलिंग निघालें. या भग्न लिंगावर मंदिर बांधावें कीं कसें या विचारांत रात्रीं राजा झोपला. स्वप्नांत त्याला भोलानाथानें दर्शन दिलें. ‘ लिंग आहे त्याच स्थितींत असूं दे. त्यावर उद्यां सकाळीं ज्या पुरुषाचें तुला प्रथम दर्शन होईल, त्याच्या पावलाच्या आकाराएवढें मंदिर तूं बांध म्हणजे तुझें कल्याण होईल,’ असें सांगून आशुतोष महादेव अंतर्धान पावला.

राजानें सकाळीं उठून खिडकींतून बाहेर पाहिलें, तेव्हां गांगडक यवन नांवाचा एक खुजा आपल्या इवल्याशा पायांनीं चाललेला त्याला दिसला. रात्रींच्या स्वप्नांतील पायायेवढा मंदिराच्या चौथऱ्याचा–जोत्याचा– आकार ठेवण्याचा आदेश व त्या खुजाचें छोटेसें पाऊल व पिंडीचा मोठा आकार हें सारें आठवून त्याला फार वाईट वाटलें. त्यानें खुजाला बोलावून सारें वृत्त निवेदन केलें. खुजा राजाच्या बरोबर शिवलिंग पाहण्याकरतां गेला व महादेवाचा आदेश बरोबर असल्याचें सांगूं लागला. राजा आश्चर्यानें पहात असतांच खुजानें खस्‌दिशीं एक भलीमोठी सुरी आपल्या पावलांत खुपसली. त्यांतून भळभळ रक्त वाहूं लागले असतांना खुजानें रबरासारखें पाऊल ताणायला सुरुवात केली. पहातां पहातां पावलाची लांबीरुंदी हात हात वाढूं लागली, सध्यांच्या देवळाच्या जोत्याचा आकार तयार होतांच गांगडक खुजानें ‘ येवढें देऊळ बांध ’ म्हणून राजाला सांगितलें व ‘ शिव हरे ’ म्हणत आपला देह ठेवला. सारे प्रजाजन तो अद्‌भुत प्रकार पाहून स्तिमित झाले.

त्या खुजा गांगडकाची प्राणाला करपटासमान मानणारी ती अद्‌भुत श्रद्धा पाहून राजाला हर्ष आणि दुःख यांचा एकदमच साक्षात्कार झाला. मग राजानें शिवभक्त गांगडकाच्या सांगण्याप्रमाणें त्या ठिकाणीं एक सुंदरसें भव्य मंदिर बांधलें. शिवाय हनुमान, सूर्य, विष्णु, महिषासुरमर्दिनी, विघ्नहर्ता गणेश यांची पूर्वापार प्रथेप्रमाणें त्याच आवारांत आणखी छोटीं मंदिरें बांधलीं. त्या छोट्या गांगडक खुजाप्रमाणें आपलीहि धर्मश्रद्धा वर्धिष्णु असावी म्हणून राजानें नागरजनांच्या साह्यानें आणखी १७ मंदिरें गांवांत बांधवलीं. मुरूडचा सिद्ध पुरुष गंगाधर यानें तीन गंडकी शिळा कर्नाटकांतून आणल्या होत्या. त्यांपैकीं एक श्रीधर पाध्ये या ब्राह्मणाहातीं पाठवून मंगलमयी दुर्गेच्या मूर्ती तयार करवून त्यांची स्थापना करून त्यावर एक सुंदर मंदिर आणि पुष्करिणी बांधवली. गांवांत व्याघ्रांबरी ग्रामदेवतेच्या देवळाची दुरुस्ती केली व मग गुहागरची वसाहत झपाट्यानें वाढत जाऊं लागली. या ठिकाणच्या नागरांना त्यांच्या राजाच्या न्यायपूर्ण व धर्मप्रेमी वृत्तीनें संतुष्ट केलें होतें. त्यामुळें कायुराण राजाच्या मृत्यूनंतर नागरजनांनीं भर वस्तींत त्याचीहि स्थापना गांवचा संस्थापक महापुरुष म्हणून केली. त्याच्या समाधीवर मंदिर बांधलें. आजहि गुहागरला महापुरुषाचें छोटें मंदिर आहे. सत्कर्म-संकल्पांना हा महापुरुष पावतो असा विश्वास आहे.

या गूढवनांतील लोक गूढ मनाचे असतात असा त्यांचा सार्थ लौकिक आहे. सत्कर्मांप्रमाणें दुष्कर्मांच्या मानसिक प्रेरणांचा ते लोकांना पत्ता लागूं देत नाहींत. गूढ कारस्थानें करणाऱ्या आनंदीबाई या रघुनाथराव पेशव्यांच्या पत्नीचें हें माहेर. त्यांच्या वाड्याच्या भग्नावशेषांवरून तो एके काळीं भव्य असावासा वाटतो. शेवटच्या पेशव्यांचें देवघर आज डाकबंगला बनलें आहे. देवघराच्या पूजेकरतां असलेल्या फुलबागेचा उपयोग इंग्रजी अंमदानींत मानवी शिरकमलें उडवणाऱ्या बंदुकीच्या गोळीबार मैदानाकरतां करण्यांत आला. काळाचा महिमा अगाध हेंच खरें !

आजहि येथले लोक गूढ मनाचे, कठोर हृदयाचे आहेत असें सांगतात. पण या गूढ मनांच्या लोकांतच, ईश्वरी निष्ठेनें अखंड तपस्या करून ‘ दुर्मिळ ’ असा संतोष प्राप्त करून स्वतःचें जीवन धन्य करणारी आमच्या भाऊरावांसारखी, आपला मोठेपणा गूढ ठेवणारीं देवमाणसें मला

आढळलीं. स्वतः दारूचा धंदा नाइलाजानें करणारा, पण स्वतःच्या मित्रानें दारूपासून अलिप्त रहावें या करतां सत्याग्रह व अन्नत्यागापर्यंत जाणारा दिलदार मनाचा भंडारीहि मी येथेंच पाहिला. त्यामुळें गूढ वनांतल्या या गूढ नागरिकांबद्दल मला प्रेम वाटतें. तिथल्या व्याडेश्वराबद्दल भक्ति वाटते.

● ● ●

# जयगडाचा ' सुताम्रपर्णी जलराशीयोगी ' करहाटेश्वर : ८

निळ्या गर्द मखमालीचा गालीचा, आपल्या पीत-हरित रंगानें शोभणाऱ्या राजवाड्याच्या भव्य दाल-नांत चौफेर पसरून, आपल्या सुवर्ण सिंहासनावरून, एखाद्या लोभस-गोंडस राजपुत्रानें हातांत हिरे माणिक मोती यांनीं भरलेल्या पराती घेऊन, त्या दालनभर मुक्त हस्तानें उधळून टाकाव्यात व इतस्ततः त्या सर्व निळ्या मखमलीवर घरंगळणाऱ्या, टपोऱ्या, तेजस्वी मौक्तिक राशींचा खेळ पहात आनंदानें त्याचे कमलनेत्र उत्फुल्ल व्हावे, तसा भास जयगडाच्या समुद्र व खाडी यांच्या संगमावर विराजमान झालेल्या करहाटेश्वराकडे पाहून होतो. एका बाजूला सुदूरपर्यंत उन्हांत नाचणाऱ्या तेजस्वी तरंगांची चमचमणारी चलितप्रसन्न, मनोहारी सागरविचि–नृत्यें, तर दुसऱ्या बाजूला हरित–पीत पर्वतराजींच्या पार्श्व-भूमीवर उल्हास–आनंदाचे फवारे उडवणारें जयगडच्या खाडीचें विशाल, नील, रम्य पात्र, यांचा प्रीतिसंगम. मार्लेश्वराहून धांवत पळत आलेल्या बांवनदी व तिच्या बरोबर सहजीवन साध्य केलेल्या शास्त्री, अलकनंदा, इत्यादि मैत्रिणी, यांचा तो सागरांत विलीन होत जाणारा विशालकाय ओघ व त्यांच्या तीरावर, सह्याद्रिशीर्षस्थ होऊन, त्या अगाध जलराशीकडे अनि-मिष नेत्रांनीं पहाणारा प्रसन्न करहाटेश्वर, पाहून, " आतां आमोद सुनास

आले, श्रुतीसि श्रवण रिघाले, आरसे उठले लोचनेंसी ।। आपलेंनि समीरपणें, वेल्हावती विंजणें, कीं माथेंचि चांफेपणें, बहकताती ।। जिव्हा लोधली रसें, कमळ सूर्यपणें विकसे, चकोरचि जैसें, चंद्रमा जाले ।। फुलेंचि जाली भ्रमर, तरुणीची जाली नर, जाले आपुले शेजार, निद्राळुचि ।। चूतांकुर जाले कोकीळ, आंगचि जाले मलयानिळ, रस झाले सकल रसनावंत । तैसे भोग्य आणि भोक्ता, दिसे आणि देखता, हे सरले अद्वैता, अस्फुटामाजीं ।। '' असा अनुभव आपणांस येतो. करहाटेश्वराच्या मंदिर प्राकारांत उभें राहून दिसणारा देखावा इतका भव्य, इतका रम्य व मनोहारी आहे, कीं जणुं मंदिरांत असलेला करहाटेश्वरच भव्य रूपानें, चैतन्यरूपानें आपल्याला दर्शन देत आहे, आपल्या देहाचें भान हरपवीत आहे असें वाटतें. दूरपर्यंत पसरलेलें अनंत नील नभोवितान, त्याखालीं पसरलेला, चिन्मय महासागर व त्या नील पार्श्वभूमीवर चमचमणारें, चैतन्यपूर्ण तरंगांचें अद्भुत नृत्य हा देखावा पाहून, आपलें शरीर, ही घाणीची खोळ–भिरकावून देऊन, आपल्या आंतील आनंदपूर्ण चैतन्यघन, सत्यमय आत्मरूपाला, आपल्या अस्मितेला तिच्या या महत् अद्भुत रूपांत विरघळवून टाकावें, त्याच्याशी एकरूप होऊन अतिविशाल व्हावें, असा मोह माणसाला होतो.

या दृश्यानें आपल्याला त्या विशाल विश्वनाथाशी, नीलकांताशी एवढें एकरूप होतां येते कीं त्यांत व आपल्यांत अभेद होतो. मग सुगंधच सुगंधाचा उपभोग घेतो. शब्दच शब्दाला ऐकतात. सारा देखावाच देखाव्याला पहातो. वाराच जणुं वायूला वारा घालतो, पुष्पगंधाचा आस्वाद फुलेंच घेतात. रसच जिव्हारूप बनतात. सूर्यच कमलसूर्य बनून फुलतो. चंद्रच होऊन चकोर चांदणें पितात. फुलेंच भ्रमर होतात. युगुलच एकरूप होतें. झोंपेलाच झोंप लागते. सोनेंच अलंकार बनतें. आम्रपल्लव व कोकिळा एकरूप होतात. आंगच मलयनिल होतें. रसज्ञच रस बनतो. सारे जवळपासचें अपार सृष्टिवैभव आपणच झालों असा अनुभव येतो. त्याच्यांत व आपल्यांत येणारा देहाचा पापुद्राहि दूर होतो. व त्या अनंत चैतन्यांत आपणहि अनंतचैतन्यच होतो. अद्भुत महदानंदरूप बनून आपणच त्याचा उपभोग घेतो. आपणच तो जगद्रूप, सृष्टिरूप परम आत्मा बनतो. कारण,

दा. ... ९८२८० 

" सामरस्याचें बोहल्यावरी, शिवशक्ति ग्राजिरी, अभेद जेवीं सिंधु-लहरी, लवण जळ न्यायेंशी ।। जेवीं दीप आणि ज्योती, किरणें अंगीं गभस्ती, कीं चंद्र आणि दीप्ती, अभेदे असती जयापरी ।। पुष्प तेथें सुगंध, वाद्य तेथेंचि नाद, कीं सुख तेथें आनंद, अभेदपणें वर्तत ।।
( नाथलीलामृत )

त्यावेळीं त्या महान् रूपाशी आपण आपला ' मी ' सोडून, पूर्ण समरस होतो, त्यावेळीं त्या साजिऱ्या शिवशक्तींत व आपल्यांत भेद उरत नाहीं. समोर प्रसन्नतेनें पसरलेला तो अथांग सागर व त्याचें तरंग, चंद्र आणि चांदणें, वाद्य आणि नाद, सुख आणि आनंद हे जसे वेगळे नाहींत, त्याप्रमाणें आसमंतांतल्या त्या प्रसन्न शिवमंगल रूपांत व आपल्यांत भेद रहातच नाहीं. जणुं आपणच विशाल होऊन सर्व दूर पसरलेले आहोंत व आपणच तटस्थ रूपानें त्याचा अनुभवहि घेत आहोंत. सारे भेद मिटले आहेत, सोऽहम्‌चा लोप होऊन, सारेंच अहम् झाल्याचा दिव्य अनुभव आम्हांला येऊन, त्या सत्—चित्—आनंदाचा, त्याच सच्चितानंद रूपानें अनुभव आम्ही घेऊं लागलों आहोंत, जीवनांतल्या साऱ्या कटकटी, आशा-निराशा यांचा लोप होऊन, करहाटेश्वराच्या त्या भव्य रूपाच्या जवळ " सासुरवासें शिणली, तियें भेटे जेवी माऊली " अशा भावनेनें आपण त्याच्याशीं एकरूप होतो.

कोंकणचा समग्र इतिहास, साधनें जमवून जेव्हां केव्हां एखादा कोंकणचा सुपुत्र लिहील तेव्हां लिहो. सध्या तरी तुटपुंज्या साधनांनींच त्यांतील रत्न-भांडाराचा शोध घ्यावा लागतो. आठव्या शतकांत राष्ट्रकूट राजघराण्याच्या आधिपत्याखालीं कोंकण होतें. राष्ट्रकूट सम्राट अमोघवर्ष याच्या साम्राज्य-विस्तारास कपर्दी शिलाहारानें अतिशय मदत केली. त्याचा मांडलीक म्हणून त्याला कपर्दिक द्वीपाची सत्ता मिळून महामंडलेश्वर, महासामंताधिपती इत्यादि बिरुदावलीसह त्याची नेमणूक कोंकण प्रांतांचे राज्यकर्ते म्हणून झाली. या शिलाहार घराण्यांत अनेक महापराक्रमी, कलेचे भोक्ते, सदाचारसंपन्नांचे पाठीराखे व विद्याव्यासंगी राजे निर्माण झाले. संजाणपासून तो सावंत-वाडीपर्यंत त्यांच्या पसरलेल्या कलाभिरुचीच्या खुणा अजूनहि सर्वत्र सांपडतात. त्यांच्या विद्याव्यासंगाची कीर्ति काश्मीरपर्यंत पसरलेला होती. देशांतल्या साऱ्या

राजदरबारांतून त्यांचे वकील होते व साऱ्या भारताचें दृश्य कोंकणांत राहूनहि या वकिलातींच्या खिडक्यांतून ते पहात असत व आपलें राज्य आदर्श करण्याचा प्रयत्न करीत असत. इ. स. ११३५ मध्यें अपरार्क शीलाहारानें याज्ञवल्क्य स्मृतीवर केलेली टीका कांहीं वर्षांपूर्वी काश्मिरांत एका उत्खननांत सांपडली आहे. शिलाहारांच्या त्या टीकेला अजूनहि काश्मिरांत मान आहे. सदरहू टीका या विद्वान् व कलेच्या भोक्त्यानें आपल्या वकिलामार्फत त्यावेळच्या काश्मीरच्या राजाला भेट म्हणून दिली होती. मुंबई जवळच्या कान्हेरीच्या लेण्यांतहि त्यांचे शिलालेख आहेत. इ. स. १०९५ त झालेल्या शिलाहार-झंझ राजानें आपल्या शिवभक्तीची पावती बारा ठिकाणी भव्य शिवमंदिरें बांधून दिली होती. त्याचा ताम्रपट खारेपाटणला सांपडला आहे. कोंकणांत दिसणाऱ्या तटकोट किल्ल्यांचें बव्हंशी हेच रचनाकार होते. कल्याण जवळच्या अंबरनाथाचें भव्य व कलाकुसरीचें मंदिरहि छितराज शिलाहारानें इ. स. १०७० त बांधून आपल्या भक्तीचें महानस्मारक करून ठेवलें आहे. सुंदर कलापूर्ण व रम्य शिवमंदिरें, सुंदर निसर्गरम्य ठिकाणीं बांधण्याचें जणु या राजांना वेडच होतें. संगमेश्वरच्या कर्णेश्वराचें अतिभव्य, कलाकुशलतेचा अप्रतिम नमुना असलेलें मंदिरहि, त्यांच्या कलासक्तीची, त्यांच्या ऐश्वर्याची व त्यांच्या असीम भक्तीची साक्ष अजूनहि देतें. ज्याला कोंकणच्या गतवैभवाचा, इतिहासांतल्या सोनेरी पानांचा अभिमान असेल त्या प्रत्येक कोंकणवासियानें हीं मंदिरें अवश्य पाहिलीं पाहिजेत. म्हणजे त्यांची छाती अभिमानानें फुलून येईल, इतकें त्यांचें शिल्प अप्रतिम आहे. कोंकणांत सर्वत्र पसरलेल्या दारिद्र्याचो ज्यांना खंत असेल, त्यांनीं हीं मंदिरें, हे किल्लेकोट पहावे. म्हणजे त्यांची मनें गतकालांतील आमच्या पूर्वजांच्या कर्तृत्वानें मोहरून येतील व आजच्या अनुकूल काळांत, आजच्या काळाला साजेल असें कर्तृत्व, असा त्याग, असा सद्भाव त्यांच्यांतूनहि आपोआप प्रकट होईल. पुढें राष्ट्रकूटांच्या साम्राज्याला उतरती कळा लागली व चालुक्य घराण्याच्या राज्याचा विस्तार झाला, पण शिलाहारांनीं त्यांचे मांडलीक होण्याचें नाकारल्यानें सत्याश्रय चालुक्यानें आपला सेनासमुद्र कोंकणांत उतरवला. एका बाजूनें हा सेनासागर व दुसऱ्या बाजूनें जलसागर या कैचींत शिलाहार सांपडला. पण त्यांचा पीळ गेला नव्हता. एखाद्या

काडीच्या दोन्ही बाजू पेटून, त्या जळत जळत मध्यावर पोचाव्यात व त्यावरची आळी भाजूं लागावी तसा शिलाहारांचा प्रकार झाला. शेवटीं नाइलाजानें सोमेश्वर शिलाहारानें मांडलिकी पत्करली. त्यानंतर देवगिरीच्या यादवांचेंहि शिलाहारांना स्वागत करावें लागलें. शिलाहारांच्या काळांत झालेल्या कोंकणच्या खऱ्या विकासाचें स्मृतिलेख आजहि संजाण ते गोव्यापर्यंत पसरलेले आहेत. मंदिरें, व किल्ले या रूपानें आपल्याला त्यांचें दर्शन होतें.

जयगडच्या किल्ल्याचाहि पाया याच राजांच्या कारकीर्दींत घातला गेला असावा. कारण जयगडच्या खाडीच्या तोंडावर वसलेला हा किल्ला त्यांच्या तीक्ष्ण दृष्टींतून सुटणें अशक्य होतें. किल्ल्याचे सर्व भाग आज पडित असले तरी अजून तग धरलेल्या तट-कोटांची रचना, त्यांची भव्यता व त्यांचे समरसामर्थ्य यामुळें शिलाहारांकडेच त्यांचें कर्तृत्व द्यावें लागते. त्यानंतर या ठिकाणांवर विजापूरचा आदिलशहा, सरदार कान्होजी आंग्रे यांचाहि ताबा अनेक वर्षें होता व त्यानंतर पेशव्यांच्या ताब्यांतहि इंग्रज येईपर्यंतचा काळ व्यतीत झाला. किल्ल्याची भव्य उभारणी टिकाऊ व्हावी, म्हणून जयबा महारानें त्या किल्ल्यांत स्वतःला गाडून घेतलें, त्याचेंहि स्मृतिस्थान आज किल्ल्यांत आहे. किल्ल्याच्या तटांच्या मागेंच, ॲल्युमिनियम कारखान्याच्या नियोजित स्थानाला जाणाऱ्या रस्त्यावर आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरतां निधड्या छातीनें अखेरपर्यंत झुंजून, शेवटीं रणशय्येवर चिरनिद्रा घेणाऱ्या कोंकणच्या नरशार्दूलांच्याबरोबर सहगमन करून, आपलें जीवन धन्य करून, पुढील पिढ्यांना स्फूर्ति देणाऱ्या वीर पत्नींचीं २५–३० सती वृंदावनें आज उभीं दिसतात. ज्या एका तुलसीदलानें रुक्मिणीनें " गिरीधर प्रभु तुळिला " त्या तुलसीच्या छायेंत विसावलेल्या या मंगल मातांच्या समाधीपुढून सरकतांना त्यांच्या अज्ञात त्यागानें, पतिप्रेमानें आपलें मन भरून येतें. त्या अनामींच्या, त्या अनवगत नरशार्दूलांच्या स्मृतींना, भरलेल्या मनानें, भारावलेला सादर–प्रणाम करूनच आपण करहाटेश्वराकडे चालूं लागतों.

करहाटेश्वराच्या पायठाणावरून चालू लागतांच दूरपर्यंत पसरलेले विस्तृत सपाट पठार व त्यावर मधूनच डोकें वर करून, आपल्या डोक्यावर माळलेल्या लाल लाल फुलांच्या गुच्छांचें प्रदर्शन करणारी निष्पर्ण सावरीची

झाडें, एखाद्या वयाला न शोभणारा साज-शृंगार करणाऱ्या वृद्धानारीप्रमाणें विशोभित दिसतात. पण त्या वृद्धेजवळच, तिचा हात धरून उभी असलेली करवंदी, काजू यांची खुरटीं झाडेंहि वसंतसमय प्राप्त झाल्यानें मोठी लोभस वाटतात. मधूनच एकाकीपणानं उभी असलेलीं अश्वत्थ, औदुंबर, वटवृक्ष यांचीं डेरेदार, हिरवीगार झाडें, एखाद्या अवाप्तकाम संतसज्जनासारखी टवटवीतप्रसन्न व शांत दिसतात. त्या पलीकडे अहोरात्र नामघोषगौरवानें धवळीतविश्व करणाऱ्या प्रसन्न, नील सागराचा अफाट विस्तार पाहून मन हरखतें. या पठाराच्या एका कोपऱ्यावर आसनस्थ झालेला करहाटेश्वर, संसाराच्या फापट पसाऱ्याला टाळून, दूर हिमालयाच्या शिखर गुहेंत बसलेल्या एखाद्या योगिराजाप्रमाणें भासतो. साऱ्या जगाकडे तटस्थ वृत्तीनें पहात, जगाच्या सुष्ट दुष्ट कोलाहलापासून दूर राहून, ही सारी हरीची लीला पहात, आत्मानंदांत मुरणाऱ्या योग्याप्रमाणें करहाटेश्वर या एकांत, विजनवासांत येऊन बसला आहे. कुठल्या निसर्गप्रेमी, संस्कारी भक्तानें त्याला इथें आपल्या भक्तीनें खेंचला हें जरी अज्ञात असलें, तरी अनादि कालापासून तो तिथें आहे. शिलाहार, आदिलशहा, शिवाजी, आंग्रे, पेशवे व आजचें स्वराज्य हे सारे पालट त्यानें तिथें बसून पाहिले. या पालटांनीं, त्यांत घडणाऱ्या सुष्टदुष्ट खेळांनीं तो कधींच विचलित झाला नाहीं. अनेक नाथपंथी योगियांनीं, अनेक रामदासपंथीयांनीं, अनेक शिवभक्तांनीं या एकांतांत-एकाचा म्हणजे स्वतःचा, 'मी' चा अंत याच्या सान्निध्यांत करून जन्माचें सार्थक केलें. एकांतांत राहूनहि त्यांनीं लौकिकांत आदरहि मिळविला. ज्यांना ज्यांना बुद्धीची एकाग्रता, मनाची समता, ईश्वराचें प्रेम हवें होतें, ते सारे इथें धांवत आले. रघुनाथराव पेशव्याला मृत्युदंडाची कठोर शिक्षा सुनावणाऱ्या निःस्पृह रामशास्त्र्यानेंहि इथें आपली साधना केली. पुण्याच्या गजबाजाटांत एका गुंतागुंतीच्या प्रकरणांत त्यांना निःपक्ष निर्णय घेणें अशक्य झालें. मनाच्या न्यायदानाचा कांटा समतोल रहावा म्हणून ते इथें करहाटेश्वराच्या सहवासांत येऊन राहिले होते. त्यांच्या न्यायाचा धारवाडी कांटा इथें संतुलित झाला व मोठ्या समाधानानें सर्व निर्णय लिहून त्यांनीं आपल्या निःक्षपाती न्यायाची पताका आणखीच उंच फडकावली. शंखवादन करतांच प्रकट होणाऱ्या व गायमुखांतून वाहणाऱ्या

इथल्या बोभाटी गंगेच्या निर्मल जलाप्रमाणेंच आपलें सारें चारित्र्य निर्मल ठेवण्याची प्रेरणा त्यांनीं इथेंच पुष्ट केली. या स्थानाचें दर्शन घेऊन पेश-व्यांनींहि त्याला कार्तिक प्रतिपदेच्या महोत्सवाकरितां व नित्य पूजेकरतां वर्षासन बांधून दिलें. आजपर्यंत अनेकांनीं इथें आपलें जीवन निर्मल कर-ण्याची प्रेरणा मिळवली.

बोभाटी गंगेचें गोमुखांतून स्रवणारें निर्मल, थंड जल पिऊन मनुष्य संतुष्ट होतो. त्याच्यापुढें सागराचा तो अफाट विलोभनीय विस्तार उभा राहून त्याचें मन विशाल होऊन तो तदाकार होतो. त्या सागराच्या धवल फेनयुक्त प्रमत्त लाटा एकावर एक उसळत येऊन ज्या वेळीं करहाटेश्वराच्या पायाशीं आदळतात त्यावेळीं आपल्या प्रचंड देहानें ध्यानस्थ असलेल्या स्थितप्रज्ञ प्रस्तराच्या अंगाखांद्यावर बागडणाऱ्या त्याच्या अवखळ मुलाची आठवण येते. त्या लाटांच्या धडकीसरशी तो विशालकाय जरी अचल, अभंग राहिला तरी त्या जलधारांचे शतसहस्र खंड उडून मोगऱ्याच्या कळ्यांची टोपलीच कुणी त्याच्यावर उधळली कीं काय असा मनाला संभ्रम होतो. निळेंशार अंतरंग असलेलें विशाल गगन जणुं पालथें होऊन त्यांतल्या असंख्य तारकापुंजांची आकाशगंगा जणुं त्या नीलसागर—वीचींच्या चमचमाटानें आपल्यासमोर उभी रहाते. त्या साऱ्या अद्भूत लीलेनें, आपण सौन्दर्यसंपन्न करहाटेश्वराच्या त्या भव्य रूपाला हेंच प्रार्थितों कीं,

> तेजोऽसि तेजो मयि धेहि ।
> वीर्यमसि वीर्यं मयि धेहि ।
> बलमसि बलं मयि देहि ।
> ओजोऽसि ओजो मयि धेहि ॥

आपण तेजस्वरूप आहांत मला तेजस्वी बनवा; आपण वीर्यस्वरूप आहांत, मला वीर्यवान बनवा; आपण बलस्वरूप आहांत, मला बलवान् करा; आपण ओजस्वरूप आहांत, आपण मला ओजस्वी बनवा.

३६०७२
३८३ १८/५/६८

# मालवणचे शिरी बाबा : ९

“ पार्था तेणें पाडें, सन्मानें जो सांकडे, गरिमेतें आगाकडें, थेवोंचि नेदी । पूज्यता डोळां न देखावी, स्वकीर्ती कानीं नायकावी, हा अमुका ऐसी नोहावी, सेचि लोकां । चातुर्य लपवी, महत्त्व हारवी, पिसेपण मिरवी, आवडोनि । जगें अवज्ञाचि करावी, संबंधीं सोयचि न धरावी, ऐसी ऐसी जीवीं, चाड बहु । माझें असतेंपण लोपो, नांवरूप हारपो, मज-झणे वासिपो, भूत जात । ऐसि जयाचि नवसिये, जो नित्य एकांता जातु-जाये, नांवेंचि जो जिये, विजनाचेनि । ”

श्री. ज्ञानेश्वर महाराजांनीं वर वर्णन केलेलें साधूंचें वर्णन साधूंच्या अनेक प्रकारांपैकीं एक आहे. आजच्या जगांत जिथें तिथें आपलीं खोटीं नाणीं खऱ्याच्या भावानें खपावींत म्हणून खटपट अट्टाहास चालू आहे. स्वतःच्या विकारांनीं व वयोमानानें उतरत्या सौंदर्यात असलेल्या चेहेऱ्याला रंगसफेती फासून “ भारत सुंदरी ” होण्याची शर्यत लागली आहे. स्वतःचें कपट, स्वार्थ, हीन मनोवृत्ति निरनिराळ्या तत्त्वांच्या आवरणांखालीं झांकून स्वतःचा ढोल, नगारे बडवून प्रसिद्धि करण्याची होड लागली आहे. अशावेळीं ‘मी’ चें पूर्ण विसर्जन करून, ‘ जें दिठीही न पविजे, तें दिठीविण देखिजे ’ हा अनुभव घेऊन, जीं साधुवृत्तीचीं उदार माणसें वेड्याचें रूप घेऊन, जगाकडे तटस्थ-

पणें पाहूं शकतात, त्यांच्या त्या कृतीचें रहस्य समजणें अतिशय कठीण असतें. खरा वेडा व ज्ञानी पण वेड्याचें सोंग पांघरलेला, यांत भेद करणें, ज्यांना आत्मानुभव नाहीं त्यांना अशक्य होतें. एकाद्या वेळीं लोकांना न समजणाऱ्या भाषेंत विद्वत्तापूर्ण ज्ञान देणारा प्रकांड पंडितहि मूर्ख ठरण्याचा संभव असतो व ज्ञानहीन पण लोकांच्या भाषेंत बोलणारा साधारण माणूस पंडित म्हणवून मिरवूं शकतो; त्यामुळें माझ्यासारख्या अनभिज्ञ माणसानें ठरवलेलें मत बरोबर असेलच असें नाहीं. पण स्वतःला वाटलेलें मत व्यक्त करणें हेंहि चूक होणार नाहीं.

मालवणच्या एका पेठेंतल्या ओट्यावर काळ्यासांवळ्या रंगाची, कृश देहयष्टीची, ज्या शरीराची कुणीं कधींच काळजी न घेतल्यानें अस्वच्छ दिसणारी, एक लंगोटी लावलेली व्यक्ति आढळते. बाह्य देखाव्यानें कांहीं कल्पना येऊं शकत नाहीं. वाढलेल्या दाढीचे खुंट, वेडगळ वाटणारा चेहरा व कुठेंतरी अनंतांत पहाणारी दृष्टि व जनसंमर्दांत असूनहि त्यांत नसलेली ही व्यक्ति आहे. मालवणचे लोक तिला ‘ शिरी ’ वा ‘ श्री बाबा ’ इत्यादि नांवांनीं ओळखतात. जवळपासच्या एका गांवांतून कित्येक वर्षांपूर्वीं ही व्यक्ति मालवणांत आली. कधीं समुद्रावर, कधीं देवळांत, कधीं एखाद्या घाणेरड्या जागीं, तर कधीं एकाद्या दुकानाच्या ओट्यावर अशी मालवणच्या परिसरांत ही व्यक्ति हिंडते. कधीं कुणाच्या मोटारमधून व पायीं परगांवींहि भटकत असते. मालवणचें हें एक मोठें कोडें आहे. श्री. ज्ञानेश्वर महाराजांच्या वर दिलेल्या ओव्यांतून वर्णिलेलीं लक्षणें या विभूतीला लागूं पडतात. सट्टेवाले सट्ट्याकरितां, रोगी रोग जाण्याकरितां, सरकारी नोकर अनीतीनें जोडलेलें द्रव्य पचण्याकरितां, दुराचारी दुराचाराचें नियतीनें ठरवलेलें फळ टाळण्याकरतां अशा विभूतींच्या मागें लागून त्यांना उपद्रव देतांना मी पाहिले आहेत. त्यामुळें अशा साधुशील व्यक्ती वेड्याचें उग्ररूप घेऊन त्या उपसर्गाला टाळीत असतात. पण खऱ्या सदाचारी भाविकाला त्यांच्या तोंडांतून, कृतींतून, सान्निध्यांतून जीवन धन्य करण्यासारखा प्रसाद मिळतो याचा मला थोडासा कां होईना पण अनुभव आहे.

मालवणला श्रीबाबांचे एकनिष्ट भक्तांकडून मला त्यांच्या अनेक अद्‌भुत अनुभवांचें वर्णन ऐकावयास मिळालें. येथले मोटारधंदा व मासळीचा धंदा

करणारे श्री. फ्रान्सीस नांवाचे कोळी समाजांतले एक अत्यंत श्रद्धावान् गृहस्थ माझे मित्र आहेत. माझ्यापेक्षां त्यांना कृष्णाच्या गीतेचें, हिंदु देवतांचें व आचारांचें अतिशय ज्ञान आहे. बाबांना ते आपलें परमदैवत मानतात. त्यांच्या देवघरांत भगवान् येशूच्या पवित्र फोटोबरोबरच भगवान् गोपाल-कृष्णाची रम्य, लोभस फ्रेम लावलेली आहे. साधुसंतांचे अनेक फोटो आहेत. आपल्या घरीं सकाळीं येणाऱ्या प्रत्येक अतिथीला ताजी अर्धी भाकरी व चहा देतांना त्यांच्या परम भाविक मातोश्रींना मीं अनेकदां पाहिलें आहे. सकाळीं उद्योगाला लागण्याचे आधीं बाबांच्या परवानगीशिवाय ते पाऊल उचलणार नाहींत. एकदां असेंच फ्रान्सीसना कोल्हापूरला जायचें होतें. नेहमींप्रमाणें बाबांची परवानगी घेण्याकरितां ते गेले. पण त्यांना परवानगी मिळेना. शेवटीं "मी तुझ्याबरोबर येतों, चल!" म्हणून बाबा त्यांच्याबरोबर एस्. टी. च्या गाडींत एका जागेवर जाऊन बसले व फ्रान्सीसना स्वतःच्या शेजारीं बसवले. गाडी सुरू व्हायच्या वेळीं 'माझ्या जागेवर बस व येथून हलूं नकोस' एवढें सांगून बाबा खालीं उतरून चालूं लागले. फ्रान्सीस जात असलेल्या त्या मोटारला घाटांत भयानक अपघात झाला. कांहीं माणसें दगावलीं. सारे जखमी झाले पण फ्रान्सीस मात्र साध्या खरचटण्यापासूनहि वांचले.

एकदां फ्रान्सीस व त्यांची आई मालवणच्या समुद्रावर, कोल्हापूरहून मासळीची मोठी ऑर्डर आल्यानें खरेदीकरतां गेली. त्या दिवशीं तेथें कोल्हापूरचे आणखी कांहीं व्यापारी त्याकरतांच आल्यानें व बाजारांत मासळी फारच कमी आल्यानें मासळीचे भाव कडाडले. पण मोठ्या ऑर्डर-वर नफा जादा मिळेल या आशेनें, खरेदीच्या तयारींत असतांनाच बाबांनीं 'आतांच मासळी घेऊं नकोस!' म्हणून अकस्मात् तेथें येऊन सांगितलें. हातीं येणारा नफा सोडणें कठीण वाटूनहि आईच्या आग्रहानें फ्रान्सीसनीं मासळीची खरेदी बंद केली. पण कोल्हापूरच्या आलेल्या व्यापाऱ्यांनीं सारी मासळी खरेदी केली. मनांत दाटलेली निराशा लपविण्याकरितां फ्रान्सीस तिथेंच हात चोळीत फेऱ्या घालूं लागले. बाबांनीं तें पाहिलें. ते जवळ आले. व 'घाबरूं नकोस. देवबागहून आतां मासळी येईल ती घे व कोल्हापूरला घेऊन जा' म्हणून हंसत सांगून ते नाहींसे झाले आणि थोड्याच वेळांत त्यांचें बोलणें

प्रत्ययास आलें. त्या दिवशीं देवबागला अपरिमित मासळी सांपडली होती. मासळी मातीमोलानें विकत घेऊन फ्रान्सीसनीं ती कोल्हापूरला पाठवली व इतरांपेक्षां खूपच नफा त्यांना मिळून नुकसान टळलें. त्या दिवशीं मालवणहून आठ मैल लांब असलेल्या व पायाशिवाय वाहतुकीचें साधन नसलेल्या देवबागहून मालवणला कुणी सांगणारा आला नव्हता व बाबा फ्रान्सीस यांचे घरांत होते. खरेदीच्या वेळीं देवबागला समुद्रांतून काढल्या जाणाऱ्या मासळीचा कुणालाच पत्ता नव्हता. याच फ्रान्सीस–बरोबर एकदां रिकाम्या ( पेट्रोल आंत अजिबात नसलेल्या ) टॅक्सीमध्यें केवळ पाणी ओतून १०–१२ मैल टॅक्सीनें बाबा जाऊन आल्याचा चमत्कार मी त्यांच्याच तोंडून ऐकला. फ्रान्सीस अत्यंत श्रद्धावान् असल्यानें बाबांचा शब्द हाच त्यांच्या आचाराचें एकमेव सूत्र झालें आहे.

मालवणचे एक व्यापारी श्री. नाईक यांचा बाबांवर अतिशय विश्वास. त्यामुळें बाबांनीं कधीं पैसे मागितले तर ते आपल्या गल्ल्यांतून त्यांना व्यावयास सांगत. एकदां त्यांच्या वसुलीचे ३–४ हजार रुपये गल्ल्यांत ठेवले असतां बाबांनीं तेथें ठेवलेले ३–४ हजार रुपयांचें बंडल उचललें व ते चालूं लागले. श्री. नाईकांची एवढी श्रद्धा कीं, ते एक शब्द बोलले नाहींत. फक्त आपल्या गुमास्त्याला बाबा पैसे रस्त्यांत फेकतील तर ते उचलून आणण्याकरितां त्यांनीं पिटाळलें. पण त्या दिवशीं ते पैसे तसेच स्वत:जवळ ठेवून बाबा उन्हांतून ८ मैलपर्यंत चालत राहिले. बिचारा गुमास्ता बारकाईनें त्यांच्यावर लक्ष ठेवून त्यांच्यामागें गेला. तिथें पोचतांच बाबा एका झाडाखालीं बसले. गुमस्त्यानें पाहिले तर रुपयांचें बंडल नाहींसें झालेले. बाबांनीं कानांवर हात ठेवल्यानें गुमास्त्यानें पळत जाऊन मालकांना बोलावलें. पण पैशाचा पत्ता लागला नाहीं. गांवांतल्या शहाण्या लोकांनीं सल्ला देऊनही श्री. नाईकांनीं पोलीसांकडे तक्रार केली नाहीं वा पैशाकरतां खटपट केली नाहीं. पोस्टाच्या पाकिटांत पत्राच्या आंत एक रुपयाची नोट पाठविली तर मालकापर्यंत ती पोंचत नाहीं, इतका प्रामाणिकपणा हल्लीं पोस्टांतहि इतर सरकारी खात्याप्रमाणें शिरला असल्याची तक्रार हल्लीं पोस्टांतलेच लोक करतांना दिसतात. पण तिसऱ्या दिवशीं साध्या पाकिटांतून पोस्टानें श्री. नाईक यांचे पैसे परत आले. श्री. नाईक यांच्या-

इतकी श्रद्धा व मनाची हीं स्थिरता खरोखर दुर्मिळच. हा सारा प्रकार मुंबईच्या वृतपत्रांत त्यावेळीं आलेला मीं वाचल्याचें आठवतें.

मालवणच्या कस्टम ऑफिसांतले कारकून श्री. जोगळेकर यांनीं भिकारी समजून बाबांच्या अंगावर एक आणेली फेकली. पण ' खिशांत पांच रुपये ठेवून, मला एक आणा देतोस काय ? ' म्हणून बाबांनीं हटकतांच श्री. जोगळेकरांनीं सर्व खुर्दा काढून मोजला व मनांत बाबांच्याबद्दल यत्किंचित् श्रद्धा व आदर नसतांनाहि ते सर्व पैसे बरोबर पांच रुपयेच भरल्यानें त्यांना अत्यंत आश्चर्य वाटलें व त्यांनीं हा सर्व अनुभव मला सांगितला.

तिथल्या म्यु. कचेरींत हेडक्लार्क म्हणून काम करणारे श्री. पै या अत्यंत सदाचारी व भाविक गृहस्थांना, मुंबई जवळच्या वज्रेश्वरी येथील परमहंस श्री. नित्यानंद महाराज यांचेजवळ असणाऱ्या संन्याशानें " तुमच्या गांवांत येवढी मोठी विभूति असतांना, तुम्हांला इतक्या लांब येण्याचें कारण नाहीं " म्हणून सांगतांच त्यांना आश्चर्य वाटलें. रत्नाची पारख रत्न-पारख्यालाच होणार; इतरांना तें जमणें कठीण ! तसेंच ज्यांचा देहभाव पूर्ण जागृत आहे, अशा व्यक्तींना देहातीत विभूतींचें रहस्य कळणें कठीण. त्यामुळें माझ्यासारखा सामान्य मनुष्य.

तव तत्त्वं न जानामि, कीदृशोऽसि महेश्वर ।
या दृशोऽसि महादेव तादृशाय नमोनमः ॥

म्हणूनच संतोष मानतों व स्वतःचें मन पवित्र भावनेनें शुद्ध करूं शकतों.

● ● ●

# दालभ्य ऋषींचें दाभोळ : १०

दाभोळचें प्रथम दर्शन मी वेलदूरच्या किनाऱ्यावरून घेतलें. गर्द झाडींत डोंगराच्या रांगांत लपून, वासिष्ठीच्या खाडींत आपलें प्रतिबिंब पहाणारें, सागराच्या गंभीर वेदघोष करीत येऊन कोसळणाऱ्या लाटा लीलया अंगावर झेलणारे दाभोळ गांव पाहून मी एकदम खूष होऊन गेलों. दुसऱ्या वेळीं डोंगरावरून गिरक्या घेत जाणाऱ्या एस. टी. च्या बसनें दाभोळचें दुसऱ्या बाजूचें दर्शन झालें. कोंकणामध्यें इतकी रमणीय निसर्ग-सुंदर स्थानें जागोजागीं विखुरलेलीं असतांना कोंकणच्या भूमीला दरिद्री म्हणणाऱ्या दरिद्री मनाची मला कींव आली. निसर्गाच्या अंकावर खेळणारा, अर्धपोटी असलेला पण मनानें निसर्गाच्या उदार देणगीचा आस्वाद घेऊं शकणारा श्रीमंत मनाचा बहुजनसमाज तेथें आनंदानें रहात असलेलाहि मी पाहिला.

दाभोळच्या नांवाबद्दल मला अनेक कल्पना ऐकण्यास मिळाल्या. दालभ्य ऋषींनीं इथल्या स्वयंभू चंडिकेच्या गुहेंत ब्रह्मानंद मिळविला. त्यांच्या आश्रमाची जागा अजूनहि तेथें दाखवली जाते. तेथेंच दालभ्ये-श्वराचें मंदिर आज उभें आहे. या ऋषींच्या नांवामुळें अपभ्रंश होतां

होतां दाभोळ झालें. 'दश बोळ' असलेला गांव म्हणून दहा बोळाचें दाभोळ झालें असेल, हेंहि शक्य आहे.

दाभोळचें मूळ नांव 'महिकावती' होतें. दालभ्य ऋषींच्या आश्रमानें तें दाभोळ झालें असें हिंदु समाजांत ऐकलें. मुसलमानी अंमलांत त्याचें नांव 'महमुदाबाद' म्हणूनहि कांहीं काळ गाजलें.

सुमारें एक हजार वर्षांपूर्वी या किनाऱ्यावर हिंदु कोळ्यांची मुख्यत: वस्ती होती. त्यांचा प्रमुख नागोजी कोळी म्हणून इथें समुद्रावर सत्ता गाजवीत असे. त्या सुमारास एक मुसलमान अरब सरदार, गाजी आझमखान म्हणून या किनाऱ्यावर आपल्या गलबतासह लष्कर घेऊन आला. त्याच्या सत्तेला नागोजी कोळ्याचा विरोध होऊं लागला. चकमकी झडूं लागल्या. आझमखानाच्या बरोबरचे मलबारी मुसलमान शिपाई जनतेला त्रास देऊं लागले. शेवटीं दाभोळपासून थोड्या अंतरावर जयगड खाडींतील तवसाळ गांवांत कोळ्यांनीं आझमखानला कापून त्याचें शीर धडावेगळें केलें. पण मलबारी मुसलमानांची संघटना प्रबळ होती. त्यांचा अंमल सर्वत्र बसूं लागला. विजापूर दरबारचें साह्य त्यांना होत होतें. त्यामुळें गाजी आझमखानाच्या शिराचा दर्गा तवसाळला बांधून धडाचा दर्गा दाभोळला बांधण्यांत आला. तो अजूनहि आहे. इथें आलेले सुरुवातीचे मुसलमान सरदार व शिपाई शियापंथी होते. दाभोळच्या परिसरांत पसरलेल्या जुन्या थडग्यांवर असलेलीं तलवार, सांखळी वगैरे शियापंथी चिन्हें याची साक्ष देतात.

मुसलमानांनीं येथें आल्यावर सत्तेबरोबर धर्माचाहि सर्व मार्गांनीं प्रचार केला. विस्कळित हिंदु समाजाच्या संघटना नव्हत्याच. ज्या होत्या त्या एकाकीपणानें लढल्या व सारें शौर्य, धैर्य, स्वाभिमान राष्ट्रीय चारित्र्याच्या अभावीं मातीमोल झालें. मुसलमानांच्या कडवेपणानें हिंदु त्यांना पचवूं शकले नाहींत. लवकरच अंजनवेलचा किल्ला मजबूत करून दाभोळचें नियंत्रण सुलभ करण्यांत आलें. सुरुवातीला आलेल्या मुसलमान सरदाराला बंदर म्हणजे परदेशी म्हणूनच ओळखत. त्यांना गांवच्या जमिनी इनाम होत्या. हल्लीं त्यांचे वंशज बहुतेक मुंबईला व्यापारधंद्यांत असतात. पण या कुटुंबाकडे ते दाभोळचे मानकरी असल्यानें अनेक कागदपत्रें, सनदा, ताम्रपत्रें इत्यादि आहेत. त्यांच्या कुटुंबानें उर्दूमध्यें दाभोळचा कांहीं इति-

हास लिहिला आहे. पण त्यांच्यापैकीं कुणीच सध्यां तेथें नसल्यानें तो पहायला मिळाला नाहीं. विजापूरचे हे अंकित सरदार होते व ते मलबारी ( मोपला ) होते.

मुसलमानांच्या अंमलामुळें इथें अनेक मुसलमान साधुपुरुषहि आले. त्यांच्यापैकीं पीर शेख फरीद यांचा एक दर्गा येथें आहे. ईश्वराच्या प्राप्ती-करतां यांनीं येथें चिंचेचा पाला खाऊन, विहिरींत उलटें टांगून घेऊन तप केलें त्यांना बऱ्याच सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. अखंड मौनव्रत व सत्या-चरण यामुळें ते म्हणतील तसें होत असे. मीठ घेऊन आलेल्या माणसाला 'साखर घेऊन कुठें चाललास' म्हणून त्यांनीं विचारलें तर खरोखरच मिटाची साखर व माडीचें दूध होत असे असें सांगतात. त्यामुळें लोकांचा त्यांच्यावर फार विश्वास होता. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा भव्य दर्गा बांधण्यांत आला.

दाभोळच्या जवळच्या एका डोंगरावर सय्यद अमीरुद्दीन बालापीर यांचा एक सुंदर दर्गा आहे. बालापीर हे एक मोठे अवलिया होते. ते जिवंत असतांना व मेल्यावरहि त्यांचा दर्गा नवसाला फार लवकर पावतो, म्हणून त्यांना शैनुल पीर म्हणतात. असें म्हणतात कीं, दाभोळची वस्ती पूर्वीं फार उंचावर डोंगरपठारावर होती. खाडी व समुद्राच्या पाण्याची उंचीसुद्धां सध्यांपेक्षां फारच जास्त होती. त्यांत एकदां महापूर येऊन वरच्या वस्तीवर पाणी येऊं लागलें. लोक चिंताग्रस्त झाले. बालापीरांना सारे शरण गेले. पाऊस थांबला. भरतीचें व पुराचें पाणी त्यांच्या कृपादृष्टीमुळें कमी झालें. लोकांची मालमत्ता वांचली. त्यावेळच्या पुराची कल्पना देणारें जहाजाचे १५–२० माणसांना न उचलणारें पावडें–लोखंडी नांगर, कालवाचे दगड, इत्यादि वस्तू बालापीरांच्या दर्ग्यांत पडून आहेत. पुढें त्यांच्या अनुज्ञेनें डोंगराची माती व दगड–माडांचे सोट नदींत आडवे टाकून त्यावर–टाकण्यांत आले. पाण्याची उंची खूप कमी झाली व मग सध्यांच्या दाभोळची वसाहत खाडी किनारीं करण्यांत आली. अजूनहि खणलें असतां खाडीकिनारीं हे माडाचें ओंडके गाडलेले सांपडतात. दाभोळचें मुख्य आकर्षण म्हणजे तेथील कवठी ( अंड्याची ) मशीद. तिलाच आयेषाची किंवा मासाबची मशीद असेंहि म्हणतात. विजापूरच्या आदिलशहाची आयेषा म्हणून मुलगी होती. वयांत येऊनहि अनेक वर्षें ती ऋतुमति झालेली नव्हती.

वैद्य हकीमाचे उपाय थकले. तेव्हां शेवटीं मक्केच्या यात्रेला जायचें तिनें ठरविलें. वाटखर्चाकरतां १५-२०लाख रुपये घेऊन दाभोळच्या खाडीच्या नेहमींच्या राजरस्त्यानें ती दाभोळपर्यंत आली. पण तिथें मुक्काम करतांच ती ऋतुस्नात झाल्यानें, मक्केच्या यात्रेचें कारण राहिलें नाहीं. अनेक वर्षांची चिंता मिटली. पुढील, त्या कालचा धोक्याचा, प्रवास टळला. या आनंदाप्रीत्यर्थ उरलेले १६ लाख रुपये तिनें खर्च करून ही मशीद बांधली. मशीद अत्यंत भव्य व शिल्पाच्या दृष्टीनें रेखीव आहे. या मशिदींत बळी देण्याकरतां अंड्यांचा उपयोग केला म्हणून तिला कवठी–अंडे–ची मशीद म्हणतात. गांवांत एका दुसऱ्या मशिदीलाहि तेंच नांव आहे व ती अंड्यांचा व्यापार करून त्या पैशानें बांधली गेली असा प्रवाद आहे. सरकारी पुराणवस्तुजतन खात्यातर्फे तिथें एक इमाम असतो म्हणतात. पण त्याची गांठ पडणें कठीण. तिथें मशिदीच्या माहितीचा बोर्ड मराठींत असता तर लोकांना अधिकृत माहिती मिळाली असती. पण त्याऐवजीं नासधूस करूं नका म्हणून डोळे वटारणारा निष्प्राण बोर्डच तिथें लावला आहे. मुसलमानी अमदानींत येथें एकूण ३६० मशिदी होत्या; पण आज त्यांपैकीं बहुतेक पडल्या आहेत. तिथें एका मुसलमान सरदाराचा भव्य वाडा होता. पण आतां पडक्या भिंती पाहूनच समाधान मानावें लागतें.

मराठ्यांच्या सत्तेनें शिवाजी महाराजांच्या वेळेपासूनच इथें चढायांना सुरुवात केली. सिंधुदुर्गाला लागणारा पैसा दाभोळ लुटूनच शिवाजी महाराज उभा करूं शकले. लवकरच हा प्रदेश मराठी राज्यांत सामील झाला व अनेक वर्षें दुर्लक्षित झालेली हिंदु वस्ती डोकें वर काढूं लागली.

याच सुमारास जमनापुरी उर्फ बालपुरी नांवाचा गोरख– संप्रदायी गोसावी गांवांत बाजार विहिरीच्या मठांत उतरला होता. त्याला स्वप्नांत येथल्या स्वयंभू चंडिकेनें वर डोंगरावरच्या तिच्या गुहेंत येऊन रहाण्याचा आदेश दिला व तो तेथें राहून सेवा करूं लागला. त्यावेळीं तेथें साप, वाघ इत्यादि प्राण्यांची भरपूर वस्ती होती. पण जमनापुरीच्या भक्तीनें त्यांवर विजय मिळवला. पुढें एका शिष्याला गादीवर बसवून त्यानें जिवंत समाधी देवीचें देवळासमोर घेतली. त्यानंतर ही गादी शिष्यपरंपरेनें चालू होती. पण या शतकांतल्या शिष्यांनीं संसार सुरू करून ती प्रथा बंद पाडली व

आतां त्यांच्या कुटुंबांतील माणसें इनामी जमिनीची व देवीची सेवा करून पोट भरतात. देवीची गुहा बरीच मोठी व अंधारी आहे. शिवाय तिच्या चारी बाजूंना भुयारांच्या वाटा खोल खोल गेलेल्या दिसतात. या वाटांनीं पूर्वी एक घोडेस्वार जाऊं शकत असे एवढ्या त्या उंच होत्या असें जुने लोक सांगतात. पण आतां त्यांत बरीच पडझड झाल्यानें रस्ता माणसानें सरपटत जाण्याइतपतच रुंद राहिला आहे येथली देवी फार कडक, पण भक्ताची मनोकामना पूर्ण करणारी आहे. देवीच्या भुयारी देवळाजवळून स्वच्छ पाण्याचा बारमाही वाहणारा एक पाट जातो. जवळच वाघबीळ आहे. तिथें अधूनमधून वाघ येऊन रहातो व देवीचें दर्शन घेतो असा समज आहे. सदरहू देवीचे देवळाभोंवतीं दिसणारे तटाचे अवशेष येथें पुरातनकालीं किल्ला असावा असें दाखवतात. देवीच्या देवळांत एकांतप्रिय भक्तांना साधना करण्याच्या दृष्टीनें जागा पूर्ण निवांत वाटते. स्वयंभू असली तरी देवीचें रूप मनोहर वाटतें. शिवाय दाभोळच्या डोक्यावरच हें स्थान असल्यानें समुद्र, खाडी व हिरवागार परिसर पाहून मन प्रसन्न होतें.

या डोंगराच्या पायथ्याशींच एक दगडी बांधणीचा गंगातळें म्हणून तलाव आहे. त्यांतल्या एका ठिकाणीं दर तीन वर्षांनीं गंगा येते. त्यावेळीं खणानारळांनीं ओटी भरण्याचा पहिला मान बंदर या मुसलमान कुटुंबाला आहे. येथें रहाणारे ब्राह्मण पुजारी स्वतःला गंगापुत्र म्हणवून घेतात.

दाभोळनें हिंदु, मुस्लीम, व इंग्रजी राज्यांचे अनेक नमुने पाहिले. जराजर्जर झालेल्या इथल्या इमारती, पडके अवशेष व मुंबईच्या रोखानें पळणारा येथला तरुण वर्ग यामुळें दाभोळच्या परिसरांत पुन्हां तीं मोकळीं पडलेलीं घरें भरून हें शहर कधींकाळीं पुन्हां माणसांनीं उमलेल तो भाग्यदिन ठरेल. आजतरी निसर्गसुंदर पण पडक्या इमारतींचे दाभोळ पाहून मनावर विषण्णतेची दाट छाया पसरते.

• • •

# भाटयांतील सती सामाई देवी : ११

रत्नागिरीजवळच्या भाट्यांत एक सुंदर देऊळ भंडारी समाजानें बांधलें आहे. त्याला सतीचें देऊळ म्हणतात. अनेक भाविकांना ही सती नवसाला पावते असा विश्वास आहे.

या भाट्याचे मूळ वतनदार मुरकर म्हणून भंडारी घराणें होतें. येथें ब्राह्मण व भंडारी मुरकर यांची वसाहत होती. मराठी राज्याच्या वेळची गोष्ट. जयबा महाजन भाटकर म्हणून पेशव्यांच्या आरमाराचा तांडेल अधिकारी येथें आला. सोईस्कर गांव पाहून आपलीं गलबतें त्यानें नांगरलीं. मुरकरांशी अदबीनें मैत्री जुळवून त्याचें घर स्थानापन्न झालें. मुरकर कुटुंबांतल्या एकाला त्यानें आपली मुलगी दिली. पण सत्ता, संपत्ति, मागोमाग येणारा ‘ मद ’ यानें कुरबूर सुरू झाली. एके दिवशीं जांवयाला त्याच्या तीन भावांसह त्यानें भोजनाचें निमंत्रण दिलें. जेवतांना शब्दावरून शब्द वाढला. दोन्ही बाजू इरेस पडल्या नि हट्टाला पेटल्या. जांवईबुवा व त्यांचे भाऊ जेवून तावातावानें बाहेर येतात, तों जयबा महाजनाच्या माणसांनीं हात उचलले. वातावरण गरम झाले. तोल सुटला गेला व त्यांत जांवयासह चारी भावांची व घरांतल्या इतर मंडळींची जयबांच्या लोकांनीं कत्तल केली.

जयवंतांची मुलगी सामाई नऊ महिने भरत आलेली पहिलटकरीण. ती बापाचा व नवऱ्याचा हा द्वंद्वप्रसंग पहात होती. मुरकरांची कत्तल होतांच, मुरकर वंशाचा दिवा उदरीं घेऊन ती बापाच्या घरांतून पळाली व मासेमारी करणाऱ्या एका कोळ्याच्या होडींत जाऊन जाळ्यांच्या ढिगाखालीं लपली. पहांटेच्या वेळीं मासेमारी करण्याकरतां कोळी त्या ठिकाणाहून भर समुद्रांत शिरले. जाळ्याखालीं लपलेल्या या स्त्रीला पाहून ते विस्मित झाले. तिच्या विनंतीला मान देऊन त्यांनीं तिला सुखरूपपणें जवळच्या पेठ किल्ल्यांत पोचवलें. ती योग्य वेळीं प्रसूत होऊन तिला पुत्र झाला नि मुरकर घराण्याचा निर्वंश होण्याचें टळलें. सामाई श्रीमंत अधिकारी बापाची लेक होती. तिचा पिंड सुखांत वाढलेला होता. पण पुत्रप्रेमानें तिनें बापाकडे, त्याच्या संपत्तीकडे व सुखासीन जीवनाकडे पाठ फिरवली. ती लोकांच्या घरचीं काबाडकष्टांचीं कामें करी. तिचा पुष्ट देह काटकीसारखा वाळला. सुंदर केसांच्या झिपऱ्या झाल्या. अंगाची टवटवी लोपली. हरणासारखे सतेज डोळे निस्तेज झाले. पण पुत्राच्या प्रेमानें तिचा अंतरात्मा संतुष्ट होता. पोटाला मिळणाऱ्या अर्ध्या नाचण्याच्या भाकरीवर ती दिवस काढीत होती. अंगावरचीं फाटकीं धडोतीं पतिप्रेमाच्या बळकट आवरणांनीं पैठणीसारखीं अभिमान देणारीं ठरत होतीं. तिच्या अमाप कष्टांनीं तिचा बाळ चंद्रकोरीप्रमाणें वाढत होता. तिचा अंतरात्मा आनंदानें फुलत होता.

सामाईचा मुलगा दहा-बारा वर्षांचा झाला होता. सवंगड्यांशीं खेळतांना एके दिवशीं मुलांनीं “ रांडोळीचा पोर ” म्हणून त्याला डिंवचला. सामाईच्या निर्धाराचा तो वंशवेल आईकडे आला. रडवेल्या तोंडानें त्यानें आपल्या बापाचा पत्ता विचारला. बिचारी सामाई मुलाच्या या सरबत्तीनें घाबरली. ती लपूनछपून दिवस काढीत होती. जवळ असलेल्या बापापासून अज्ञातवासांत तिला रहायचें होतें पण पोर धड जेवेना, झोपेना. साऱ्या समजावण्या फुकट गेल्या. बापाचा ध्यास सुटेना. पोरापुढें मातृहृदयाचा पराभव झाला. सामाईकडून हकीगत कळतांच मुलाचा हट्ट वाढला. त्या गांवांत जाण्याचा हट्ट त्यानें धरला. दहा-बारा वर्षें तपस्यामय जीवन व्यतीत करणारी सामाई बाळाला घेऊन भाट्यांत आली. त्याच्या बापाचा निर्वंश झाल्याचें समजून लोकांनीं घरें, शेतें बळकावलीं होतीं. भिकारणी-

सारखी दिसणारी सामाई व तिचा बाळ भाऱ्यांत फिरत होते. जयबा महाजनाच्या तीक्ष्ण नजरेंतून हें सुटलें नाहीं. तो स्वतः पुढें आला, पण सामाईच्या दैन्यावस्थेनें तिला तो ओळखूं शकला नाहीं. त्यानें दरडावून तिला " तूं कोण ? " असें विचारलें.

बापाचा रुद्रावतार पाहून सामाई थरथर कांपूं लागली. बाळाच्या काळजीनें तिच्या मातृहृदयाचा थरकांप झाला. ती रडतरडत खालीं वांकली. बापाच्या पायावर पडली. तिच्या करुण अवस्थेनें जयबा विरघळला. रुद्राचा मंगल शिव झाला. त्यानें तिला अभय दिलें. तिचें, तिच्या पुत्राचें रक्षण करण्याचें आश्वासन दिलें. पण सामाईनें त्याच्याकडून नारळावर हात ठेवून वचन घेतलें; तिची इच्छा पूर्ण करण्याचें ! त्या क्षणाखर भंडाऱ्यांतला दिलदारपणा जागृत होताच तिनें आपली ओळख दिली. सामाईची ती दैन्यावस्था, तिचें तें विलक्षण पुत्रप्रेम, तिनें त्याकरतां केलेलें दिव्य तप ऐकतांच सुपात्र कन्येबद्दलच्या वात्सल्याचा सागर उचंबळला. त्यानें मुलीला, नातवाला हृदयाशीं धरलें. आपल्या डोळ्यांतल्या प्रेमाच्या गंगेनें त्यांना भिजवलें नि स्वतःचें मनहि अनुतापाच्या यमुनेनें पवित्र केलें. नातवाची सारी जिंदगी, व्याज व भरपाई त्याच्या स्वाधीन केली.

पण मुलाच्या काळजींतून मुक्त होतांच सामाईनें सती जाण्याचा आपला मनोदय व्यक्त केला. पतीनंतर त्याच्या प्रेमानें स्वतःला जाळून घ्यायची तयारी दाखवणारी ती पतिव्रता, मुलाच्या वात्सल्याचे, आईबापांच्या प्रेमाचे, सुखाचे नाजूक धागे ताडकन् तोडायला तयार झाली. मृत्युदेवतेच्या पाशांत, त्यांना फुलांचे हार समजून, मान अडकवणारी ती वीर भंडारीकन्या पाहून, तो व सामाईची आई दुःखानें वेडी झाली. पण सामाईचा निर्धार कायम होता. ती कुठल्याहि मोहाला बळी पडली नाहीं. साप जशी सहज रीतीनें कात टाकतो, एखादा संन्यासी आपले मायापाश तोडतो, त्या सहजतेनें तिनें साऱ्यांना दूर लोटलें.

सती जाण्याची तयारी झाली. आजूबाजूच्या लांबलांबच्या गांवांचे लोक आले, मानकरी आले. साऱ्यांनीं आपल्या माना त्या साध्वीपुढें नम्र केल्या. रंगेल रक्ताचा जयबा भंडारी महाजन, त्यानेंहि तिला वंदन केलें. साध्वी

सामाईनें हंसत हंसत मृत्यूला कवटाळलें. सामाई देवीची समाधि बांधण्यांत आली. एका थोर जीवनाचें भावी पिढीकरतां स्फूर्तिस्थान निर्माण करण्यांत आलें. त्या सामाई देवीच्या कथेनें अनेक भंडारी तरुण-तरुणींना, आबाल-वृद्धांना पराक्रमाची स्फूर्ति दिली. मनाचें मोठेपण, पावित्र्य दिलें. कांहीं वर्षांपूर्वी नव्यानें जीर्णोद्धार झालेलें सामाईदेवीचें मंगल मंदिर आजहि भाट्यांत आहे. तिथल्या मुरकरांना, भाटकरांना, इतर भंडाऱ्यांना व इतर समाजाला स्फूर्ति देण्याचें, त्यांच्या अवनत जीवनांतून वर उठवण्याचें, त्यांच्या सत्यसंकल्पाला चैतन्यरूप करण्याचें, त्यांच्या नवसाला पावण्याचें सामर्थ्य आजहि सती सामाईदेवीच्या पादुकांत आहे. भाट्याचे लोक या पवित्र स्मृतिमंदिराला प्रणाम करून आपलें जीवन, आपले आचारविचार उन्नत करण्याचा संकल्प करतील अशी मला आशा वाटते. तशा संकल्पाला सिद्धी देण्याचें सामर्थ्य आजहि तेथल्या चैतन्य अंशांत आहे ही माझी खात्री आहे, श्रद्धा आहे !

● ● ●

०

# चुना कोळवणचा सवतकडा : १२

मानवी मन हें एक न उलगडणारें, मोठ्या गुंतागुंतीचें कोडें आहे. त्यांतून काय रत्नें व हलाहल बाहेर पडूं शकेल याचा भरंवसा देतां येत नाहीं. तुकारामहाराजहि "मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचें कारण, मोक्ष अथवा बंधन, सुख समाधान इच्छा ते ॥" म्हणून त्याचें कौतुक करतात. भगवान् श्रीकृष्णहि "**मन अेव मनुष्याणां कारणं बंध–मोक्षयोः**" म्हणून त्याचं महत्त्व सांगत आहेत. महाभारत, रामायण आदि ग्रंथ म्हणजे या विलक्षण मनाच्या गुंतागुंती उकलून दाखवण्याचा महर्षि व्यास, आदिकवि वाल्मिकी यांनीं केलेला एक महान् प्रयत्नच आहे. त्यांत शत्रूंचीं मुंडकीं सपासप् उडवणारा महापराक्रमी अर्जुन आप्तस्नेहानें रडतांना दिसतो, तर कर्णाबद्दलच्या असूयेनें जळतांना त्याचा सारासार विवेकहि नष्ट होतो. कर्णाचा पराक्रम व औदार्य यानें स्तिमित होत असतांनाच त्याचें अपमानानें धगधगणारें हृदय पाहिलें, त्याचा कौरवांचा कैवार पाहिला कीं आश्चर्य वाटतें. ज्या सुयोधनाला दुर्बुद्धीनें दुर्योधन नांव प्राप्त झालें, त्याचें मित्रप्रेम व शौर्य आकर्षकच वाटतें. सीतेचा लोकलाजेनें त्याग करणारा, वालीचें निर्दालन करणारा मर्यादापुरुषोत्तम श्रीरामहि त्याच्या उदात्त, गंभीर चित्रांत त्याच्या या कृत्यांनीं एक अनाकलनीय कोडें वाटतो.

आजच्या जगांत आम्ही पाहूं लागलों तर अशी कितीतरी कोडीं आम्हांला पडतील. सर्वस्वाचा त्याग करून, देशाच्या स्वातंत्र्ययज्ञांत स्वतःच्या जीविताचेंहि हवन करायला सिद्ध असलेला, एखादा महान् देशभक्त ज्यावेळीं चार कवड्यांकरतां, आपल्याकरतां हाल सोसलेल्या आप्तावर अविश्वास दाखवितो, त्यावेळीं त्या महान् देशभक्तांतला हा क्षुद्रपणा आपल्याला एक कोडेंच वाटतें. रणावर मर्दुमकी गाजवणारा एखादा सेनापती ज्यावेळीं सभेंत झालेल्या थोड्याशा गडबडीनें गांगरतो, त्यावेळीं मानवी मनाच्या विविध बाजू पाहून तेंच मन आश्चर्य करूं लागतें. सुष्टदुष्ट भावनांचा एकाच वेळीं खेळ खेळणारें हें मन म्हणजे जगांतलें एक महान् आश्चर्य आहे. त्याचें न सुटणारें कोडें सोडवण्याचा जों जों प्रयत्न करावा, तों तों तें अधिकच गूढ बनतें. शेवटीं त्याच्या विविध लीला व मर्कटचेष्टा पाहून आपणच आपल्या मनाला ' तें असें असेल ' असें समजवावयाचें येवढेंच !

लांज्याच्या पुढें व राजापूरच्या अलिकडे मुचकुंदी नदीच्या तीरावर असाच एक सुंदर गांव वसलेला आहे. मुचकुंदीच्या पात्रानें तिथें वरून खालीं जीं उडी मारली त्यानें निर्माण झालेला धवलतुषार उधळणारा प्रपात हें एक मोठें आकर्षण तिथें आहे. हिरव्यागार सृष्टीमातेचें मोहक रूप चुन्याच्या डोंगरामुळे मोठें मोहक वाटते. चारी बाजूस उंच उंच हरितश्याम गिरिशिखरें व त्यांमधून झुळझुळ वाहणारें मुचकुंद ऋषींच्या कन्येचें धवल पात्र यामुळें कोंकणच्या विविध आकर्षक सौंदर्याचा माणसाला साक्षात्कार होतो. त्याच डोंगरावर पुढें होऊन खालच्या गांवांकडे पहाणारा ' सवतकडा ' व ' परीट-कडा ' आपल्याला त्यांच्याकडे आकर्षित करतो. ' हे कोण ? ' ' त्यांचें नांव काय ? ' असल्या कुतूहलानें आपल्याला पछाडलें जातें. चुना कोळवणच्या या घरमालकाचें गांभीर्य, त्याची शान, त्याचा रुबाब आपल्याला त्याची अगत्यानें चौकशी करायला लावतो, येवढा त्याचा दरारा इथें आहे.

फार वर्षांपूर्वीची गोष्ट; या कोळवण गांवांत एक सावकार मोठ्या इमल्यांत मोठ्या झोकानें रहात असे. कानांत, हातांत त्याच्या श्रीमंतीचें प्रदर्शन भरलेलें असे. दारी बैलजोड्यांचे घुंगर त्याच्या भातशेतीची कल्पना देत. जवळपासची हापूस आंब्यांची राई, माड-पोफळी त्याच्या घराची शोभा

वाढवीत. सावकाराच्या दारीं राबणारे कुळवाडी मरेमरेतों मेहनत करून त्याच्या मोबदल्यांत मिळणारी चटणी-भाकरी खाऊन सावकाराला त्याच्या औदार्याबद्दल दुवा देत. सावकाराला कसली कमतरता नव्हती. सुखाच्या साधनांचा तोटा नव्हता. पण सुख मात्र मिळत नव्हतें. त्याच्या पोटीं संतती नव्हती. सावकार व त्याची पत्नी उदास होत. वैद्यांचे, ज्योतिषांचे व भगतांचे सारे उपचार झाले. देवाला सांकडें घातलें, पण सावकाराला संततीचें दान कुणी करीना. सावकार यामुळें खिन्न झाला. एवढी सारी कमाई, एवढी जमवलेली माया कुणाकरतां ? घरांत आपल्या मागें दिवा कसा लागेल या चिंतेनें त्याला घेरलें. बायकोनें व मित्रांनीं दुसरें लग्न करण्याचा सल्ला दिला. सावकारानें तो मानला. नवी वधू घरीं वाजत गाजत आली. आतां तरी आपल्याला पुत्रमुख दिसणार, घरांतली सारी खिन्नता, औदासीन्य जाणार या आशेनें सावकारानें पांढऱ्या केसांना कलप लावून तारुण्याचा देखावा केला. एका तरुण मुलीच्या गळ्यांत आपल्या थरथरत्या हातानें लग्नाची माळ अडकवली. सुखाच्या आशेनें एक नवा प्रयोग केला.

पण या सुखाच्या शोधांतच दुःखाची बीजें होती. तरणीसाठी बायको, या म्हाताऱ्याला घालून-पाडून बोलूं लागली. सवतीला मोलकरणीची कळा आली. सवत एखाद्या अडगळीसारखी नको नको वाटूं लागली. ही म्हातारी मरेल, तर म्हातारा आपल्या कह्यांत येईल, घरांत मोठीला मिळणारा मान आपल्याला मिळेल, आपणच घराची सारी सत्ता, संपत्ति यांच्या स्वामिनी होऊं म्हणून धाकटी झुरूं लागली. धुसफुस करूं लागली. घरांत क्षुल्लक कारणावरून भांडणें होऊं लागलीं. ज्या सुखासाठीं दुसरें लग्न केलें. तें तर दूरच पळालें. पण दुःखानें, भांडणतंट्यांनीं घरांत कायमचें घर केलें. सावकारानें धाकटीला समजावण्याचा खूप प्रयत्न गेला. मोठीलाहि समज दिली. पण सावकाराला जास्त सुख मिळावें आणि तें आपल्या हातून मिळावें, याकरताच आपली तगमम होते, त्याकरतांच आपण भांडतों, तंडतों, एकमेकींच्या उखाळ्या-पाखाळ्या काढतो असें दोघींनीं त्याला बजावलें. धाकटी नवी नवरी म्हणून अधिकार गाजवायला पहात होती तर मोठीला मोठेपणाचा, इतक्या दिवसांच्या वहिवाटीचा हक्क मोठा वाटत होता. दोघीहि माघार घ्यायला तयार नव्हत्या. दोघींनाहि आपलेंच

म्हणणें, आपलेंच तत्व बरोबर असल्याचा हट्ट सावकारावर लादायचा होता. त्याला जास्त सुख आपल्याच हस्ते व्हावें यांकरतां त्यांचा अट्टहास होता. त्यांच्या भांडणतंट्याला, शिवीगाळीला, धमक्या-प्रति-धमक्यांना सावकार, त्याचे नोकरचाकर, शेजारीपाजारी, सारे कंटाळले. त्यांच्या केलेल्या समजावण्या फुकट गेल्या. पण त्या दोघींना आवरणें, त्यांना घरबंद घालणें साऱ्यांना अशक्य झालें. सावकाराचा प्रभाव या स्त्रियांवर पडेना इतका तो हतप्रभ झाला होता. त्या भांडायला लागल्या कीं, मुकाट्यानें सारें पहात रहावें येवढेंच त्याच्या हातांत राहिलें होतें. धाकटी कधीं त्याच्याकरतां कांहीं खाण्याचें पदार्थ तयार करून त्याला पाचारीत असे, तर मोठी त्याला ते पचणार व रुचणार नाहींत म्हणून मोडता घाली. त्यामुळें धाकटीहि मोठीच्या वेळीं तोच उपाय करी. मोठीनें निळ्या रंगाचा कपडा घेतला व त्याच्याकरतां शिंप्याकडे कपडे शिवायला टाकले कीं, धाकटीनें लालसर रंगाचे कापड आणून त्याचेच कपडे घाल म्हणून आग्रह करावा. सावकाराला मनांतून हे दोन्ही रंगांचे कपडे नको असायचें. तो म्हणायचा, ‘ मी आतां या रंगांना विटलों आहे. तरुणपणीं अंगांत खूप रक्त होतं त्यावेळीं या रंगीत कापडाच्या वेगवेगळ्या तऱ्हा मीं वापरल्या. आतां मला कुठलाच रंग नको आहे. ज्यानें माझ्या मनाला प्रसन्नता वाटेल असा एक पांढरा रंगच मला आवडतो. तेच कपडे मी घालीन ! ’ पण दोघी तें मान्य करीत ना. ‘ माझ्या आवडीचे कपडे नाहीं घातलेत तर निदान दुसरीच्या आवडीचे घाला. मीं तुम्हांला तिच्या बाजूचे समजून काय समजायचें तें समजीन पण हा तिसराच पंथ मला आवडायचा नाहीं. ’ बिचारा सावकार या ओढा-ताणीनें बेजार होई.

एके दिवशीं सावकारानें दोघींचीहि चांगलीच कानउघाडणी केली. पुन्हा भांडणार नाहीं व घरांत अशांतता निर्माण करणार नाहीं असें दोघींनीं आश्वासन दिलें. दोघी वरकरणी एकमेकींशीं सख्य दाखवूं लागल्या. एक-मेकींना समजावून घेण्याच्या व सावकाराला सुखशांतता मिळवून देण्याच्या गोष्टी करूं लागल्या. सावकाराला आनंद झाला. या भांडणतंट्यांपासून आपण आतां सुटलों, घरांतली अशांतता आतां कायमची गेली, आतां आपण सुखी होणार या कल्पनेनें त्याला आनंद झाला.

एके दिवशीं दोघी सवती सायंकाळीं पाय मोकळे करण्याकरितां सावकाराला सांगून घराबाहेर पडल्या. दोघींच्या प्रेमाच्या घरांत आनंद निर्माण करण्याच्या गोष्टी सुरू झाल्या. त्या झपाझप फिरायला, निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घ्यायला उंच कड्याच्या बाजूला वळल्या. तिथून सारा आसमंत मोठा भव्य व सुंदर दिसे. मुचकुंदीचें खळाळणारें पात्र धवल तुषार उडवीत उड्या मारतांना पाहून मन प्रसन्न होई. दोघी हा रमणीय देखावा पाहण्याकरतां त्या कड्याच्या वरच्या बाजूला आल्या.

धाकटीच्या अंगांत तारुण्याची शक्ति असल्यामुळें ती भरभर पुढें चालली. तिच्या पाठोपाठ मोठी चालत होती. कड्याजवळ येतांच मोठीच्या मनांत काय आलें तें मुचकुंदीलाच ठाऊक ! ती पुढें झाली. धाकटीला समजूं न देतां तिनें आपल्या पदराचें टोंक धाकटीच्या वाऱ्यानें फडफडणाऱ्या पदराला बांधून टाकलें व ती वेग वाढवून धाकटीच्या बरोबरीनें चालूं लागली. दोघी कड्याच्या टोकावर येऊन आजूबाजूला दिसणारा सुंदर देखावा पाहूं लागल्या. मोठी तो रमणीय देखावा पाहण्यांत गुंग झाली होती. त्या भव्यतेनें तिचं मन प्रसन्न होत होतं. धाकटीला त्या भव्यतेबरोबरच भयानक खोलीची आठवण झाली. तिच्या चेहऱ्यावर एक क्षणच द्वेषाची लकेर उमटली. खालचा ओठ घट्ट चावून तिनें दोन्ही हात पुढें करून मोठीला ती बेसावध असतांना जोरानें कड्यावरून खालीं लोटलें. पण काय होतें आहे तें समजण्याच्या आंतच दोन भयानक किंकाळ्या दरीचा आसमंत घुमवीत कड्याच्या खालच्या बाजूनें उमटल्या व सारें शांत झालें. सावकार सायंकाळीं उठलेल्या त्या भयानक किंकाळ्यांनीं दचकला आणि सुखाच्या व आनंदाच्या कडेलोटाची ती निशाणी तो उमगला व कड्याखालीं येऊन त्यानें वेड्यासारखे ते छिन्नविच्छिन्न झालेले दोन गोळे पाहिले व डोक्याला हात लावून तो मट्कन् खालीं बसला.

आजहि तुम्ही चुना कोळवणला कधीं गेलांत तर दुसऱ्याचें श्रमानें जमविलेलें मधुधन अपहरण करतांना ज्या कड्यावरून पडून तो मधाचें पोवळें काढणारा परीट मेला, तो परीटकडा, तुम्हांला तिथें दिसेल. आजहि स्वःताच्या स्वार्थाकरतां भांडणाऱ्या पण सावकाराच्या शांतीच्या व सुखाच्या गोष्टी करणाऱ्या, दुसरीच्या नाशाकरतां खटपट करून त्यांत शेवटीं साऱ्यांचाच

नाश करणाऱ्या त्या दोन सवतींची आठवण देणारा उंच सवतकडाहि तुम्हाला तिथें दिसेल. जरा अंतर्मुख होऊन तुम्ही विचार करूं लागाल तर आपण सारे जगांतले लोक अशाच एका कड्याजवळ उभे असून, हैड्रोजन बॉंबचे पदर एकमेकाला घट्ट बांधून घेऊन, युद्धाच्या कड्यावर येऊन, एकमेकींना या भयानक कड्यांवरून ढकलून देऊं पहाणाऱ्या दोन सवती तुम्हांला अंतःचक्षूंपुढें उभ्या दिसतील. त्या दोघींना या अविचारापासून परावृत्त करूं पहाणारा पांढऱ्या कपड्याचा आर्जवी सावकारहि तुम्हांला त्यांना समजावतांना दिसेल व आतां पुढें जगाचाहि चुना कोळवणचा सवतकडा होणार कीं काय, या भयानें तुम्ही आपले डोळे मिटाल.

• • •

# चिपळूणची जगन्माता भगवती विंध्यवासिनी : १३

अप्रतिम कलाकुसरीच्या, नाजुक मनोहारी शिल्पाचा उत्कृष्ट नमुना म्हणजे चिपळूणच्या रावतळ्याजवळ असलेली जगन्माता विंध्यवासिनीची गंडकी शिळेची सर्वांगसुंदर मूर्ति होय. इतके रेखीव, बांधेसूद अवयव, मुद्रेवरचे भाव, शरीराच्या सूक्ष्मतम हालचाली व्यक्त करणारे त्यांतलें सूक्ष्म रेखा-चित्रण, फारच थोड्या मूर्तींमधून इतक्या समर्थपणें व्यक्त झालें असेल. केतकी-विवलीचा लक्ष्मी-केशव, गुहागर जवळच्या आऱ्याचा लक्ष्मी-नारायण व चिपळूणची भगवती विंध्य-वासिनी त्या त्या शिल्पकारांनीं आपल्या साऱ्या कलेचें सर्वस्व ओतूनच जणूं निर्माण केल्या आहेत. या महान् समर्थ शिल्पकारांनीं साऱ्या विश्वांतील चैतन्य या जड, गंडकी शीळेमधून जणूं साकार करून ठेवलें आहे.

" अदितिर्द्यौरदितिरन्तरिक्षम्; अदितिर् माता स पिता पुत्रः ।
" विश्वेदेवो अदितिः पञ्चजनाः; अदितिर् जात् मादितिर् जनित्वम् ॥

या पंक्तींत दिव्य तेजानें झळकणारी प्रतिभा, चैतन्याची आंतरिक स्फूर्ति, लहानथोर सर्वांविषयीं उदार समान वृत्ति, जगताला रक्षणाची पांखर घालणारें व्यापक प्रेम, अवघा संसार सुखाचा करणारी पवित्रता, विश्वसंग्रहाची शक्ति, मानववंशाविषयीं सहानुभूति, भूतकाळाचें अनादि स्मरण आणि

भविष्य कालाविषयींची अनंत आशा, हीं सर्व या अदितीच्या रूपानें एकवटलीं आहेत; या अष्टभुजेच्या खड्गिनी, शूलिनी, गदिनी, चाक्रिणी, शंखिनी, चापिनी अशा आठ हातांचे आकार व रेखा जिवंत व्यक्तीच्या हातांचीच आठवण करून देतात. जवळचा महिषासूर, व्याघ्र इत्यादींच्या प्रतिमा, देवांना त्राहि भगवान् करणाऱ्या राक्षसाचा वध करतांना, भगवतीच्या मुखावर दिसणारें तेजस्वी गांभीर्य, स्त्रियांना अलंकार वाटणारी सुडौल बांधेसूद शरीरयष्टी व सुंदर कोमल भाव असलेलें मुखकमल, यांमुळें विंध्यवासिनी मातेला साकार करणाऱ्या त्या महान् शिल्पकाराच्या प्रतिभेचें कौतुक वाटून त्या जगन्माता अदितीकडे मला कोण पोंचवील अशी हुरहुर लागते. ही पाषाणमूर्ति जणुं आतां आपल्याशीं बोलायला लागून आपल्याला अभयदान देऊन सर्व पापतापांतून सोडवील असा विश्वास वाटूं लागतो. जवळच त्या महान् शिल्पकाराच्या हातूनच गंडकी शीळेंतून साकार झालेला, चार भुजांचा, पांच मुखांचा व स्वतःभोंवतीं संगीतसाधना करणाऱ्या भक्तांचें वलय असणारा असा जगदंबेचा लाडका पुत्र कार्तिकस्वामी याची तशीच रम्य, सजीव मूर्ति उभी आहे. सौंदर्याला, सुरेखेला साकार करणाऱ्या या दोन चकाकणाऱ्या सुडौल मूर्ति पाहून कलावंतहृदयांतून काळ्या गंडकी पाषाणांत सौंदर्याचा केवढा मोठा अविष्कार होऊं शकतो याची प्रचीति येते. होयसाळ शिल्पाचा हा अप्रतिम नमुना कोंकणचें भूषण आहे. विंध्यवासिनीचें मंदिर त्या मानानें अगदींच सामान्य असलें तरी त्याची भरपाई आसपासच्या पर्वतराजीनें व वनराजीनें केलेली आहे. दोन डोंगरांच्या बेचक्यांत अगस्तीतीर्थाच्या बाजूला, गर्द हिरव्यागार झाडींत असलेलें हें मंदिर व आंत असलेल्या मूर्ती माणसाला मोहून टाकतात.

विंध्यांत असलेली ही योगिनी चिपळूणला कशी आली याचा लोकांना पत्ता नाहीं. पण इसवी सनाच्या प्रारंभीं आंध्रभृत्यांची राजवट या भागावर होती. त्यांच्या देवतांतच पार्वतीमाता, तिचा सुपुत्र कार्तिकस्वामी व दक्षिणामूर्ति या देवता प्रामुख्यानें आढळतात. त्यांच्याचपैकीं एखाद्या भगवतीभक्त राजानें हिची स्थापना केली असावी. त्यानंतर इ. स. २२५ ते ५५० या काळांत वाकाटक, कदंब, सेंद्रक, मौर्य व चालुक्य या राजघराण्यांची सत्ता इथें नांदत होती. संगमेश्वरच्या ' कर्णेश्वर ' मंदिराचा जनक, राजा कर्णदेव

याचेंहि राज्य इथें नांदलें. पुढें शिलाहार व यादव या सत्तांनींहि इथें खांदेपालट केला. पण अल्लाउद्दिन खिलजीच्या दक्षिणप्रवेशानें या सत्ता कोसळूं लागल्या व पुढें विजापूरच्या आदिलशाहीनें आपला मोर्चा इकडे वळवला. शिलाहारांचा पाडाव होऊं लागतांच त्यांच्या सत्तेखालीं नांदणारे छोटे राजे स्वतंत्र झाले व त्यांचीं छोटींछोटीं राज्यें सर्वत्र पसरलीं.

कोंकणचा इतिहास ज्या समाजांनीं घडवला त्यांत खारवी कोळ्यांचा भाग मोठा आहे. शिक्षणांत मागासलेली, अबोल, जाहिरातबाजी न करतां येणारी, पण कणखर वृत्तीची, दिलदार हृदयाची, शौर्यशाली व निर्धार टिकवणारी ही जात म्हणजे कोंकणचें एक भूषण आहे. या कोळ्यांची लहानलहान राज्यें दाभोळपासून तों घाटमाथ्यापर्यंत, कुंभार्ली घाटांतहि पसरलेलीं होतीं. त्यांतल्या बारा भावांच्या – ‘ बारा-राव ’ कुटुंबाचें राज्य चिपळूणपासून घाटमाथ्यापर्यंत पसरलेलें होतें. हे सारे भाऊ मोठे कर्तबगार, धाडसी व वीर्यशाली होते. भगवती विंध्यवासिनीला ते आपली आई समजून तिच्या पूजेअर्चेकरतां अफाट खर्च करीत. या महिषासुरमर्दिनीच्या पायाशींच त्यांचा निवास होता. या बारा-रावां ( राजां ) मुळेंच या भागाला रावतळें हें नांव प्राप्त झालें होतें. त्यांच्या सैन्याचे तळ कुंभार्ली घाटावरच्या हेळवाकपासून तों चिपळूणपर्यंत असत. त्यांच्या सैनिकांची शिस्त, पराक्रम, धैर्य साऱ्या कोंकणांत अद्वितीय ठरलें होतें. त्यांच्या धाकानें आदिलशहाला चैन पडेना. इ. स. १३८० मध्यें आदिलशहानें सरदार आकूसखान यास मोठ्या सैन्यानिशीं बाराराव कोळ्यांवर पाठवला. पण कुंभार्ली घाटाखालीं सोनपायाच्याखालीं कोंकण-वावी येथें घनघोर लढाई होऊन कडव्या खारवी कोळ्यांनीं त्याचा सैन्यासह निकाल लावला. तें ऐकून पातशहास फार अफसोस वाटला. त्यानें दुसरा सरदार भाईखान यास शिरपांव बक्षीस देऊन अतिशय मोठें सैन्य देऊन रवाना केलें. पण बारा-राव कोळ्यांनीं त्याची त्याच्या सैन्यासह मौजे दळवटणें येथें कबर बांधली. तेव्हां बादशहाला पुन्हा अफसोस होऊन सरदार बहाद्दूर सरदार शेख बहादूर यास बहुत फौजेनिशीं, सरंजामानिशीं शिरपांव, पोषाक, बक्षीस व मोठी जागिर कबूल करून कोळ्यांवर हल्ला करण्यास पाठवला. शेखबहाद्दूर कोळ्यांना मारीत मारीत चिपळूणपर्यंत आला. रावतळ्यावर हल्ला करून त्यानें पुष्कळ

कोळ्यांस मारलें. तो विंध्यवासिनीच्या देवळावर चालून गेला. पण कोळ्यांनीं वरच्या डोंगराचा प्रचंड ढीग देवळावर पाडला. त्या गडबडींत भगवतीचे पुढचे दोन हात तुटले. पण सबंध देऊळ मातीच्या ढिगाऱ्यांत गुप्त झालें. पण कोळी हटले नाहींत. त्यांनीं चिपळूणपर्यंत माघार घेऊन चिपळुणांत शेखबहाद्दूरची सैन्यासह कबर बांधली. पण यांत कोळ्यांचें सैन्य फार पडलें. पातशहास हें मालूम होतांच पातशहा फार कष्टी जाहले व बोलिले कीं, तीन मातबर सरदार शिपाई चांगले तलवारबहाद्दर ठार होऊन कोळीयानें नाबूद केले. तर आतां कोळी शिकस्त होऊन मुलुख सर कसा होईल ?

तेव्हां जें काम या सरदारांना जमलें नाहीं, तें करायला एक हिंदु सरदारच तयार झाला. मराठ्यांच्या इतिहासांत अशा अनेक स्वार्थी, अदूरदृष्टीच्या लोकांनीं स्वबांधवांच्या निर्दय कत्तली केल्या आहेत. स्वाभिमानशून्य, राष्ट्रीय चारित्र्य नसलेले, असले हे अस्तनींतले निखारे सर्वकाल सर्वत्र आढळून येतात. पृथ्वीराजाचा पाडाव करण्याकरतां महंमद घोरीला बोलावणाऱ्या जयचंद्राचा हा वारसा मराठ्यांतहि चालू होता. माधवराव रविराव शिंदे यांनीं हा विडा उचलला व बादशाही फौज घेऊन मोठ्या पराक्रमानें त्यांनीं या स्वतंत्र कोळीराज्याचा शेवट करून, कोळ्यांची भयानक कत्तल केली. बारा राव कोळी या घनघोर युद्धांत ठार झाल्यानें, त्यांच्या बारा स्त्रिया कलमणी येथें इतर कोळी वीरस्त्रियांबरोबर सती गेल्या. तिथें त्यांचीं वृंदावनें आहेत. कोळ्यांची स्वतंत्र सत्ता नष्ट करून, शिंद्यांनीं ती कोळ्यांच्या अफाट संपत्तीसह बादशहापुढें सादर केली. बादशहानें चिपळूण प्रांतांत दिलेला चोवीस गांवच्या खोतीचा तुकडा घेऊन ते धन्यता पावले. पुढें छत्रपती शिवाजीराजांच्या सत्तेलाहि त्यांनीं चंद्रराव मोऱ्यांप्रमाणेंच विरोध केला व त्यांत त्यांची चंद्ररावप्रमाणेंच गत झाली. पण पुढें शिवाजीची बाजू कांहीं शिंद्यांनीं धरली व मोठा पराक्रम गाजवला. एका वेळीं तर सिद्दीला तोंड देतांना शिंद्यांचीं अनेक कुटुंबेच्या कुटुंबें उध्वस्त झालीं. त्यांच्या स्त्रियाहि सती गेल्या. शिंद्यांच्या कुळाचें पाप धुतलें जाऊन ते स्वराज्याच्या पायाचे मजबूत आधार बनले.

संभाजीच्या हौतात्म्यानंतर मध्यंतरीच्या काळांत सिद्दीचा जोर झाला. पण पुढें चिमाजीअप्पानें आपल्या पराक्रमानें हा सारा प्रदेश मोकळा केला.

त्याचवेळीं भगवती विंध्यवासिनीच्या पुरातन मंदिराचा कळस नांगरटी करतांना लागला व पुन्हा देऊळ खणून वर काढण्यांत आलें आणि भक्त-जनांची रीघ भगवतीचें दर्शन घेण्याकरतां लागली.

सर्व देवांना त्राहि भगवान् करणाऱ्या महिषासुराचा नाश करणारी ही भगवती, चिपळूणच्या जवळच रावतळ्याच्या डोंगरांतल्या रम्य स्थानीं आजहि विराजमान आहे. तिथल्या रमणीय स्थानांत माणसाचें मन सहजच रमतें. तिचें नयनमनोहर पण तेजस्वी व्यक्तित्व साकाररूपानें पाहतांना मनुष्य भक्तिभावानें प्रार्थितो कीं, " **प्रणतानां प्रसीदत्वं, देवी विश्वार्ति हारिणी । त्रैलोक्यवासिनामीड्य लोकानां वरदा भव ॥**

• • •

# श्रीहरिहरेश्वर : १४

रागावणें, रुसणें, फुगणें, हटून बसणें, हा स्त्रियांचा जन्मसिद्ध हक्क आहे. स्त्रियांनीं रागावणें सोडलें तर मला वाटतें, पुरुषजात दुःखी होईल. स्त्रिया रागावल्या-रुसल्या कीं अधिकच सुंदर, तेजस्वी दिसूं लागतात. त्यांचा राग, चडफडाट दुरून पाहणें रम्यच असतें. अगदीं कैकयीच्या कालापासून स्त्रिया हेंच करीत आल्या आहेत. त्यांच्या रागावण्या-रुसण्याचे प्रकार भिन्न असतील, पण अक्षरओळख नसलेल्या निरक्षरेपासून तों विद्याविभूषित विदुषीपर्यंत साऱ्याच स्त्रिया हा आपला जन्मसिद्ध हक्क सोडायला तयार नाहींत. याला मग महाबळेश्वरच्या सह्याद्रि शिखरावरून हरेश्वरला सागरसमर्पण होणारी सावित्रीमाता तरी अपवाद कशी असणार? रुसून फुगून वैतागानें निघालेली सावित्री वयानें, देहानें मोठी असली तरी बाणकोटच्या खाडींत शिरतांना तिनें आपला हा हेका सोडलेला नाहीं. स्थूलकाय स्त्रीनें कितीहि लगबग केली तरी देहधर्मानें, वयोमानानें तिचा वेग व चापल्य एकाद्या सडसडीत षोडशवर्षीय बालेइतका असणें शक्य नाहीं, त्याप्रमाणेंच बाणकोटच्या खाडीला मिळणारी सावित्री प्रौढा असल्यानें तिचा वेग मंद झाला आहे. आंतील राग जोरांत उसळत असला, तरी तिला आपला राग जरा सौम्यतेनेंच व्यक्त करावा लागला आहे. तिच्या कांठी दोन्हीं तीरांवर ध्यानस्थ बसलेले, मंडणगड व कुलाबानिवासी डोंगरहि, चमनगोटा करून कठोर तप आचरणाऱ्या कर्मठ संन्याशांप्रमाणें वाटतात. त्यांचें वैराग्य व भव्यता पाहून आदर वाटला, तरी त्यांच्या प्रखर वैराग्यानें त्यांच्याजवळ

जाण्याची माणसाला हिंमत व्हायची नाहीं. न जाणो, त्यांचा ध्यानभंग झाला तर वस्कन् अंगावरच खेकसायचे ! पण बऱ्याच वर्षांपूर्वी हेच संन्यासी, मोठे रसिक वृत्तीचे संसारी गृहस्थ होते हें ऐकलें तर आपल्याला आश्चर्य वाटेल. कांहीं वर्षांपूर्वी वनश्रीनें बहरलेले हे डोंगर, लोकांच्या बेहिशेबी जंगलतोडीनें, अधिक धान्य काढायच्या अधिक लालसेनें व खरा वन-महोत्सव साजरा न करण्याच्या आळसानें असे पार उघडेबोडके झाले आहेत. लोकांच्या या कृतघ्नतेनें त्यांना संसाराचा वीट आला व आतां ते उघड्या-बोडक्या अंगानेंच सावित्रीच्या दोन्ही तीरांवर कठोर सूर्यतापानें, तप पुरें करायला बसले आहेत. हें वैराग्य जाऊन त्यांच्यांत योग्याची मधुरता येईल तेव्हांच ते धन्य होतील. या पर्वतरांगा महाडपासून श्रीहरिहरेश्वराच्या दर्शना-करितांच जणूं ताटकळत रांगा लावून उभ्या आहेत. भगवान् श्रीहरिहरेश्वराच्या अधिकाधिक जवळ जे आपल्या तपोबलानें पोंचले, त्यांची वैराग्याची हाप-धांप निवाली असून, पश्चिम समुद्र व सावित्रीतीराला, ते हरेश्वराच्या दर्शन-अनुभूतीनें प्रसन्न मुद्रेचे, सौम्य रूपाचे व शांत वृत्तीचे झाले आहेत. त्यांच्या सहवासांत वागडणाऱ्या वृक्षवेलींनाहि या शांतचित्त, निर्वैर, प्रसन्नमुख प्राप्त पुरुषांच्या अंगाखांद्यांवर लोळतांना संकोच वाटत नाहीं. रागावलेल्या सावित्रीमातेचें मुखहि, श्रीभगवान् हरिहरेश्वरानें बारा ठिकाणीं तिचा रुसवा-फुगवा काढण्याच्या, तिच्या दुखावलेल्या अहंकारावर फुंकर घाल-ण्याच्या केलेल्या विनवण्यांनीं प्रसन्न पण गंभीर झालें आहे. पण हरिहरेश्व-राच्या विनवणीला दाद न देतां ती मानिनी आपल्या सौंदर्याच्या ताठ्यांत फुसफुसत तशीच सागराला मिळून अदृश्य झाली आहे.

म्हणजे त्याचें असें झालें कीं, फार फार वर्षांपूर्वी एकदां ब्रह्मदेव यज्ञ करण्याकरितां बसले होते. आतां ब्रह्मदेवांचाच तो यज्ञयाग ! त्याला भगवान् विष्णु, आशुतोष गिरिजापति इत्यादि मोठमोठे पाहुणे आपले इष्टमित्र, सगेसोयरे, लेकी-सुना यांच्यासह सारा थाटमाट करून उपस्थित होते. पृथ्वीवरचे सारे तपस्वी ऋषीमुनी, आपल्या साध्वींसह हजर होते. जिकडे-तिकडे थाटमाट, वैभव यांचा झगमगाट झाला होता. वैकुंठवासी भगवान् विष्णु सर्व ऐश्वर्यासह लक्ष्मीला घेऊन हजर होते. लक्ष्मीच्या ऐश्वर्य-रूपानें सारे विस्मित झाले होते. ब्रह्मदेवांच्या पट्टराणी सावित्रीमाता या समारंभाच्या

मुख्य यजमानीणबाई नि त्यांच्याच घरचें हें कार्य; त्यामुळें ब्रह्मदेवांनीं यज्ञाकरतां पाचारण करतांच, ज्यामुळें आपल्या वैभवाचें दर्शन होऊन लक्ष्मीशीं स्पर्धा करतां येईल अशी भरजरी पैठणी, दागदागिने इत्यादि शोधून, त्या परिधान करण्यांत गुंग झाल्या. स्त्रियांचें नटणेंमुरडणें संपून त्या बाहेर जायला तयार होईपर्यंत, आजच्या अणुयुगांत एखादा टिटॉव्ह पृथ्वीला सात प्रदक्षिणा घालून यायचा पण यांची तयारी पुरी झालेली नसायची हा नियमच आहे. त्याला त्यावेळची पट्टराणी सावित्रीमाता तरी अपवाद कशी असणार ! बाईसाहेबांचें नटणेंथटणें होतांहोतां मुहूर्त टळण्याची वेळ आली. भटजी घाई करूं लागले. शेवटीं ब्रह्मदेवांनीं मुहूर्त टळूं न देण्याकरतां तिथेंच तयार होऊन बसलेल्या आपल्या दुसऱ्या पत्नीला—गायत्रीमातेला—यज्ञाकरतां स्वतःजवळ बसविलें व यज्ञयाग सुरू झाला. यज्ञाचा अर्धाअधिक भाग पुरा झाल्यावर आपल्या जाम्यानिम्यासह, पूर्ण नटूनथटून, सावित्री यज्ञकर्माकरतां हजर झाली. पण यज्ञाला ब्रह्मदेवांनीं आपल्या सवतीला बसवून, तो पुरा करीत आणल्याचें पाहून तिचा अहंकार दुखावला. “ येवढ्या लोकांत, येवढ्या महत्त्वाच्या प्रसंगीं, माझा हा जाहीर अपमान म्हणजे काय गोष्ट आहे ? पट्टराणीचा हा सारा साज चढवून आतां उपयोग काय ? ” रागा-रागानें त्या गौरांगीचें मुख लाल झाले, डोळे विस्फारले गेले, ओठ कंप पावूं लागले, दांत घट्ट आवळले गेले. “ माझा अपमान ! या मानिनीचा, या रूपगर्वितेचा, या महान् पट्टराणीचा हा भयंकर अपमान म्हणजे काय गोष्ट आहे ? ” ब्रह्मदेव, विष्णु, गिरिजापती सारे तिचा राग पाहून सर्दच झाले. “ या भगवतीला आतां समजवायचें कसें ? कुणीं ? ” कसाबसा यज्ञ पुरा झाला. सारे मोठ्या अजिजीनें, म्लान मुद्रेनें तिच्याभोंवतीं गोळा झाले. पण तिची समजूत पटेना. तिचा सवतीमत्सर अनावर झाला. ती आपल्या मुखांतून शापवाणी उच्चारती झाली कीं, “ तुम्ही सारेजण माझा अपमान करायला धजलांत; पण यापुढें आतां तुम्हांला जलरूपानें नदी म्हणूनच वहात रहावें लागेल. ” त्या तपस्विनीचा शब्द खरा झाला. भगवान् विष्णूंना कृष्णा नदीचें, ब्रह्मदेवाला वेण्या नदीचें, शंकराला कोयना नदीचें व इतर देवऋषींना लहानसहान नदीनाल्यांचें रूप प्राप्त झालें; आणि ते पूर्व दिशेनें, पूर्वसागराकडे, महाबळेश्वरच्या यज्ञमंडपांतून वहात निघाले. साऱ्यांनीं

तिला समजावण्याचा, तिचा राग शांत करण्याचा खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ ! विष्णूच्या विनवणीनें तिला थोडें बरें वाटलें. म्हणून तिनें "या जलरूपांत तुम्ही अंशानें राहिलांत तरी चालेल." असा उःशाप व सूट दिली. आपला अपराध नसतां आपल्याला छळणाऱ्या या गर्विष्ठ स्त्रीला अद्दल घडावी म्हणून, इतरांनींहि सावित्रीला "तूंहि जलरूपानेंच वहाशील" म्हणून शाप दिला. पण त्या रूपगर्वितेला जलरूप प्राप्त झालें तरी तिचा ताठा ओसरला नव्हता. इतर जलरूपें पूर्व समुद्राला निघालेलीं पाहून, तिनें पश्चिमेच्या कड्यावरून रागानें उडी टाकली व ती रागानें तट्ट फुगून महाडमार्गें पश्चिम सागराकडे वळली. ब्रह्मदेवाच्या संसाराची राखरांगोळी होऊं नये म्हणून भगवान् गिरिजापतीनें बारा ठिकाणीं तिला अडवून परत चलण्याचा आग्रह केला. त्या बारा ठिकाणीं स्वयंभू स्थानें महाबळेश्वर ते हरेश्वर या दरम्यान निर्माण झालीं. पण मानिनी सावित्रीचा राग अनावर झालेला होता. हरिहरेश्वराजवळ ब्रह्मा–विष्णू–महेशांनीं शेवटचा निकराचा प्रयत्न केला. तिथेंच हरिहरेश्वराचें स्वयंभू स्थान निर्माण झालें. अजूनहि ते महान् देव तिथेंच रागावलेल्या मानिनीचा राग शांत झाला म्हणजे ती परतून येईल या आशेनें, तिष्ठत बसून तप करीत तिची वाट पहात आहेत.

दक्षिणेंत काशी-विश्वनाथ सावित्रीच्या तीरावर येऊन बसल्यानें या स्थानाला काशीचें पावित्र्य, निर्मलता व वैभव प्राप्त झालें. दंडकारण्याचें रम्य उपवन बनवून नगरें, देवालयें रचणाऱ्या महाराष्ट्राच्या जनकानें— अगस्ती ऋषींनीं— या स्थानावर, या स्वयंभू त्र्यमूर्तींवर एक सुंदर मंदिर हजारों वर्षांपूर्वी उभारलें व मग पतिराजांचा "वियोग : प्रेमवर्धकः" असला तरी तो सहन न झाल्यानें पार्वतीमाताहि तेथें योगेश्वरीरूपानें येऊन बसली. काशीविश्वनाथ आपल्या कालभैरव रूपांत काशीचें रक्षण करतो, तोहि तसल्याच रूपांत येथें येऊन राहिला. या दक्षिण-काशीच्या वैभवाचा, कीर्तीचा डंका उत्तर–काशीपर्यंत वाजला. तिथल्या कालभैरव रूपाला हा सारा वैभव सोहळा आपण पहावा अशी इच्छा झाली व तो रात्र संपायच्या आंत परत जाऊं या हिशोबानें काशीहून निघाला. तो येतो आहे, या वार्तेनें हरेश्वराच्या कालभैरवाला परमसंतोष होऊन, त्याच्या स्वागताकरतां त्यानें आपलें नेहमींचें दक्षिणाभिमुख उत्तरेकडे केलें. पण काशीचा कालभैरव

जरा रमतगमत निघाल्यानें श्रीवर्धनला येईपर्यंत पहांटेच्या कोंवड्यानें साद घातली. आतां '**इदं च नास्ति, परं न लभ्यते**' अशी अवस्था होऊन काशी आणि हरेश्वरचा लोभ सोडून त्याला तिथेंच कायमचा मुक्काम करावा लागला. हरेश्वरचा काळभैरव अजूनहि त्याची वाट पहात उभाच आहे. काशीचे नवस फेडण्याकरितां श्रीवर्धनचा काळभैरव भक्तांनीं असा आपल्या प्रेम प्रेरज्जूंनी जखडला आहे कीं, तो त्यांच्या त्या भक्तीला तसाच पावत असतो. इथें त्रैमूर्तीच्या नांवाचे तीन सुबक डोंगर सावित्रीच्या पात्राकांठीं तिच्याकडे लक्ष लावून उभे आहेत. त्यांच्या अंगाखांद्यावरच्या अर्धचंद्राकार खडकावर त्रैमूर्तींचीं स्वयंभू स्थानें आहेत. पिशाच्चवृत्तीच्या मानवी मनाला मुक्ति देण्याकरितां शुक्ल तीर्थ व अजर–अमर रहाण्याच्या अमूर्त कल्पनेला श्राद्धपिंडरूपानें अमर करण्याकरितां भक्त विष्णुपदीं धांवतात. उत्तर काशीप्रमाणेंच येथें मंदिराला तीर्थस्थानापर्यंत जाऊन, फिरून महादेवाच्या देवळांत असलेल्या प्रथेप्रमाणें प्रदाक्षिणा घालतात. काशीप्रमाणेंच क्षेत्रप्रदक्षिणा करण्याची इथें पद्धत आहे. महाशिवरात्र व कार्तिकांत भैरव–अष्टमीला येथें मोठा उत्सव होतो. त्यावेळीं लांबलांबचे भाविक लोक भूतपिशाच्चबाधेपासून मुक्ति मिळावी म्हणून भैरवाला आळवतात, तर योगेश्वरीचा कार्यसिद्धी-साठीं कौल घेतात. आपलें मनोवांछित त्याच्या कृपेनें पुरें झाल्याबद्दल हरि-हरेश्वरला कृतज्ञतेनें नवस फेडतात.

छत्रपती शिवाजी राजांचा प्रतिस्पर्धी चंद्रराव मोरे यानें जावळीहून येथें येऊन समुद्राकडे जाण्यास पायऱ्या बांधून देऊन आपला भक्तिभाव प्रकट केला होता, तर छत्रपती शिवाजी राजांच्या भोसले कुलानें येथें अन्नछत्र, गोशाळा व यात्रेकरूंना मदत करून आपली दानत दाखवली. सावित्रीसागर संगमावर वसलेली ही दक्षिण काशी मोठी रमणीय व पवित्र आहे. आसपास असलेलीं नारळी व पोफळीचीं हिरवीगार उपवनें, हरेश्वराच्या प्राप्तीनें तृप्त–शांत झालेले, पण प्राप्तपुरुष असूनहि, लोक-शिक्षणाकरितां कठोर तप करणारे तापसी पर्वत, मानिनी व रूपगर्विता सावित्रीचें विशाल, प्रसन्न पात्र व आपल्या या अपमानित पण गुणसंपन्न कन्येला पितृप्रेमानें थोपटणारा विशालहृदयी पश्चिम सागर व त्यावरून वाहणारा मंद समीर, यामुळें माणसाचें मन मोठें प्रसन्न होऊन तो भक्ति-

भावानें पुलकित होतो. त्याच्या तोंडून सहजच उद्गार बाहेर पडतात कीं–

अयं दान-कालस् त्वहं दानपायम्
भवान्नाथ दाता, त्वदन्य न याचे ।
भवद्भक्तिमेव स्थिरां देहि मह्यम्
कृपाशील शंभो कृतार्थोऽस्मि तस्मात् ।।

" हे प्रभो हरिहरेश्वरा, हा दानाला योग्य काल आहे आणि मी दानाला योग्य, पात्र आहे. तूं दाता आहेस म्हणून मी दुसऱ्याकडे याचना करणार नाहीं. तुझ्या ठायीं माझ्या मनांतील भक्ति दृढ होऊं दे. ( हेंच दान तूं मला कर. ) हे कृपासागरा, शंभो ! त्यामुळें मी धन्य होईन !

• • •

# कळकदऱ्यांतील उंच गिरिशिखर : १५

साखरपा सोडल्यानंतर एस. टी. ची डौलदार नि भव्य गाडी झपाट्यानें अंबाघाट चढूं लागते. अत्यंत भव्य गिरिशिखरें नि भयानक खोल दऱ्या यांच्याशीं लपंडावाचा खेळ खेळत, ती गिरक्या घेतघेत वरच्या पातळीला जाण्याचा प्रयत्न करीत असते. मानवी मनाचं तें एक प्रतीक, जणूं अंबेच्या पावनकारी दर्शनाकरितां धडपडतांना दिसतं. आजु-बाजूला खोलखोल दऱ्या जणूं आ वासून तिचा तोल केव्हां जातो नि आपण तिला स्वतःच्या उदरांत केव्हां घेतों अशा भावनेनं उभ्या असतात, तर हरितश्याम वर्णाची अंबामाई अति उंचावरून स्वतःकडे येण्याला तिला आव्हान व आवाहन देत असते. चक्रधराच्या हाताचा वा मनाचा समतोल राहिला तर या भव्यतेच्या अगदीं जवळ पोचून त्याला आनंदकारी महालाभाची आशा राखतां येते. पण हात व मन यांचें सहकार्य सुटलें तर-तर स्वतःच्या छोट्या विश्वाचे तुकडेतुकडे होण्याचेंच फक्त नशिबीं यायचें. अंबामातेच्या या भव्योदात्त कुशींत जाण्याचं, तिच्या रोमांचकारी सौन्दर्याचा आस्वाद घेण्याचं भाग्य मला लाभलं; त्यावेळीं कोकणमातेच्या स्तुतिस्तोत्रांनीं माझ्या मनांत गर्दी केली. आपल्या जीवनाचाहि समतोल साधावा, वासना-विकारांच्या या खोल दऱ्या टाळतां याव्यात व अंबामातेच्या भव्य अंकावर तिचीं स्तुतिस्तोत्रं गातांना या क्षुद्र देहाचा कायमचाच विसर पाडतां यावा अशा कल्पनांनीं मन भारून गेलें. भव्य निसर्गाचा मानवी मनाच्या उन्नत अवस्थेकरतां अत्यंत उपयोग होतो. माणूस स्वतःचीं वाटणारीं सुखदुःखं

त्या भव्यतेशीं, त्या प्रसन्नतेशीं, उदात्ततेशीं स्वतःचें आत्मीय नातें जोडून विसरून जातो. जगाबरोबर त्याला स्वतःच्या क्षुद्र देहाभोंवतीं स्वतः निर्माण केलेल्या संसारकोशाचाहि विसर पडतो. तो मुक्त मनानें या निसर्गाकाशांत स्वैर विहार करूं लागतो. हिमालयाच्या भव्य शिखरांत भैरवघाटी म्हणून स्थान आहे. त्या ठिकाणचा निसर्ग इतका भव्योदात्त आहे कीं अनेक संवेदनाशील माणसांना स्वतःच्या 'विटाळाचा गोळा' असणाऱ्या शरिराचा उबग येतो. त्या भव्यतेशीं एकरूप होण्याकरतां ते त्या गोळ्याचा भैरवघाटीवरून उडी घेऊन आनंदानें त्याग करतात.

कळकदऱ्याचा आसमंत असाच उन्मादकारी आहे. समुद्रसपाटीचें खोलीवर वावरणारें क्षुद्र मनहि या उन्मादजन्य शक्तीनें उच्च विचारांच्या भराऱ्या मारूं लागतें व दृष्टिगम्य शिखरांचीहि उंची क्षणांत ओलांडतें. अंबाघाटाच्या चढाच्या शेवटीं खिंडींतून वळतांना घाटावरून धोंधों करीत येणारे थंडगार वारेहि तसेच आल्हाददायक वाटतात. मागें कळकदऱ्यापासून दूरवर पसरलेलीं बुटक्रीं टेकाडें, त्यांच्या बाजूचे विस्तीर्ण खळगे व मधूनच नागमोडी वळणें घेणाऱ्या 'माता', 'काजळी' व 'बाव' या नद्यांचीं खळखळणारीं पात्रें, वर पुढें विशाळगडापासून सामोरे येणारे रम्य पर्वत, व वृक्षराजी या विलक्षण अनुभवानें मनुष्य भांबावतो. खालच्या जागीं खोल वाटणाऱ्या या उथळ खळग्यांतून आपण 'वळवळ' करीत होतों, या क्षुद्र टेकाडांनाच महान् समजून कवटाळत होतों, या जाणीवेनें त्याची त्यालाच लाज वाटते.

त्या आसमंतांत फिरतांना तिथल्या रद्दी खानावळ्याकडून मिळालेलें अति तिखट, आमटी नांवाचें पाणी, व अर्धाकच्चा भात व ज्वारीची भाकरी खाऊनहि मन त्याला नांवें ठेवायला तयार नव्हतें. तिथल्या नयनरम्य निसर्गानेंच पायपिटीचा शीण व पोटांतले कावळे यांना थंड केले होते. त्यामुळें हॉटेलच्या दारांतल्या मोडक्या खुर्चीवर रेलून मी विचार करीत होतों. डोळे इकडेतिकडे हिंडून निसर्गाचें टिपण करीत होते. तिथें केवळ जीवन जगण्याकरतां धडपडणाऱ्या माणसांचें क्षुल्लक जीवन व माझ्या मनांत येणारे स्वैर विचारांचे तरंग; तिथल्या गरीब माणसांच्या फाटक्या कपड्यांतून डोकावणारें दारिद्र्य व माझ्या अंगावर झळकणारा तो बुशशर्ट व

ती पँट; सभोंवार पसरलेला रम्य निसर्ग व त्याकडे पाठ फिरवून पोटाची खळगी कशी भरेल, याची विवंचना करणारा तो मानवसमूह; कशाचा कशाशी सुसंवाद वाटेना, मन त्यांतून कांहीं मिळतें का याचा शोध घेत होतें, पण शोध लागेना.

वाढलेली पांडरीशुभ्र दाढी, डोक्यावर लांबसर पांढरे केस, अंगावर फाटके कपडे, गळ्यांत तुळशीची माळ व चेहेऱ्यावर भाबडें हास्य अशा रूपारंगाची एक व्यक्ति हॉटेलकडे येत होती. तिच्याकडे पाहून मीं हांक मारली. “ काय बुवा, कुठें निघालांत ? या, जरा गप्पा मारूंया ! ”

माझ्या त्या अनोळखी, अनपेक्षित हांकेनें बुवा जरा थबकले. माझ्याकडे एकदां नीट न्याहाळून त्यांनीं मला नमस्कार केला. माझ्या गांवाची, नांवाची चौकशी केली व माझ्या शेजारीं खुर्चीवर आसन मांडले. बुवांच्या फाटक्या देहयष्टींतून त्यांचें दारिद्र्य उघडें पडलें होतें. डोक्यावरच्या केसांना तेलाचा स्पर्श कित्येक दिवसांत झालेला नव्हता. साबूटॉयलेटचें तर नांवच ठाऊक नव्हतें. धोतराच्या गांठी, कपड्यांचीं ठिगळें, अंगावर, चेहऱ्यावर पडलेल्या सुरकुत्या या सर्वांचींच उतारवयें दाखवीत होतीं. पण बुवांना यांचें भान नव्हतें. एका अनोळखी, परदेशी पेहेरावाच्या या ‘ सायबानें ’ आपल्याला कशाला बोलावलें याचाच ते विचार करीत असावेत.

“ काय बुवा, ” मीं त्यांना म्हटले, “ गळ्यांत तुळशीची माळ घातलीत ? “ मी पंढरीचा वारकरी आहे ! ” बुवांनीं सांगितलें. मी कुतूहलानें त्यांना प्रश्न विचारीत होतों. नेहमीं आढळणारा अशा कपड्यांचा उर्मटपणा, आढ्यता यांचा उग्र दर्प न आढळल्यानें, बुवांचें मन मोकळें होत होतें. संकोच दूर जात होता. निराळ्या कपड्यांचा असला तरी हा माणूस आपल्याच जातीचा आहे असें बुवांना वाटूं लागलें. बुवांची रसवंती सुरू झाली.

बुवांचं वय ब्यांयशी वर्षांचें होतें. वयाच्या अठराव्या वर्षापासून ते पार्यी पंढरीची वारी करीत होते. विसाव्या वर्षी एका मुलीला जन्म देऊन बुवांची पत्नी देवाघरीं गेली. पण बुवांनीं पुन्हा लग्न केलें नाहीं. त्या लहान बालिकेचा इतर नात्याच्या लोकांच्या मदतीनें सांभाळ केला. तिचं यथासमय लग्न करून दिलं. बुवांच्या घरची जेमतेम पोटापुरती भात व वरकस शेती

होती. वरकड खर्च थोडंफार इतर काम करून ते मिळवीत. गेलीं साठ वर्षें न चुकतां ते पंढरीला पायीं १००–१५० मैल चालत जाऊन वारी करीत होते. बुवांची माहिती ऐकतां ऐकतां मीं म्हटलं, "बुवा, वारीला जातां इतके दिवस पण प्रवासांत काय गांवांत भीक मागून खातां ?"

"साहेब," बुवा तीव्र स्वरानें म्हणाले, "भीक मागायचा मला काय अधिकार ? वारी मी लोकांवर उपकार करायला थोडीच करतों ? मी लुळा, लंगडा नाहीं गृहस्थाश्रमी आहे. मी कामधंदा करून गांवांत पोट भरतो. मग धर्माचंच तेवढं काम काय भीक मागून करूं ?"

बुवांच्या या स्वाभिमानी वृत्तीचं, त्यांच्या नेकीचं मला अतिशय कौतुक वाटलं. नोकरीच्या कामाकरतां भत्ता मिळत असूनहि, फुकटांत कुठें चहा मिळाला तर परमानंद होणारे महाभाग मला माहीत होते. पण दारिद्र्यानं पिचणाऱ्या बुवांचं सत्त्व त्यांच्यांत नव्हतं. मीं आदरानं बुवांना म्हटलं, "बुवा, तुमच्या वारीचा कार्यक्रम कसा असतो ?"

"मी पहांटेचे तीन वाजतां उठतों. सारे सकाळचे कार्यक्रम आटोपून चार वाजतांच चालायला सुरुवात करतों. दुपारीं दोन वाजतां एखाद्या झाडाखालीं पाण्याचा ठिकाणा पाहून थांबतो. भाकरीचं पीठ विकत घेतो. तांदूळ बरोबर असतोच. स्वत: काटक्या जमवून पोटाची सोय करतो. मग पुन्हा उन्हं कललीं कीं रात्रीं दहा-अकरापर्यंत चालत जाऊन एकाद्या देवळांत, झाडाखालीं, धर्मशाळेंत पांडुरंगाचं नांव घेत झोंपतों. रात्रौ जेवायचें नसतेंच. असा आपला साधाच कार्यक्रम असतो."

"तुम्ही रोज तुकाराम, नामदेवांची गाथा, ज्ञानेश्वरी कांहीं वाचतां का ?" मीं विचारलें.

बुवा हंसले. "मी निरक्षर, अंगठा लावणारा. मला तें कांहीं वाचतां येत नाहीं. माझा आवाज चांगला नाहीं. स्मरणशक्ति धड नाहीं. त्यामुळें मला त्यांतलं कांहींच करतां येत नाहीं. अडाणी पडलों ना मी !"

"मग ऐवढीं वर्षें तुम्ही पंढरीला जातां, येवढ्या लोकाचीं प्रवचनं ऐकतां तुम्ही लोकांना कांहीं या श्रवणभक्तीनं मिळालेलं सांगतां का ?" मीं विचारलं.

" साहेब, " बुवा म्हणाले, " मी अडाणी, लिहिणंवाचणं नसलेला. मला काय ज्ञान आहे तर मी लोकांना शिकवूं ? कोण माझं ऐकेल ? काय माझा अधिकार ? असं मीं काय केलं आहे की लोकांना मीं उपदेश करावा ? "

" मग एवढीं वर्षं पंढरीला जाऊन, निष्ठेनं हाल सोसून तुम्हीं मिळवलंत काय ? शिकलांत काय ? " मीं प्रश्न केला.

" अखंड नाम ! " बुवा शांतपणें म्हणाले, " मी एकच शिकलों. प्रेमानं देव समजून सगळ्यांशीं वागायचं आणि अखंड हरिनाम घ्यायचं. या प्रत्येक श्वासाबरोबर अखंड–झोंपेंतसुद्धां–नाम घ्यायचं. बाकी कांहींच मला आलं नाहीं. "

" बुवा, " मी उठून म्हणालों, " हें जें आलं त्यांतच सर्व आलं. तुकोबा म्हणतात, 'वेद अनंत बोलिला, अर्थ इतुकाचि साधिला, विठोबासी शरण जावें, निज निष्ठें नाम गावें' यापेक्षां दुसरं काय साधायचं आहे ! आम्हांला तें साधत नाहीं. सर्व वाचून ऐकून आम्ही कोरडेच आहोंत. तुमचं स्वतःचं हरिनाम असं अखंड चालतं का ? "

" साहेब, " बुवा म्हणाले, " स्वतःबद्दल अजिबात बोलूं नये. स्वतःची स्तुति करूं नये. मी एक क्षुद्र जीव ! माझं काय घेऊन बसलांत ? बरं जातों आतां, " एवढें बोलून बुवा चालायला लागले. मीं वाकून केलेला नमस्कार घ्यायलाहि ते थांबले नाहींत.

बुवांची दूरदूर जाणारी ती तपस्वी, विनयशील व निष्ठावान् बटुमूर्ति मी पहात होतों. एवढी निष्ठा, एवढी तितीक्षा, एवढा भक्तिभाव कळकदऱ्याच्या त्या परिसरांत असावा याचं मला आश्चर्य वाटत होतं. शहरी जीवनांत अनेक ग्रंथालयें, वृत्तपत्रें, रेडिओ व सिनेमे असूनहि ही सात्विकता, तितीक्षा, स्वतःचं जीवन उन्नत करण्याची ओढ दिसत नव्हती. स्वैर आचारविचार, जास्तींत जास्त भोगविलासी जीवन म्हणजेच अद्यावत 'कल्चर' होत असतं. पहातांपहातां बुवांची बटुमूर्ति अंबा घाटाच्या उंच गिरिशिरांसारखी रमणीय, भव्य, आकर्षक वाटून मीं त्यांच्यापुढें एखाद्या खोल दरीसारखा दिसूं लागलों. माझ्या कानांत " शतजन्मींच्या श्वासाइतके, घेऊनि अखंड नाम, बाई मीं विकत घेतला श्याम " या ओळीचे आलाप ऐकूं येऊं

लागले. बुवांच्या दूरवर दिसणाऱ्या मूर्तीला मीं प्रेमादरानं मनोमन शतशः प्रणाम केले. खरी मराठी संस्कृति मुंबई-पुण्यासारख्या शहरांत नाहीं, इथें आहे व ती अत्यंत अभिमानास्पद आहे. तिच्या अप्रसिद्ध रूपाला माझे सहस्र कोटी नमस्कार ! बुवा निरक्षर पण उपासना करीत होते अक्षराची. श्रीज्ञानदेवांनीं म्हटलें आहे–

" हे सात्विक मति जया, निर्वाह ती होय धनंजया, बागुल नोहे तया, कैवल्य तें । तो न पढो का ब्रह्मसूत्र, न लोढो सर्व शास्त्र, सिद्धांत न होत स्वतंत्र, तयाच्या हातीं । तयाचीं आचरतीं पाउलें, पाउनि सात्विका श्रद्धा चाले, तो तेंचि फळ ठेविलें, ऐसे लाहे ।।

अ. १७–१७

• • •

# नीलप्रांगणांतील प्रसन्न नीलकंठ : १६

हिरव्यागार रंगाच्या लोकरीचें दाट आवरण असलेलीं, गुबगुबीत, गोंडस अंगाचीं हजारों मेंढरें एखाद्या निर्जल नदीच्या विस्तीर्ण पात्रांत दाटीवाटीनें उभीं असावींत, त्याप्रमाणें गुहागरनंतर येणाऱ्या पालशेतच्या नदीचा पूल ओलांडून, चढण चढूं लागतांच, उजव्या हातास असलेल्या विशाल दऱ्यांतील वनसृष्टि उभी असलेली आपल्याला दिसते. कोंकराचें चापल्य, उत्साह, गोंडसपणा, तकतकीत, भरदार अंगयष्टि यांची त्या भव्य दृश्याकडे पहातांना आपोआप आठवण येते. या हरित मेंढ्यांचा विस्तीर्ण कळप मोठ्या मुष्किलीनें पार करून सड्यावर यावें तों, दूरवर पसरलेल्या विस्तीर्ण मैदानांतून, हंसऱ्या, गौर, गोंडस चेहऱ्याच्या, अवखळ, भरदार देहयष्टीच्या, लाडावलेल्या मुलासारखा पश्चिमेकडून हुंदडतच येणारा अनिल आपल्या अंगाखांद्यावर लाडिकपणें येऊन झेपावतो. त्याच्या स्वैर दंगामस्तीनें आपलें मनोरंजन होत असतांनाच वेळणेश्वरचा तिठा येतो. आपली ऊर्ध्व झालेली गति, आपल्याच पायानें अधोगतीला येते. पण जरासा उतार उतरतांच, मघांचाच तो भव्य कळप चरत चरत इथल्या विस्तृत दरीकांठावरून खालीं खोलपर्यंत उतरलेला दिसतो. त्यांच्या त्या मनमोहक हालचाली पहातांनाच या दोन कडांमधून दूरवर पसरलेल्या निळ्याशार आकाशाला भिडलेल्या तसल्याच विस्तीर्ण नीलवर्ण मैदानाकडे आपलें लक्ष्य वेधलें जातें. या नीलकांत सपाट मैदानावरूनच, दुडूदुडू धांवणारी, मघांची ती अनिलाची हवीहवीशी वाटणारी लाडिक झेंप असावी

हें पटतें. आपल्यालाहि या सपाट नीलिम्यावर असेंच पळतां आलें तर काय बहार होईल असा विचार मनाला चाटून जातो. पण त्या मैदानाच्या अलिकडच्या टोंकावर डोलणारें माड, एखाद्या जाणत्या वृद्धाप्रमाणें आपल्याला कळकळीचा सल्ला देतात कीं, " बाबारे, यावर तुझ्यासारख्या जडदेहीला चालतां येणार नाहीं. ते अवखळ पोरच त्या तसल्या लीला करूं जाणें ! " जवळच या निळ्या पार्श्वभूमीवर डौलानें व उंचीनें उठून दिसणारें वेळणेश्वराचें उत्तुंग शिखर आपल्याला त्या अविचारापासून अधिकारवाणीनें परावृत्त करून स्वतःकडे येण्याची आज्ञा करतें. या मनोहारी दृश्याकडे पहात आल्हाददायक, उत्साही वातावरणांत, मनुष्य आपला तोल सांवरीत, स्वतःचें सारें जीवन विशाल जलसमुदायाला 'बहुजनहिताय, बहुजन-सुखाय' अर्पण केलेल्या पऱ्ह्याच्या पाण्यांत उतरतो. स्वतःचें सर्वस्व सागराला दान करून कृतार्थ झालेला तो पऱ्हा आपल्या अंतरंगांतली असंग्रहवृत्ति व वैराग्य दगडगोट्यांच्या रूपानें सिद्ध करून देतो. त्याचें हें वैराग्य स्पृहणीय असलें तरी आपल्यांत ते वैराग्य सिद्ध न झाल्यानें आपलीं पावलें पुढें असणाऱ्या नागरांच्या वस्तीकडेच वळतात. या वस्तीच्या कडेला समुद्रकिनारीं येतांच वेळणेश्वराची भव्य वास्तु, आपल्या इतर पांच आकर्षक सवंगड्यांसह उभी असलेली दिसते.

प्रथमदर्शनीच उजव्या हाताला वेळणेश्वरचा रखवालदार गांवराख्या विराजमान असून, त्याच्या सोबतीला त्याचा सेनापती कालभैरव, सालबाई, झोलाई, भुताई वगैरे आहेत. गांवराखा हा गांवाचं रक्षण करतो. त्याच्या पलीकडें कालभैरव बहिरी आहे. अनेक वर्षांपूर्वी तो समुद्रांत रहात होता. एकदां कोळी लोक मासे मारायला समुद्रांत शिरले. त्यांच्या जाळ्यांत हा आला. कोळ्यांनीं चिडून त्याला दोनदां समुद्रांत टाकला. तरी तिसऱ्या वेळींहि ही पाषाणमूर्ति जाळ्यांत आली. वैतागानें एका कोळ्यानें आपली कोयती त्यावर चालवली. पण झालें अद्भुत. त्या दगडांतून रक्ताचा प्रवाह सुरू होऊन, होडी रक्तानें भरली. सारे कोळी घाबरले. किनाऱ्यावर येऊन त्यांनीं त्याची स्थापन केली. पूजापाठ करून शांति केली. आजपर्यंत कोळी लोकांनीं आपल्या समाजाचे कुठलेंच काम त्यानें कौल दिल्याशिवाय केलेलें नाहीं. त्यानंतर जवळच तीन योगिनी आहेत. सालबाईचें योगबळ

वाघावर ध्यानस्थ बसण्याइतकें आहे, तर झोलाई पाठीशीं असलेल्या गाईचें शेपूट व जीभ एकेका हातानें खेचून धरून उभी आहे. योगारूढ व्हावयाचें असेल तर शरीराची हीं दोन द्वारें ताब्यांत हवीत, असें तिला सुचवावयाचें आहे कीं काय तें न कळे. तिच्या दोन हातांनीं हें नियंत्रण चालू असतांना राहिलेले दोन हात पावित्र्यदर्शक कमल, शंख अशा वस्तूंवर आहेत. वासना-निरासानंतर पावित्र्याचा लाभ सुलभ होतो हें खरेंच! तिसरी योगिनी भुताई एका अस्थिर होडीवर स्थिर झाली आहे. देवळांतल्या या मूर्ती पाहून, मग विघ्नहर्ता गणराज एका सुंदर रूपांत सुंदर मंदिरांत बसलेला दिसतो त्याचे दर्शन घ्यावें. त्यानंतर भगवान विष्णूंचें दर्शन करून, रामेश्वराला वंदन करावें. जवळच पांडवांचें स्थान असून तिथें जुनीपुराणी अशीं शिवलिंगें आहेत. या शिवलिंगांचें आगमन पांडवकालीं झालें आहे असें सांगतात. त्या पाषाणाचा जीर्णशीर्ण अवतार पाहून तें फारच जुनें असावें हें पटतें. त्यानंतर मुख्य देवळाकडे वळायचें.

सुमारें हजार-बाराशे वर्षांपूर्वी बहिरन गाडगीळ नांवाच्या एका गरीब सत्शील ब्राह्मणाला—

“ कदा निलिम्प निर्झरी निकुञ्जकोटरे वसन्
विमुक्तदुर्मतिः सदा शिरस्थमञ्जलिं वहन् ।
विलोललोललोचना ललामभाललग्नकः,
शिवेति मन्त्रमुच्चरन् कदा सुखी भवाम्यहम् ॥ ”

— सुंदर भालप्रदेश असलेल्या चंद्रशेखर भगवान् शिवाला, आपल्या कुविचारांचा सर्वस्वी त्याग करून, अश्रुपूर्ण नेत्रांनीं व सद्‌गदीत कंठानें आळवून मी केव्हां पाहीन व हें सुखसर्वस्व माझ्या केव्हां आधीन होईल अशी उत्कंठा लागली होती. त्या अज, निर्गुण, निर्विकल्प, निरीह गिरीशाला पहाण्याकरतां त्याचे डोळे आसुसलेले होते. घरच्या दारिद्र्याचा विचार न करतां, तो रानोवनी भटकूं लागला. नीलनभांतून त्याला नील-कंठाचें रूप पहाण्याचा हव्यास उत्पन्न झाला. जवळच पसरलेल्या विस्तीर्ण सागराच्या निळ्या प्रांगणांतून, त्याला त्या पिनाकपाणीच्या डमरूच्या ध्वनीचे पडसाद ऐकूं येऊं लागले. आकाशांत त्या विश्वरूपाचा, त्या भालचंद्राचा

त्याला भास होऊं लागला. अवघें ब्रह्मांड त्याला मंगलमय वाटूं लागलें. तो गंगेच्या कांठीं रहाणारा विश्वनाथ माझ्याकडे आपलें रुद्ररूप सोडून शिवरूपानें कधीं येईल या विचारानें त्याची झोंप उडाली. अन्न तुटलें. आजूबाजूच्या साऱ्या सृष्टीच्या सौंदर्यात त्याला शिवाचें मांगल्य दिसूं लागलें. स्वतःचें मन, बुद्धि, अहंकार, देहाची पासोडी, यांपासून 'मी' वेगळा आहें

**'चिदानंद रूपः शिवोऽहम् शिवोऽहम् ।'**

याचा त्याला प्रत्यय येऊं लागला. आजूबाजूला नटलेल्या या शिवरूपानें त्याचें भान हरपूं लागलें. नीलवर्णाच्या सागराच्या लाटा किनाऱ्यावरच्या मेरूपर्वतावर एकापाठोपाठ एक येऊन आदळतांना त्या 'शिवोऽहम्, शिवोऽहम्'चा अखंड ध्वनि काढतांना पाहून तो तन्मय होऊन त्यांच्याकडे पहात राही. साऱ्या विश्वाला वेड लावणाऱ्या त्या '**मंगलानांच मंगलम्**'नें आपल्याला साकार होऊन दर्शन द्यावें, अशी प्रार्थना तो अन्नपूर्ण नेत्रांनीं करीत असे. सागराच्या तीरावरच्या एका शीळेवर बसून, 'तो माझा स्वामी तो पार्वतीरमण कधीं येतो?' म्हणून तो वाट पाहूं लागला. शहाण्या, विकारांनीं लडबडलेल्या जगानें बहिरवभट गाडगिळाला पागल ठरवला. इतरांसारखें सुखोपभोग मिळवण्याच्या, विकार वर्धमान करणाऱ्या मार्गाकडे त्या दरिद्री माणसानें पाठ फिरवली होती. होतां होतां दिवसमास नामशेष होत होते. पण बहिरवभट गाडगिळाला निराशा शिवत नव्हती. उलट 'ज्याच्या कानांतले कुण्डल डुलत आहेत, ज्याचे नेत्र सुंदर व विशाल आहेत, ज्याचें मुख प्रसन्न असून जो नीलकंठ अत्यंत दयाळू आहे, ज्यानें व्याघ्रचर्म व रुंडमाळा धारण केल्या आहेत' त्या प्रियतम शिवाचें साकार-रूपानें दर्शन व्हावें म्हणून त्यानें अखंड भजन चालू ठेवलें होतें. त्याला एकच ध्यास लागला होता —

**'चलत्कुंडलं शुभ्रनेत्रं विशालं,**
**प्रसन्नाननं नीलकंठं दयालम् ।**
**मृगाधीशचर्माम्बरं मुंडमालं,**
**प्रिय शंकरं सर्वनाथं भजामि ॥'**

अखेर एके दिवशीं सागरतीरीं व्याकुळ झालेल्या या आर्त भक्ताला

पहाटेच्या मंगल वेळीं भयंकर सिंहनाद ऐकूं येऊं लागला. एका प्रचंड पत्थराची हालचाल होऊन त्यांतून ज्वाळा बाहेर येऊं लागल्या. आशुतोष महादेवाच्या लिंगाचा आकार साकार होऊन तो गडगडाट थांबला. बहिरवभटानें घाईघाईनें त्या पिंडीवर पाण्याच्या घागरी ओतायला सुरुवात केली. ' ॐ नमो रुद्रायच, शिवायच ' म्हणून तो त्या रौद्ररूपाला, कल्याणकारी शिवरूप धारण करण्याची प्रार्थना करूं लागला. रुद्रानें प्रसन्नतेनें भक्ताकरतां शांत शिवरूप धारण केलें. बहिरवभटाच्या शंभर घागरी त्यानें अंतरंगांत सांठवल्या. प्रसन्नतेनें पिंडींतून शिवनाद होऊं लागला. पिंडींतल्या अंगठ्यायेवढ्या छिद्रांतून गंगेप्रमाणें निर्मल पवित्र जल वाहूं लागलें. गंगाधराच्या शिखेंतून ती अमृतधारा, व तो शिवनाद येतांना पाहून बहिरवभटाचें हृदय आनंदानें, कृतज्ञतेनें, कृतार्थतेनें भरून आलें. त्या शिवरूपाला त्यानें प्रेमानें मिठी मारली, आनंदाश्रूंनीं न्हाऊं घातलें. त्याचें सारें जीवन कृतार्थ झालें.

लवकरच गांवकऱ्यांनीं हा अद्भुत प्रकार सर्वत्र पसरवला. लांबलांबचे लोक वेळणेश्वराच्या व बहिरवभट गाडगिळाच्या दर्शनाला येऊं लागले. त्या स्वयंभू स्थानावर एक प्रचंड भव्य मंदिर बांधण्यांत आलें. पुढें शिलाहारांचें राज्य तिथें होतें. त्यांनीं आणि त्यांचे सरदार गोखले यांनीं व इतर धनिकांनीं ते मंदिर सागरतीरीं आणखी भव्य केलें. लवकरच कृतार्थ झालेल्या बहिरवभट गाडगिळांनीं देवाच्या स्थानाजवळच समाधि घेतली. ते बसत त्या स्थानावर लोकांनीं उभारलेला मठहि आजपर्यंत दाखवला जातो त्याच ठिकाणीं बसून यात्रेच्या वेळीं भाविक भक्त आपल्या अंजलींत वेळणेश्वराचे तीर्थ घेऊन ' हें जल माझ्या अंतरांतल्या षड्विकारांना नाहींसें करो ' म्हणून सद्गदित होऊन प्रार्थना करतात. आजहि वेळणेश्वराच्या त्या पिंडींत ८० घागरीं जल सामावलें जातें. आजहि भाविक भक्तांना तो गंभीर शिवनाद अचानकपणें कधीं कधीं ऐकायला मिळतो.

फार पूर्वी या स्थानीं कालभैरवाच्या देवळांत बालनाक महार म्हणून एक भक्त येत असे. तो नाचत नाचत कालभैरवासमोर पेटलेल्या होमकुंडांत बेभान होऊन शिरे. त्याचें तें तांडवनृत्य त्या धगधगत्या कुंडांत तास अर्धा तास चालत असे. बालनाक महाराचें स्थान आजहि जागृत

आहे असें समजतात. अंगाची आग होणें व इतर आगदायक विकारावर, बालनाकला केलेल्या नवसानें उतार पडतो, असा लोकांचा अनुभव आहे. वार्षिक एक नारळाची राखण गांवकरी त्याला देतात.

या गांवचे गोखले घराणें इथले मानकरी आहे. शिलाहारांच्या पाडावा-नंतर या भागावर विजापूरच्या आदिलशहाचा अंमल बसला. त्यांना रसद पुरवून गोखल्यांचे रसदे झाले. पुढें मराठ्यांचा अंमल सुरू होतांच, छत्रपती शाहूनें शामाजीपंत गोखल्यांना सातारला नेलें व पदरीं ठेवलें. त्यांची रास्त वागणूक पाहून त्यांना शाहूनें रास्ते करून सरदारकी बहाल केली. पुढें नानासाहेब पेशव्यांना आपली गोपिका देऊन त्यांनीं पेशव्यांशी घरोबा केला व ते पुणेकर झाले. त्यांना वेळणेश्वरला इनामहि होतें व त्यांच्यातर्फे एक व्यवस्थापक वेळणेश्वरला असे.

वेळणेश्वरच्या जवळच वैतरणी नदी आहे. देवळाचें मागेंच मेरू पर्वत म्हणून स्थान आहे तिथें अस्थिविसर्जनाचा विधि करतात. 'सागरे सर्व तीर्थानि' असल्यानें गरीब भाविकांची सोय झाली आहे. या मेरूपर्वताच्या मध्यें एक मोठा, पत्थरांत मध्यभागीं असलेला, अत्यंत खोल असा जलाशय आहे. त्याला बहिरीचा आड म्हणतात. एके वेळीं हा मेरूपर्वत अत्यंत उंच होता. पण सागराच्या प्रमत्त लाटांनीं, एखाद्या माजलेल्या रेड्यानें दगडी भिंतीवर उन्मादानें धडका द्याव्यात, त्याप्रमाणें आज हजारों वर्षे धडका देऊन, त्याचा उच्चभ्रूपणाचा ताठा पार साफ केला आहे. वेळणेश्वर, गणपति इ. देवळांचा जीर्णोद्धार कांहीं वर्षांपूर्वी करण्यांत आला आहे. दर महाशिवरात्रीला व इतर महत्वाच्या प्रसंगीं इथें यात्रा, नाटकें इत्यादि कार्यक्रम होतात, व सारा आसमंत लोकांनीं फुलून जातो.

अनंत क्षितिजापर्यंत पसरलेल्या निळ्या सागराच्या किनारीं वसलेला हा नीलकंठ, त्याच्या आसपास असलेल्या स्वच्छ जलाच्या पुष्करिणी, हिरवागार आसमंत व या मोठ्या दरींत समुद्रावरून दुडदुड धांवत येऊन आपल्या अंगावर झेंपावणारा अनिल, यामुळें वेळणेश्वराच्या गर्द झाडींतून परत फिरणारा पाहुणा, पुन्हा पुन्हा त्या प्रसन्न वातावरणाकडे वळून पहात असतो, तरी त्याची तृप्ती होत नाहीं.

● ● ●

ठाणे. स्थळप्रत.
दि: ...............
नों: दि: ...............

# वेलागदुर्ग जंजिरा 'सुवर्णदुर्ग' : १७

ऐतिहासिक किल्ल्यांच्या परिसरांत ज्या ज्या वेळीं मी जातों, त्या त्या वेळीं माझ्या मनांत हर्ष-विषाद, राग-लोभ, लज्जा-अभिमान इत्यादि भावनांचा हलकल्लोळ उडतो. किल्ल्यांच्या त्या प्रचंड भिंती, बुरुज, तिथल्या पडक्या ऐतिहासिक वास्तू यांचा माझ्या मनावर विलक्षण परिणाम होतो. महाराष्ट्र हा वीरांचा, व संतांचा देश आहे. भारतांत राजपुताना, महाराष्ट्र, तमिलनाड इत्यादि प्रदेशांतून इतस्ततः पसरलेले कोट—किल्ले, त्या प्रदेशांत होऊन गेलेल्या वीरांच्या व वीररमणींच्या शौर्य—धैर्याचे पवाडे अखंड गाऊन हतप्रभ झालेल्या मनांत चैतन्य उत्पन्न करतात. ज्यावेळीं माझ्या मनांत निराशेचा दाट काळोख पसरतो, व्यवहारचातुर्याच्या नांवाखालीं, लबाड गुंडांचा जय व ध्येयवादी सज्जनांचा पराभव असा प्रकार समाजांत मला दिसून, माझें मन डगमगतें, निराधार होतें, त्यावेळीं या ऐतिहासिक भव्य वास्तूंच्या सहवासांत मी जातों. इतिहासाचीं पुस्तकें चाळतों व मला त्यांतून प्रकाशाचे किरण दिसूं लागतात. हतवीर्य झालेलें धैर्य पुन्हा परततें. निराशेंतून तितिक्षेचा, सहन करण्याचा, सोसण्याचा संदेश मिळतो. मराठ्यांच्या इतिहासांतलें माझें आवडतें चित्र, नजीबखान रोहिल्याशीं लढतांना, साठ-सत्तर जखमा होऊन, रणांत कुठलीहि आशा, सहाय्य नसतांना, पुन्हा लढशील का म्हणून विचारणाऱ्या शत्रूला 'बचेंगे तो और भी लढेंगे' म्हणून बाणेदार उत्तर देणाऱ्या दत्ताजी शिंद्याचें

आहे. दत्ताजीच्या बाणेदार चरित्राएवढें मला मोहविणारें अन्य चरित्र नाहीं. यशस्वी ठरलेल्या शिवाजी-बाजीरावांचीं चरित्रेंहि मला ओढ लावीत नाहींत. औरंगजेबासारख्या महाबलाढ्य, पाताळयंत्री बादशहाला एकाकीपणानें लढून नामोहरम करण्याची जिद्द ज्या संभाजीच्या बलिदानानें निर्माण झाली, त्या संभाजीचे हिमालयारखे इतर दोषहि मला कणवत् वाटूं लागतात. संभाजी मुसलमान होता तर त्याचे सारे हाल टळले असते. राजसत्ता ऐहिक वैभवासह त्याची दासी झाली असती. पण हे सारे सुखोपभोग टाळून दाहक मृत्यूचा स्वीकार हंसतमुखानें करणारा संभाजीच मला आवडतो. मुसलमान बादशहांच्या जनानखान्यांत जर पाऊल ठेवलें असतें तर ज्यांना सुखोपभोगांची चंगळ झाली असती, त्या रजपूतरमणी, ज्यावेळीं या तुच्छ भोगांवर—व्यवहारवादावर लाथ मारून जोहार करतात, त्यावेळीं त्याच्या त्या अपूर्व त्यागानें माझें अंतर्बाह्य कणन्कण चैतन्यानें फुलून जातात. माझें मस्तक आदर, प्रेम, अभिमान यांनीं नम्र होऊन मी मनोमन त्यांना माझी आदरांजली वाहतों. तमिळ रामायणाचा कर्ता कंबन म्हणतो, 'कोणत्याहि देशाचें माहात्म्य, तिथें धान्य किती पिकतें अथवा भौतिक वैभव किती लखलखतें यावर नसून, त्या देशांत सद्गुणी, सच्छील व आपल्या ध्येयाकरतां सर्वस्व अर्पण करणारीं माणसें किती निपजलीं यावर अवलंबून आहे.' असे वीर, असे संत महाराष्ट्रांत अनादि कालापासून तों आजतागायत झाले. आपल्या जीवनाला उजाळा देण्याची, भावी पिढ्यांना स्फूर्ति देण्याची ज्यांना इच्छा असेल, त्यांना अशा ऐतिहासिक वास्तू भरपूर खाद्य पुरवतात आपलें अंतरंग जर आपण मोकळें ठेवलें तर त्या वास्तूंत घडलेल्या भल्याबुऱ्या इतिहासानें जीवनाची दिशा ठरवतां येते. तिथें घडलेल्या हीन चारित्र्यामुळें आपलें चारित्र्य कसें असूं नये याचा वस्तुपाठ मिळतो; तर दैदिप्यमान चारित्र्यानें तें अपयशी असले तरीहि जीवनांत सर्व संकटांना तोंड देऊन सारे हाल शांतपणें सोसूनहि, शरीरसर्वस्व गमावूनहि 'काय मिळवावें' हें समजतें. अपयशहि स्वाभिमानशून्य, हीन चारित्र्याच्या यशापेक्षां अधिक स्फूर्तिप्रद, अधिक वैभवशाली वाटूं लागतें. या ऐतिहासिक जड वास्तूंतूनहि चैतन्याचा संदेश आपल्याला अखंड मिळूं शकतो.

चौदाव्या शतकांत कोंकणावर अधिराज्य असणाऱ्या शीलाहार राजांच्या

अमदानींत एका कोळी सरदारानें हर्णैच्या विजयदुर्गाचा पाया घातला. आठशें चौरस एकर कातळाचा, समुद्रवलयांकित भाग कापून, विजयदुर्गाला अभेद्यरूप देण्यांत आलें. किनाऱ्यापासूनचा पाव मैलाचा खडक सक्त मेहनत व अमाप पैसा खर्च करून कोरला व शिलाहारांनीं विजयदुर्गाचे कोट-बुरुज निर्माण केले आणि त्याचा मुख्य भूमीशी संबंध तोडून टाकला. एकावर एक प्रचंड शिळा रचून त्यांनीं या किल्ल्याची समरशक्ति वाढवली. जवळच्या तीन टेकड्यांनाहि त्याच फोडलेल्या कातळाचे प्रस्तर वापरून त्यांनीं या जंजिरा किल्ल्याला अभेद्य बनवण्याचा प्रयत्न केला. पण पुढें आपसांतल्या दुहीकरतां प्रसिद्ध असलेल्या आपल्या लोकांनींच शिलाहारांना दगा दिला व हा अभेद्य जंजिरा आपल्या सवंगड्यांसह विजापूरच्या आदिलशाहाच्या गळ्यांत जाऊन पडला. सोळाव्या शतकांत विजापूरकरांना, त्यांच्या सागरी सत्तेच्या दृष्टीनें याचें महत्त्व पटलें व त्यांनीं त्याच्या तटाकोटांची उंची वाढवून त्याला बळकटी आणली. १६६० मध्यें शिवाजी-राजांचा पोलादी पंजा त्यावर पडतांच किल्ल्यानें त्यांचें स्वागत केलें. १६९८ मध्यें आपल्या सुप्रसिद्ध आरमाराचें मुख्य ठिकाण म्हणून कान्होजी आंग्र्याने त्याचा मराठी राज्यातर्फे सत्कार केला. १७१३ सालीं शाहूनें आंग्र्यांवर खूष होऊन हा किल्ला त्यांना बहाल केला. पण लवकरच कान्होजीचा पुत्र तुळाजी आंग्रे याच्याकडे तो आला. मध्यवर्ती सत्तेला तो जुमानीनासा झाला. त्याच्या आरमारी वर्चस्वाचा धाक इंग्रज, पोर्तुगीज इत्यादि परकीय सत्तांना बसला. पण पुढें पेशव्यांचें व त्याचें वांकडें आलें. मराठी सत्तेलाहि तो आव्हान देऊं लागला. १७५५ सालीं कान्होजीच्या दोन्ही पुत्रांत सत्तेकरतां भांडणें लागल्यानें एकानें पेशव्यांची मदत मागितली. पेशवे या संधीची वाटच पहात होते. इंग्रजांच्या परकीय सत्तेशीं पेशव्यांनी संधान बांधलें व आंग्र्यांच्या बाणकोट व विजयदुर्ग या दोन किल्ल्यांवर हल्ला करण्याचें ठरलें. मुंबईच्या गव्हर्नरनें आपल्या कमोडरला आंग्र्यांच्या प्रबल आरमाराशीं प्रत्यक्ष झुंज न घेतां फक्त वेढा देण्याचा हुकूम सोडला. २२ मार्चला कमोडर जेम्स चाळीस अवजड, सोळा मध्यम व दहा हल्ला करणारी जहाजें यांसह चौलजवळ येऊन पेशव्यांना मिळाला. तीन दिवसांनीं त्यांना ७ मोठीं लढाऊ जहाजें व साठ मध्यम फत्तेमाऱ्या व

दहा हजार सैन्य यांची जोड पेशव्यांकडून मिळाली. दुपारीं आंग्र्यांचें आरमार सुवर्णदुर्गाच्या खाडींत असल्याची बातमी लागली. कमोडर जेम्स घाई करूं लागला. पण पेशव्यांचें आरमार चपळपणें हालचाल करूं शकलें नाहीं. ही बातमी आंग्र्यांना लागतांच त्यांच्या आरमारानें किनाऱ्याला येऊन दडी मारली. इंग्रजांची प्रोटेक्टरसारखी हलकी जहाजें पाठलागाला असूनहि उपाय चालला नाहीं. संध्याकाळीं जेम्सनें पाहिलें तर आंग्र्यांचें सारें आरमार सुवर्णदुर्गाच्या आडोशाला उभें असून पेशव्यांचा सरदार रामाजीपंत बिवलकर सारें सैन्य घेऊन सुवर्णदुर्गावर मोर्चे लावून उभा. त्यानें बिवलकरांना हल्ला करण्याचा आदेश देऊन स्वतः सुवर्णदुर्गाच्या मुख्य दरवाजावरच हल्ला चढवून तोफांचा मारा चालू ठेवला. आंग्र्यांच्या दुर्दैवानें त्यांच्या दारुकोठारालाच आग लागून जिकडेतिकडे स्फोट होऊन तट-बुरूज कोसळूं लागले. जेम्सनेंहि तोफांनीं मुख्य दरवाजा उडवून सारें सैन्य आंत घुसवलें. पण येवढें होऊनहि किल्लेदार आपल्या थोडक्या सेनेनिशीं प्रतिकाराला उभा ठाकला. शेवटीं इंग्रज व पेशव्यांचें सैन्य त्यांना कापून काढून आंत शिरलें व सुवर्णदुर्ग हस्तगत करण्यांत आला. सुवर्णदुर्ग, फत्तेगड, गोवा, भुईकोट हे चारी किल्लेकोट पेशव्यांच्या स्वाधीन करून, कराराप्रमाणें इंग्रजांनीं बाणकोट व जवळचा दहा गांवांचा दासगांवपर्यंतचा प्रदेश घेतला. अशातऱ्हेनें सुवर्णदुर्ग जिंकूनहि मराठ्यांच्या सत्तेच्या पराभवाचीं बीजें मराठ्यांनीं आंग्र्यांचें आरमार नष्ट करून घातलीं.

इ. स. १८०२ मध्यें यशवंतराव होळकरानें पुणें जिंकून शेवटच्या बाजीरावाचा पाठलाग सुरू केला, त्यावेळीं बाजीराव या किल्ल्यांत सुरक्षिततेकरतां आला. पण तिथें आपली बायकामाणसें ठेऊन त्याला पळच काढावा लागला. यशवंतराव होळकरानें त्यांना ताब्यांत घेतलें. शेवटीं बाजीरावानें सांगितल्यावरून इंग्रजांनीं पुनः १८०४ मध्यें किल्ल्यावर हल्ला चढवला व तो बाजीरावाच्या स्वाधीन केला. १८१८ मध्यें बाजीरावानें राज्यसत्तेवर पाणी सोडलें व पेन्शन घेऊन सारें राज्य इंग्रजांच्या स्वाधीन केलें. पण या सत्तात्यागाला नाइलाजानें त्यानें संमति दिली तरी त्याचा पीळ गेला नव्हता. त्यानें सर्व किल्लेदारांना गुप्त चिठ्या पाठवून 'मी परागंदा होत असलों तरी तुमच्या ताब्यांतलें राज्य इंग्रजांना देऊं नका' म्हणून कळवलें.

नोव्हेंबर १८१८ मध्यें कर्नल केनेडी एक एक किल्ला घेत सुवर्णदुर्गावर आला. पण किल्लेदारानें शरण येण्याचें नाकारलें. त्यावेळचा मुंबईचा गव्हर्नर एल्फिन्स्टन यानें एका जाहीरनाम्यानें बाजीराव पेशवा व छत्रपति प्रतापसिंह यांचीं राज्यें खालसा करून त्यांना पेन्शनींत काढल्याचें व त्यांचे जे सरदार-दरकदार सरळपणें शरण येऊन ताब्यांतील सरकारी मालमत्ता स्वाधीन करतील, त्यांचीं इनामें, सरदारक्या कायम ठेवण्याचें आश्वासन दिलें होतें. त्यामुळें लवकरांत लवकर इंग्रजांशीं सलोखा करून आपली मिळकत राखण्याची मराठी राज्याच्या माकनऱ्यांत चढाओढ लागली होती. अशावेळीं आपल्या मराठेशाहीच्या दौलतीच्या इभ्रतीची, स्वाभिमानाची जाणीव ठेवणारे बापू गोखले, रंगो बापूजी, चतुरसिंग भोसले, यांसारखीं नररत्नें या साऱ्या भयाण अंधःकारांतहि आपल्या तेजानें चमकत होतीं. असाच एक कणखर मनाचा, आगींत झेप घेणारा बहाद्दर मराठा वीर त्यावेळीं विजयदुर्गावर होता. शेवटच्या बाजीरावाला जरी त्याचें मोल पेन्शनच्या चतकोर तुकड्यापुढें वाटलें नाहीं, तरी या प्रतिकूल नि गुणांचें चीज न होण्याच्या काळांतहि त्या बहाद्दरानें आपलें सत्त्व सोडलें नाहीं, इमान टाकलें नाहीं.

कर्नल केनेडीच्या सैन्यानें विजयदुर्गांतील पठाण-रोहिला सैन्याला फितवलेंच होतें. पण केनेडीच्या शरणागतीच्या पत्राला त्यानें नकार पाठवला. किल्लेदाराचें उत्तर मिळतांच केनेडीच्या प्रचंड दारूगोळ्यांचा वर्षाव किल्ल्यावर होऊं लागला. पठाण-रोहिल्यांच्या तुकड्या मिळेल त्या वाटांनीं किल्ल्याबाहेर पडूं लागल्या. पण किल्लेदार गाढे या प्रकारानें डगमगला नाहीं. इंग्रजांचीं सारीं प्रलोभनें फोल ठरलीं. किल्ल्याचे तट कोट भराभर ढासळूं लागले. गाढ्यांच्यासमोर गाढ अंधार पसरला होता. मदतीची कुठूनच आशा नव्हती. पण इंग्रजांची गुलामगिरी स्वीकारायला त्यांचें मन तयार नव्हतें. हाताखालच्या शे-पन्नास विश्वासू शिपायांसह तो प्रतिकाराला उभा होता. किल्ला सर करण्याकरतां केनेडीनें किल्ल्याचें लाकडी प्रवेशद्वारच तोफेनें उडवून दिलें. दारूगोळ्याचें कोठारहि केव्हांच जमीनदोस्त झालें होतें. पण आपल्या सैन्यासह आंत घुसतांच त्याला एक विलक्षण दृश्य दिसलें. किल्लेदार गाढे आपल्या एका तुटक्या जखमी हातासह प्रतिकाराला

सिद्ध होता. हजारों शस्त्रसज्ज सैनिक त्या ५–५० सैनिकांवर तुटून पडले, पण त्यांनाहि गाढे दाद देईना. एक एक अवयव निकामी होऊनहि त्याचा प्रतिकार थांबेना. शेवटीं बंदुकीनें गाव्यांचा बळी घेण्यांत आला. मराठे-शाहीच्या स्वाभिमानाची, जिद्दीची, त्यागाची ही ज्योत जबरदस्तीनें विझविण्यांत आली. ज्या गाव्यांनीं मोठ्या इमानानें, स्वामीनिष्ठेनें, धैर्यानें हा किल्ला अखेरपर्यंत लढवला, त्यांच्या साऱ्या मंडळींची सरसकट कत्तल करण्यांत येऊन त्यांची मिळकत जप्त करण्यांत आली. आज तुम्ही हर्णैला गेलांत तर 'गाव्यांची बाव' येवढी एकच त्यांच्या कुटुंबाची निशाणी तुम्हांला तिथें सांपडेल. ज्या वीरानें मराठेशाहीच्या अस्तंगत होणाऱ्या दीपाची प्राणपणानें काळजी घेतली, त्याचें नांवनिशाणहि आज विजयदुर्गावर दिसत नाहीं.

केनेडीनें किल्ला घेतांच आपल्या सैनिकांना विजयाचीं बक्षिसें वाटलीं. किल्ला इंग्रजांच्या ताब्यांत जावा म्हणून जे बेइमान, फितूर झाले, त्यांना केनेडीनें मोठ्या समारंभानें इनामें, जहागिऱ्या, सन्मानदर्शक पदव्या यांची खैरात केली. या फितुरांचा सन्मान केनेडीनें स्वतःच्या हस्तें केला. पण हा समारंभ चालला असतांच त्याच्या सैन्यांतला एक पुरभय्या शिपायी आपल्या एकतारीवर गात होता, 'चंदन तो घिस गया, रहे बभुल का खोड। अच्छे अच्छे चलदिये, रहे चपाती चोर!"

● ● ●

# आडिवऱ्याचें शामल ब्रह्म : १८

‘ मानवाच्या जीवनांत नाना विकारांचे रंग कमी-अधिक प्रमाणांत उठून दिसतात. शुभ्रधवल सूर्य-किरणांत जीवनांतले हे सारे रंग अप्रकट रूपानें सामावलेले असतात. इतर रंग जेव्हां कळाहीन होतात, तेव्हांच पांढरा रंग दिसून येतो. काम, क्रोध, मोह, लोभ, मद, मत्सर, भय इत्यादि सात अवगुण ज्यावेळीं ईशकृपेनें फिकट होत जाऊन आपला रंग सोडतात, त्याचवेळीं सत्त्वगुणांचा धवळ मंद प्रकाश जीवनांत उमटतो. पण या सत्त्व जीवनांतहि जीवन अपूर्णच रहातें. त्या धवलगुणांचाहि एखाद्या दयाळू चोरासारखाच उपयोग होतो. मुक्कामाला पोंचवायला सत्त्वगुणहि अपुराच पडतो. या साऱ्यांच्या साऱ्या रंगांना पोटांत सामावून घेणारा रंग म्हणजे महाकालीचा कृष्ण रंग. या कालीमातेच्या उदरांत सारें ब्रह्मांड सांठवलेलें आहे. या श्याम वर्णांत सर्व रंग बेरंग होऊन जातात. पांढरा रंगहि काळ्यांत नामशेष होतो. फक्त एकुलता एक विठ्ठलाचा, महाकालीचा, ब्रह्माचा रंग उरतो. त्या सांवळ्या ब्रह्मालाच आळवतां आळवतां ज्ञानदेव वेडावले, तुकोबा देहभान विसरले, रामकृष्ण ‘ परमहंस ’ बनले. पाणी दूर असतांना निळं–काळं दिसतं. पण जवळ जातांच पाण्याचा रंगच सांगतां येत नाहीं. सृष्टि उत्पन्न होण्यापूर्वीं निबिड अंधःकार असतो. तेव्हां ही जगन्माता, निराकार महाकाली, महाकालासह एकरूपानं असते. भक्तांकरतां तीच श्यामाकाली, वरा–अभयदायिनी, रक्षाकाली होते. पण उत्पति, स्थिति, अंतीं, तीच

संहारमूर्ति होऊन स्मशानकाली बनते, त्यावेळीं गळ्यांत मुंडमाळा, कमरे-भोंवतीं नरहस्तांचा कंबरपट्टा, अंगांतून संहाराचें रक्त ठिबकत आहे अशा रूपानें, जगत्संहार करून साऱ्या सृष्टीचीं बीजं पुनर्निर्माणाकरतां सांवरून ठेवते. या भगवतीचं हें सारं अरूप मनांत ठसण्याकरतां भक्तानें 'अहं 'चा संपूर्ण त्याग करायला हवा. पण तो तर अतिच कठीण. जातां जात नाहीं. सारे योगी, तपस्वी या 'मी ' च्या अस्तित्वानंच घसरले. एकादाच शुकदेव, एकादाच ज्ञानदेव या मायामयीचं, आनंदमयी रूप अनुभवूं शकला असेल.

सुमारें हजार वर्षांपूर्वी रत्नागिरीजवळच्या, स्वामी स्वरूपानंदांनीं पावन केलेल्या पावसपासून ८–१० मैलांवर आडिवऱ्याला, हें 'श्यामल ब्रह्म ' आमच्याकरितां प्रगट झालें आहे. 'अट्ट ' म्हणजे बाजार. अट्टचें आड होऊन आडिवऱ्याची बाजारपेठ सुमारें हजार-बाराशें वर्षांपासून प्रांतांत प्रसिद्ध होती. शिलाहार राजांची सत्ता या भागावर होती त्यांतल्या भोज-राजाचें शके ११९३ चें दानपत्र आजहि उपलब्ध आहे. शिलाहार कालाच्या सुमारास आडिवरें म्हणजे फार भरभराटलेली बाजारपेठ होती. जैन व्यापाऱ्यांच्या पैशानें तिथें अनेक जैन देवतांचीं स्थानें उभीं राहिलीं होतीं. पण पुढें आद्य शंकराचार्यांच्या दक्षिण धर्मविजयाचा इकडे संचार सुरू झाला. त्यांच्या प्रेरणेनें पुन्हा हिंदु धर्मानें बाळसें धरलें. त्यांच्या पवित्र हस्तानें इथें श्री नगरेश्वर, श्री महालक्ष्मी, योगेश्वरी व रवळनाथ या मंदिरांची स्थापना करण्यांत आली. तिथल्या जोशी, काळे, भिडे इत्यादि व्यक्तींना खोतीचे, महाजनकीचे अधिकार मिळाले. पण शिलाहारांचा अदिलशाहीकडून पाडाव झाला. पण गांवांत कदम, तावडे इत्यादि घराण्यांचे अनेक लोक होते. ते आदिलशाहीविरुद्ध बंड करून उठले. आदिलशाही राज्याचें बस्तान त्या भागांत नीट बसेना. वसूल गोळा होईना. झालेला वसूल विजापूरपर्यंत पोचेना. कदम-तावड्यांच्या अल्पसंघटित टोळ्या तो वसूल परस्पर लुटूं लागल्या. पण या लोकांत दूरदृष्टीचा, संघटनेचा आणि विवेकाचा अभाव होता. त्यांच्या उठावाला क्रांतिकारी सेनेचें रूप येण्याऐवजीं हीन मनोवृत्तीच्या गुंडांच्या टोळक्यांचें रूप येऊं लागलें. त्यांनीं आपल्या गुंडगिरीनें स्थानिक स्त्री-पुरुषांना त्राहि भगवान् करण्यास सुरुवात करतांच, लोकमानसांत त्यांच्या कर्तृत्वाबद्दल आदरभाव, प्रेम वा सहानुभूति राहिली नाहीं. या साऱ्या तक्रारी

आदिलशहापर्यंत पोंचल्या. पातशहा याच संधीची वाट पहात होता. आदिलशाही सत्तेनें आडिवऱ्याच्या खोत भिड्यांना जवळचे दोनशें अरबी सैनिक मदतीला दिले व या स्वजनांचा नाश करण्याच्या कामगिरीबद्दल मोठी सरदारकी बहाल केली. कपिलाषष्ठीच्या दिवशीं कदम तावड्यांचे सहा-सातशें इसम समुद्रस्नानाला गेले असतां त्यांच्यावर भिड्यांनीं जोरकस हल्ला चढवला. त्या बेसावध तरुणांना कंठस्नानें घालण्यांत आलीं. अनेक तरुण माणसें मृत्युमुखीं पडलीं. कांहीं शरण आलीं, त्यांना सोडण्यांत आलें. कदम-तावड्यांच्या कुलस्त्रिया आपल्या कुलाच्या अब्रूकरतां सती गेल्या. गुंड-गिरीचा निर्दयपणें बीमोड करण्यांत आला. गुंडगिरी संपली, पण शौर्याला, पराक्रमाला विवेकाची, सदाचाराची मर्यादा घातली न गेल्यानें, कदम तावड्यांचा तर नाश झालाच, पण समाजांतील क्षात्रवृत्तीच्या संरक्षणाखालीं ज्या धर्मप्रेमाची, संस्कारांची वाढ होते तीहि खुरटली. समाज नेभळा, बल-हीन व अपुरुषार्थी बनला. स्वकीयांच्या जुलुमाविरुद्ध उठाव करून परक्यांना तोच जुलूम करण्यास रान मोकळें मिळालें. लांडग्यांचा त्रास होतो म्हणून वाघाला घरांत घेतलें गेलें होतें.

भिड्यांच्यावर त्या स्वकीय संहाराचा, त्या कत्तलीचा अतिशय परिणाम झाला. पातशहाची सरदारकी, खोती त्यांना गोड वाटेना. या अमानुष हत्येला आपण जबाबदार आहोंत असें त्यांना वाटूं लागलें. स्वतःच्या धर्म-बांधवांना आपण परक्यांच्या हातांत दिलें हें पाप कसें फिटेल याचा त्यांना घोर लागला. ते बेचैन झाले. सारे आप्त, पत्नी, वैभव, भोग यांचा त्यांना वीट आला. '**न तातो न माता न बन्धुर्न दाता, न पुत्रो न पुत्री न भृत्यो न भर्ता, न जाया न विद्या न वृत्तिर्ममैव, गतिस्त्वं गतिस्त्वं त्वमेका भवानि**' म्हणून ते जगदंबेला शरण गेले. '**मत्समः पातकी नास्ति, पापघ्नी त्वत्समानाहि, एवं ज्ञात्वा महादेवी यथायोग्यं तथा कुरु**' म्हणून ते भगवतीला आळवूं लागले. त्यांनीं बेचिराख झालेल्या कदम-तावड्यांचीं घरें स्वखर्चानें दुरुस्त केलीं. वांचलेल्या कदम-तावड्यांना पुन्हा गांवांत आणून वसवलें. तरीसुद्धां त्यांचीं त्या अरबांनीं उडवलेल्या कत्तलीच्या दृश्यानें गेलेली झोंप परत येईना. संहारमूर्ती कालीचे ते रात्रंदिवस ध्यान-चिंतन करूं लागले. त्यांनीं ऐषआरामी जीवनाचा त्याग केला. रात्रींबेरात्रीं

ते एकटेच अमावास्येसारख्या काळोखांतून त्या संहारक काली-रूपाचें चिंतन करीत डोंगर-दऱ्या फिरूं लागले. अखंड महाकाली-चिंतनानें त्यांचा गौरवर्णहि श्यामल झाला. असे अनेक दिवस गेले. एका पहांटे एका भंडारी माणसानें एक पांच-सहा फुटी उंच, ऊर्ध्वदृष्टि असलेली, शवावर पद्मासनस्थ असलेली, चतुर्भुज, गळ्यांत रुंडमाळा व मस्तकावर पंचमुखी शेष धारण करणारी, अशी श्रीमहाकालीची मूर्ति त्यांच्यापुढे आणून ठेवली. गोव्यांत झालेल्या धर्मच्छळानें त्यानें ती मूर्ति आपल्या गलबतावरून आडिवऱ्याला आणली होती. भिड्यांना त्या मूर्तीच्या दर्शनानें शांति मिळाली. त्यांनीं नगरशेट शेठ्यांना तयारी करून देऊळ बांधण्यास सांगितलें. स्वतःची सारी संपत्ति देवीच्या देवळाच्या कामीं लावली. त्यांतून आडिवऱ्याच्या महाकालीचें भव्य व सुंदर मंदिर तयार झालें. मूर्तीची प्रतिष्ठापना मोठ्या समारंभानें करण्यांत आली. महाकालीच्या या उत्सवाचा सोहळा दूरदूरपर्यंतच्या लोकांच्या जयघोषनादानें अनेक दिवसपर्यंत यथासांग पार पाडण्यांत आला.

त्यानंतर खोतांनीं आपलें संसारांतलें लक्ष काढून घेतलें. गांवांतले कदम-तावडे व खोतांचें वैर शमलें. त्यांनाहि महाकालीच्या मानकऱ्यांत सामील करून घेण्यांत खोतांनीं आपल्या मनाचा मोठेपणा प्रगट केला. कदम-तावड्यांनीं आपल्या पूर्वपापांबद्दल महाकालीची व सर्व लोकांची क्षमा-याचना केली. एखाद्या गोकुळासारखें आडिवरें गांव महाकालीच्या प्रेम-भक्तीनें सुस्नात होऊन शोभूं लागलें. महाकालीच्या दर्शनासाठीं थेट शिवरायापासून तों पेशव्यांपर्यंत साऱ्यांनीं आडिवऱ्याला भेट दिली. देवीची पूजा, पाठ, नैवेद्य यांसाठीं साऱ्यांनीं व गांवच्या खोत, नगरशेट, मान-कऱ्यांनीं उत्तम व्यवस्था लावून दिली.

शामल सागराच्या, शामल वनश्रीच्या व शामल पर्वतराजीच्या, निसर्ग-सुंदर, रमणीय स्थानीं असलेल्या, महिषासुराचा वध करणाऱ्या, जगाची उत्पत्ति, स्थिति, लय सांभाळणाऱ्या श्री महाकालीच्या या स्थानाचें माहात्म्य, कोंकणवासीयांना भक्तिप्रेमसुधेनें पुलकित करतें. साऱ्या जगाच्या पापतापांतून सुटून आपलें मन निर्मल करण्याकरतां दूर दूरचे भक्त अखंड इथें येऊन राहतात. भगवतीच्या चरणाजवळ आल्यावर—

अयः स्पर्शे लग्नं सपदि लभते हेमपदवीम् ।
यथा रथ्यापाथः शुचि भवति गंगौघमिलितम् ॥
तथा तत्तत्पापैः अतिमलिनमंतर्मम यदि ।
त्वयि प्रेम्णासक्तं कथमिव न जायेत विमलम् ॥

ज्याप्रमाणें परिसाला स्पर्श करून लोखंडाचें सोनें होतें, नदीनाले गंगेला मिळांतच पवित्र होतात, त्याप्रमाणें भिन्नभिन्न पापांनीं मलीन झालेलें अंतरहि या महामंगलेच्या चरणीं आश्रय घेतांच निर्मल होतें, असा भक्तांना अनुभव येतो. इथें येणाऱ्या एका दूरस्थ भक्ताला वाटेंत एका दरोडेखोरानें अडवलें असतां, व्याघ्ररूपानें महाकालीनें त्या दरोडेखोराला पळवून लावलें होतें. एका माहेरवाशिणीचा धांवा ऐकून ही स्नेहमयी कृष्णामाता तिच्या मदतीला ऐनवेळीं धांवून आली व तिनें त्या अबलेच्या धनाचा व सर्वस्वाचा बचाव निर्मनुष्य जंगलांत केला. असल्या कितीतरी दंतकथांचे अनुभव या जगन्मातेबद्दल ऐकायला मिळतात. त्यांतला भक्तिभाव पाहून मनुष्य अंतर्मुख होऊन म्हणतो " माते, हें घे तुझें पाप-पुण्य, ज्ञान-अज्ञान, धर्म-अधर्म. मला तूं आपली शुद्ध, निर्मला भक्ति दे. जगन्माते, या भव-सागरांत माझी जीवन-नौका षड्विकारांच्या तुफानानं बुडते आहे. हे कल्याणमयी, हे आनंदमयी, तूंच आतां यांतून मला सोडव. तुझ्या ' दुर्गा, दुर्गा, ' या नामघोषानं जर माझं जीवन तूं आकंठ भरून टाकशील तर माते, मला दुसरं कांहींहि नको. "

न मोक्षस्याकांक्षा भवविभववांछापि च न मे,
न विज्ञानापेक्षा शशिमुखीसुखेच्छापि न पुनः ।
अतस्त्वां संयाचे जननि जननं यातु मम वै,
मृडानी रुद्राणी शिव शिव भवानीति जपतः ॥

● ● ●

# शंकरमौलिविहारिणी राजापुरवासिनी विमला ! : १९

एकाद्या कुशल, मेहनती मातेनें मोठ्या साक्षेपानें, गांवांतल्या साऱ्या जागा धुंडाळून, विविध रंगांचीं बहरलेलीं फुलें, पत्री, दुर्वा, देवतेच्या पूजेकरतां जमवून ताटांत भरून ठेवावींत पण तिचें लक्ष चुकवून, तिच्या लहानशा लाडक्या कन्येनें आईची ही एकांगी होणारी देवपुजेची तयारी साऱ्या विश्वांत भरलेल्या शक्तिरूपाची पूजा करण्याकरितांच जणूं तीं पत्रपुष्पांनीं भरलेलीं ताटें आपल्या इवल्याशा गोंडस हातांनीं खोलीभर मुक्तपणें उधळून लावावींत, त्याचबरोबर हळदी-कुंकवानें भरलेले करंडेहि सर्वत्र उधळून टाकावेत त्याचप्रमाणें राजापूरच्या आसमंतांत कोंकणच्या सृष्टिमातेनें आपल्या दोन्ही-चारी हातांनीं लाल गुलाबी मातीची व गेंदेदार वनश्रीची मुक्तहस्तानें, स्वच्छंद मनानें अमाप उधळण करून सारा प्रदेश नयनरम्य करून टाकला आहे. जिकडे पहावें तिकडे उंच उंच विशाल गिरिशिखरें नि त्यावरून ओघळणारे हे हरित-पुष्पांचे घोंसच्या घोंस. एस. टी. ची डौलदार बस ज्यावेळीं राजापूरच्या प्रागणांत '**ॐ प्राच्यै दिशे इंद्राय नमः**' गुणगुणत पूर्व, पश्चिम, ऊर्ध्व, अधर अशा दाही दिशांना आपले प्रणाम सांगत शिरते, त्यावेळीं आपलें मन वनश्रीच्या या नयन-मनोहर खेळानें लुब्ध होऊन जातें. वाटेंत उंच उंच माना वर करून आपल्याकडे कुतूहलानें पहाणारे गर्द छायेचे वृक्षराज व त्यांच्याच पाया-पासून हुंदडत खिदळत जाणाऱ्या निर्मल सलिल सरिता आपल्या संगीतानें

आपलें मन प्रसन्न करतात. जणूं एकाद्या गौरीहराच्या पूजेचें कार्य एकाद्या हौशी, श्रीमान्, भाग्यवंताकडे चाललें आहे नि त्या सौंदर्याच्या महापूजेचा सोहोळा पहायला आपण हजर झालों आहोंत. सारा आसमंत त्या पूजेच्या पवित्र वातावरणानें भरून गेला आहे. अनेक मंजुळ आवाजाच्या स्वरसम्राज्ञी पूजेचीं भक्तिगीतें आळवीत आहेत. या पवित्र वातावरणाचा जणूं कैफ यावा, तसा राजापूरचा रम्य परिसर आपल्याला स्वर्गीय वातावरणांत नेऊन सोडतो. असद्, क्षणिक विचारांचे बंध तटातट् तुटून पडतात व माणसाचें मन आपोआप वरच्या प्रसन्न गगनांत विशाल भरारी मारूं लागतें, आसमंतांतल्या सौंदर्याशीं एकरूप होतें. सद्भावनांचीं कारंजीं त्याच्या अंतरंगांत थुई थुई उडूं लागतात व त्यावर सद्विचारांचें इंद्रधनु फुलूं लागतें. त्या वैदिक ऋषींची प्रार्थना ‘ **आनो भद्राः ऋतवो यन्तु विश्वतः** ’—विश्वांतील सर्व दिशांतून मंगल विचार आमच्याकडे येवोत—आपल्या ओठांतून स्फुरते. सारा निसर्ग आपल्याला ‘ **दीयते ज्ञान सद्भावः क्षीयते पाशुवासना** ’ असा ईश्वररूप वाटतो व आपल्या मनाची सारीं कवाडें सताड उघडून, भक्तिप्रेमाच्या अमृतवायूचें स्वागत करायला आपण सहज सिद्ध होऊन जातो.

राजापूरच्या धूत-पाप-ईश्वराचें नि त्याच्या डोक्यावर लीलया लीला करणाऱ्या गंगेचें हें स्थान महान् आहे. येथें दुसरें कांहीं नाहीं तरी सत्संग मिळतो. भगवत्कृपेनें आपल्या चित्ताचे दरवाजे मोकळे असल्यास, एका क्षणाचाहि सत्संग जीवन पालटवूं शकतो. आपण सारे जीवनज्योत उजळ-ण्याचा प्रयत्न करीत असतो, पण येथें समुदायशक्तीचें दर्शन होऊन आपण एकटे नाहीं याचें ज्ञान होतें, शक्ति वाढते व आपणास एक महान शक्ति भेटत असल्याचा आभास होतो. अशा तऱ्हेच्या निसर्गसमुदायाची, भक्त-समुदायाची साधकाला जरूर असते. अर्जुनाला दिसलेलें विश्वरूप येथें दिसतें. आपल्या एकट्याच्याच प्रयत्नानें सारी साधना पूर्ण होऊं शकत नाहीं, अशी नम्रता असल्यास या विश्वशक्तीचा लाभ होऊं शकतो. ईश्वरानें सत्प्रेरणा फक्त मलाच दिली आहे, मलाच तो करूं पहातो आहे असें नाहीं. बाकीच्या जगाला दिली नाहीं असेंहि नाहीं. इतरांवरहि तीच कृपा आहे. त्याचें आपण भक्तगण आहोंत. तो गणपति आहे. आपण एकटे नाहीं—विश्वशक्ति आपल्या-

बरोबर आहे असें दर्शन अशा या निसर्गरम्य भक्तिभावानें परिपूर्ण स्थानीं होतें. '**नृत्यंति ब्राह्मणा यत्र बालवृद्धाः शिवप्रियाः उत्सवे धूतपापस्य हर्षनिर्भर मानसाः**' अशा त्या वातावरणांत आपणहि तन्मय होऊं शकतों.

सुमारें हजार–बाराशें वर्षांपूर्वीं या निसर्गाच्या रम्य परिसरांत निळोबा भट व गंगाजी साळुंके नांवाचा एक गरीब ब्राह्मण व कुणबी काशीविश्वेश्वराची आराधना करीत असत. निळोबा ब्राह्मणाचें घरचें उत्पन्न शून्य होतें. मिळणाऱ्या अर्ध्या-चतकोर भाकरी-भातावर '**विधिवशात् प्राप्तेन संतुष्यताम्**' अशी त्याची वृत्ति होती. गंगाजी साळुंख्याचा जन्म तर सदा संतुष्ट कुणबी समाजांत झाला होता. मिळणाऱ्या पेजपाण्यावरहि त्याला असमाधान वाटत नव्हतें. निळोबाच्या झोपडीजवळच गंगाजीचें झोंपडें उभें होतें. दोघांची अवस्था एकच असल्यानें दोघांत आपोआप प्रेम होतें. निळोबाच्या प्रेमभक्तीचा आस्वाद त्यालाहि घेतां येत होता. '**सहनं सर्व दुःखानाम् अप्रतिकारपूर्वकम्**' ह्या तितिक्षेचें बाळकडू दारिद्र्यांत त्यांना पाजलेलें होतें. पण या दारिद्र्यानें ते जीवनाला विटले नव्हते. विश्वनाथाच्या प्रेमभक्तीनें त्यांचीं अंतरंगें पुष्ट झालीं होतीं. त्यामुळें चातुर्मासाचं उत्पन्न घरच्यांना ठेवून नि वरकस जमिनीचें वांट्याला येणारें पेजपाणी घरांत लावून, दोघेहि भिक्षा मागत दर वर्षीं काशीची यात्रा करीत. निळोबाला साऱ्या शास्त्रांचें ज्ञान होतें. गंगाजीच्या ठायीं प्रेमभक्ति होती. दोघेहि यात्रेची वाटचाल करूं लागले कीं, वाटेंत भक्तिप्रेमाच्या गोष्टी अखंड चालत. शेतांत मरमर राबणारा गंगाजी निरक्षर होता. अखंड कर्मयोग करून तो ज्ञानापासून अलिप्त होता. जे ज्ञान बाळगतात ते निरुद्योगी नि जे ज्ञानाचे खरे अधिकारी कर्मयोगी, तेच ज्ञानापासून अलिप्त रहातात. पण ज्ञानविरहित कर्म निरुपयोगी आणि ज्ञान कर्माशिवाय निःसत्व. दोहोंचा योग साधला पाहिजे. तो योग निळोबा आणि गंगाजीच्या यात्रेनें आपोआप साधला गेला. निळोबाला शेतकऱ्याच्या कर्मयोगाचें ज्ञान आणि कष्ट प्रवासांत मिळत होतें. तर कर्मयोगी गंगाजीला ज्ञानाचा लाभ निळोबाच्या संगतींत अनेक वर्षें यात्रा करतांना मिळत होता. त्यांच्या दैनिक जीवनांतहि या सहयात्रेनें सुसंवाद निर्माण झाला होता. दोघांनाहि एकाच तऱ्हेचे कष्ट-आनंद या यात्रेंत लाभत असत. घरच्या दैनंदिन जीवनांत निळोबाला वणवण करीत पै-पासरी करतां रानावनांतून भिक्षुकी-

साठीं पायपीट करावीच लागत होती. गंगाजीच्या शेतांत कोयता,कुदळी, नांगर या अवजारांच्या सहाय्यानें जमीन कसली जात होती तर रात्रीच्या प्रशांत वेळांत या दोघां कर्म-योग्यांचा, ज्ञानभक्तीचा प्रेमालाप चाले. ज्ञान, भक्ति आणि कर्म या तिहींच्या योगालाच, एकाच वस्तूंत अनुभव घेण्याला--गीता 'समत्व' म्हणते. मनुष्याच्या शरीराची रचनाच अशी आहे कीं, त्याचें मस्तक आकाशांत असलें तरी पाय जमिनीला लागलेले असतात. ज्ञान, कर्म व आनंद--ज्याला भक्ति हें नांव आहे या तिहींचा अनुभव एकदम यायला हवा. वैदिक ऋषी सांगतात, '**तव इत् इंद्र अहं आशसा हस्ते दात्रं च ना दधे**' हे परमेश्वरा, तुझ्या प्राप्तीसाठीं हातांत विळा घेऊन मी शेतांत काम करतो. देह असतांना कर्मांतून सुटणें म्हणजे मुक्ति नव्हे. ज्यामुळें देह उत्पन्न झाला आहे, त्या वासनेला छेदणें म्हणजे मुक्ति होय. आणि अशी मुक्ति भक्तीनें मिळूं शकते, कारण ती अंतिम अवस्था आहे. अंतिम अवस्था आरंभ न केल्यानें मिळूं शकत नाहीं. देह आहे तोंवर बाह्य कर्में करीत-करीत मनानें कर्ममुक्त होण्याचा यत्न चालेल तर शेवटीं तो देह उडून जाईल व फिरून देहधारणेची जरूर रहाणार नाहीं. याचें नांव मुक्ति. निळोबा आणि गंगाजीच्या दैनंदिन कर्मांत नि यात्रेंत हा सारा ज्ञानकर्म-भक्तियोग परिपक्व होत होता. दोघेहि वर्षानुवर्षें हा योग आचरतां आचरतां वृद्ध झाले. एका वर्षीं तर शरीरानें थकलेल्या त्या यात्रींना यात्राहि अशक्य झाली. दर वर्षींची काशी-विश्वनाथाची, त्या गंगामाईची दर्शन-यात्रा चुकली. दोघेहि आपल्या दुर्बलतेनें निरुपायानें घरींच राहिले, पण मनानें यात्रेचींच चित्रें त्यांच्या दृष्टि पुढें अहोरात्र उभीं राहूं लागलीं.

निळोबाच्या घरीं त्यावेळीं एक गाय होती. पण प्रेमानें चारापाणी देऊनहि तिचें दूध रात्रीच्या दोहनाचेवेळीं निघेना. निळोबानें रागानें गुराख्याला विचारलें. गुराख्यानेंहि रागानेंच 'उद्यां चोर पकडून माझें निरपराधित्व सिद्ध करतों' म्हणून सांगितलें. गुराख्यानें दुसऱ्या दिवशीं गाईवर पाळत ठेवली. गाय एका ठिकाणीं पान्हा सोडतांना दिसली. रागानें गुराखी कुऱ्हाड घेऊन धांवला. जिथें दूध सांडलें त्या ठिकाणीं त्यानें घाव घातला. खालच्या दग-डाची कवची उडाली. त्याचें विशाळगड जवळ कासडें येथें कपलेश्वराचें लिंग बनलें. दुसरा भाग तिथेंच राहिला. गुराख्यानें येऊन तें वृत्त निळोबांना

सांगितलें. त्यानें येऊन पाहिलें तों तेथें महादेवांचें लिंग प्रगट झालेलें ! आपल्या दुधाच्या लोभानें या लिंगाच्या छिन्नतेला आपण कारण झालों म्हणून निळोबाच्या डोळ्यांत आसवें उभीं राहिलीं. ज्या काशिनाथाच्या यात्रेला आपण चुकलों, तोच आपल्याला दर्शन द्यायला आला असतां आपण मूर्ख-पणा केला. **' मूढोहं मलचित्तोहं न जाने त्वां जग त्पातिम्; त्वन्माया मोहित मतिः स्तसंगरहितः सदा '** म्हणून त्यांनीं त्या चंद्रमोलीची भरल्या अंतःकरणानें प्रार्थना केली. पण एवढ्यांत ती धेनू मोकाट पळूं लागली व तिनें जवळच्या कोटीतीर्थांत देहविसर्जन केलें. निळोबांनीं तें पहा-तांच तिच्या मागोमाग त्या तीर्थांत उडी घेतली. देहाचा लोभ आतां नव्हताच तो त्यांनीं पूर्ण सोडला. त्या धेनूमागें निळोबांचाहि देह नाहींसा होऊन ते त्या विश्वनाथरूपांत लीन झाले.

गंगाजीला हा सारा प्रकार कळला. त्यानें येऊन देवाचें दर्शन घेतलें. काशी-विश्वनाथ प्रगट झालेला पाहून त्याला गंगामाईच्या पवित्र जलाची आठवण झाली. " योगी ज्वालानाथाच्या भक्तीनें गरम पाण्याचे झरे जर उत्पन्न झाले तर माझ्या यात्रेचें फळ देवानें गंगेला प्रगट करून कां देऊं नये ? " या विचारानें तो बेचैन झाला. त्याला कामधाम सुचेना. " देवा, निळोबाकरतां तूं प्रगट झालास. त्याचा हा देहाचा पडदा दूर केलास. मग माझ्यावरच तुझी अवकृपा कां ? साऱ्या जगाचें पापताप हरणाऱ्या गंगे, आतां तूंहि इथें प्रगट हो, माझ्यावर प्रसन्न हो ! " **' सकल-कलुष-भंगे स्वर्ग सोपान संगे, तरल-तर-तरंगे देवि गंगे प्रसीद '** म्हणून गंगाजी प्रार्थना करूं लागला. शेतांतल्या बांधावर बसून त्यानें गंगेची प्रार्थना तहान-भूक विसरून सुरू केली त्याच्या अश्रूपूर्ण डोळ्यांपुढें गंगेचे चमचमणारे निर्मल जलतरंग पूर्णपणें उभे राहिले. ज्या गंगेच्या किनारीं आपलीं मोठ-मोठीं साम्राज्यें सोडून सम्राट-चक्रवर्ती तप करून मुक्त झाले, विष्णूचे पाय पुजून, शंकराच्या जटा शोभवून, जन्हूच्या मांडीवर खिदळून, सगरपुत्रांना मुक्ति देणारी ती तरल तरंगा, ती त्रिभुवनतारिणी भगवती भागीरथी कधीं प्रगटेल म्हणून गंगाजीला अधीरता लागली. त्याच्या डोळ्यांतल्या पवित्र अश्रूंनीं खालची सारी जमीन ओली झाली, पण गंगाजी अश्रू थांबवीना. शेवटीं त्याच्या भ वभक्तीनें ती पतितोद्धारिणी जान्हवी द्रवली. गंगाजीच्या

नाचण्याच्या वरकस डोंगरी जमिनींतून ती धो धो करीत धांवत येऊन बारा ठिकाणीं प्रगट झाली. गंगाजीची भक्ति सार्थकी लागली. त्याचें जीवन उजळून निघालें. हा अद्भुत प्रकार ऐकून हजारों लोक हा अभूतपूर्व चमत्कार पहायला लोटले. गंगाजीच्या मातेच्या—'गंगा माता कीं जय'च्या घोषानें सारा आसमंत दणदणून गेला. सर्वदूर गंगेच्या जन्माची कथा वाऱ्याप्रमाणें पसरली.

श्रीशैलचा राजा प्रतापरुद्र सहसेनापंडित हा अद्भुत प्रकार पहायला मुद्दाम आला. त्याचा धर्माधिकारी विश्वंभरपंडित यानें प्रयागाप्रमाणें ही गंगा कमजास्त होईल तरच मी तिला गंगा मानीत म्हणून सांगितलें. तेव्हां गंगा गुप्त झाली. गंगा प्रगट व्हावी म्हणून सारे उपोषण करूं लागले. तेराव्या दिवशीं दोन स्त्रियांनीं साऱ्यांना गंगा प्रगट झाली म्हणून दृष्टांत दिला. सारे जाऊन पहातात तों खरोखर गंगा धो धो वहात होती. प्रतापरुद्रानें गंगेच्या जवळची सारी जमीन खरेदी करून गंगाजी साळुंख्याला बहाल केली. पण गंगाजीला द्रव्याचा लोभ नव्हता. त्याची स्थिति '**जो आपुलेनि नागरपणें, इंद्रभुवनाते पाबळे म्हणे, तो रंजे केवीं पालिवणें भल्लाचेनि। जो अमृतासी ठी ठेवी, तो जैसा कांजी न सेवीं, तैसा स्वसुखानुभवी न भोगी ऋद्धी**' अशी झाली होती. नम्रतेनें त्यानें ती देणगी घेण्याचें नाकारलें शेवटीं त्याच्या विनंतीवरून तिथल्या सदाचारसंपन्न विद्वान ब्राह्मणांकडे गंगापूजेचे अधिकार व श्री धूतपापेश्वराच्या भव्य मंदिराची व्यवस्था सोपवली गेली. अजूनहि ज्यावेळीं राजापूराला गंगा प्रगट होते, तेव्हां तेव्हां गंगाजी साळुख्यांची आठवण म्हणून गंगा प्रगट होताना गंगाजीचा आवडता नाचणा तिच्या मुखांतून प्रथम बाहेर येतो. आज लोक गंगाजी साळुंखे यांच्या '**माझें नाम रूप हारपो, मज झणें वासिपो भूतजात**' या आकांक्षेची पूर्ती पहात असले तरी, महाराष्ट्राच्या एका मोठ्या संतकवीनें दोन-अडीचशें वर्षांपूर्वींच आपल्या मोरोपंती काव्यांत त्यांचे हे सद्गुण, हा भक्तिभाव वर्णिलेला आहे. गंगेचीं चौदा कुंडें साळुख्यांची कीर्ति व धूतपापेश्वराच्या भव्य मंदिराची पताका निळोबांची कीर्ति आजहि सांगत असतात.

राजापूर हा फार जुना गांव नि आयात–निर्यातीचें मोठें बंदर होतें.

इराक, इराण, तुर्कस्थानपर्यंत इथल्या सांपळे—कुशे यांच्या गलबतांवरून माल येत-जात असे. इथल्या मोठ्या बाजारपेठेनेंच शिवाजीराजांना इकडे खेचलें. इंग्रज, डच, पोर्तुगीज इत्यादि परराष्ट्रांचे इथें कारखाने व वखारी होत्या. शिवाजीच्या पराक्रमाचा धसका बसून त्या कधीं बंद तर कधीं चालू होत. इथल्या गंगापुत्रांचे तंटे शिवाजीपासून पेशव्यांपर्यंत साऱ्यांनाच सोडवावे लागले. त्यांच्याहि भक्ति—औदार्याचा या स्थानाला फायदा झाला. औरंगजेबाच्या वागण्याला कंटाळलेला त्याचा मुलगा अकबर हा शेवटीं येथूनच मस्कतला गेला.

अलिकडच्या काळांतहि येथें श्री. रघुनाथशास्त्री (काका) पुराणिक व श्री. लक्ष्मणराव दांडेकर यांचेसारखे सत्पुरुष होऊन गेले. राजापूरच्या वाणिज्य व धर्मसंप्रदायानें महाराष्ट्राचा एक मोठाच कालखंड व्यापला आहे. इथली पाठशाळा, औषधशाळा इत्यादींच्या मागें मोठी तपस्या उभी आहे. राजकारणी लोकांनाहि राजापूरनें आकृष्ट केलें. सुप्रसिद्ध उष्ण झरे, निर्मला गंगा व श्री धूतपापेश्वर यामुळें अनेक शतकांपासून राजापूरला महत्त्व आलेलें आहे. इथल्या उष्ण झऱ्यांत अनेक तऱ्हेचे रोग बरे होतात असा लोकांचा अनुभव आहे. पण इथें येणारा मोठा जनसमुदाय हा तिथल्या गंगा व धूतपापेश्वर दर्शनानें पावन होण्याकरितांच येतो. त्याच्या शरीर आणि मानसिक शुद्धीला तें सहाय्यभूत होतें. तसें गंगेत—‘ एच्-टू-ओ ’ ( H2O ) आहे म्हणून आंघोळ करणारा बुद्धिवादी, निर्बुद्ध असलेला बैल व भक्तिमान व्यक्ति या सर्वांनाच देहशुद्धि मिळते. पण पहिले दोन मानसशुद्धीपासून अलिप्त रहातात. भक्ताला ती मिळते. कारण ‘ **जैसे क्षेत्रीं जें पेरिजे, तें वांचूनि आन न निपजे, कां पाहिजे तेंचि तेंचि, देखिजे दर्पणाधारें । ना तरी कडे या तळवटीं, जैसा आपुलाच बोलु किरीटी, पडिसादु होऊनि उठी, निमित्तयोगें । तैसा समता या भजना, मी साक्षीभूतू पैं अर्जुना, एथ प्रतिफळे भावना आपलाली ।** ’ भक्तानें येणाऱ्याची सद्भावना पोसली जाते. माणसाला बाहेरून कितीतरी संपदा आणि आपदा प्राप्त होतात. पण त्याच्या मुळाशीं जाऊन पाहिलें तर असें निश्चितपणें अनुभवास येतें कीं, सुखाचें मूळ सद्बुद्धि—सद्वासना होय. म्हणून जे प्रयत्न आपण करतो त्याचा परिणाम जर चित्तशुद्धि अथवा वासनाशुद्धि होत असेल आणि बुद्धि

निर्मल होत असेल तर तो प्रयत्न सफल झाला असेंच मानलें पाहिजे. आत्मकल्याणासाठीं अनेक ऋषींनीं व संतपुरुषांनीं केलेल्या प्रार्थना प्रसिद्ध आहेत. पण त्यांत गायत्री मंत्र सर्वोत्तम मानला गेला आहे. गायत्री मंत्र हा बुद्धिवादी मंत्र. त्यांत सद्‌बुद्धीचीच मागणी आहे. शेवटीं आपल्याजवळ जी निर्णयशक्ति आहे तीच बुद्धि होय. तिच्यापलिकडे अंतर्यामीं परमेश्वर! त्याच्यापर्यंत पोंचायचें साधनदेखील निर्विकार बुद्धि, निर्मल भक्तीच आहे. म्हणून जेणेंकरून बुद्धि शुद्ध होईल ती साधनाभक्ति करणें हें साऱ्याच साधनांचें सार आहे. कंदिलाची कांच धुरकटलेली असली तर ज्योतीचा प्रकाश बाहेर येणार नाहीं. तशीच प्रत्येकाच्या अंतःकरणांत ईश–ज्योत आहे. बुद्धि निर्मळ असेल तरच प्रकाश बाहेर फांकेल. गीतेंतहि सर्वोत्तम आदर्श स्थितप्रज्ञ पुरुषाचा आहे. ज्याची बुद्धि स्थित–निष्कंप–अविकारी तोच स्थितप्रज्ञ अशी बुद्धि अचूक निर्णय घेते. अशा बुद्धीचा एखादा निरक्षरहि पंडितापेक्षां अचूक निर्णय घेऊं शकतो. बुद्धि सर्वांना आहे. कोणांत ती तीव्र, कोणांत ती मंद असेल. पण रज–तममिश्रित तीव्र बुद्धीहि चुकीचा निर्णय देऊं शकेल तर मंद पण स्वच्छ बुद्धि अचूक निर्णय देईल. आणि बुद्धि निर्मळ झाल्यावर मंदहि तीव्रच होते. ती आत्म्यांत लीन होते. तीव्र लीन बुद्धि जेवढी व्यापक होते तेवढी अनेक ज्ञानें मिळूनहि होत नाहीं. म्हणून स्वच्छ बुद्धीची, निर्मल भक्तीची साधना हवी. आणि ती साधना म्हणजे ईश्वरभक्ति! तो भक्तिभाव राखूं तर भगवान् सांगतात–' ददामि बुद्धियोगंतम् ' ज्ञान द्यायला मी बसलोंच आहे. आंतूनच तें ज्ञान आपल्याला मिळून जाईल, कारण तो उत्सुकतेनें वाट पहातोच आहे कीं कोण माझ्या आशीर्वादाची इच्छा करतो आहे? साऱ्या जगांत प्रकाश आणि सत्यप्रेरणा भरून रहावी अशी त्याची इच्छा आहे. पण आम्हा बालकांना तो प्रयोग करूं देतो. चूक करूं तर वर–खालीं, मागें–पुढें तोच बसला आहे. त्याची दृष्टि आपल्यावर आहेच. मासोळी पाणी सोडून जाणार कुठें? पाण्याचा तरंग पाणीच असतें. आपलें काम प्रेम–भक्तीनें त्याच्याकडेच जाण्याचें आहे. उपनिषद् सांगते– ' तपसा ब्रह्म विजिज्ञासस्व, तपो ब्रह्म! ' तप, भक्ति करून त्याला जाणा, त्याची ओळख करून घ्या कारण गुणविकास करूनच आत्मदर्शन होतें. भक्ति–प्रेमाची परिसीमा म्हणजेच अद्वैत--हें सारें जग, ही सारी भक्तिगंगा,

हा धूतपापेश्वर हे सारें माझेंच रूप आहे, ही अद्वैताची भूमिका. म्हणून अद्वैताची साधना प्रेमाच्या, भक्तीच्या, भूतदयेच्या विस्ताराची साधना होईल. एवढ्यासाठींच श्री शंकराचार्यांसारखा महान्, अद्वितीय प्रकांडपंडितहि 'भूतदयां विस्तारय!' अशीच प्रार्थना करून राहिला आहे. आणि ती साधना राजापूरच्या श्री धूतपापेश्वर--गंगादर्शनांत झाली म्हणजे पुरे!

●●●

# केळशी–उटंबरें येथील कमला आणि पीरबाबा : २०

चिदाकाशांत पूर्ण प्रेम–चंद्राचा उदय झाला आहे, प्रेमसिंधूच्या लाटांचें श्रुतिमधुर संगीत दूरवर ऐकूं येत आहे, हरित रंगाच्या, जरीबुट्टी काढलेल्या, चोळीपरकरांचा साज केला आहे, हातांत चंदेरी–सोनेरी हरित कंकणें किण्‌किण् वाजत आहेत; डोक्यावर नारदमुनींच्या पद्धतीनें कुंतलाचीं पेड बांधून, त्यावर हिरव्या चाफ्यांची, हरित पर्णांकित, कलाबूत लावून, वेणी माळलेली आहे; पदांतले कर्णमधुर घुंघुर–चाळ वाजत आहेत, हास्यसुखाच्या, प्रसन्न चर्येच्या, शुक्राच्या तेजस्वितेशीं डोळ्यानें स्पर्धा करणाऱ्या, सुडौल शरीराच्या, अष्टवर्गीय, हजारों मधुबालिकांनीं, निरागस हावभाव करीत, नवरात्रांच्या उत्सवांत देवीभोंवतीं फेर धरावा व आपल्या गोड गळ्यानें स्वरमधुर गान करीत, देवीभोंवतीं वर्तुळांत फिरत रहावें म्हणजे आपणास जो अनुपम, निरागस आनंदाचा लाभ होईल तसा केळशीच्या महालक्ष्मीच्या दर्शनाला आपण गेलों कीं आपणास होतो. एका बाजूस अनंत निळा सागर, त्याच्या अलिकडे हिरव्यागार रंगानें न्हालेलीं नारळी पोफळीचीं विस्तीर्ण, प्रसन्न, तालांत माना डोलावणारीं बनें व आपल्या सभोंवार वर्तुळकार परिघांत असलेल्या डोंगरकपारींच्या आश्रयानें डौला–दिमाखांत उभी असलेली प्रसन्न पर्णराजी–या प्रसन्न, निरागस, निसर्गाच्या बालिकांच्या वर्तुळ परिघांत हरितारक्ती, कृष्ण, पीत, अशा रंगांचीं रांगोळी असलेलीं विस्तीर्ण सपाट शेतें नि त्यांच्या मध्यभागीं—

**रासनिकुंजे गुंजति नियतं भ्रमरशतं किल कान्त। एही निभृत-पथपान्थ। त्वामिह याचे दर्शनदानं हे मधुसूदन शान्त॥ शून्यं कुसुमासनमिह कुंजे शून्यः केलिकदंबः दीनः केलिकदंबः। मृदु कलनादं किल सविषादं रोदिति यमुनास्वम्भः॥**

—"रास-निकुंजांत शेंकडों भ्रमर गुंजन करीत आहेत. इकडे ये, हे शान्ति-मय मधुसूदन, तुझ्या दर्शनाची मी वाट पाहते आहें. भीक मागते आहें. हे नाथ, आपल्या खेळण्याच्या या पुष्पाच्छादित कुंजांत, हें कुसुमासन व हे लिला–कदम्ब सारें आपल्याशिवाय सुनें सुनें वाटत आहे. हे मोर आदि पक्षीगणहि खिन्न झाले आहेत. मंदमधुरभाषिणी यमुनेचें हें निर्मल जलहि आपल्या वियोगानें जणूं मुसमुसत आहे. '**एही जनार्दन, पीतांबरधर, कुंजे मन्थर पवने**'—हे पीतांबरधारी जनार्दन, या मंदमंद वायू खेळत असणाऱ्या कुंजवनांत तूं ये," अशी श्रीविष्णूची प्रार्थना करणारी, त्याची हृदयदेवता श्रीमहालक्ष्मी व तिचा भव्य प्रासाद, आपल्या डोळ्यांना सुखावतो. या विरहिणी महालक्ष्मीमातेचें दर्शन घ्यायला आपण आंत जातों, पण देवळाच्या मध्यभागीं विराजमान झालेली ही परब्रह्मस्वरूपिणी पद्मासनस्थिता माता आपल्याला विरहिणी न वाटतां, जिला आपला सखा भेटलेला आहे व जिला अखंड '**अधरं मधुरं, वदनं मधुरं, नयनं मधुरं, हसितं मधु-रं। हृदयं मधुरं, गमनं मधुरं, मधुराधिपतेरखिलं मधुरम्॥**' असा अनुभव असलेली अशी प्रसन्नचेतस आढळून येते. सारा निसर्गाचा आसमंत आपल्या महान ऐश्वर्यानें फुलवणारी ही '**चंद्राहिरण्मयी लक्ष्मी**' विरहिणी असणेंच शक्य नाहीं. उलट साऱ्या ऐश्वर्याच्या अधिपतीचे पाय नम्रपणें तिनें कायमचे धारण करून त्यांतच ती एकरूप झाली आहे. त्या विश्वप्रियेला जणूं हेंच सुचवायचें आहे कीं, माझ्या वैभवावर तुमचें कितीहि प्रेम असलें, तरी त्या वैभवाची स्वामिनीहि जर त्या माधवाला शरण जाण्यां-तच आपलें जीवनसाफल्य अनुभवते, तर त्या वैभवाला भुलणारे तुम्हीहि, त्याच माधवाला शरण जा. त्याला आधीन करणाऱ्या भक्तांच्या आधीन मीहि असणार यांत नवल काय?

सुमारें दोन–अडीचशें वर्षांपूर्वी या आदित्यवर्णा अमलेचा एक भक्त केळशी-उटंबरें गांवांत उटंबरें या कोळ्यांच्या घराण्यांत जन्म पावला. डोंगरी

कोळ्यांची ( सोनकोळी ) ही वस्ती मासळी पकडण्यांत मोठी तरबेज होती. खवळणारा दर्या, बदलणारा वारा नि मासोळीची लहर यांमुळें कोळ्यांचा धंदा बेभरंवशाचा असतो. अमुक दिवशीं अमुक उत्पन्न येईलच याचा अंदाज कोणालाच देतां येत नसे. त्यामुळें कोळ्यांची स्थिति **'एक दिवस हत्तिवरी, मिरवतो त्या नवऱ्यापरी; एक दिवस चिंधी घरीं, नाहीं सांगतो, कोण दिवस येई कसा कोण सांगतो,'** अशी होती. अमाप मेहनत रात्रभर करून खाण्यापुरतें मिळूं नये, तर फारसे कष्ट न करतां वर्षाची बेगमी व्हावी, असा उटंबऱ्याचा अनुभव होता. त्यामुळें या चंचल लक्ष्मीला आपण कायमचें प्रसन्न करूं, तरच आपली ददात मिटेल असें त्याच्या भोळ्या मनाला वाटलें. अष्टग्रहींत आपल्याला आलेल्या भाविष्याचा अनुभव त्याला आला होता. भगताचे शकुन खोटे ठरले होते. त्यामुळें या प्यादीफर्ज्यांच्या पायाला न लागतां, त्यांच्या मालकिणीचेंच पाय आपण धरूं, असा त्यानें निश्चय केला. अहोरात्र असलेली पोटाची चिंता सागराच्या अथांग जलांतून प्रयत्न करूनहि, पुरी मिटत नव्हती. म्हणून तो त्या सागराच्या जलालाहि भंगून वर आलेल्या कमलेला शरण गेला. त्याचा भाव पाहून ती शरणागत वत्सला द्रवली व केळशीच्या निसर्गवर्तुळांत स्वयंभू प्रकट झाली. गरीब उटंबरेनें तिथें एक लहानसें झोपडें बांधून तो तिची मनोभावें पूजा करूं लागला. पण त्या लहानशा झोपडींतल्या भक्तिभावानें कमला संतुष्ट झाली. उटंबऱ्याचें आयुष्य ज्या आनंदाकरतां त्याला लक्ष्मी जवळ हवीशी वाटली, त्या आनंदानें फुलून गेलें. आंतले लोभमोह शमन पावले. कशाकशाची म्हणून त्याच्या ठायीं वासनाच उरली नाहीं. लक्ष्मीनें त्याच्या बाह्य वैभवाबरोबरच आंतरवैभव वाढवलें होतें. त्यामुळें कामनिक भक्तीचा लोप होऊन शुद्ध—निर्मलाभक्तीचा उदय झाला व त्या संतोषांतच उटंबरेनें आपला देह सापानें कात टाकून जावें तितक्या सहजतेनें सोडला.

याच वेळीं लागू नांवाच्या एका धनवान् ब्राह्मणाला दृष्टांत झाला व त्यानें भरपूर पैसा भव्य मंदिर व चार पुष्करणी बांधून सार्थकीं लावला. उटंबरे--लागूंच्या भक्तिप्रेमाचें कायमचें स्मारक उभें राहिलें. लागू पुढें मराठी राज्यांत आपल्या पराक्रमानें मोठे सरदार बनले.

या निसर्गसुंदर स्थानाच्या एका कोपऱ्यांत अनंताचा शोध घेणाऱ्या

एका महान मुस्लीम संतांची–हजरत सय्यद याकूब सरवदी यांची, एक सुंदर समाधी–दर्गा—आहे. एका बाजूला विशाल सागराची अखंडपणें चाललेली ‘ इबादत ’ ( जप ), वरच्या बाजूला ज्या अनंताची उपासना त्यांनीं केली तें अनंत आकाश व सभोंवतीं मनोहारी निसर्गाचें रमणीय वलय, अशा थाटांत अनंताचा शोध घेऊन तृप्त झालेला हा महात्मा अंगावर गिलिप–चादर–ओढून समाधिस्त झालेला आहे. त्या समाधींतहि त्याचा अखंड ‘ ताहजुद नमाज ’ चाललेला आहे. जन्मभर ज्या ‘ तसबी ’ ( माळ )नें त्यांनीं ( जप ) केला, ती तेथें आहे. अंगावर भारी किंमतीचा गिलीप, बाजूला ते ज्यावर विश्रांति घेत ती खाट, त्यांचा पायघोळ झब्बा, त्यांच्या देहविसर्जनानंतर केळीच्या पानावरून दर्यांतून वहात आलेले पांच तांब्याचे पंजे, गुडगुडी इत्यादि वस्तू पडल्या आहेत. शिवाजी व संभाजी राजांनीं बांधलेली त्यांच्या दर्ग्याची सुंदर पण साधी इमारतहि तितकीच प्रेक्षणीय आहे. कबीरानं म्हटलं आहे— **‘ जाती न पूछो संतकी, देख लियो जो ग्यान, मोल करो तलवारका, पडा रहन दो म्यान ’** या दृष्टीनं आपण बघितलं तर त्या महान संतापुढें आपलें मस्तक नम्र भावानेंच झुकून, ईश्वराची आराधना करून त्यांत स्वतःला विसरलेल्या, या महात्म्याचें दर्शन, आपल्यांतहि तसलीच प्रदीर्घ साधना करण्याची प्रेरणा उत्पन्न करते.

सिंध हैद्राबादकडून, सुमारें साडेतीनशें वर्षांपूर्वी हजरत पीरबाबा याकूब हे अचानक बाणकोटच्या बाजूनें केळशीच्या खाडीवर आले. अंगावर फाटकीं वस्त्रें, वाढलेल्या भव्य शुभ्र दाढीमिशा, पाठीवर सोडलेला धवल केशकलाप, वर्ण ताम्रगौर अशी ही सात फुटी मूर्ति तरी ( होडी ) वाल्याला आपल्याला पलिकडे घेऊन जा म्हणून विनवूं लागली. या कंगाल माणसाकडून तरीचें भाडें मिळणें अशक्य आहे हें समजून तरीवाला खाडींतून त्यांना परतीराला न्यायला तयार नव्हता. तिथें केळशीचा हिरजी गुजर नांवाचा हिंदु व्यापारी होता. ही कोणी फिरती अवलिया व्यक्ति असावी असा त्याचा समज झाला. त्यानें पुढें होऊन बाबांचें व त्यांच्याबरोबर असलेल्या त्यांच्या दहा–बारा वर्षांच्या चेल्याचें–सोलीसखानाचें–भाडें स्वतः भरलें व स्वतःच्या घराजवळ जवळचें थोडें–फार सामान ठेवायला त्यांना एक जागा दिली. तेव्हांपासून

बाबा गांवांत आपल्याच नादांत गुंग होऊन फिरत. गांवांत भिक्षा मागून तर कधीं हिरजी गुजराचा शिधा घेऊन ते आपला निर्वाह करीत. कधीं त्यांना लहर आली म्हणजे लोकांकडे हमालीचेंहि काम करीत. त्यांच्या निवासामुळें हिरजी गुजराच्या दोन गलबतांचीं चार गलबतें झालीं. व्यापार तेजींत आला व तो अमाप धनवान बनला. बाबांच्या कृपेमुळेंच हें वैभव आपल्याकडे आलें या समजुतीनें त्याची व इतर लोकांचीं त्यांच्यावर श्रद्धा बसली. ते सागराच्या किनारी सोलीसखानाला बरोबर घेऊन, तर कधीं एकटेच, तासन्तास तन्मय होऊन बसत. अशा वेळीं त्यांना देहाचेंहि भान उरत नसें. सारें जीवनच जणूं त्यांनीं नमाज–प्रार्थनारूप–केलें होतें. एका अल्लाच्या अखंड चिंतनाशिवाय त्यांना दुसरा उद्योग राहिला नाहीं. त्यावेळीं विजापूरचा अम्मल या भागावर होता. पण त्या मुस्लीम अंमलाच्या ऐन आमदानींत बाबांचा सर्वधर्मसमभाव वाखाणण्यासारखा होता. मुसलमानापेक्षां हिंदूच त्यांचे भक्त होते. ते सांगत, ‘ एकाच तळ्याला चार घाट असतात. चार बाजूंनीं चार लोक तेथें पाणी प्यायला येतात. मराठी बोलणारा हिंदू त्यांतल्या पाण्याला ‘ पाणी ’ म्हणतो, मुसलमान ‘ पानी ’ म्हणतो, एखादा पंडित त्याला ‘जल’ म्हणतो, तर एखादा कानडी त्याला ‘नीर’ म्हणतो, पण साऱ्यांना लाभ होतो एकाच निर्मल जलाचा. साऱ्यांना तृप्ती होते ती एकाच जातीची. फक्त नांवें ज्याच्या त्याच्या जाती, धर्म, पंथ, बोली, याप्रमाणें दिलीं जातात. पाणी आहे तसेंच अभेदपूर्णच रहाते. तसेंच एकाच ईश्वराला अल्ला, राम कांहीं म्हणा, दर्शन अनुभव मात्र त्या अनंत ईश्वराचाच घ्यायचा आहे. तुमच्या घरांतल्या वडिलधाऱ्या माणसाला नात्याप्रमाणें कुणी काका, मामा कांहीं म्हणो, पण त्याचें साऱ्यांवरच प्रेम असतें. लहान बालकाला तर त्या आजोबाचें नांवहि नीट घेतां येत नाहीं, तरी तो आजा त्याचें निरागस प्रेम पाहून त्यालाच सर्वांत आधीं उचलून घेऊन त्याचें कौतुक करतो; त्याचप्रमाणें पोपटपंची करणाऱ्या भावहीन आचारविहीन मुल्ला–पंडितांपेक्षां, श्रीमान अधिकारी व्यक्तींपेक्षां ईश्वर निर्मल–भावाच्या भक्तांनाच अधिक जवळ असतो. ’ बाबांचें व्यक्तिमत्व मोठें प्रसन्न व दयाळू होतें. तें ज्यावेळीं हमाली करण्याकरितां ओझीं उचलत तीं त्यांच्या डोक्यावर न टेकतां अधांतरींच रहातात असा लोकांचा समज होता.

छत्रपती शिवाजी राजांनीं ज्यावेळीं दाभोळकडे आपला मोर्चा वळवला, त्यावेळीं बाबांची कीर्ति त्यांच्या कानांवर गेली. ते केळशीला स्वतः आले. दाभोळवर हल्ला करण्याची सारी तयारी झाली होती. या थोर अवलियाचा आशीर्वाद मागण्याकरतां ते उटंबर-केळशीला आले. पण बाबांनीं त्यांना सबूरीचा सल्ला दिला. पण सारी तयारी फुकट जाण्यापेक्षां राजांनीं प्रयत्न करून पहाण्याचें ठरविलें. त्यांचा आरमारी तांडा वादळांत सांपडून नष्ट व्हायची वेळ आली, तेव्हां त्यांना बाबांचे शब्द आठवले. ते आपला बेत तहकूब करून परतले. बाबांचें दर्शन घेऊन त्यांनीं आपणांस यश मिळावें म्हणून त्यांची प्रार्थना केली व यश मिळाल्यास दर्गा बांधून देऊं म्हणून सांगितलें. पण माझा दर्गा बांधून पुरा करणें तुला शक्य होणार नाहीं, 'पण अमुक दिवशीं तूं दाभोळवर हल्ला कर, तुझी फत्ते होईल' म्हणून त्यांनीं त्यांना आशीर्वाद दिला. सुवर्णदुर्गचा मुसलमान किल्लेदार बाबांचा भक्त. त्यांच्या सांगण्यावरून त्यानें शिवाजीराजांना तो किल्ला विनायास दिला. लवकरच राजांनीं दाभोळवर हल्ला करून जय मिळविला व जवळपासचा सारा प्रांत त्यांच्या कब्जांत आला. राजांनीं त्यांना दर्गा बांधण्याची जागा पसंत करण्यास सांगितलें व आपल्या राज्याला वारसपुत्र असावा अशी विनंती केली. बाबांनीं त्यांना तसा आशीर्वाद दिला व शिवाजी राजे देशावर कांहीं गडबड निघाल्यानें तिकडे घाईगर्दीनें निघून गेले.

समाजांत जें पाप-पुण्य होतें, त्याला जबाबदार राज्यकर्ते असतात. ज्यांच्या हातांत सत्तेचीं सूत्रें असतात, ते जर पापभीरू, नीतिमान असतील, त्यांचा पाठिंबा, सत्याला, न्यायाला, शुचितेला असेल तर तो समाज सत्त्वगुणी, नीतिमान, सदाचारसंपन्न होतो. पण ज्यावेळीं राजसत्तेचीं सूत्रें अदूरदृष्टि, अनीतिमान अथवा जवळच्या थोड्याशा फायद्याकरतां समाजांतल्या कंटकांना हाताशीं धरून सत्प्रवृत्तींना खेचण्याची असते, त्यावेळीं समाज अधोगतीला जातो. त्यामुळें भरतखंडातील राज्यसत्तांचा असा समज होता कीं, समाजांत जे साधू संत, तपस्वी, पंडित, असतात त्यांच्या योगक्षेमाची, आपण आपल्या उदार दृष्टीनें जाण ठेवूं, तर त्यांनीं केलेल्या तपाचें, सत्कर्माचें एक अष्टमांश पुण्य आपल्याला मिळेल. समाजांतल्या स्वार्थी कुप्रवृत्तींना आपण उत्तेजन देऊं तर त्यांतल्या एकअष्टमांश पापाचे आपण भागी-

दार होऊं. त्यामुळें समाजांतल्या सत्वशील वृत्तींना आश्रय देणें म्हणजे आपल्या राजसत्तेला बळकटी आणणें असेंच ते समजत. आणि तें खरें होतें. कारण, ज्या समाजांत हें सत्त्वगुण, हें तेज असतें, तोच समाज ताठ उभा रहातो. सर्व संकटांना प्रखरतेनें तोंड देऊं शकतो. असा समाज गुंड–पेंढाऱ्यांच्या, बाजारबुणग्यांच्या टोळधाडीपेक्षां सामाजिक संतुलनाला उपयोगी असतो. परकीय व स्वकीय अत्याचारांना, बेबंदशाहीला तोच समाज तोंड देऊं शकतो. छत्रपती शिवाजी राजांना ही दूरदृष्टि, हा विवेक होता. म्हणूनच त्यांनीं बाबा याकूब यांच्यासारख्या मुस्लीम संताची योग्य बूज राखली. त्यामुळें माघ शुद्ध पंचमी व षष्ठी शिवशक ३८ मध्यें बाबांच्या दर्ग्याला ऊदफुलां-करतां व फकिरांच्या बेगमी ( भिक्षा ) करतां ६५३ एकर जमीन उटंबरे-केळशी या गांवीं इनाम करून दिली. त्यांचें तें आज्ञापत्र आजहि उपलब्ध आहे. त्यांत त्यांनीं बाबांचा ' हजरत बाबा याकूब बहुत थोर वली ' म्हणून गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. रायगडाच्या बांधणीचें काम चालू असता महा-राज बाबांचा श्रीरामदासस्वामीप्रमाणेंच वेळोवेळीं येऊन सल्ला घेत. महाडच्या डोंगरांत असणारे रामदासस्वामी व केळशीला असलेले बाबा याकूब या दोघां महान् संतांचा एकमेकांस चांगला परिचय होता. वरचेवर ते एक-मेकांस मुद्दाम येऊन भेटत अशा दंतकथा त्या भागांत प्रचलित आहेत. बाबा याकूब एकदां अकस्मात् रायगडावर शिवाजीराजांकडे आले. गडाचें अति-खर्चिक काम होतांना अमाप पैसा खर्च होत होता. त्यामुळें बाबा याकूब आल्या दिवशीं राजांच्या खजिन्यांत मजुरांना वांटण्यास पुरेसा पैसा नव्हता. बाबांनीं ती जबाबदारी स्वतःवर घेतली व साऱ्या मजुरांना त्यांनीं गवताची एक एक करंडी वाटली. रात्रीं ज्यानें ज्या इमानानें मेहनत केली होती, त्या मानानें त्याची गवताची काडी सोनें, रुपें, तांबें, लोखंड या धातूंची झालेली आढळली. साऱ्या मजुरांना व राजांना झालेल्या कामाचें मोल समजून आलें. दुसऱ्या दिवसापासून बाबा याकूब असेपर्यंत सर्व मजूर मोठ्या इमानदारीनें काम करीत. रायगडावर असतांना केळशींतहि बाबांचें दर्शन लोकांना होत असे. शिवाजीराजांनीं दर्ग्याचा पाया व त्यावर काळ्या दगडाचें मजबूत काम सुरू केलें नि तेवढ्यांत त्यांच्यावर मृत्यूनें अकाली घाला घातला. पुढें संभाजीराजांनीं आपल्या वडिलांचें तें काम दर्ग्याच्या भिंती छपरापर्यंत

चढवून पुरें करण्याचा प्रयत्न केला. पण तिथलीं पावित्र्यदर्शक कमळाचीं फुलें कोरून होतांच तें काम अपुरें राहिलें. कारण लवकरच संभाजीचाहि मृत्यु घडून आला. राजारामाला तीस वर्षांत या कामाकडे लक्ष द्यायला फुरसतच झाली नाहीं. पण छत्रपतींच्या मराठी राज्याच्या प्रासादावर कळस चढविणाऱ्या थोरल्या बाजीरावानें, या दर्ग्यावर घुमट चढविण्याचा प्रयत्न केला. पण एका रात्रींत तो घुमट बाबांच्या स्वप्नांतल्या आदेशाप्रमाणें चढवितां न आल्यानें त्यानें तो नाद सोडून दिला. पुढें त्यावर कौलांचेंच एक साधें छप्पर बसविण्यांत आलें व तें आजतागायत तसेंच आहे.

बाबा याकूब खूप वृद्ध होईपर्यंत जगले. आसपासच्या गरीब, श्रीमंत हिंदु–मुस्लीम लोकांना त्यांचा मोठा आधार वाटत असे. ‘ **गगन गुंफामें बैठिके रे, उलटिके अपना आप देखै, अजपा जपै बिन जिभसोरे, बिन नैन निरंजन रूप लेखै; ज्योति बिन दीपक है रे, दीपक विना जगमग पेखै** ’ अशा अनुभवाची उच्च कोटीची त्यांची साधना होती. बाह्य लक्ष्मीची त्यांनीं कधीं पर्वा केली नाहीं. त्यामुळें मराठ्यांचे राजे पेशवे, तसेंच जंजिऱ्याचे नबाबसुलतान त्यांच्या पायाशीं नम्र होण्यांत धन्यता मानीत असत. त्यांचें आंतरवैभव विश्वनाथाच्या रूपाशीं ते एकरूप झाल्यानें कोण मोजणार ? त्यांची अखंड अवस्था एकच होती आणि ती म्हणजे ‘ **झिलमिल झिलमिल बरसे नूरा, नूर–जहूर सदा भरपूरा, रुनझुन रुनझुन अनहद बाजे, भँवर गुंजार गगन चदि गाजै, रिमझिम रिमझिम बरसै मोती, भयो प्रकाश निरंतर ज्योती, निर्मल निर्मल निर्मल नामा, कह यारी यहँ लियो बिश्रामा** ’—तुकारामांच्या भाषेंत सांगायचं म्हणजे ‘ **रक्तश्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न, चिन्मय अंजन सूदले डोळा ।। तेणें अंजनगुणें दिव्य दृष्टी झाली, कल्पना निमाली द्वैताद्वैता। देशकाल वस्तुभेद मावळला, आत्मा निर्वाळला विश्वाकार** ’—किंवा ज्ञानोबा माउलीच्या भाषेंत—‘ **सुढाळ ढाळाचें मोती अष्टै अंगे लवे ज्योती, सुख सोज्वळ मोतियांचें लेणें, दिधले जाईजणें वाई येवो। देशी नाहीं, देशा उरी नाहीं, हाटणी नाहीं ते पाटणी नाहीं, लक्षाचेनि लाभे जोडले निधान, बाप रखूमादेवीवरू श्री विठ्ठल जाण** ’—अशी अखंड आनंदाची होती. बाबांच्या काळांत वावरणाऱ्या त्या भाग्यवान्

लोकांना त्याचे अनुभव आलेच. ज्यांना देहाची आसक्ती होती त्यांना तसलें अनुभव आलेच, पण जी सोलीसखानासारखी त्यांची लहानपणींच भक्त झालेली मंडळीं त्यांच्याजवळ आली, त्यांनाहि त्यांनीं एवढे अधिकारी बनविले कीं सोलिसखानानें त्यांच्या आधींच देह ठेऊन आपलें जीवन कृतार्थ केलें. बाबांनीं आपल्या आधीं शरीराचा हा पडदा झटकून टाकणाऱ्या आपल्या शिष्याचा आपल्यापेक्षांहि मान ठेवला, त्यांच्या वार्षिक उरसांत त्याचा मान पहिला असतो. '**फेडित पाप ताप बुडालीं काढित**' अशा वृत्तीचा हा महान् मुस्लीम संत मुस्लीम हिजरी सन १०९३ (इ. सन १६८१) शाबान ६ या दिवशीं समाधिस्त झाला. त्यांच्या समाधीचें (दरग्याचें) काम पुरें व्हायच्या दिवशीं उटंबऱ्याच्या कोळ्यांच्या जाळ्यांत एक आंब्याची कोय सांपडली. त्यांनीं दोन वेळां फेकून देऊनहि ती पुन्हा जाळ्यांत आली. त्यामुळें ती कोय फोडण्यांत आली. पहातात तो त्यांत भारी किंमतीची रेशमी गिलिप चादर निघाली. कोळ्यांनीं तडक आणून ती तेथल्या मुजावर पुजारीकडून बाबांच्या कबरीवर चढवली. त्याच दिवशीं दुपारीं एका केळीच्या पानावर तरंगत आलेले तांब्याचे पांच पंजे सांपडले. त्यांची झालेली स्थापना आजहि पहायला सांपडते. आजहि कांहीं वेळां, एका पांढऱ्याशुभ्र घोड्यावर बसून, शुभ्रधवल पायघोळ झब्बा घालून, हजरत सय्यद याकूब सरवरी, आपल्या आवडत्या केळशीच्या तपस्यास्थानीं आलेले लोकांना दिसतात व गांवावर असलेल्या त्यांच्या कृपादृष्टीचा लोकांना अभिमान वाटतो.

हरितप्रसन्न निसर्गकन्यांच्या रमणीय कंकणपरिघांत भक्तांना अभयदान देणारीं हीं दोन स्थानें पाहून मन प्रसन्न होतें. मनांतील मळमळ आपोआप गळून पडते व मनुष्य साऱ्या विश्वांत पसरलेल्या ईश्वरसुखाला सन्मुख होतो. या साऱ्या संसारांत सुप्त रूपांत असलेला नारायण कुठल्या रूपानें आपल्याकडे येईल याचा भरंवसा नसल्यानें तो प्रसन्न, निरागस अंतरानेंच त्याला सामोरा होतो. एका मुस्लीम साधु कवीनें सांगितलें आहे ना कीं, '**रहिमान यहीं संसारमें, सबसें मिलिये धाअि; ना जाने केहि रूपमें नारायण मिल जाअि।**' या संसारांत नारायण कुठल्या रूपांत मिळेल कुणी सांगावें? म्हणून तूं '**जें जें भेटे भूत, तें तें मानिजे भगवंत**' असें कर! ● ● ●

# तळवण्याचे भारती महाराज : २१

सुमारें साडेतीनशें वर्षांपूर्वी कदंब कुलाकडून विजापूरच्या बादशहानें घेतलेला सावंतवाडीचा हा प्रदेश, मुसलमानी धर्मवेड्यांकडून उध्वस्त झालेला होता. श्री भारतीमहाराज फिरत फिरत या प्रदेशांत आले. त्यांनीं जनसमुदायांत या धर्मवेडानें उत्पन्न झालेली चीड पाहिली होती. जवळपासची जनता संघटनेच्या अभावीं सामर्थ्य असूनहि निस्त्राण झाल्यागत होती. या मोकाट जनतेला एका प्रबळ संघटनेच्या सूत्रांत गुंफून तिच्या सुप्त सामर्थ्याचें तेज प्रगट करूं शकणारा, योजनाकुशल नेता हवा होता. वास्तविक '**ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या**' अनुभवणाऱ्या योगीराज भारतींना या उठाठेवीची गरज नव्हती. पण ज्या भारतीय संस्कारांनीं त्यांचें मन विशाल बनून विशाल विश्वरूपाशीं एकरूप झालेलें होतें, त्या भारतीय संस्कृतीलाच ज्यावेळीं आघात पोंचूं लागला, त्यावेळीं तिच्यावरच्या प्रेमानें ते चिंतामग्न झाले.

या साऱ्या निष्प्राण जनतेला ऊर्जस्वला, विजिगीषु, सहिष्णु पण अन्याय, जुलूम–जबरदस्तीविरुद्ध ठाम उभे राहूं शकणाऱ्या भारतीयत्वाचा साक्षात्कार करून देणें आवश्यक होतें. श्री परशुराम भारती या प्रेरणेनें लोकमानसांत मिसळून गेले. स्वतःच्या धार्मिक, पौराणिक, पवित्र स्थानांवर होणारे हे हल्ले, प्राण पणाला लावून परतवा, स्वतःचें जीवितवित्त, कुललज्जा यांचें रक्षण व्हावें असें वाटत असेल, तर प्रथम त्यागाला, आत्मसमर्पणाला तयार व्हा, त्यांतूनच तुमच्या भावी पिढीच्या कल्याण–मंदिराची मुहूर्तमेढ तुम्ही उभारूं शकाल, त्यांतूनच '**समानीव आकूतिः, समाना हृदयानिवः**' अशा

उज्ज्वल समाजाची घडण होईल, आजच्या बलिदानांतून, आजच्या भोग-त्यागांतून उद्यांचीं सुखस्वप्नें तुम्ही पाहूं शकाल, आजच्या विरागतेंतूनच उद्यां तुमच्या घरांत अनुरागाचें सुखसाम्राज्य नांदेल,' असा समाजाला उत्स्फूर्त करणारा संदेश देत हा योगीराज गांवागांवांतून हिंडे.

या कषायवस्त्रधारी, तेजःपुंज योग्याच्या मुखांतून स्रवणारी ती तेजाची गंगा पाहून, सारे लोक दिपून जात. त्यांचा आदरसत्कार करून स्वतःच्या मनाचें समाधान करीत. आजच्या या तमांतून ज्योतीकडे नेणारा पथ आपल्याला लवकरच सांपडेल, असा त्यांना विश्वास वाटूं लागे. ते निर्भय वृत्तीनें या योग्याचा जयजयकार करून आसमंत दुमदुमून टाकीत.

एके दिवशीं जनताजनार्दनाच्या कल्याणाचा विचार करीत भारती चालले होते. एका झाडाखालीं कसलेल्या शरीरयष्टीचा एक तेजःपुंज तरुण माणूस डोक्याखालीं हात ठेवून शांतपणें झोंपलेला त्यांना दिसला. त्याच्या डोक्यावर एक मोठ्या फडांचा नाग आपला फणा पसरून उभा असलेला त्यांना दिसला. ते विलक्षण दृश्य पाहून त्यांना फार आनंद झाला. ज्या तरुण पुढाऱ्याच्या, लढवय्याच्या शोधांत आपण व सारी जनता आहोंत, तो हाच, अशी त्यांची खात्री झाली. भारती महाराजांच्या चाहुलीनें तो नाग आपला फणा पूर्ववत करून शांतपणें जंगलांत शिरला. भारती महाराजांनीं त्या तरुणाला हांक मारली.

त्यांच्या हांकेनें जागा होऊन तरुणानें आजूबाजूला पाहिलें. एक काषायवस्त्र धारण केलेली तेजस्वी मूर्ति स्मित करीत उभी पाहून, तरुणानें त्यांच्या पायांवर डोकें ठेवलें भारतींचा 'राज्याधिकारी हो' अशा अर्थाचा आशीर्वाद ऐकून तरुणानें आपली दरिद्री अवस्था त्यांच्या कानांवर घातली. त्याचा बाप परकीय आक्रमणाच्या वेळीं समरांगणांत लढतांना धारातीर्थी पडला होता. घरदार सारें सोडून त्याची विधवा आई, त्याला लहान असल्यानें कटिखांद्यावर घेऊन या प्रदेशांत पळून आली होती. अत्यंत दरिद्री अवस्थेंत त्यांचा गुजारा कसातरी होत होता. भारतींनीं आपला शब्द खोटा होणार नाहीं, असें आश्वासन दिलें. त्या तरुणाला धीर दिला.

लवकरच लोकांची संघटना त्या तरुण माणसाच्या नेतृत्वानें उभी राहिली. जवळपासचे नवजवान मोठ्या हिरिरीनें त्या तरुण माणसाच्या—खेम

सावंताच्या–झेंड्याखालीं जमा झाले. भारतींच्या प्रोत्साहनानें युद्धकलेंत वाकबगार होणारें शिक्षण जवळपासच्या दऱ्याखोऱ्यांतून गुप्तपणानें देण्यांत आलें. लढाईचे डावपेंच, नवनव्या शस्त्रांचा वापर इत्यादि कामांत तरबेज झालेल्या त्या युवकांनीं सावंतवाडीच्या विजापुरी केंद्रावर हल्ला करून तिथली शस्त्रें, घोडीं इत्यादि काबीज केलीं. ठाण्याच्या मुख्यालाच ठार केलें. हळूं-हळूं संघटनेचा जोर वाढला. बांदा, आरोंदा, सावंतवाडी, कुडाळ भागांत या खेमसावंताचा अंमल बसला. थोड्याच दिवसांत आजच्या सावंतवाडीच्या गत राज्याचा पाया घालण्यांत आला. परकीय शत्रूंना नामोहरम करण्यांत आलें. सावंतवाडीकर भोसल्यांचें राज्य स्थापन झालें. जनतेवरचा जुलूम, अत्याचार बंद पडला. भारती महाराजांचा शब्द खरा झाला.

धर्मप्रेमी खेमसावंतवाडीकर भोसल्यांचें राज्य सुरू होतांच, त्यानें भारती-महाराजांना आपल्या राज्यांतच कायम निवासस्थान करण्याचा व आपलें राज्य न्यायानें, प्रेमानें चालेल अशा आशीर्वाद देण्याचा आग्रह चालविला. भारतीमहाराजांनीं तळवण्याचें हें निसर्गसुंदर स्थान त्याकरतां पसंत केलें. राजे खेमसावंत वारंवार त्यांच्या दर्शनाला येऊं लागले. भारतीमहाराज एक महान् सिद्धपुरुष असल्यानें त्यांच्याकडे लांबवरचे लोक स्वतःचें संसारदुःख दूर होण्याकरतां, भवताप निवारण्याकरतां व अध्यात्म मार्गांत स्वतःची प्रगति व्हावी म्हणून आशीर्वाद मागण्याकरतां येत व समाधान मिळवून परत जात. भारतींची वृत्ति येवढी निर्वैरपूर्ण व शुचित्वाची होती कीं, पक्षी निर्भयवृत्तीनें त्यांच्या अंगाखांद्यावर खेळत. वाघ, चित्ते, हरिणें इत्यादि वन्य पशू आपला जन्मजात वैरभाव विसरून त्यांच्याजवळ नांदत. एक वाघ तर त्यांचा इतका भक्त बनला कीं, भारतींच्या गुहेशेजारीं तो चोवीस तास, वर्षानुवर्षें आसन मांडून होता. त्या गुहेंतच पुढें त्यांच्या मृत्यूनंतर त्याची समाधि बांधण्यांत आली व त्याची अजून पूजा करतात व त्याच्या मृत्यू-दिनाचा लहानसा समारंभ करतात.

भारतीमहाराजांनीं यानंतरचा काल अखेरपर्यंत या स्थानींच घालविला. शांत चित्तानें सर्व अवस्थांमध्यें विश्वब्रह्माच्या प्रतीतीचाच प्रवाह आहे, म्हणून आसपासचें सारें सद्रूप ब्रह्मच आहे अशा अनुभवानें ते येथें राहिले. प्रत्यक्ष चंद्र पाहिल्यावर जशी चित्रांतल्या चंद्राची शोभा विशेष वाटत नाहीं,

त्याप्रमाणें असत् पदार्थांच्या अनुभवानें त्यांना थोडीहि तृप्ती अथवा दुःख शिल्लक उरलें नव्हतें. चहूंबाजूला आपणच आहों असें आपलें अद्वितीय रूप पहात, आत्मानंदाचा अनुभव घेत त्यांनीं आपलें ऊर्वरीत आयुष्य व्यतीत केलें. आत्मस्वरूप जाणून स्वानंदरसाचा अनुभव घेतल्यानें वासना-रहित मौनाचा आश्रय करून त्यांनीं महानंदाचा व अतीव सौख्याचा अनु-भव घेतला. ज्यावेळीं त्यांचा देह खूप जीर्ण झाला व आपलें अवतारकार्य आतां संपलें आहे, असें त्यांना वाटूं लागलें होतें, त्यावेळीं या स्थानाच्या मोहानें एक साधू त्या ठिकाणीं आला. भारतीमहाराजांनीं 'साधूला अमुक जागेचा लोभ नसावा' असें सांगितलें. त्यावेळीं योग्यानें 'ज्या राजानें तुम्हांला हें स्थान दिलें, तो आतां तुम्हांला भेटूं शकणार नाहीं' अशी क्रोधवाणी उच्चारली. भारतींना भविष्यकाळचें ज्ञान होतें. राजे खेमसावंत त्या दिवशीं भारतींच्या दर्शनाकरतां घोड्यावरून, ते ज्या ठिकाणीं होते तेथून निघाले होते. ओटवणें येथून श्री रवळनाथाचें दर्शन घेऊन, पुढें ते तळव-ण्याला येणार होते. पण अचानक तिथें त्यांना मृत्यूनें गांठलें. शेवटच्या क्षणीं भारतीमहाराजांनीं त्यांना दर्शन दिलें व मगच त्यांनीं आपला स्वतःचा देह तळवण्याच्या या रम्य स्थानीं येऊन ठेवला.

हरितरम्य गालीच्याच्या या विशाल दरींत श्री भारतीमहाराजांचे सुडौल सुंदर समाधी–मंदिर मोठें खुलून दिसते व माणूस सहजच उद्गारतो कीं—

'वेदांत-वाक्येषु सदा रमन्तः, भिक्षान्नमात्रेण च तुष्टिमन्तः।
विशोकमंतःकरणे रमन्तः, कौपिनवन्तः खलु भाग्यवन्तः ॥'

• • •

# भीम्या मांग : २२

भीम्या मांगाचें नांव ऐकून सारा कोंकणप्रांत थरथरा कांपत असे. मर्दांच्या तरवारी भीतीनें गळून पडत, तर गर्भिणींचे गर्भपात आपोआप होत. भीम्याचें नांव ऐकतांच मोठमोठ्या सावकारांच्या तिजोऱ्या भीतीनें दडी घेत, तर सावकार अफू खाऊन जीव देत. भीम्याचा दराराच तसा होता. त्याच्या मनगटाकडे पाहूनच पहारीसारख्या जाड गजांचीं कडीं होऊन त्याच्यापुढें पडत. त्याच्या पायांचा दणका नि छातीची धडक दंडासारख्या जाड फळ्यांच्या दारांच्या चिरफळ्या करी. भीम्या ज्या दरवडेखोर मांगांच्या टोळीचा म्होरक्या होता तिथेंसुद्धां सारे त्याला थरथर कांपत. भीम्याच्या तोंडांतून बाहेर पडणारा शब्द म्हणजे त्या टोळीचा अटळ कायदा होता; तो पाळण्यांत झालेली कसूर म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूला आमंत्रण! मग तिथें दयामया या शब्दांची ओळखसुद्धां होऊं नये. त्याच्या थोड्याशाहि अवज्ञेचें फळ म्हणजे मृत्युदंडच.

एका वर्षाच्या दरोड्यांतली हकीगत तर साऱ्या टोळीच्या हृदयांत खोल खोल जाऊन बसली होती. भीम्याबरोबर सारे काव फासलेले मांग एका सावकाराच्या घरावर तुटून पडले. अमावास्येची रात्र. डोळ्यांत बोट घातलें तर कळूं नये असा अंधार. भीम्याच्या साथीदारांनीं पेटवलेल्या मशालींच्या अंधुक प्रकाशांत एकेकाचे क्रूर चेहरे पाहूनच यमदूतांचा भास व्हावा. सावकारानें आपल्या नोकरांकरवीं बंदूक झाडून टोळीचे एक-दोन जवान ठार केले. भीम्याच्या लाल लाल डोळ्यांतून क्रोधाचा अंगार बाहेर पडूं लागला.

त्याचा क्रोध सळसळत होता. सावकाराच्या घरादाराची राखरांगोळी कर-ण्याचा—सारीं बायका, मुलें, माणसें ठार करण्याचा—भीम्यानें हुकूम दिला. सारे यमदूत तुटून पडले. घरांतलें एकूण एक माणूस बळी पडलें. पण एक लहान पोर भीम्याच्या साथीदाराच्या गळ्यांत येऊन पडलें. इतक्या भयंकर केविलवाणें तें रडत होतें कीं, त्या मांगहृदयाला पाझर फुटला. त्याची फरशी (परशु) खालीं आली. भीम्यानें तें पाहिलें. त्याचा क्रोध उसळला. लाल डोळ्यांनीं पहात तो साथीदारावर धांवला. डोळ्याचें पातें लवण्याच्या आंत कडेवरच्या मुलासह साथीदाराचे दोन तुकडे भीम्याच्या परशूनें (फरशीनें) केले होते. सारी टोळी भयचकित मुद्रेनें तो प्रकार पाहत होती, पण भीम्या अचल होता. कांहीं झालेंच नाहीं अशा सहजतेनें पुन्हा तो लुटालुटीच्या मागें लागला. एक जवान गेला, पण साऱ्या टोळीची शिस्त, सर्वजण थरकांप होऊन गेल्यानें, मांगांनीं कायम ठेवली.

भीम्या जसा क्रूर व शूर तसाच दिलदार नि जिवाला जीव देणारा होता. टोळीचीं जखमी माणसें त्यानें कधींच मागें ठेवलीं नाहींत. पकडलें जाण्याचा—मरण्याचा संभव असूनदेखील तो गोळ्यांच्या वर्षावांत निधड्या छातीनें पुढें होऊन आपल्या जखमी साथीदारांना बरोबर आणीत असे. त्यांची आईच्या मायेनें सेवा करी, त्यांच्याकरतां खंडोबाला-बहिरोबाला पैशाकडे न पाहतां मोठमोठाले नवस करी. त्यांच्या दुखण्याबाण्यांत त्याचा जीव उडून जाई. एखाद्या लहान मुलासारखा तो त्यांच्याकरतां रडे. टोळीचीं माणसें म्हणजे त्याचा जीव कीं प्राण होतीं. आईच्या मायेनें तो त्यांचें सारें करी.

भिम्या एखाद्या दरवड्यानंतर परत फिरला म्हणजे त्यांत शौर्य गाजवि-लेल्यांना मोठमोठीं बक्षिसें देई. स्वतःच्या गळ्यांतले कंठेसुद्धां तो कैक वेळां दोस्तांना खैरात करून चुकला होता. अशा वेळीं मग ५-२५ बोकड कापले जात. दारूच्या बाटल्या डझनावारी खलास होत. सारे बेहोष होऊन भीम्याच्या दिलदार—स्वभावाचा—फायदा घेत. कंजूषपणा हा शब्द भीम्याला ठाऊक नव्हता. सारी पृथ्वी जर त्याच्या ताब्यांत असती तर तीसुद्धां आपण अशा वेळीं खैरात करून टाकली असती असें भीम्या बोलून दाखवी. भीम्या जसा आडदांड होता, तसाच हळुवार मनाचा होता. एखाद्याकडे त्यानें भाकरी खाल्ली—मीठ खाल्लें तर त्या मिठाला तो जन्मभर जागल्याशिवाय रहात

नसे. अशा माणसाच्या केसाला तो धक्का लावीत नसे. मेलेलें माणूस असेल अशा घरांत तो शिरत नसे. भीम्या त्याच्या टोळीच्या मतानें फार धर्मशील होता, नीतिमान् होता. खंडोबा-बहिरोबाची यात्रा तो कधीं चुकवीत नसे. दर अमावास्येला मरीआईचा बोकडहि तो न चुकतां बळी देई.

इंग्रज सरकारच्या राज्याचीं मुळें त्यावेळीं फारशी खोल गेलेलीं नव्हतीं. भीम्याच्या मागावर माणसें पाठवायला त्या वेळीं जिल्ह्याच्या अधिकाऱ्याला फार कठीण जाई. आजच्यासारख्या फर्फर् करीत मोटारी उडवायला त्या वेळीं कोंकणांत धड रस्तेहि नव्हते व मोटारीहि नव्हत्या. त्यामुळें भीम्यासारख्या पुंडांचें नि पेंढाऱ्यांचें चांगलें फावत असे. सरकारी पोलीस येण्याच्या आंत भीम्या कुठें पसार होईल याचा भरंवसा नसे. वाहतुकीचीं साधनें नसल्यामुळें व ऐषआरामी संवयींमुळें पोलिसांना इकडे तिकडे फिरणें जड जाई. पण भीम्याचं टोळकं म्हणजे कष्टाला सरावलेल्या राकट मांगांचें ! दिवसादिवसाला ते स्थलांतर करीत. कधीं कुलाबा तर कधीं रत्नागिरी असा भीम्याच्या टोळक्याचा अनिरुद्ध संचार असे. लोकांमध्यें त्याच्याविषयीं इतक्या दंतकथा प्रचलित असत कीं, त्याचा खरा पत्ता नि ठिकाणा मिळणें अशक्य होई. भीम्या आपल्या दरवड्याची अगोदर नोटीससुद्धां लावीत असे. येवढं करूनहि त्याला होणारा सर्व विरोध तो आपल्या डावपेंचांनीं पुरा मोडून काढी.

त्या वेळीं कोंकणांत आमच्या वाडवडिलांचें घरदार नि मोठी शेती होती. आमचीं व्यापारी जहाजें मुंबई, मुरूड, मंगळूर यांच्यावरून पार सिलोनपर्यंत जात आणि वाल, नारळ, तांदूळ, कापड इत्यादींचा प्रचंड प्रमाणावर व्यापार करीत. आमच्या घरची सावकारीहि होती. त्यामुळें आमचें घराणें उभ्या कोंकणांत श्रीमंत म्हणून प्रसिद्ध होतें. त्यामुळें आमच्या घराण्याकडे भीम्याचें लक्ष जाणें सहाजिकच होतें. आमच्या आजोबांच्या मनांत ही धास्ती नेहमीं असे. पण येवढें सारें घरदार नि चांगला चालता व्यापार सोडून जाणार कुठें ? त्यामुळें नाइलाजानें नि पैशाच्या लोभानें ते तसेच गांवाला चिकटून होतें. त्यांनीं एक-दोन बंदुका ठेवल्या होत्या, पण ह्या दोन बंदुका म्हणजे केवळ स्वतःचें समाधान होतें, कारण, भीम्याच्या प्रचंड नि क्रूर टोळक्यापुढें त्यांचा निभाव लागणें अशक्य होतें.

पण अखेर भीम्याची नजर आमच्या घराकडे वळलीच. आपण उद्यां रात्रीं दरवडा घालणार म्हणून त्याचा निरोप आला. घरांत जिकडे तिकडे गोंधळ नि रडारड सुरू झाली. जिल्ह्याला खबर पाठवली. पण तिथले पोलीस आधींच कुठें रवाना झालेले होते. त्यामुळें तिथें गेलेला माणूस हात हालवीत परत आला.

आजोबांनीं गांवच्या लोकांना विचारून पाहिलें. पण तें सारें व्यर्थ होतें. आमच्या घराण्यानें गरिबांची शेतीवाडी सावकारशाही गाजवून गिळंकृत करून त्यांना देशोधडीला लावलें होतें. इतके दिवस पैशाच्या नि चलतीच्या जोरावर साऱ्यांना नमून रहावें लागे. पण आज खुद्द सावकारच अडचणींत होता. साऱ्यांना मनांतून आनंद होत होता. निर्बलांचा आनंदाचा दिवस तोच! सबलांचा ते स्वतः प्रतिकार करूं शकत नाहींत, त्यामुळें परस्पर त्यांचा कांटा निघाला तर त्यांना हवाच असतो. माझ्या आजोबांच्या विनवण्या फुकट गेल्या. भीम्याला तोंड देण्याची कुणाची छाती नव्हती; शिवाय निर्दय सावकाराकरता आपला जीव नि घरदार गमावण्यास कुणीच तयार नव्हतें.

शेवटीं दरवड्याचा दिवस उगवला. आमचे आजोबा प्रयत्न करून निराश झाले होते. काय होईल तें पहावें म्हणून सारे स्वस्थ झाले. आजी देवापुढें दोन दिवस अनुष्ठान मांडून बसली होती. सारे तिच्याभोंवतीं जमा झाले व रडूं लागले. सर्वांना आज रात्रीं काय होईल, कोण कोण माणसें मरतील, याची घोर चिंता लागली होती. शेवटीं आजी उठली, तिनें घराचे सारे दरवाजे बंद केले. विश्वासांतली माणसें घरांत ठेवलीं.

आजीनें घरांतले सारे मौल्यवान् दागिने, सोन्या–चांदीचीं भांडीं, महत्त्वाचे कागदपत्र, पैसाअडका गोळा करून एका ठिकाणीं त्यांचा ढीग केला. सारे जण विस्मयानें तिच्याकडे पहात राहिले.

आजीनें पदर खोंवला व ती दागिन्यांच्या ढिगाजवळ आली. ती पटपट दागिने व भांडीं तिथें रचूं लागली. हळुंहळूं एका झोंपलेल्या माणसाचा आकार तयार होऊं लागला. चांदीची कळशी डोक्याच्या ठिकाणीं आली. इतर सामानाचें बाकीचें शरीर बनलें. त्यावर भराभर शाली, शालू, भरजरी पैठण्या पांघरल्या गेल्या, वरतीं एक पांढरें स्वच्छ धोतर घातलें गेलें. एका

मृत शरिराचा शेवटचा देखावा तयार झाला होता. कुणालाहि पाहतांच वाटलें असतें कीं, मेलेला मनुष्यच झांकून ठेवला आहे.

सारे जण भयचकित होऊन पहात होते. दुपार टळून गेली होती. आजीनें आजोबांना तांदुळाच्या कणगींत लपून राहण्यास सांगितलें. ते जेवून खाऊन कणगींत जाऊन बसले. त्यांच्या अंगावर गवताचा चारा श्वासोच्छ्वास करतां येईल अशा बेतानें रचण्यांत आला. एवढें होतांच आजीनें शिरा नि भाजी तयार करण्यास घरच्या लोकांस सांगितलें. ६०–७० माणसांना पुरेल येवढा प्रसाद तयार करण्यांत आला. तो नीट झांकून ठेवला गेला.

आजीनें साऱ्या लोकांना बोलावलें. सारे त्या दागिन्यांच्या तयार केलेल्या मृत शरिरापाशीं जमा झाले. आजीनें आपली कल्पना त्यांना समजावून सांगितली.

थोड्याच वेळांत गांवांत बोंब झाली कीं, भीम्याच्या धास्तीनें सावकारांची हृदयक्रिया बंद पडून ते वारले. जो तो आमच्या घराकडे धांवत होता. आजीनें मळवट फांसलेला होता. अंगावर सौभाग्य–लेणीं घातलीं होतीं. आज ती सती जाणार म्हणून लोक भक्तिभावानें येऊन पाया पडत होते. सारे तिच्या पतिनिष्ठेची तारीफ करीत होते. आजी आजोबांच्या धोतर पांघरलेल्या कलेवराजवळ बसून धाय मोकलून रडत होती. सारे आप्तजन भोंवतालीं बसून रडत होते. घरावर जिकडे तिकडे उदासीनता पसरलेली होती. सारा गांव सावकाराच्या घरावर आलेल्या नि येण्याऱ्या संकटाची चर्चा करीत होता !

अखेर भीम्याच्या टोळक्याच्या तुताऱ्यांचे आवाज जवळ जवळ येऊं लागले. गांवकरी पुढें काय होणार ह्या काळजींत चूर होऊन घरोघर परतूं लागले.

भीम्याचें टोळकें आरडाओरड करीत आमच्या घरापुढें जमा झालें. त्याला सावकाराच्या मरणाची बातमी सांगण्यांत आली. भीम्याला भयंकर त्वेष आला, पण करतो काय ? त्याचा 'धरम्' आडवा आला. मेलेल्या माणसाच्या घरावर दरवडा घालणें त्याच्या नीतीच्या विरुद्ध होतें. तो एकटाच घरांत घुसला. धोतराखालीं झांकलेल्या प्रेताजवळ मळवट भरून सती

जायला सिद्ध झालेली आमची आजी त्यानें बघितली. त्याला खात्री पटली. जायच्या आधीं सतीच्या पाया पडण्याकरतां तो पुढें झाला. त्यानें वांकून नमस्कार केला व तडक परत फिरण्याकरतां त्यानें पाठ वळविली. पण आजीनें त्याला हुकूमच फर्मावला, " भीम्या ! जरा थांब. सतीचा प्रसाद घेतल्याशिवाय जाऊं नकोस. " भीम्याच्या कपाळावर आठी चढली. एक पाऊल त्यानें परत जाण्याकरतां उचललेंसुद्धां, पण पुन्हा त्याचा बेत फिरला. एका तळहातावर दुसरा तळहात पसरून तो तीर्थ नि प्रसाद घेण्याकरतां वळला. प्रसाद तोंडांत टाकून तो तडक बाहेर आला. साऱ्या मांगांना सतीचा प्रसाद देण्यांत आला. येवढ्या आशेनें आलेले सारे मांग नुसत्या सतीच्या प्रसादावर संतुष्ट होऊनच घरीं गेले !

भीम्याला ५–७ दिवसांनंतर खरा प्रकार कळला. त्या वेळीं तो भयंकर संतापला. पण करतो काय ! सावकाराचें अन्न त्यानें प्रसाद म्हणून कां होईना खाल्लें होतें. निमकहलाल रहाणें हें त्याचें आतां कर्तव्य ठरत होतें. सावकारावर नि त्याच्या चतुर बायकोवर चरफडत बसणें त्याला भाग होतें.

आमच्या आजोबांनीं कृतज्ञता म्हणून भीम्याला घरीं सन्मानानें बोलावलें. साऱ्या मांगांना यथेच्छ दारूमांसाचें जेवण घातलें नि चांगलीं चांगलीं बक्षिसें दिलीं. तेव्हांपासून भीम्या आमच्या घराण्याचा एक हितचिंतक बनला. दरवर्षीं आमच्या चतुर आजीच्या दर्शनाला तो येई नि एखाद्या आज्ञाधारक पोराप्रमाणें तिच्याशीं गोष्टी करी, आणि पाहुणचार घेऊन नि पायां पडून परत जाई.

त्या गोष्टीला आज खूपखूप वर्षें झालीं. तो भीम्या मांग, आमची आजी नि आजोबा ह्यांपैकीं कांहींच तुम्हांला आमच्या गांवीं दिसणार नाहीं. आमच्या घराण्याचा तो पैसा, मानमरातब नि वैभव आज नांवालासुद्धां उरलें नाहीं. पण आजहि तुम्ही तिथें जाल तर आमच्या आजी–आजोबांच्या बुद्धिवैभवाचे पोवाडे गाणारे त्यांचे दरिद्री वंशज, आपल्या कुळाचा हा प्रचंड ठेवा तुम्हांला प्रेमानें नि अभिमानानें वर्णन करतांना आढळतील.

• • •

# अंतरींचा ज्ञानदिवा मालवूं नको रे ! : २३

माझं भावजीवन ज्यांनीं घडवलं, त्यांत माझ्या आईचा व मामांचा फार मोठा हिस्सा आहे. आईच्या भावनिर्भर गोड गळ्यांतून ऐकलेला द्रौपदीचा धावा अजूनहि ज्या ज्या वेळीं मी एकटा, एकांतांत, रम्य नदीतीरीं, सागराच्या सान्निध्यांत, काळोखांतून चमचमणाऱ्या निरभ्र आकाशाखालीं झोंपतो, त्या त्या वेळीं मला ऐकूं येऊन मी देहभान विसरतों. ज्यावेळीं मी एखाद्या मनोहारी, भव्य पर्वताच्या कुशींत, एकटाच, एकांतांत असतो, जवळपास पक्ष्यांच्या कूजनाचे आलाप माझ्या कानांवर येत असतात, त्यावेळीं मामांच्या गोड सुरेल आवाजांत लहानपणीं ऐकलेले सोहिरोबानाथ अंबिये यांचें '**अंतरींचा ज्ञानदिवा मालवूं नको रे**' म्हणून आर्त हांक देणारें भजन माझ्या कानांत घुमूं लागतें व मंत्रमुग्ध होऊन ते अंतरीचे बोल ऐकून मी तन्मय होतों. लहानपणीं हें भजन रचणारा हा महान् साधुकवि आपला कुणीतरी जवळचा जिवलग सोयरा असावा असें मला वाटत असें. त्याचें दर्शन घ्यावें, त्याच्या इतर भजनांचा आस्वाद चाखावा अशी विलक्षण ओढ त्यावेळींच मनाला लागली होती. पण सोहिरोबांची जातकुळी, त्यांचा गांव या कशाचाच मला पत्ता नव्हता. पण या महान् साधुकवीच्या गांवीं आपण जावें, त्याचे पवित्र श्वास–उच्छ्वास ज्या वातावरणांत उमटले, तिथें आपणहि आपल्या मनांतल्या मनोमलाचे उच्छ्वास बाहेर हांकलून, त्याच्या पावित्र्याचे, त्याच्या काव्याचें श्वास अंतरीं रिचवून

आपलं हृदय पुष्ट, निर्मल, निरोगी करावं अशी आंस मनाला लागली होती. त्यामुळें रत्नागिरीला आल्यावर, सोहिरोबांचें बांदा गांव सावंतवाडी-जवळच सात-आठ मैलांवर आहे हें ऐकलें, त्यावेळींच मनानें तेथें जाण्याचा संकल्प केला व तिथेंच काम निघाल्यानें तो पुरा झाला.

महाराष्ट्राचें काश्मीर हें सार्थ नांव ज्या गोमंतकाला आहे, त्याच्या मांडीला मांडी लावूनच बांदा गांव वसला आहे. सावंतवाडीहून ज्यावेळीं एस. टी. गाडी बांद्याकडे वळते, त्यावेळीं तिथल्या वनश्रीनें माणूस मंत्रमुग्ध होतो. उंचच उंच वाढून, गर्दशीतल छाया करीत, सागरी हवेनें डोलणारे, नारळ सुपारीनें लहडलेले माडपोफळीचे प्रचंड वृक्ष, त्यांना वेढणाऱ्या हरित-श्याम लतापल्लवांची दाट झाडी नि आजूबाजूला हिरव्या मखमलीच्या शाली पांघरून बसलेले सुबक आकाराचे डोंगर नि हिरव्या पाचूच्या पाण्यानं खळाळणाऱ्या विस्तीर्ण दऱ्या पाहून हें सारे कौशल्य प्रकट करणाऱ्या कुशल हाताबद्दल कृतज्ञता वाटते. इथला सारा निसर्ग मोठ्या कलाकुशलतेनें, मृदु-तम हातानें निर्माण केलेला आहे. इथले लोकहि त्याच कुशल हातानें घडव-लेले असल्यानें त्यांच्यांतहि निसर्गाचा हा गुण पूर्णपणें उतरला आहे. गौर-गोंडस चेहऱ्याचे, चलाख मुद्रेचे, नि बुद्धीची तीव्रता पटवणाऱ्या फटकळ जिभेचे, इथले सारस्वत आपलें लक्ष वेधून घेतात, तर नीटस, स्वच्छ कपड्यांच्या, मोहक चेहऱ्याच्या, गोड गळ्याच्या, इथल्या सरस्वती-कन्या आपलें सरस्वतीशीं असलेलें नातें उघड करतात. इथले लोक मोठ्या कला-सक्त हृदयाचे. स्वतःचें जीवन कलापूर्ण करण्यांत त्यांची सारी रसिकता प्रकट होते. सभोंवतीं पसरलेल्या रम्य निसर्गानें त्यांना सारें जीवन आनंद-पूर्ण करण्याची जणुं अखंड प्रेरणाच मिळते.

पण या विलासी व कलापूर्ण जीवनालाहि माणूस कंटाळतो. त्याच्या अंतरात्म्याची हांक त्याला अस्वस्थ करते. "हे सारे विलास-भोग सोड. या बाह्य सौंदर्याची आसक्ति कमी करून, आंत तडफडणाऱ्या आत्मपंछीला या देहाच्या क्षुद्र पिंजऱ्यांतून मोकळा कर. उडूं दे त्याला या विशाल विश्वाकाशांत. मारूं दे त्याला या अनंतांत विशाल भरारी. तुझें मानस येवढें विशाल कर कीं, '**घेई आपोशान ब्रह्मांडाचें**' अशी त्याची स्थिति होईल." म्हणून त्याचा अंतरात्मा तडफडूं लागतो. सुखासीन, वैभवाच्या जीवनालाहि

तो कंटाळतो. असाच आपल्या आत्मारामाची आर्त हांक ऐकून तडफडणारा एक महान् साधुकवि या बांद्यांत शके १६३६ मध्यें जन्माला आला व त्यानें अनेकांचे मालवणारे ज्ञानदिवे प्रज्वलित केले व आजहि तो ते करीत आहे.

विजापूरच्या आदीलशाहीच्या वेळची भव्य घुमटाची मशीद, प्रेक्षणीय कबरी, यांचा ठसा ठेवून पण एदिलाबाद हें आपलें नांव पुसून, बांदा आपलें पूर्वीचें नांव धारण करून, सावंतवाडीच्या भोसल्यांच्या पराक्रमी राज्यांत सामील झालें होतें. पण वाडीच्या राजे खेम सावंतांनंतर त्यांचा औरसपुत्र फार लहान असल्यानें त्याचा चुलता सोम सावंत याच्याकडे सारा अधिकार व सत्ता गेली. हा सोम सावंत अत्यंत दुष्ट, प्रजेस हैराण करणारा, मद्यपी व छंदीफंदी होता. लोकांकडून पैसे काढण्याकरितां तो त्यांना अतिशय छळीत असे. मारहाण, खून असले प्रकार राजरोस होऊं लागले. कुलकर्ण्यांच्या पोटावर धोंडे ठेवून तो त्यांना गरीबांना नाडून पैसे उकळण्यास भाग पाडीत असे. सोहिरोबांची कुळकर्णीपणाची वतनदारी मागच्या राजवटींत वीस वर्षे झालीं होतीं. पूर्वीच्या समतोल न्यायी राजवटीनें त्यांच्या सरळ, निष्कलंक व लांचखोरीपासून अलिप्त असलेल्या वृत्तीचें कौतुक केलें होतें. पण सोम सावंताला त्याचें काय? सोहिरोबांच्या भक्तिभावानें, ऋजुतेनें, प्रामाणिकपणानें खूष होण्याऐवजीं तो त्यांच्यावरच खवळला. लोकांचे खिसे कापून, त्यांना नाडून, छळून, पैसे उकळून स्वतःचा बंदोबस्त न करणारा हा इमानी सरकारी नोकर त्याच्या डोळ्यांत सलूं लागला. स्वतःच्या पाशवी वासना तृप्त न करणारा, स्वतःच्या खिशांत सोन्याचे चार तुकडे अधिक यावे याकरतां मदत न करणारा हा बेमुर्वतखोर नोकर पाहून त्या दोन पायाच्या, उच्चपदस्थ पशूचें पित्त खवळलें. "तूं येवढा देशभक्त, प्रामाणिक आहेस तर तो तुझा देव मला दाखव, नाहींतर तुला ठार करतों, तुझा जीवच घेतो" म्हणून तो शांत वृत्तीच्या सोहिरोबांना धमकावूं लागला. त्यांच्या विनवण्यांकडे त्यानें दुर्लक्ष केलें. उन्मत्त जंगली पशूंना त्या गरीब नोकराची दया कुठून येणार? तो त्यांच्या मागें हात धुवून लागला. त्यांची गयावया, त्यांची स्वतःला न छळण्याची विनंति फुकट गेली. सोमसावंताचा राग अधिकच भडकला. तो त्यांना जीव घेण्याच्या धमक्या अधिकच जोरांत देऊं लागला. सोहिरोबांचा जीव व्याकुळ झाला. या नराधमाची विनवणी करण्या-

पेक्षां त्या सर्वांतर्यामी दयाघन प्रभूलाच शरण गेलेलें बरें हें त्यांना पटलें. ते आर्त हृदयानें त्याचा धांवा करूं लागले. प्रभूनें सोहिरोबांच्या विशाल नेत्रांतून सोम सावंताला आपलें तेजोरूप दाखवलें. त्या ज्वालेनें सोमसावंताचे डोळे दिपले. तो भिऊन गेला. सोहिरोबा त्याला शांतपणें म्हणाले, " आज तूं माझ्या दयामय प्रभूच्या सहनशक्तीचा अंत पाहिलास. त्याला तुझ्या राक्षसी वृत्तीनें आज माझ्या डोळ्यांतून आपला कोप प्रगट करावा लागला. पण लक्षांत ठेव, प्रभूच्या कोपाची ही ज्वाला लवकरच अनर्थ करील. " लवकरच सोम सावंतानें दारूनें धुंद होऊन, दारूच्या पिंपावर बसून, त्यालाच आग लावली व त्यांतच जळून तो खाक झाला.

पण या प्रकारानें सोहिरोबा नोकरीला विटले. ज्या नोकरींत प्रामाणिकपणानें, न्यायानें, सरळपणानें सरकारी कामच करतां येत नाहीं, प्रभूची सेवा नीट करतां येत नाहीं ती नोकरीच नको, या निर्णयावर ते आले. त्यांनीं नोकरी सोडली व प्रभूचा अखंडजप करीत ते रानावनांत फिरूं लागले. तिथल्या निर्मळ निर्झरांशी प्रभूच्या प्रेमाच्या गुजगोष्टी ते करूं लागले. त्यांचें शरीर या बदलानें कृश झालें. अंगाचीं हाडें वर दिसूं लागलीं. पण अंतरात्मा पुष्ट होऊं लागला. भक्तिभाव, वैराग्य पुष्ट झालें. एकदां जंगलांत असेच हरिनाम घेत असतां, रसाळ गऱ्यांचा एक मोठा फणस त्यांना मिळाला. तो कापून, त्याचे गरे खाण्याच्या बेतांत ते असतां " बाबू हमको कुछ दे " म्हणून एक धीरगंभीर वाणी ऐकू आली. मागें वळून पहातात, तों एक भव्य जटा–दाढी असलेली एक सिद्धमूर्ति स्मित करीत उभी ! सोहिरोबांनीं त्या सिद्धमूर्तीला साष्टांग प्रणिपात केला व साऱ्या गऱ्यांचाच नैवेद्य त्यांना अर्पण केला. त्या सिद्धपुरुषानें सारे गरे खाऊन तृप्तीची ढेकर देत प्रसाद म्हणून त्यांतले चारच गरे सोहिरोबांना दिले. ते खातांच त्यांच्या साऱ्या वृत्तींत पालट झाला. नवनाथांतलें एक रत्न, आदिनाथ, मत्स्येंद्रनाथ या गुरुपरंपरेतले एक थोर अधिकारी म्हणून ज्यांचा सार्थ लौकिक साऱ्या भारतभर होता, ते सद्गुरु श्री गैबीनाथ हे परमभाग्यानें सोहिरोबांना गुरु म्हणून लाभले होते. त्यांचा उपदेश ग्रहण करतांच सोहिरोबांच्या साऱ्या वृत्तींत पालट होऊन त्यांना अवघें जग हरीरूप दिसूं लागलें. सर्वत्र परमसमर्थ सद्गुरुरूप भरलें आहे असा त्यांना अनुभव येऊन ' **गैबी प्रसादे गैबीच**

**झालों** ' असे, जीवन कृतार्थ झाल्याचे उद्गार अंतःस्फूर्तीनें त्यांनीं काढले. सद्गुरूंनीं कृपाप्रसाद दिल्यानंतर त्यांनीं आपले सारसर्वस्व अखंड योगसाधना व भक्ति यांतच समर्पण केलें. वनांत त्यांना सारे हरीमय झाले होते. पहावें तिकडे हरीच नटलेला त्यांना दिसे. सारा प्रपंचच हरीरूप झाल्यानें आनंदून ते म्हणतात, ' **लय हा भगवंती जाय, मग हा प्रपंच तरी काय। हरिभेटीसाठीं साधन आटाटी, तो मज शेवटीं आंतुडला ॥** ' या महालाभानें त्यांचें सारें जीवन उजळून गेलें. सर्वत्र आनंदाचेंच साम्राज्य पसरलें असल्याचा त्यांना अनुभव आल्यानें ते म्हणतात, ' **आनंदाचें जळें भरियेले डोळे, चैतन्य सोहळे भोगियेले। सोहिरा म्हणे दुजें, कांहींच नसावें, होऊनि असावें देवरूप ॥** '

या नंतर सोहिरोबांनीं भारतभर तीर्थयात्रा करीत, एकरस ब्रह्माचा सर्वगामी अनुभव घेत फिरण्याचें ठरवलें. पण निघण्याच्या दिवशींच त्यांची विधवा सून, आपल्या आसन्नमरण एकुलत्या एक चिरंजीवाला वांचवा म्हणून त्यांच्या पायावर पडली. सोहिरोबांच्या अमृतदृष्टीनें तो बरा झाला व सोहिरोबा तसेच उत्तरेकडे निघाले. यावेळीं त्यांच्या बरोबर त्यांची एक जन्मभर कुवांर राहिलेली भगिनीहि निघाली. यावेळीं सोहिरोबांच्या काव्याला बहर आला होता. काव्यानंद व ब्रह्मानंद दुथडी भरून वाहूं देणारें काव्य ते निर्माण करीत होते. वर्डस्वर्थच्या डोरोथी या बहिणीप्रमाणे या सरस्वतीकन्येनें अविवाहित राहून आपल्या भावाचें अक्षरवाङ्मय लिपीबद्ध करण्याचें काम मोठ्या निष्ठेनें, प्रेमानें जन्मभर केलें. भावाच्या या सत्संगतीचा येवढा परिणाम तिच्यावर झाला कीं, तीहि स्वतः अध्यात्मपर काव्य करूं लागली. सोहिरोबांच्या ब्रह्मानंद प्रकट करणाऱ्या काव्याची कीर्ति सर्वदूर पसरली. हजारों, लाखों भारतभरचे लोक त्यांच्या दर्शनानें पावन होण्याकरतां त्यांच्याकडे येऊं लागले. त्यांचा कीर्ति–सुगंध साऱ्या भारतभर पसरला. फिरत फिरत ते ग्वाल्हेरला आले.

बांद्याचे मूळ रहिवासी व महादजी शिंद्यांचे एकनिष्ठ सेनापती जिवबादादा बक्षी, सोहिरोबांचें ज्ञान, वैराग्य, भक्ति, योगांतले नैपुण्य व त्यांची प्रसादपूर्ण वाणी पाहून त्यांचे एकनिष्ठ भक्त बनले व त्यांच्या दर्शनाकरतां रोज येऊं लागले. त्यांची ब्रह्मानंद व काव्यानंद प्रसवणारी प्रसादवाणी आपल्या

धन्याला ऐकवून त्याचें जीवन धन्य करावें अशीं जिवबादादांना उत्कट इच्छा झाली. सोहिरोबांची अमृतवाणी ऐकून महादजी आपलें जीवन धन्य मानतील, या महान् साधुकवीचा सन्मान करून आपलाहि मान वाढवितील ही त्यांची कल्पना. त्यामुळें महादजींची संमती घेऊन सोहिरोबांना त्यांनीं दरबारीं येण्याचें आमंत्रण दिलें.

पण सत्ता आणि संपत्तिचा असा विलक्षण गुण आहे कीं, ती ज्याच्यावर कृपा करते, त्याची विवेकबुद्धीच आधीं नष्ट करते. या दोहोंची कृपा असूनहि विवेक राखूं शकणारा लक्षावधींत एखादाच. महादजी हा सर्वसत्ताधीश, मराठी राज्याचा एक मोठा आधारस्तंभ, इंग्रजाची हड्डी नरम करणारा, दिल्लीचें तख्त आपल्या बळानें गदगदा हलवणारा महापराक्रमी सेनापती. त्याच्यावर या दोन्हींचीं कृपा. त्यामुळें त्याचाहि विवेक सुटला, अहंकार तीव्र बनला.

एखाद्या न्हाव्यानें आपल्याला वैद्यकी, अर्थशास्त्र, सुतारकाम, लोहारकाम व काव्यरचना येते, असें सांगितलें तर आम्ही त्याच्या मूर्खपणाला हंसूं. पण सत्तासंपत्तीनें पागल बनलेलीं माणसें त्यांच्या अंगीं "सर्वे गुणाः" चिकटवणाऱ्या तोंडपुज्यांकडून स्वतःच्या स्वार्थाकरितां फसवलीं जातात, त्यांचा विवेक नष्ट होतो, त्यावेळीं त्यांना या मूर्खपणापासून वांचवणारे जगांत कोणी सहसा आढळत नाहीं. त्यामुळें मोठ्या आग्रहानें दरबारांत जाऊन सोहिरोबा बसले तेव्हां महादजीनें आपल्या र ट फ कविता त्यांना म्हणून दाखवल्या. सोहिरोबांसारखा महान् संतकवि पैशाच्या, मानसन्मानाच्या लोभानें त्यांना चांगल्या म्हणेल ही त्यांची अपेक्षा. त्यामुळें कविता वाचून दाखवून त्यानें सोहिरोबांना अभिप्राय विचारला. त्यावर "ज्या काव्यांत सच्चित् आनंदरूप परमात्म्याची स्तुति व भक्ति नाहीं, प्रसाद नाहीं, तें काव्य म्हणजे तांदुळावांचून असलेलें टरफल, धान्याशिवाय एकदाट लागलेलीं कणसें, आत्मा नसलेलें सुंदर शरीर होय." असा अभिप्राय सोहिरोबांनीं व्यक्त केला. हा सोहिरोबांचा आपल्या काव्यावरचा अभिप्राय ऐकून महादजी रागानें लालबुंद झाला. भर दरबारांत झालेल्या या अपमानानें तो सोहिरोबा व जिवबा दादा बक्षी यांच्याकडे रागानें पाहूं लागला. त्याबरोबर शांतपणें सोहिरोबा दरबारांतून उठले. महादजीकडे एक तीव्र कटाक्ष टाकून

ते गरजले " अवधूत नहीं गरज तेरी, हम बेपरवां फकीरी, दौलत देख दिवाना मेरी, अपना मौज न करना फेरी, जब सोहिरा तख्तपर बैठे, तब सब दुनियां ××× पर बैठे " येवढें बोलून ते दरबारांतून निघून गेले.

यानंतर सोहिरोबांच्या काव्याला पौर्णिमेचें उधाण आलें. त्यांच्या काव्यातून ब्रह्मानंद व काव्यानंद दुथडीं भरून वाहूं लागला. दूरदूरचे लोक त्यांच्या दर्शनानें पावन होण्याकरतां, हा काव्यरस लुटण्याकरतां येऊं लागले. सोहिरोबांनीं अक्षय बोध, महदनुभवेश्वरी, पूर्णाक्षरी, अद्वयानंद, सिद्धांतसंहिता हे ग्रंथ, शिवाय अभंग, सवाया, श्लोक, आरत्या, दोहे इत्यादि पांच हजारांवर चरल्या. त्याशिवाय सोहिरोबांची आध्यात्मिक बखर हा एक ग्रंथ आहे. त्यांच्या काव्याची साऱ्या भारतभर कीर्ति दरवळली.

असा हा महान् सारस्वत शके १७७१ मध्यें, ज्या मार्गानें श्री मुक्ताबाई व श्री तुकाराम महाराज लोकांना अज्ञात असलेल्या मार्गानें आपलें जीवनपुष्प ब्रह्मरूप करते झाले, त्याच मार्गानें आपली ज्ञानज्योत ब्रह्मरूप करता झाला. सकाळीं त्यांच्या शिष्यांना त्यांच्या गादीवर एक चिठ्ठी आढळली. त्या चिठ्ठीवर लिहिलें होतें " दिसणें हे सरले, अवघे प्राक्तन हे मुरले, आलों नाहीं, गेलों नाहीं, मध्यें दिसणें हे भ्रांती, जागृत होता स्वप्नचि हरपे, कर्पूर न्यायें जग हरले। सगुण स्वरूपीं निर्गुण ठेले, अनुभव हरले, स्वरूप कळे।" बांद्याच्या या महान् सारस्वताचीं भजनें व दोहे अजून उत्तर भारतांत व इतरत्र मोठ्या प्रेमानें गाइले जातात. सावंतवाडीच्या व रत्नागिरी जिल्ह्याच्या साधुकवीचें बांद्यांत स्मारक करणें हें साऱ्यांना भूषणास्पद ठरेल. रत्नागिरी जिल्ह्याच्या या महान् सुपुत्राला माझे अनंत प्रणाम !!

• • •

[illegible] ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३६०७२ दि: [illegible]
क्रमांक ३७२ नों दि: [illegible]